**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी.** : अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु.शी.** : सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

(चर्चा पुढे सुरु......)

**उप सभापती** : अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेवर काल सन्माननीय सदस्य श्री.प्रवीण दटके हे ऑनलेग होते. आता त्यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी. माझी सर्वच सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी कृपया वेळेचे बंधन पाळून मला कामकाज पार पाडण्यास सहकार्य करावे.

श्री.प्रवीण दटके : सभापती महोदया, मी काल ऑनलेग होतो. मी काल सांगितल्याप्रमाणे या वर्षीच्या अर्थसंकल्पात जुन्याच घोषणांची पुनरावृत्ती असल्यामुळे मी माझ्या भाषणात पुन्हा त्या बाबतचा उल्लेख करणार नाही. परंतु मी सांगू इच्छितो की, सरकार कशाप्रकारे स्वत:चीच पाठ थोपटून घेत आहे. देहू-पंढरपूर, आळंदी-पंढरपूर, सुरत-चेन्नई इत्यादी रस्त्यांचे प्रकल्प माननीय केंद्रीय मंत्री श्री.नितीनजी गडकरी यांच्या पुढाकाराने महाराष्ट्रात सुरु आहेत. सीआरएफमुळे रस्ते विकासाला गती मिळाल्याची बाब प्रत्येक पक्षातील नेते मंडळी मान्य करते. वास्तविक पाहता राज्य शासनाने अर्थसंकल्पामध्ये रस्ते विकासाच्या योगदानाबद्दल माननीय केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरीजी यांचे मोठ्या मनाने अभिनंदन करावयास पाहिजे होते. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांचे मन मोठे आहे हे आम्हाला माहीत आहे. एनएचआय प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यात ८८ प्रकल्प सुरु आहेत. राज्यात १३,०८१ कि.मी. लांबीच्या रस्त्यांची कामे सुरु आहेत. केंद्रीय एनएचआय, सार्वजनिक बांधकाम विभाग इत्यादींच्या प्रकल्पांची अंदाजित किंमत १ लाख ६४ हजार कोटी रुपये आहे. या माध्यमातून मी माननीय केंद्रीय मंत्री श्री.नितीनजी गडकरी यांचे आभार मानून त्यांचे अभिनंदन करतो.

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दटके....

सभापती महोदया, नागपूर ही राज्याची उप राजधानी आहे. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस, माननीय श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांचे सरकार असताना नागपूर शहरातील सिमेंट रस्त्यासाठी एक पॅकेज मिळत होते. महानगरपालिका १०० कोटी रुपये, एनआयटी १०० कोटी रुपये अशा प्रकारचे पॅकेज मिळत होते. परंतु गेल्या दोन वर्षांपासून हे पॅकेज मिळणे बंद आहे. माझी आपल्या माध्यमातून विनंती आहे की, उप राजधानी असलेल्या नागपूर शहरासाठी हे पॅकेज सुरु करावे.

सभापती महोदया, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या विषयावर मी काल बोलल्यामुळे मी आता त्याची पुनरावृत्ती करणार नाही.

सभापती महोदया, मा.परमपूज्यनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून बांधण्यात येत आहे. नागपूर महानगरपालिका या स्मारकावर खर्च करीत आहे. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री व माननीय श्री.नितीनजी गडकरी केंद्रीय मंत्री असताना भट सभागृहाला जसे अनुदान दिले त्याच धर्तीवर मा.हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाला किमान १०-१५ कोटी रुपयांची मदत करावी अशी आमची मागणी आहे. माननीय वित्त मंत्र्यांनी यासाठी तरतूद करावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, नागपूरला दोन वैद्यकीय महाविद्यालय असल्यामुळे अद्यापपावेतो त्या ठिकाणी जिल्हा रुग्णालय झालेले नाही, ही फार दुर्दैवी गोष्ट आहे. मागच्या सरकारने नागपूरच्या पश्चिम भागात जिल्हा रुग्णालय मंजूर केले होते. याबद्दल तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस आणि तत्कालीन माननीय पालकमंत्री श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांचे मी अभिनंदन करतो. परंतु दोन वर्षांपूर्वी मंजूर केलेल्या जिल्हा रुग्णालयाला वितरित केलेला निधी अजूनपर्यंत मिळाला नाही. त्या रुग्णालयाच्या इमारतीचे अर्धवट काम आहे तसेच पडून आहे. तेथील कर्मचारी, यंत्रसामुग्री, आस्थापना या सर्व बाबींसाठी या राज्य सरकारने एकही पैसा उपलब्ध करुन दिला नाही. सभापती महोदया, या राज्य सरकारने कोविडच्या काळात सुद्धा नागपूरच्या बाबतीत सावत्रपणाची भूमिका दाखविली. मी राज्य सरकारला आवाहन

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दटके....

करतो की, नागपूरच्या जिल्हा रुग्णालयासाठी आवश्यक तेवढा निधी वितरित करुन ते रुग्णालय तत्काळ सुरु करावे.

सभापती महोदया, नागपूर येथे मेयो वैद्यकीय महाविद्यालय आहे. या वैद्यकीय महाविद्यालयाच्या माध्यमातून कॅन्सर रुग्णालयाच्या नवीन इमारतीसाठी जवळपास २७० कोटी रुपयांचा निधी मागच्या सरकारने मंजूर केला होता. परंतु यामध्ये विडंबना अशी आहे की, त्या रुग्णालयाच्या उपकरणांसाठी अगोदर निधी आला आणि इमारतीच्या बांधकामासाठी निधीच उपलब्ध नाही. नागपूर येथे छत्तीसगड, मध्य प्रदेश, ओरिसा या राज्यांतून आणि विदर्भातील अकोला पर्यंतच्या भागातून रुग्ण उपचारासाठी येतात. माझी विनंती आहे की, नागपूर वैद्यकीय महाविद्यालयासाठी मागच्या सरकारने मंजूर केलेला निधी तत्काळ वितरित करण्यासाठी शासनाला आदेश द्यावेत.

सभापती महोदया, गेल्या १४ मार्च पासून २० वैद्यकीय महाविद्यालयाचे प्राध्यापक संपावर आहेत. या २० वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये कोणतीही शस्त्रक्रिया होत नाही. माझी विनंती आहे की, सरकारने या प्राध्यापकांच्या मागण्यांबाबत योग्य ती दखल घेऊन त्यांचा संप ताबडतोब मिटविण्यासाठी प्रयत्न करावेत.

सभापती महोदया, कोविड काळात कर्तव्य पार पाडत असताना काही लोक मृत्युमुखी पडले. नागपूर येथील हेड कॉन्स्टेबल श्री.संतोश तिवारी यांना रस्त्यावर मूर्च्छित येऊन ते मृत्युमुखी पडले. गेल्या सव्वा वर्षापासून या मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना शासनाकडून आर्थिक मदत मिळण्यासाठी आम्ही पाठपुरावा करीत आहोत. परंतु अजूनपर्यंत त्या व्यक्तीच्या कुटुंबियांना त्यांच्या हक्काची ५० लाख रुपयांची आर्थिक मदत मिळालेली नाही. माननीय गृह राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. कृपया त्यांनी या विषयाची नोंद घेऊन या प्रकरणात लक्ष घालावे.

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दटके....

सभापती महोदया, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ हे विदर्भात असून त्या ठिकाणी शेती संदर्भातील संशोधन होत असते. या विद्यापीठाची इमारत ११६ वर्षे जुनी आहे. त्या विद्यापीठाचे अधिष्ठाता, ट्रस्ट यांनी इमारतीच्या दुरुस्ती व देखभालीसाठी ३ कोटी रुपयांची मागणी सरकारकडे केली आहे. ती इमारत हेरिटेज असून अतिशय सुंदर इमारत आहे. परंतु ती इमारती जुनी असल्यामुळे केव्हाही कोसळू शकते. माझी विनंती आहे की, या इमारतीच्या देखभाल व दुरुस्तीसाठी ३ कोटी रुपये मंजूर करावेत.

सभापती महोदया, विदर्भात कापूस, धान, संत्रा, तूर, चना ही मुख्य पिके आहेत. पुणे असेल किंवा पश्चिम महाराष्ट्रात अनेक ठिकाणी त्या भागातील पिकांचा विचार करता विशेष प्रक्रिया प्रकल्प उभे करण्यात येतात. कापूस पीक असेल तर त्या ठिकाणी सूतगिरण्या असतात, धान असेल तर पॅकेजींग युनिट असते, संत्रा पीक असेल तर त्यासाठी वेगळे युनिट असते. पश्चिम महाराष्ट्राच्या धर्तीवर विदर्भात सुद्धा सूतगिरण्या किंवा प्रक्रिया केंद्रे सुरु करावीत. तूर आणि चना हे यवतमाळ, अकोला या भागातील मुख्य पीक आहे. या भागात मोठ्या प्रमाणावर शेतकरी आत्महत्या होतात. या आत्महत्या कोणाची सत्ता असताना होतात या बाबतीत मला राजकारण करायचे नाही. या भागात तूर, चना डाळींच्या उत्पादनासाठी काही प्रकल्प करु शकलो, शेतकऱ्यांना रोजगार उपलब्ध करुन देऊ शकलो तर त्या भागातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी होऊ शकतील, हे मी सरकारच्या निदर्शनास आणून देतो.

सभापती महोदया, सध्या कमी क्षेत्राची शेती विकण्याचे काम सुरु आहे. माझी विनंती आहे की, या वर्षी शेती खरेदीवरील मुद्रांक शुल्क वाढविण्यात येऊ नये.

सभापती महोदया, पर्यावरण व पर्यटन विभागाच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, गोरेवाडा प्राणी संग्रहालयात आफ्रीकन सफारी सुरु करण्यासाठी १०० कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाने मंजूर केला आहे, याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. नागपूर ही भूमी गोंड राजाची आहे, आदिवासी बांधवांची आहे, मूल निवासींची आहे.

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दटके....

त्यांचे दैवत असलेल्या भगवान मुंडा यांचे स्मारक १०० कोटी रुपयांतून गोरेवाडा प्राणी संग्रहालयात उभारावे, अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदया, पूर्वी नागपूर शहर हे हातमागावर साडी किंवा कापड विणण्याचे केंद्र होते. मुस्लीम आणि हलबा कोष्टी या समाजातील विणकर लोक मोठ्या प्रमाणात हातमागाच्या व्यवसायात आहेत. हलबा समाजाचे अनेक प्रश्न असून त्यांना आरक्षण मिळण्यास अडचणी आहेत, त्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळत नाही. त्या समाजातून अभियांत्रिकी, डॉक्टर वा इतर पदव्या घेतलेले विद्यार्थी आज घरी बसलेले आहेत. त्या समाजातील तरुण मुले देशोधडीला लागले आहेत. ज्यांचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन झालेले नाही त्या मुस्लीम किंवा हलबा कोष्टी विणकरांचे अनुदान बंद आहे. माझी विनंती आहे की, ते अनुदान तत्काळ अदा करण्यात यावे. तसेच त्या ठिकाणी कापडाचे पॅकेजींग सेंटर सुरु केले तर त्या भागातील बेरोजगारी कमी होऊन एकप्रकारे हलबा समाजाला न्याय मिळू शकेल.

सभापती महोदया, बालेवाडीच्या धर्तीवर मानकापूर स्टेडीयम येथे एखादी छोटे क्रीडा विद्यापीठ स्थापन करावे. माननीय क्रीडा मंत्री श्री.सुनील केदार हे नागपूरचे आहेत. माझी त्यांना विनंती आहे की, त्यांनी या विषयाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे.

सभापती महोदया, नागपूर शहरात किमान ४५०-५०० क्रीडांगणे, १२३ उद्याने आहेत. याकडे एनआयटीचे लक्ष आहे. राज्य सरकारने एनआयटीला अनुदान देऊन या सर्व गोष्टींकडे लक्ष द्यावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, नागपूर भागातील तरुणांच्या दृष्टीने एक विषय प्रलंबित आहे. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस आणि माननीय श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सरकारच्या काळात २०१६ मध्ये नागपूर विमानतळाच्या बाबतीत खाजगी टेंडर झाले होते. त्या टेंडरच्या अनुषंगाने आरएफक्यूमध्ये ५ लोक आले होते. ज्यावेळी

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दटके....

आरएफपी झाला त्यावेळी जीएमआर आणि जीव्हीके या दोन कंपन्या २०१८ मध्ये आल्या. त्यावेळी ग्रॉस रेव्हेन्यूच्या पर्सेंटेजवर निगोशिएशन करुन जीएमआर कंपनीने जवळपास १४.४९ टक्क्यांची निविदा मान्य केली. तद्नंतर हा विषय दिल्ली स्तरावर सिव्हील एव्हीएशन, एएआयकडे गेला. परंतु या कामामुळे नुकसान होत असल्यामुळे ती निविदा प्रक्रिया रद्द केली गेली. तद्नंतर संबंधित कंपनीने माननीय उच्च न्यायालयात दावा दाखल केला. ती कंपनी उच्च न्यायालयात जिंकली. आता हे प्रकरण माननीय सर्वोच्च न्यायालयात सुरु आहे. माझी विनंती आहे की, राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात विशेष वकिलांची नियुक्ती करुन आपल्या बाजूने निर्णय होण्यासाठी प्रयत्न केला आणि हे टेंडर परत मिळविले तर विदर्भातील उद्योगांना, आयटी इंडस्ट्री किंवा टालसारख्या प्रकल्पांना फार मोठी मदत होईल व त्या माध्यमातून नागपूरमध्ये मोठे सेंटर सुरु होईल. माझी विनंती आहे की, या कामासाठी राज्य सरकारने योग्य ती कार्यवाही करावी.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य, आपली वेळ संपत आली आहे. आपण एका मिनिटात भाषण संपवावे.

श्री.प्रवीण दटके : सभापती महोदय, अन्न, व नागरी पुरवठा विभागाच्या बाबतीतील एक विषय आहे. नागपूर शहराची लोकसंख्या ९.५ लाख असून जवळपास ६७ हजार रेशनकार्ड आहेत. परंतु कोविड काळात प्राधान्यगटात न आल्यामुळे अडीच-तीन लाख रेशनकार्ड एनपीएसधारक झाले असून त्यांना अन्नधान्य मिळत नाही.

नंतर श्री.कांबळे....

श्री. प्रवीण दटके ....

सदर बाबतीत आंदोलन झाले. आम्ही माननीय मंत्री श्री. छगन भुजबळ यांना भेटलो, सर्वजणांना भेटलो. सरकारने याबाबतीत निर्णय करावा. काल सरकारने विजेच्या बाबतीत निर्णय केला आणि ३ महिने कनेक्शन कापणार नाही असे म्हटले, त्याच धर्तीवर अन्नधान्य विभागाचा देखील विचार करावा. विद्युत विभाग शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन कापणार नाही, तसे शहरातील स्लम, सरकारी योजना म्हणजे पंतप्रधान आवास योजना, रमाई आंबेडकर आवास योजना यांची घरे अशा सर्व ठिकाणी तेथील गोरगरीब माणसांना देखील अशी सूट देऊन, त्यांना इन्स्टॉलमेंट देऊन त्यांचे विजेचे कनेक्शन कापू नये अशी माझी आपल्यामार्फत सरकारला विनंती आहे. नागपूरसह विदर्भाचा कायापालट करुन टाकावा. माझे सरकारला आवाहन आहे. आम्ही रोज आरोप करतो की, आपण विदर्भविरोधी आहात, आपण मराठवाडाविरोधी आहात.

सभापती महोदया, माझे आपल्या माध्यमातून सरकारला आवाहन आहे की, नागपूरसह विदर्भाचा कायापालट करुन विदर्भविरोधी महाविकास आघाडी हा धब्बा पुसून टाकावा. तशी संधी अर्थसंकल्पाच्या माध्यमातून सरकारला आहे. आपण सरकारला निर्देश द्यावेत. विदर्भ, मराठवाडा येथील ग्रामीण भागाकरिता विशेष निधी उपलब्ध करुन द्यावा असे मी सरकारला आवाहन करतो. आपण मला बोलण्यास संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

----

असुधारित प्रत

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांची नावे क्रमाने सांगते. मी यादी वाचल्यानंतर कोणीही हात वर करु नये. यादीमध्ये सर्वांची नावे आहेत. पण आपल्या माहितीस्तव मी यादी वाचते. माझी सभागृहाला सहकाराची विनंती आहे. सभागृहाचे कामकाज सुरु होऊन १० मिनिटे झाली आहेत. आता कोणी सन्माननीय सदस्य सकाळी ११ वाजता, ११.१५ वाजता येतील आणि नाव घेण्याबाबत आग्रह करतील. मी त्यांचे नाव घेणार नाही. तुम्ही कोणीही आग्रह करायचा नाही हे मला तुम्हाला सांगायचे आहे.

अर्थसंकल्पावरील चर्चेत भाग घेण्यासाठी सन्माननीय सदस्यांच्या नावामध्ये शिवसेना पक्षाचे सन्माननीय सदस्य सर्वश्री. विलास पोतनीस, सुनील शिंदे, रवींद्र फाटक यांची नावे आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून सन्माननीय सदस्य सर्वश्री. विक्रम काळे, अनिकेत तटकरे आहेत. सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हण आता अनुपस्थित आहेत. सन्माननीय सदस्य सर्वश्री. अरुण लाड, अब्दुल्लाह खान दुर्राणी व संजय दौंड हे ३ सन्माननीय सदस्य अनुपस्थित आहेत. काँग्रेस पक्षाकडून सन्माननीय सदस्य श्री. जयंत आसगावकर, सन्माननीय सदस्या डॉ. प्रज्ञा सातव, सन्माननीय सदस्य डॉ. वजाहत मिर्झा, सन्माननीय सदस्य श्री. अमरनाथ राजूरकर, सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे असा क्रम आहे. भारतीय जनता पक्षाच्या सन्मानीय सदस्यांमध्ये सन्माननीय सदस्य ॲड निरंजन डावखरे, सन्माननीय सदस्य सर्वश्री. भाई गिरकर, सदाभाऊ खोत, विनायक मेटे, महादेव जानकर, चंद्रशेखर बावनकुळे, सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील, सन्माननीय सदस्य सर्वश्री. नागोराव गाणार, रमेशदादा पाटील, सन्माननीय सदस्य ॲड निलय नाईक, सन्माननीय सदस्य सर्वश्री. रामदास आंबटकर, गोपिचंद पडळकर असा क्रम पक्षाने दिलेला आहे. सन्माननीय सदस्य डॉ. परिणय फुके यांचे नाव यामध्ये नाही तरी मी त्यांच्या नावाचा अंतर्भाव करते. ....(अडथळा).... शेवटच्या सन्माननीय सदस्यांना देखील न्याय मिळायला नको का ? तुम्ही ते ठरवू नका. तुम्ही कसे बोलत आहात यावर ते अवलंबून आहे. मी नावे वाचली आहेत. सचिवालयाने सन्माननीय सदस्य डॉ. परिणय फुके यांच्या नावाचा अंतर्भाव करावा. आता सन्माननीय सदस्य श्री. विलास पोतनीस यांनी भाषण सुरु करावे.

श्री. शंभूराज देसाई : सभापती महोदया, अर्थसंकल्पावरील चर्चेचा तिसरा दिवस सुरु आहे. आजच्या कामकाजामध्ये सकाळच्या सत्रात तिसरा व शेवटचा दिवस दाखविला आहे. शासनाच्या वतीने मला देखील उत्तर देण्यासाठी पुरेसा वेळ पाहिजे. माझी सभागृहाला विनंती राहील की, सकाळच्या सत्रामध्ये उत्तरासह ही चर्चा आज संपविता आली तर बरे होईल. कारण विधानसभेत देखील खूप कामकाज आहे. विधानसभेत देखील लक्षवेधी सूचना आहेत. माझी विनंती आहे की, आपण चर्चा उत्तरासह संपवू या. आज विधानसभेत उत्तर होणार आहे. ....(अडथळा).... त्यामुळे तसे होणार नाही. एकाच वेळी दोन्ही उत्तरे आली पाहिजेत. विधानसभेत अर्थसंकल्पावरील चर्चेला दोनच दिवस दिले होते. आपल्याकडे तीन दिवस दिले आहेत. विधानसभेत चर्चा संपवून आज उत्तर आहे. माझी विनंती आहे की, किमान प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर लगेच आजच उत्तर घ्यावे. सकाळी चर्चा संपवावी. प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर उत्तर घ्यावे.

**उप सभापती** : मी माननीय मंत्री व सभागृहाला सांगू इच्छिते की, तुम्ही माननीय सभापती यांच्याकडे म्हणणे मांडावे. काल बराच विचारविनिमय करुन कामकाज ठरविले आहे. तुम्ही चर्चा करुन ठरविले की, आम्ही दुपारीच उत्तर घेणार आणि माननीय मंत्र्यांनी मान्य केले तरी ते मान्य होणार नाही. मग तुम्ही चर्चेत कशासाठी वेळ घालवित आहात ? सन्माननीय सदस्य श्री. विलास पोतनीस यांनी त्यांची संधी सन्माननीय सदस्य श्री. रवींद्र फाटक यांना दिली आहे.

डॉ. परिणय फुके : सभापती महोदया, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे.

**उप सभापती** : आपण खाली बसावे. आपण पॉईंट ऑफ प्रोसिजर लिहून द्यावा.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदया, आमची नावे घेतली नाहीत.

**उप सभापती** : आपली नावे घेण्याअगोदरच काही विषय सुरु झाले होते. सन्माननीय सदस्य सर्वश्री. जयंत प्र. पाटील, कपिल पाटील, बाळाराम पाटील यांची नावे आहेत.

असुधारित प्रत

श्री. रवींद्र फाटक (ठाणे तथा पालघर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, सभागृहात सादर केलेल्या सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पाच्या सर्वसाधारण चर्चेत बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, शासनाने स्विकारलेला कृषी, आरोग्य, मनुष्यबळ विकास, दळणवळण व उद्योग हा पंचसूत्री कार्यक्रम निश्चितच महाराष्ट्र राज्याला विकासाच्या दिशेने घेऊन जाईल. पंचसूत्री कार्यक्रमामध्ये येत्या तीन वर्षांत ४ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीमुळे निश्चितच १ ट्रिलियन डॉलर महाराष्ट्राची अर्थव्यवस्था होईल याचा मला अभिमान वाटतो. महाराष्ट्र राज्याच्या वतीने ३०० एकरमध्ये होत असलेली पहिली वैद्यकीय वसाहत 'इंद्रायणी मेडिसिटी' चे मी स्वागत करतो. सर्व उपचार पद्धती एकाच ठिकाणी उपलब्ध होणार असल्याने निश्चितच त्याचा फायदा जनतेला होईल. आदिवासी विभागामार्फत कातकरी समाजासाठी बहुउद्देशीय संकुल उभारण्यासाठी पालघर जिल्ह्यातील तलासरीमधील सवणे येथील जागेची निवड केल्याने मला अतिशय आनंद होत आहे.

सभापती महोदया, शासनाने स्विकारलेल्या सन २०२१ ते सन २०२५ साठी महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरणाचे मी अभिनंदन करतो. इलेक्ट्रिक वाहनांमुळे शहरांमधील प्रदुषणाचे प्रमाण कमी होण्यास नक्कीच मदत होईल. माननीय पर्यावरण मंत्री श्री. आदित्यजी ठाकरे साहेब यांनी देखील चांगले निर्णय पर्यावरण विभागाबाबत घेतले आहेत. मी सांगू इच्छितो की, डोंबिवली, अंबरनाथ व बोईसर एमआयडीसीमधून होणाऱ्या प्रदुषणाबाबत त्यांनी कठोर निर्णय घेतले आहेत. मलंगगड डोंगरातून अंबरनाथच्या शिवमंदिर परिसरातून वाहणारी वालधुनी नदी प्रदुषणाचा विळख्यात अडकली होती. त्यावरही त्यांनी मार्ग काढून प्रदुषणविरहित करण्याचा प्रयत्न केला. कल्याण शहरात प्रवेश करायचा म्हणजे अगोदर वाहतूक कोंडीला तोंड द्यावे लागत होते. अनेक तास प्रवासात वाया जात होते. परंतु दुर्गाडी पूल व पत्री पूल सुरु झाल्यापासून वाहतूक कोंडी होणे बंद झाले आहे. वसई,

असुधारित प्रत

विरारजवळील नायगाव येथील पुलाचे काम पूर्ण झाल्यावर निश्चितच लोकांना त्याचा फायदा होऊ शकतो.

श्री. रवींद्र फाटक ....

सभापती महोदया, वसई, विरार, मिरा-भाईंदर, डोंबिवली, कल्याण, वाशी, ऐरोली, ठाणे व बेलापूर ही शहरे जलमार्गाने जोडली जाणार असल्याने रेल्वेवर येणारा ताण नक्कीच कमी होईल. या सर्व योजना राबविताना मेरीटाईम बोर्डाकडून आकारण्यात येणाऱ्या करात तीन वर्षांची सूट देखील दिली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात चिपी विमानतळ झाल्याने आम्हा कोकणवासियांना याचा मोठा फायदा होत आहे. शासन रत्नागिरी येथे विमानतळावर उभारण्यासाठी गती देत असल्याने कोकणच्या पर्यटनात मोठ्या प्रमाणात वाढ होईल आणि स्थानिकांच्या रोजगारात वाढ होईल. एमएमआरडीएमार्फत उभारण्यात येत असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माननीय बाळासाहेब ठाकरे ही स्मारके पूर्ण होत असल्याने आम्ही सर्व सन्माननीय सदस्य आनंदित आहोत. मुंबईपासून हाकेच्या अंतरावर असलेला पालघर जिल्हा पर्यटनदृष्ट्या विकसित केला जाऊ शकतो. मी स्वतः अनेक वेळा सभागृहात मागणी देखील केली होती. पालघर जिल्ह्यातील जव्हारला या शासनाने पर्यटनाचा "ब" दर्जा दिल्याबद्दल मी शासनाचे आभार व्यक्त करतो. माननीय मुख्यमंत्री श्री. उद्धवजी ठाकरे साहेबांनी स्वतः जव्हारला भेट देऊन पर्यटन दृष्टीने जव्हारचा कसा विकास केला जाऊ शकतो याबाबत स्थानिकांशी चर्चा देखील केली आहे. अर्थसंकल्पात जव्हारच्या पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन दिल्याने माननीय मुख्यमंत्र्यांचे व सरकारचे मी विशेष आभार मानतो.

सभापती महोदया, मच्छिमारांचा प्रश्न आहे. माननीय मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मच्छिमारांच्या अनेक समस्या आपल्या राज्यात आहेत. मच्छीमार शेतकऱ्यांप्रमाणेच अन्नदाता आहे. महाराष्ट्राने दिनांक २३ नोव्हेंबर, २०२१ रोजी मासेमारी कायद्यात बदल केला. परंतु अंमलबजावणी कक्ष नसल्याने योग्य कार्यवाही होत नाही. मच्छिमारांचा डिझेल परतावा, सागरी जिल्ह्यात अत्याधुनिक मासळी

असुधारित प्रत

बाजार यासारख्या मागण्या प्रलंबित आहेत. शासनाने यावर लक्ष द्यावे अशी मी विनंती करतो.

श्री. रवींद्र फाटक ....

सभापती महोदया, मुंबईमध्ये झोपडपट्टी सुधारण्यासाठी निधी उपलब्ध होतो त्याप्रमाणे आता मुंबई बाहेर देखील निधी उपलब्ध होणार असल्याने त्याचा निश्चितच ठाणे, कल्याण, उल्हासनगर, भिवंडी, मिरा-भाईंदर भागातील झोपड्यांना मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी फायदा होणार असल्याने मी शासनाचे आभार व्यक्त करतो आणि शासनाने मांडलेल्या अर्थसंकल्पास पाठिंबा देऊन मी थांबतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

----

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, या वर्षाच्या ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेमध्ये महाराष्ट्राला अनेक पदके मिळालेली आहेत. त्यासाठी केंद्र शासनाच्या क्रीडा खात्याला मी धन्यवाद देतो, त्यांनी एक चांगली सुरुवात केली आहे. शहरामध्ये व नगरपालिका क्षेत्रात क्रीडा संकुले आहेत. क्रीडा मैदाने आहेत. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणे क्रीडा मैदानांची वाताहत झाली आहे. त्या ठिकाणी अतिक्रमणे झालेली आहेत. ग्रामपंचायतीला १४ व १५ व्या वित्त आयोगातून निधी मिळालेला आहे. ग्रामपंचायतीने त्यातील काही निधी क्रीडा मैदानासाठी राखून ठेवावा अशी सूचना मी बजेटच्या माध्यमातून शासनाकडे करीत आहे. ग्रामीण भागातून खेळाडू तयार होण्याचे प्रमाण कमी आहे. गाव तेथे क्रीडांगण ही भूमिका राज्य शासनाने घ्यावी अशी मी मागणी करीत आहे. सभापती महोदया, मी बजेटवर भाषण करीत असताना पुढील वेळी त्यासाठी तरतूद झाली पाहिजे अशी माझी अपेक्षा असते. गॅलरीमध्ये अधिकारी बसलेले असतात, मी मांडलेल्या मुद्यांची ते दखल घेतात काय ? मी ज्या सूचना भाषणात करतो त्या सूचना संबंधित मंत्री महोदयांकडे किंवा विभागाकडे जातात काय ? मागील बजेटच्या वेळी तालुका पातळीवर कबड्डीसाठी मॅटची तरतूद करावी अशी मागणी केली होती. मी जिल्हा कबड्डी असोसिएशनचा अध्यक्ष आहे. राज्य कबड्डी असोसिएशनचा सदस्य आहे. राज्य कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष उप मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री स्वत: आहेत. मागील वेळी उप मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, तुमची सूचना चांगली आहे. यावर्षीच्या बजेटमध्ये त्यासाठी तरतूद करु. तशी तरतूद केल्याचे मला बजेटमध्ये दिसत नाही.

सभापती महोदया, शासन डिझेल परतावा मच्छिमार बांधवांना देते. त्यावर राज्य शासन एका वर्षात ३०० ते ४०० कोटी रुपये खर्च करते. पुरवणी मागण्यांमधून डिझेल परताव्यासाठी शासन तरतूद करते. मी अशी मागणी केली होती की, यासाठी बजेटमध्ये ५०० कोटी रुपयांची तरतूद करावी. त्याबाबत मंत्री महोदयांनी होकार दिला होता. प्रत्यक्षात याबाबत कार्यवाही झाली नाही. बजेटमध्ये तरतूद नसल्यामुळे

श्री.जयंत प्र.पाटील....

विनाकारण राज्य शासनाची बदनामी होते. अनेक वेळा त्यासाठी मागण्या कराव्या लागतात. लोक शिष्टमंडळ घेऊन येतात. त्यासाठी अनेक भानगडी होतात. डिझेलचा परतावा जिल्हावाईज नाही तर होडीवाईज दिला पाहिजे. सिंधुदुर्गमध्ये कमी होड्या असतील, मुंबईत जास्त होड्या असतील, रत्नागिरी मध्ये कमी होड्या असतील. रायगडमध्ये होडीवाईज डिझेल परतावा दिला पाहिजे. ज्या जिल्ह्यांचे मंत्री महोदय असतात ते त्यांच्या जिल्ह्यासाठी डिझेल परताव्याची रक्कम जास्त प्रमाणात देतात. आतापर्यंत जे झाले ते मी सांगत आहे. डिझेल परताव्याची तरतूद बजेटमध्ये केली पाहिजे अशी माझी मागणी आहे. त्यामुळे तेथील लोकांना न्याय मिळेल. यासाठी आम्हाला पुन्हा पुन्हा मागणी करावी लागणार नाही.

सभापती महोदया, जेएसडब्ल्यू पेण येथील कंपनीत विश्वनाथ घावन या ३३ वर्षे वयाच्या तरुणाचा मृत्यू झाला. आजूबाजूच्या गावातील दोन ते तीन हजार लोक तेथे जमा झाले होते. त्या भागातील लोकप्रतिनिधी आले होते मी स्वत: गेलो होतो. विश्वनाथ घावन यांच्या वारसांना ३० लाख रुपये नुकसान भरपाई देण्याची आमची मागणी सदर कंपनीने मान्य केली. त्यावेळी अशी तडजोड करण्यात आली होती की, कोणावरही गुन्हे दाखल करायचे नाहीत. कंपनीमध्ये मृत्यू झाला तर कंपनीवर गुन्हा दाखल करायचा नाही. तेथे जमाव जमा झाल्यावर थोडीफार मारहान झाली तरी गुन्हे दाखल करायचे नाही असे ठरले होते. असे असताना कंपनीने त्या गावातील २५ ते ३५ वयागटातील ४१ तरुण मुलांवर गुन्हे दाखल केले. जे तरुण तेथे उपस्थित नव्हते त्यांची नावे नमूद करुन त्यांच्यावर गुन्हे दाखल केले. हे तरुण गेच्या पाच वर्षापासून न्यायालयात फेऱ्या मारीत आहेत. आम्ही तडजोड करण्यास सांगितले असताना कंपनी आता आठमुठे धोरण स्वीकारीत आहे. तेथील एस.पी.यांनी बैठक घेतली तरी हा प्रश्न सुटलेला नाही. मी काल एस.पी.यांना फोन लावला होता. काल न्यायालयात तारीख होती. या मुलांवर गुन्हे दाखल असल्यामुळे त्यांना पासपोर्ट मिळत नाही. यातील ७५ टक्के मुले इंजिनिअर आहेत. त्यांना नोकरीवर कोणी घेत नाही. त्यांची वयोमर्यादा वाढत आहे. माननीय न्यायालयाने देखील सांगितले की, यामध्ये तडजोड

श्री.जयंत प्र.पाटील.....

होऊ शकते. याबाबत मंत्री महोदयांनी एस.पी.यांना तातडीने तडजोड करण्याच्या सूचना द्याव्यात व तेथील तरुणांना न्याय द्यावा.

सभापती महोदया, सोलापूर जिल्ह्यातील सांगोला येथे १२ ते १३ हजार शेतकऱ्यांना विम्याचे पैसे मिळाले नाहीत म्हणून शेतकरी कामगार पक्षातर्फे श्री.बाबासाहेब देशमुख व श्री.अनिकेत देशमुख यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढला होता. सोलापूर जिल्ह्यात विमा कंपनीकडून एकाही शेतकऱ्याला नुकसान भरपाईची रक्कम मिळाली नाही. वीज कनेक्शन तोडण्यात आलेली आहेत. विधानसभेत काल शासनाने जाहीर केले की, जी कनेक्शन तोडली ती जोडून देण्यात येतील व तीन महिने वीज कनेक्शन तोडण्यात येणार नाही. त्यासाठी मी शासनाला धन्यवाद देतो. येथील शेतकऱ्यांना न्याय दिला पाहिजे. सोलापूर जिल्ह्यात टेंभू व म्हैसाळ या धरणातून आता पाणी आले आहे. त्या भागातील शेतकऱ्यांनी पाणी नसताना रोजगार हमी योजनेतून फळबागा तयार केल्या. तेथून रोज तीन ते चार ट्रेन डाळिंबाच्या भरुन जात असतात. इतक्या मेहनतीने तेथील शेतकऱ्यांनी फळबाग उभारल्या आहेत. डाळिंब बागांवर मोठ्या प्रमाणात रोगराई येते त्याबाबत कृषी खाते लक्ष देत नाही. त्याचा निषेध करण्यासाठी मोर्चा काढला होता. या शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदया, मी अनेक वेळा माझ्या तालुक्यातील प्रश्न अनेक आयुधांचा वापर करुन विचारले आहेत. शेवूळ-रेवदंडा व नागांव मध्ये मोठ्या प्रमाणात माकडे आली आहेत. हा भाग बागायती आहे. वादळामध्ये तेथील बागा नष्ट झाल्या आहेत. तेथे माकडांचा त्रास मोठ्या प्रमाणात होत आहे. याबाबत वन विभागाने योजना आखून ही माकडे दुसरीकडे कशी नेता येतील व त्यांच्यापासून येथील शेतकऱ्यांना संरक्षण कसे देता येईल याबाबत बैठक घ्यावी. वन विभागाला मी विनंती करतो की, यावर तात्पुरती नाही तर कायमस्वरुपी उपाययोजना करता येईल काय याकडे लक्ष द्यावे.

श्री.जयंत प्र.पाटील....

सभापती महोदया, रेवसरेडी या रस्त्याचे बांधकाम एमएसआरडीसी करीत आहे. तेथील रस्त्यांवरील पुलांचे बांधकाम सुरुवातीला करायचे आहे. माजी मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी रेवसरेडी या रस्त्यावरील करंजा-रेवस या पहिल्या पूलास मंजुरी दिली. एमएमआरडीएने त्यावेळी या कामासाठी ४०५ कोटी रुपयांची तरतूद केली होती. तो रस्ता आता एमएसआरडीसीकडे वर्ग करण्यात आला आहे. मी काल माहितीच्या अधिकारात एमएसआरडीसी व एमएमआरडीएला पत्र दिले आहे. या रस्त्याच्या कामाला गती दिली पाहिजे. माजी मुख्यमंत्री श्री.ए.आर.अंतुले यांचे स्वप्न होते. त्यांनी रेवसरेडी येथील पहिल्या पूलाचे भूमीपूजन करंजा येथे केले होते. माजी सन्माननीय सदस्या श्रीमती मिनाक्षी पाटील व मी श्री.ए.आर.अंतुले यांच्याकडे गेलो होतो. त्यांनी पृथ्वीराज चव्हाण यांना फोन लावला. त्यामुळे तत्कालीन मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी या रस्त्यासाठी बजेटमध्ये निधी न देता एमएमआरडीएकडून हा रस्ता करण्यात यावा अशी सूचना केली होती. एमएमआरडीएच्या बैठक क्रमांक १३४ च्या कार्यवृत्तामध्ये ते नमूद केले आहे ते कार्यवृत्त माझ्याकडे आहे.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील.....

त्या कामाला जी गती द्यावयास पाहिजे होती ती दिली गेली नव्हती. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी त्या कामाला गती दिली. आपण कृपया श्रेय लाटण्याचा प्रयत्न करु नये. ज्याने काम केले त्यानेच श्रेय घेतले पाहिजे. आपण श्रेय घेण्याचा प्रयत्न करीत आहात. माननीय मत्स्य व्यवसाय मंत्री श्री.अस्लम शेख म्हणतात की, तो पूल आम्ही बांधला. परंतु तसे नाही. मी लहान होतो तेव्हा पासून पुलाच्या उद्घाटनाचे नारळ फोडले जात होते. परंतु अद्याप ते काम झाले नाही. मी आयुष्यात कधीही माझ्या नावाचा फलक लावण्याचा आग्रह धरला नाही. मी शक्यतो भुमिपूजनाच्या कार्यक्रमासाठी जात नाही. परंतु ग्रामस्थांनी जास्तच आग्रह केला तर एखाद्या भुमिपुजनाच्या कार्यक्रमाला जावे लागते. अनेक लोक फलकावर नाव आले पाहिजे असा आग्रह धरतात. सन्माननीय सदस्य श्री.अनिकेत तटकरे यांचे फलकावर नाव आहे. परंतु माझे नाव कोठेही नाही, ही शोकांतिका आहे. म्हणून मी उल्लेख केलेला आहे. त्या फलकावर त्यांचा फोटोही छापण्यात आलेला आहे. त्यांना असे वाटते की, सदर पुलाचे काम आम्हीच मंजूर करुन घेतले. परंतु तसे नाही. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण साहेबांनी ते काम मंजूर केले होते. त्यांनी एमएमआरडीएकडून त्या कामासाठी निधीची तरतूद करुन घेतली. त्यांनी चांगल्या गोष्टी केलेल्या आहेत. आपले काय म्हणणे आहे हे मला माहिती नाही.

सभापती महोदया, नवी मुंबई येथे विमानतळ होत आहे. शेतकऱ्यांना एफएसआयच्या माध्यमातून २२ टक्के हिस्सा परत देण्याचा महत्वाकांक्षी निर्णय घेण्यात आलेला आहे. हा महत्वपूर्ण निर्णय आहे. आपल्याला प्रत्येक ठिकाणी तटकरे साहेबांचे फोटो व नाव आढळून येते, ** आमचेच आहे, आम्हीच केलेले आहे.

**उप सभापती** : कृपया आपण ** शब्द वापरु नये.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदया, मी दिलगिरी व्यक्त करतो. परंतु आमची बोलीभाषा तशी आहे. मी तो शब्द मागे घेतो.

---

** शब्द मागे घेण्यात आला.

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील.....

सभापती महोदया, साखर उद्योग अडचणीत आलेला आहे. मी स्वत: अनेक साखर उद्योगांना फायनान्स केलेला आहे. मी मागील २५-३० वर्षांपासून साखर उद्योगाला फायनान्स करीत आहे. माननीय श्री.नितीन गडकरी साहेबांनी कालच जाहीर केले की, इथेनॉलचा वापर वाढविण्यात येणार आहे. त्या माध्यमातून पेट्रोलचे दर कमी होतील. आता रशिया-युक्रेन युद्धामुळे पेट्रोलची टंचाई निर्माण होणार आहे. केंद्र शासनाच्या सहकार विभागाने व नाबार्डने त्याचे रिशेड्यूलिंग करण्यासाठी परवानगी दिलेली आहे. त्या प्रमाणे राज्य शासनाच्या सहकार विभागाने बँकांचे रिशेड्यूलिंग करण्यासाठी तातडीने अंमलबजावणी केली पाहिजे. जेणे करुन कारखाने वाचतील. ज्या पद्धतीने युरोप, अमेरिकेत उद्योगासाठी शेड्यूलिंग करण्यात आले त्या पद्धतीने आपल्या राज्यात कमीत कमी सहकार क्षेत्रात तरी ते झाले पाहिजे. रिपेमेंटची मुदत १५ वर्षे केली पाहिजे आणि पहिल्या ३ वर्षाचा हॉलिडे दिला पाहिजे. केंद्र शासनाच्या सहकार विभागाने जी योजना लागू केली त्याची राज्यात अंमलबजावणी करण्यात यावी, अशी माझी या निमित्ताने विनंती आहे.

सभापती महोदया, पर्यावरण व वस्त्रोद्योग विभागात कोरोना काळातील अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. त्या संदर्भात तातडीने बैठका घेतल्या पाहिजेत. जवळपास ३०० ते ४०० प्रकरणे प्रलंबित आहेत. आपण पर्यावरणाबाबत चर्चा करतो. माननीय उप सभापती स्वत: त्यासाठी पुढाकार घेतात. माझे असे म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी तरी किमान २-३ महिन्यात परवानग्या दिल्या पाहिजेत. खाजगी प्रोजेक्ट वेगळे आहेत. खाजगी प्रोजेक्टसाठी सुद्धा परवानग्या दिल्या पाहिजेत. शासकीय बांधकामासाठी तातडीने परवानगी देण्याची आवश्यकता आहे. राज्य शासनाने त्यासाठी स्वतंत्र निर्णय घेण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे.

सभापती महोदया, पुणे जिल्ह्यातील रहिवाशी झोन असलेल्या जागेवर जी बांधकामे आहेत त्याची गुंठेवारी होणार असून त्याचा अनेक भूमिपुत्रांना फायदा होईल. माझे सहकारी श्री.राहुल पोफळे यांनी या संदर्भात सातत्याने पाठपुरावा केलेला

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील.....

आहे. आता तेथे एकही गुंठा जागा विकण्यासाठी परवानगी मिळत नाही. ग्रामीण भागातील मुद्दा वेगळा आहे आणि शहरी भागातील मुद्दा वेगळा आहे. तेथे अडचण निर्माण झालेली आहे. तेथे जमिनीच्या वाटण्या झालेल्या असून त्यांचे रजिस्ट्रेशन करताना अडचण निर्माण होत आहे. शासनाने यामध्ये लक्ष घालावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, चक्रीवादळामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून अद्याप म्हणावी तशी नुकसान भरपाई मिळालेली नाही. मी या संदर्भात पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी बोललो होतो. मी यापूर्वी सुद्धा सांगितले की, चक्रीवादळामुळे जी झाडे पडलेली आहेत ती झाडे रोजगार हमी योजनेतून उचलण्यासाठी तरतूद करण्यात यावी. शासनाने त्याबाबत निर्णय घ्यावा अशी माझी मागणी आहे. चक्रवादळामुळे फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. झाड मोठे होण्यासाठी ७-८ वर्षे लागतात. सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांना माहिती आहे. एका झाडापासून वर्षाला किती उत्पन्न मिळते या संदर्भात कोकण कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून माहिती घेऊन ती माहिती सभागृहाला दिली पाहिजे.

सभापती महोदया, मी सभागृहाचा जास्त वेळ घेत नाही. माझे भाषण सुरु असताना आपण बेल वाजविली नाही त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे दोन शब्द संपवितो.

-------

असुधारित प्रत

**उप सभापती** : आपण सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी सारखाच वेळ देण्याचा प्रयत्न करतो. ज्या सन्माननीय सदस्यांची दुसरी, तिसरी टर्म आहे, जे अनुभवी सदस्य आहेत त्यांना बोलण्यासाठी मी थोडा जास्त वेळ देते. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांना बोलण्यासाठी २० मिनिटांचा वेळ मिळणार आहे. सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांना महत्वाच्या कामानिमित्त अहमदनगर येथे जायचे असल्यामुळे त्यांनी मला लवकर बोलण्याची परवानगी द्यावी, अशी विनंती केलेली आहे.

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदया, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, मी सांगू इच्छितो की, राज्याचे माजी सहकार मंत्री श्री.शंकरराव कोल्हे यांचे निधन झालेले आहे. मला त्यांच्या अंत्यविधीसाठी जायचे आहे. आपण मला लवकर बोलण्याची परवानगी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

असुधारित प्रत

सभापती महोदया, माननीय मुख्यमत्रीय श्री.उद्धव ठाकरे, माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्तमंत्री श्री.अजित पवार, काँग्रेस पक्षाचे विधिमंडळ नेते श्री.बाळासाहेब थोरात यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. महाविकास आघाडी शासनाने प्रतिकूत काळात अतिशय चांगला अर्थसंकल्प सादर केलेला आहे. कोरोना काळात संपूर्ण देशाची अर्थव्यवस्था उद्‌ध्वस्त झाली. खरे म्हणजे नोटाबंदी व जीएसटीचा निर्णय घेतला तेव्हा पासूनच देशाची अर्थव्यवस्था उद्‌ध्वस्थ होण्यास सुरुवात झाली. त्यामुळे उद्योगधंद्यांची मोठ्या प्रमाणावर पिछेहाट झाली, बेरोजगारी वाढली, त्यानंतर कोरोना महामारीचे संकट आले.

सभापती महोदया, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी राज्यावर असलेल्या कर्जाचा उल्लेख केला. मी सांगू इच्छितो की, मागील वर्षी देशावर १ कोटी ३२ लाख कोटी रुपयांचे कर्ज होते. यावर्षी ते कर्ज १ कोटी ५५ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. एका वर्षात देशावरील कर्जात १७ लाख कोटी रुपयांची वाढ झालेली आहे.

डॉ.सुधीर तांबे........

कोरोनामुळे कर्जात मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. कोरोनामुळे देशावर, राज्यावर संकट आलेले आहे. आपण कर्जामध्ये वाढ का झाली हे समजून घेतले पाहिजे. खरे म्हणजे तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस साहेबांच्या काळात राज्यावरील कर्जात वाढ होण्यास सुरुवात झाली. संपूर्ण जगात कोरोना महामारीचे संकट आहे. महाविकास आघाडी सरकारने कोरोना काळाज महत्वपूर्ण निर्णय घेतले. महाविकास आघाडी सरकारने गरीबांना, शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले नाही. शेतकऱ्यांना २ लाख रुपयांची कर्जमाफी देण्यात आली. ज्या शेतकऱ्यांनी नियमित कर्ज फेडलेले त्यांना ५० हजार रुपये मदत देण्यात येणार आहे आणि त्याचा जवळपास २० लाख शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. शासनाने त्यासाठी १० हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. राज्यात अतिवृष्टी झाली, अवकाळी पाऊस पडला, पूर आले. राज्यावर अनेक प्रकारची संकटे आली. महाविकास आघाडी सरकार प्रत्येक संकटाच्या वेळी शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले हे स्पष्ट दिसत आहे. आम्ही विरुद्ध परिस्थिती सुद्धा बघितलेली आहे. ज्यावेळी माननीय श्री.देवेंद्र फडणवीस साहेबांचे सरकार सत्ततेवर होते त्यावेळी दुधाचा प्रश्न बिकट झाला होता. आम्ही शासनाला वारंवार विनंती करीत होतो. त्यावेळी माननीय श्री.महादेव जानकर साहेब दुग्धविकास मंत्री होते. अर्थात त्यांना किती अधिकार होते याची मला माहिती नाही.

यानंतर श्री.सांगळे.......

डॉ.सुधीर तांबे....

त्यांनी दूध व्यवसाय व शेतकऱ्यांना मदत केली. अशा प्रकारे शासनाने शेतीच्या संदर्भात चांगले निर्णय घेतलेले आहेत. कोविड काळात शासनाने केलेल्या चांगल्या कामासंबंधी मला माननीय आरोग्य मंत्री श्री.राजेश टोपे यांचे अभिनंदन करावयाचे आहे. कोविड काळात संपूर्ण देशाचा विचार केल्यास महाराष्ट्रात अतिशय चांगल्या प्रकारची कामे झाली आहेत. या संदर्भात सर्वांनी नोंद घेतलेली आहे. ही बाब आपण मान्य केली किंवा नाही केली, हा वेगळा भाग आहे. आज प्रत्येक गोष्टीमध्ये राजकारण केले जात असल्यामुळे देशाची जी अवस्था झाली आहे ती अतिशय चिंतनीय आहे. सातत्याने बेछूट आरोप केले जात आहेत. ही बाब योग्य नाही. आपण अर्थसंकल्पावर अतिशय साधकबाधक चर्चा करणे अत्यावश्यक आहे. तसेच महाराष्ट्राचा खर्च कमी करुन कशा प्रकारे जास्तीत जास्त उत्पन्न वाढविता येईल यावर आपण चर्चा करणे आवश्यक आहे. परंतु आपण सातत्याने आरोप करीत असतो, त्याबाबत कोणताही पुरावा नसतो.

सभापती महोदया, पंतप्रधान हे देशातील सर्वोच्च पद आहे. देशाचे पंतप्रधान कोणत्या पक्षाचे आहेत, हा गौण भाग आहे. माननीय पंतप्रधान यांनी संसदेत केलेली भाषणे मी ऐकली आहेत. त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरु यांच्यावर टीका केली. ते सातत्याने पंडित जवाहरलाल नेहरु यांच्याबद्दल बोलत असतात. सभापती महोदया, पंडित जवाहरलाल नेहरु यांनी ११ वर्षे तुरुंगात घालवले आहेत. त्यांच्या मनात रशियाबद्दल अतिशय उदारता होती. पंडित जवाहरलाल नेहरु यांनी देशात घातलेल्या पायामुळे संपूर्ण भारतामध्ये वैभव निर्माण झाले आहे. त्यामुळे देशात आयआयटी, डॉ.होमी भाभा ॲटोमिक संशोधन केंद्र अशा अनेक संस्था निर्माण झालेल्या आहेत. पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या उदात्तेचे एक उदाहरण मी सदनाला देतो. जेव्हा रशियाचे पंतप्रधान भारतामध्ये आले होते तेव्हा स्व.अटल बिहारी वाजपेयी हे तरुण खासदार होते. त्यांना पंतप्रधानांच्या स्वागताकरिता बोलाविण्याचा कोणताही प्रोटोकॉल नव्हता. तरी देखील तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी अटल बिहारी वाजपेयी यांना तेथे बोलावून त्यांची रशियाच्या पंतप्रधानांसमवेत

डॉ.सुधीर तांबे....

त्यांचा परिचय करुन दिला होता. त्यानंतर तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांचे काँग्रेस सरकार सत्तेवर होते तेव्हा देखील स्व.अटल बिहारी वाजपेयी यांना भारताची बाजू मांडण्यासाठी युनोमध्ये पाठविण्यात आले होते. आपण राजकारण करीत असताना ते देशाच्या हिताचे असले पाहिजे. अशा प्रकारे स्व.इंदिरा गांधी यांनी देखील अशा प्रकारे काम केले होते. परंतु आता कशा प्रकारे असहिष्णूतेचे वातावरण निर्माण करीत आहोत ? एखादा सिनेमा काढून धर्मा-धर्मांवर टीका करुन त्यांच्यामध्ये वाद निर्माण करायचे. आज महाराष्ट्रात तशीच परिस्थिती आहे. सभापती महोदया, महाविकास आघाडी राज्यात चांगल्या प्रकारे काम करीत असताना त्यांच्यावर सातत्याने खोटे आरोप केले जात आहेत. तसेच २०-२५ वर्षांपूर्वी घडलेली घटना उकरुन काढायी व लोकांना तुरुंगात डांबायचे काम राज्यात सुरु आहे. याउलट आपल्यावर आरोप झाल्यास अस्वस्थ व्हायचे. समाज या सर्व गोष्टींकडे बघत आहे, समाजाचे यावर बारीक लक्ष आहे. समाज अशा प्रवृत्तींना कधीही माफ करणार नाही अशी माझी खात्री आहे. राज्यात चांगल्या प्रकारचे राजकीय वातावरण निर्माण करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. राज्य शासनाने शेती, दूध व्यवसाय तसेच शिवभोजन थाळीसंबंधी अतिशय चांगले निर्णय घेतलेले आहेत.

सभापती महोदया, विरोधी बाकावर बसलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांना मला असे सांगायचे आहे की, खासदार निधी बंद होता. आता त्यांना अडीच कोटी रुपयांचा निधी दिला असल्याचे मला समजले आहे. परंतु माननीय वित्त मंत्र्यांनी आपल्या राज्यातील आमदारांकरिता ४ कोटी रुपयांचा विकास निधी मंजूर केलेला आहे. अशा प्रकारे खासदारांना ५ कोटी रुपये तर आमदारांना ४ कोटी रुपयांचा विकास निधी मिळत आहे. या निमित्ताने शासनाचे आभार व्यक्त करण्यासाठी आपण एखादा शब्द उच्चारण्यास काही हरकत नव्हती असे मला वाटते.

सभापती महोदया, शासनाने अर्थसंकल्पाच्या माध्यमातून पंचसूत्री जाहीर केली आहे. पूर्वी आपल्या जबाबदाऱ्या होत्या त्यात रोटी, कपडा आणि मकान तसेच बिजली, सडक आणि पाणी यांचा समावेश होता. आता आपल्या सुत्रामध्ये शिक्षण,

डॉ.सुधीर तांबे....

आरोग्य आणि रोजगार यांचा समावेश आहे. शासनाने उद्योगधंद्यासंबंधी जे धोरण स्वीकारले त्यात तरुणांना उद्योग सुरु करण्याकरिता प्रोत्साहन देण्यासाठी ५०० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. अशा प्रकारे राज्य शासनाने अतिशय चांगले निर्णय घेतलेले आहेत. मी सर्व निर्णयांच्या खोलात जाणार नाही. याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांनी वारंवार उल्लेख केलेला आहे. सभापती महोदया, महाराष्ट्रातील जीडीपीमध्ये ५६ टक्के भाग हा सर्व्हीस सेक्टरमधील आहे. त्यामुळे आपल्या राज्याच्या भवितव्यासाठी राज्यात जागतिक दर्जाची शिक्षण व्यवस्था निर्माण करणे खूप महत्त्वाचे आहे. राज्य शेती व उद्योग यांकरिता सक्षम आहे. भारताच्या एकूण उद्योगक्षेत्रांमध्ये महाराष्ट्राचे योगदान २० टक्के आहे. महाराष्ट्राने शेती व सहकार क्षेत्रात चांगली कामे केलेली आहेत. स्व.वसंतदादा पाटील यांनी राज्याकरिता अतिशय क्रांतीकारक धोरण स्वीकारले होते. आपण एखाद्या खेडेगावात किंवा दुष्काळी भागात गेल्यानंतर तेथे आपल्याला एखादे चांगले घर दिसल्यास आपल्या मनात साहजिकच प्रश्न येतो की, दुष्काळी भागात अशा प्रकारे चांगले घर कसे राहू शकते ? गरीब कुटुंबातील शेतकऱ्याच्या घरातील मुलगा अमेरिका किंवा बंगलोर येथे नोकरी करीत असतो. अशा प्रकारे राज्यात जे परिवर्तन घडून आले आहे ते केवळ स्व.वसंतदादा पाटील यांनी राज्याकरिता स्वीकारलेल्या क्रांतीकारक धोरणामुळे शक्य झालेले आहे.

सभापती महोदया, राज्याचा अर्थसंकल्प अतिशय चांगला असून त्यात सर्वांना न्याय दिलेला आहे. परंतु त्यात शिक्षण क्षेत्रावर थोडासा अन्याय निश्चितपणे झालेला आहे. शिक्षण क्षेत्र अतिशय महत्त्वाचे असून त्यात अनेक समस्या आहेत. मी या संदर्भात यापूर्वी देखील चर्चा केली असल्यामुळे पुन्हा त्या विषयावर बोलणे उचित वाटत नाही. आम्ही या विषयासंबंधी वारंवार चर्चा करीत असतो. देशात ५ लाखांपेक्षा जास्त शिक्षकांची पदे रिक्त आहेत. राज्यात हजारो शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत. मी सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांना सांगू इच्छितो की, आपल्या काळात खऱ्या अर्थाने शिक्षणाची अवनिती सुरु झाली. राज्यातील

डॉ.सुधीर तांबे....

अर्थसंकल्प अतिशय उत्तम असून त्यातील पंचसूत्री देखील अतिशय सुंदर आहे. मी माननीय वित्त मंत्र्यांचे एका गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो की, आपल्याला उद्याचा समर्थ महाराष्ट्र घडवायचा असल्यास शिक्षण क्षेत्राकडे सखोल लक्ष देणे अत्यावश्यक आहे. देशात महाराष्ट्राचे स्थान चांगले आहे. परंतु ते स्थान अव्वल दर्जाचे नाही. आपल्याला याबाबत कार्यवाही करायची असल्यास व राज्याची अर्थव्यवस्था सुधारावयाची असल्यास आपल्याला शिक्षणाकडे जावे लागणार आहे. याकरिता सर्व शाळा अनुदानित कराव्यात, तेथील शिक्षकांची भरती पूर्ण करावी. चांगल्या प्रकारच्या संगणक प्रणाली असलेल्या लायब्ररी, प्रयोगशाळा सुरु कराव्यात तसेच शाळांना भरपूर वेतनेतर अनुदान द्यावे.

सभापती महोदया, राज्यात अनेक तरुणांना उद्योगक्षेत्रामध्ये काम करायचे आहे. परंतु त्याकरिता जागा उपलब्ध नाहीत. याकरिता आपले औद्योगिक धोरण बदलले पाहिजे. राज्यात अनेक आजारी उद्योग आहेत. मी परवा अहमदनगर येथील एमआयडीसीमध्ये गेलो होतो. तेथे लोकांना उद्योग सुरु करण्यासाठी जागा उपलब्ध नाहीत. परंतु दुसऱ्या बाजूला त्याच औद्योगिक वसाहतीमधील ४० टक्के उद्योग बंद पडलेले आहेत. मी यापूर्वी नियम २६० अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चेत हा विषय उपस्थित केला होता. शासनाने त्यावर कोणताही निर्णय घेतला नाही. शासनाने या संबंधी धोरणात्मक निर्णय घेणे अत्यावश्यक आहे. महाराष्ट्रामध्ये आजारी उद्योगांकडे विनावापर असलेली हजारो एकर जमीन पडलेली आहे. त्या जमिनीचा पुन्हा कशा प्रकारे वापर करता येईल ? याबाबत शासनाने कार्यवाही केली पाहिजे.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी क्रीडा विषयासंबंधी उल्लेख केला आहे. राज्यात मोठया प्रमाणात गायरान जमिनी असतात. परंतु त्या जमिनींवर अतिक्रमण केले जाते. आपण त्या जमिनींचा क्रीडांगणासाठी वापर केल्यास अतिशय चांगले होईल.

असुधारित प्रत

डॉ.सुधीर तांबे....

सभापती महोदया, अर्थसंकल्पामध्ये संभाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले यांच्या स्मारकासंबंधी निर्णय घेण्यात आला आहे. उत्तर महाराष्ट्रामध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे कौळाणे येथे जन्मस्थान आहे. महाराजा सयाजीराव गायकवाड आणि बडोदयाच्या संस्थानांच्या माध्यमातून राज्यात अनेक चांगले उपक्रम राबविण्यात आलेले आहेत. विशेषत: महाराष्ट्रातील गोरगरिबांना शिक्षण देण्याचे काम बडोदयाच्या संस्थानांनी केले आहे. माझी शासनाला विनंती आहे की, महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे चांगले स्मारक झाले पाहिजे. सिन्नर तालुक्यात वामनदादा कर्डक यांचे स्मारक आहे. त्यांची आता जन्मशताब्दी आहे. मी तेथे गेलो होतो. तेव्हा त्या स्मारकाची अतिशय दुरावस्था झाल्याचे मला दिसून आले. स्मारकांच्या निमित्ताने माझी अशी सूचना आहे की, स्मारके करीत असताना तेथे एखादी संस्था निर्माण करणे आवश्यक आहे. उदाहरण सांगायचे झाल्यास लहान स्मारक तयार करीत असताना तेथे एखादी चांगली अभ्यासिका तयार करावी व तेथील एक दालन स्मारकासाठी वापरावे. तसेच त्या व्यक्तीचा तेथे एखादा जीवनपट दाखवावा. अशा प्रकारे स्मारके निर्माण करीत असताना ती कशा प्रकारे केली पाहिजेत याबाबत शासनाने पुनर्विचार करण्याची गरज आहे. अन्यथा स्मारके तयार केल्यानंतर काही वर्षांनंतर त्यांची अतिशय दुरावस्था होते. शासनाने याबाबत विचार करावा अशी मी शासनाला विनंती करतो व माझे मनोगत पूर्ण करतो, धन्यवाद.

--------------

यानंतर श्री.गागरे....

## गुरुवार, दिनांक १७ मार्च रोजीच्या

## सभागृहाच्या कामकाजासंबंधी घोषणा

ॲड अनिल परब : सभापती महोदय, महाराष्ट्र विधीमंडळाचे अधिवेशन चालू आहे. या अधिवेशनाचा कार्यकाळ कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरलेला आहे. ठरल्याप्रमाणे या आठवडयात सोमवार ते शुक्रवार असे दिनांक १७ मार्चपर्यंत नियोजित कामकाज होणार होते. परंतु विरोधी पक्ष व सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्यांचे असे मत आहे की, उद्या गुरुवार, दिनांक १७ मार्च रोजी होळीचा सण असून आपण याकरीता एक दिवसाची सुट्टी दिली तर ते संयुक्तिक ठरेल. परंतु असे निर्णय कामकाज सल्लागार समितीमध्ये होत असतात. हा विषय काल विधानसभेत एकमताने मंजूर झाला आहे. तसेच आता मी हा विषय या सभागृहात आपल्यासमोर मांडत आहे. या सभागृहाने उद्या होळी सणाची सुट्टी घ्यायची ठरवली तर आपण त्याला मंजूरी द्यावी अशी मी आपणास विनंती करतो.

**उप सभापती** : मी सभागृहाला सांगू इच्छिते की, उद्या होळी सणाची सुट्टी घेण्याबाबतचा ठराव फार आनंदात मंजूर झाला आहे. पण मंत्री महोदयांनी एवढया गंभीर आवाजात सांगितले तेव्हा टेन्शन आले की, ते आता काय घोषणा करणार आहेत.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरुण लाड हे भाषण करतील.

------

श्री.अरुण लाड (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदया, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत बोलण्याची मला संधी दिल्याबद्दल धन्यवाद.

सभापती महोदया, सन २०२१-२२ चा अर्थसंकल्प ४ लाख कोटी ८५ हजार इतका होता. कोविड हल्ल्याला तोंड देत या वर्षीचा अर्थसंकल्प ५ लाख ४८ हजार कोटीचा जाहीर केला आहे. म्हणजे पाठीमागच्या तुलनेत या अर्थसंकल्पात वाढ केली आहे. एकूण तुटीचा अर्थसंकल्प असतानासुध्दा आदिवासी घटक कार्यक्रम १४.६५ टक्क्यांनी वाढवून दिला आहे. अनुसूचित घटक कार्यक्रमात या वर्षी २०.३० टक्के वाढ केलेली आहे. शेती, शिक्षण, उद्योगधंदे, अनुसूचित जाती, आदिवासी घटक योजना यांच्यासाठी भांडवली खर्चाला २६.२१ टक्के कात्री लावली जाणार आहे पण यांना निधी दिलेला आहे. केंद्रीय कराचा राज्याचा हिस्सा व केंद्र सरकारकडून मिळणारे सहायक अनुदान जीएसटी वेळोवेळी मिळालेली नाही. वित्त आयोगाकडून ३ लाख ३७ हजार कोटी रुपये येणे बाकी असतानासुध्दा २०२२-२३ चा अर्थसंकल्प आश्वासक दिला गेला आहे, त्याबद्दल महाविकास आघाडी सरकारचे हार्दिक अभिनंदन करतो.

सभापती महोदया, राज्याचा विकास शेती, शिक्षण, उद्योगधंदे, आरोग्य व पाणी यावर अवलंबून असतो. शेतीकडे पाहत असताना नियमित बँक कर्जदारांना ५० हजार रुपयांचे अनुदान दिले गेले आहे. भूविकास बँकेचे खूप दिवसाचे वसूल न होणारे येणे माफ केले गेले आहे याबद्दल धन्यवाद. अलिकडे हवामानाच्या बदलामुळे शेती खूप अनियमित झाली आहे. एकीकडे दुष्काळामुळे पिकाची हानी होत आहे. तर अवकाळी पावसानेसुध्दा शेतीचे खूप मोठे नुकसान होत आहे, पुराने शेतीच्या पिकासह मातीसुध्दा वाहून जात आहे. शेतीऐवजी होत असलेली सिमेंटची बेटे यांना आवर घातला गेला पाहिजे. जलसिंचनाचा कालबध्द कार्यक्रम युध्द पातळीवर हाती घ्यावा लागेल. ठिबक सिंचनात येणाऱ्या अडचणी सोडवाव्या लागतील. क्षारपड जमिनीसाठी अंडरग्राऊंड ड्रेनेज काढावे लागतील व शेती वाचवावी लागेल.

श्री.अरुण लाड .....

सभापती महोदया, ६०-६५ टक्के अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून असलेल्या आपल्या देशात ६५ टक्के खाद्यतेल आयात केले जात आहे. अलिकडे काळात युध्दामध्ये ७५ टक्के आयातीवर आकडा गेला आहे. यंदा सोयाबीन पिकाला चांगला भाव मिळाल्याने सोयाबीन, लागवड देखील वाढली आहे. सुर्यफुल, कडधान्य, करडई या तेलबियांच्या पिकांना प्रोत्साहन, हमीभाव व अनुदान देऊन वाढ केल्यास खाद्यतेल आयात टप्प्याटप्प्याने कमी होईल व ती केली पाहिजे. फळबागा लागवडीकडे व बाजारपेठ याकडे लक्ष द्यावे लागेल. कडधान्य, तूर, मूग, उडीद, हरबरा डाळ यांचे योग्य नियोजन केल्यास आपल्या देशातील जनतेला १५० ते २०० रुपये प्रती किलोची डाळ खावी लागते ते थांबेल. कडधान्य हे पूर्वी मुख्य पीक कधीही नव्हते. आता कडधान्य आयात होत आहे व दीडशे दोनशे रुपये किलोने आपण खात आहोत. हे थांबविण्यासाठी नियोजन केले पाहिजे. शेती पिकवत असताना रासायनिक खते, मशिनरीकडून होत असलेली शेतीची मशागत व वाढती मजूरी यावर योग्य नियोजन करुन शेतकऱ्यांना यापासून कसे वाचविता येईल हे आकडेवारीवरुन लक्षात आलेले आहे.

असुधारित प्रत

सभापती महोदया, वीज दर सुध्दा पाणीपट्टीसह नियंत्रणात ठेवावे लागतील. हे सर्व केल्यास शेतीतून पळ काढणारा युवक शेती फायद्याची कशी आहे हे लक्षात आल्यावर शेतीत तो रमेल, वेळ काढेल व त्यास शेती आवडेल. आज पीक विमा योजना कार्यक्रम हा अजब आहे. विमा कंपनीचा खर्च ८० टक्के व शेतकऱ्यांना मिळणारा परतावा २० टक्के असा आहे. हे उलटे झाले पाहिजे, त्यापुढे ८० टक्के परतावा हा शेतकऱ्यांना दिला पाहिजे व २० टक्के खर्च विमा कंपनीला दिल्यास योग्य व्यवस्थापन होईल व शेतकऱ्यांचा चांगला फायदा होईल. सध्या फायदा होत नाही व परतावा मिळत नाही. सध्या पीक योजना घेण्यास शेतकरी अनुत्सुक आहेत.

सभापती महोदया, सामान्यांचे शिक्षण जिल्हा परिषदेच्या व महानगरपालिकेच्या अनुदानित शाळांमध्ये आजपर्यंत व्यवस्थितपणे चालू होते. अनुदानित शिक्षणाकडे लक्ष न दिल्याने, चांगल्या इमारती न दिल्याने व योग्यवेळी

श्री.अरुण लाड .....

योग्य शिक्षक भरती न केल्याने पालकांचा व विद्यार्थ्यांचा या अनुदानित शिक्षण व्यवस्थेवरचा विश्वास उडत चालला आहे, अनास्था वाढत आहे हे योग्य नाही. आज खाजगीकरण मोठया प्रमाणात वाढत आहे. खाजगी शाळा व इंग्रजी माध्यमाच्या शाळा वाढत आहे, अनुदानित शाळा वाढत नाहीत. ज्या शाळेत शिक्षकांना ५-६ हजार पगार दिला जातो त्या शाळा वाढत आहेत. ३० ते ५० हजार रुपये शिक्षकांना पगार देणाऱ्या शाळा बंद पडत आहेत. हे का होते ते तपासावे लागेल. वेळच्या वेळी शिक्षक तेथे दिले पाहिजेत. शिक्षणाचे खाजगीकरण थांबविले पाहिजे, खाजगीकरण वाढले व महानगरपालिका व जिल्हा परिषदेच्या शाळा बंद पडल्या तर सामान्याच्या मुलांनी कोठे जायचे. हे थांबविले पाहिजे. दिल्लीमध्ये शिक्षणाचे खाजगीकरण प्रस्थ खूप वाढले होते व अनुदानित शाळा ओस पडत चालल्या होत्या, तेथील मुख्यमंत्री श्री.केजरीवाल यांनी दिल्ली सरकारमार्फत चांगली इमारत, चांगले शिक्षक, सुखसोयी व शिक्षण पध्दतीत बदल केल्यामुळे महानगरपालिकेच्या शाळा चांगल्या सुरु आहेत, तेथे खाजगी शाळा बंद पडत आहे. दिल्लीमध्ये हे घडत असेल तर आपल्याकडे का घडू शकत नाही. ते येथे घडवून या शाळा वाचवाव्या लागतील. खाजगी शाळा बंद पाडाव्या लागतील, येथून पुढे येणाऱ्या शिक्षणातील बदल खेडी व सामान्य घटक यांना जमेस धरुन करावेत.

सभापती महोदया, बेरोजगारीचा दर तर २१ टक्के वर पोहचला आहे. १८ ते ३५ वयोगटातील ३० कोटी युवक हाताला काम मागत आहेत. त्यांना काम देण्यासाठी उद्योगधंदे वाढले पाहिजेत. आपण लक्ष न दिल्याने आहे तेच उद्योग बंद पडत आहेत. ते वाढले पाहिजे. याकरीता आपण लक्ष दिले पाहिजेत. देशातील सर्व कार्यालयात नोकरभरती केली पाहिजे. आज कोणत्याही कार्यालयात गेल्यावर सांगितले जाते की, आजच्याकडे मनुष्यबळ नसल्याने काम होत नाही. आवश्यक तेवढया कामांवर लक्ष देतात त्यामुळे बाकीची कामे होत नाहीत. नोकरभरती करुन प्रत्येक कार्यालयात मनुष्यबळ घेतले पाहिजे. यातून जनतेचे होत असलेले हाल थांबविले पाहिजेत.

असुधारित प्रत

श्री.अरुण लाड .....

सभापती महोदया, शासकीय उद्योगांचे खाजगीकरण चालले आहे. फायद्यात असलेले १७५ उद्योग शासनाने खाजगी केलेले आहेत. का केले माहिती नाही. खाजगी मालक एकटा असतो, सहकार व शासन हे सर्वांसाठी असते. असे असतानाही आम्ही सहकार क्षेत्रात उद्योग चालवितो. खाजगी उद्योग ५० टक्के लोकांवर चालविला जातो. असे झाल्याने बेरोजगारी वाढते असे ध्यानात आलेले आहे, त्यामुळे खाजगीकरण थांबले पाहिजे. प्रत्येक कार्यालयात कर्मचारी नेमून दिले पाहिजेत. उद्योग क्षेत्रात आज १० टक्के घट झाली आहे, बांधकाम क्षेत्रात ११ टक्के घट झाली आहे तर दळवळणामध्ये २१ टक्के घट झाली आहे.

सभापती महोदया, सिमेंट, वाळू, खडी, स्टील यांच्या अमर्याद वाढलेल्या दरामुळे सेंट्रींग उद्योग जो सामान्यांच्या हातात होता तो सुध्दा अडचणीत आलेला आहे, त्यांनी कोठे जायचे. सिमेंट, वाळू, खडी, स्टील उद्योगांना अनुदान देऊन हे उद्योग चालू ठेवावेत.

सभापती महोदया, डिझेल, पेट्रोल दर दिवसेंदिवस मोठया प्रमाणात वाढत चालले आहेत. जागतिक बाजारपेठेत वाढ झाली तरी त्यावरील टॅक्स कमी ठेऊन दर आवाक्यात ठेवावेत.

सभापती महोदया, आज झोपडपट्टीमध्ये लोकांची संख्या वाढत आहे, ती कमी व्हावी यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. ८० लाख कुटूंबापर्यंत वीज पोहचली नाही, त्यांना ती मिळावी तसेच त्यांना घरे व शौचालये मिळावीत.

सभापती महोदया, शासनाने जलजीवन मिशन योजना व्यापक प्रमाणात हाती घेतलेली आहे. पण त्याचा कितपत उपयोग झाला आहे हे तपासावे. शुध्द व निर्जंतूक पाणी सर्वांना मिळण्यात असलेले दोष काढले पाहिजेत. अशुध्द पाण्यातून होणारे साथीचे रोग थांबवावे लागतील. सध्या आपल्याकडे किमान कौशल्य व शाळेतील शिक्षण कमी झालेले आहे.

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

श्री.अरुण लाड .....

आज आपल्या देशात किमान कौशल्य शिक्षणाच्या बाबतीत खूप आकस आहे. बेरोजगारीच्या संख्येत केवळ २० टक्के युवकांना कौशल्य शिक्षण मिळाले असून ८० टक्के युवकांना कौशल्य शिक्षण मिळालेले नसल्याने त्यांना उद्योगधंद्यात व कामात समाविष्ट केले जात नाही. महिलांना कौशल्य शिक्षण द्यावे लागेल. दुधासारखे शेतीपुरक उद्योगव्यवसाय गतिमान केले पाहिजेत. महिला बचत गट व लघु उद्योगातून निर्माण झालेल्या मालाला बाजारपेठ मिळाली पाहिजे.

महाविकास आघाडी सरकारने सादर केलेल्या सामान्य व अनुसूचित, मागासवर्गीय घटकांच्याकामांना प्राधान्य देऊन, सर्व सुखसोयी देऊन त्यांना २१ व्या शतकात आपण पोहोचलो आहे असे वाटण्यासाठी आवश्यक त्या योजना पूर्ण कराव्यात.

महाविकास आघाडीच्या शासनाने दिलेला चांगल्या पध्दतीच्या अर्थसंकल्पाचे अभिनंदन करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------------

असुधारित प्रत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे ( नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदया, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, आज रोजी अर्थसंकल्पाच्या दृष्टीने विचार केला तर राज्यावर ७ लाख कोटी रुपयांचे कर्ज असल्याचे दिसत आहे, म्हणजे लोकसंख्येचा विचार केला तर प्रती व्यक्ती प्रमाणे ५५,००० रुपयाचे कर्ज आपल्यावर आहे. आता उल्लेख झाला की, ७ लाख कोटी रुपयांचे कर्ज करताना ते माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारच्या काळात झालेले नाही. या एकूण कर्जापैकी केवळ १.५६ कोटी रुपयांचे कर्ज माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारच्या काळातील होते. गेल्या अडीच वर्षात विचार केला तर १.९८ लाख रुपयांचे कर्ज महाविकास आघाडी सरकारने वाढविलेले आहे. ज्या योजना थांबलेल्या आहेत, त्या योजनांकरिता आणखी एक लाख कोटी रुपयांचे कर्ज राज्य शासनाने काढले तरीही आमचे काहीही म्हणणे नाही. आपले राज्य स्वयंपूर्ण आहे, आपल्या राज्याला कर्जही मिळू शकते, ही बाब आम्हाला माहिती आहे. जास्तीत जास्त कर्ज मिळण्याची क्षमता आपल्या राज्याची आहे, हेही आम्ही जाणतो. मागील सरकारच्या काळात सुरु केलेल्या योजना, या सरकारच्या काळात सुरु केलेल्या योजना लवकरात लवकर पूर्ण झाल्या पाहिजेत, ही सार्थ अपेक्षा आमची अर्थसंकल्पीय अधिवेशनातून असते.

सभापती महोदया, सन २०२०-२०२१ च्या बजेटमध्ये शासनाकडून ग्रामीण विकासाला मागे टाकण्यात आले होते. बजेट केले परंतु त्याला किती कट आहे, बजेटमध्ये ग्रामीण विकासाकरिता १,१५,००० कोटी रुपये अपेक्षित होता, असे असताना शासनाने याकरिता केवळ ७५,००० कोटी रुपयांचा खर्च केलेला आहे. याकरिता ४०,००० हजार कोटी रुपयांचा खर्च ग्रामीण विकासावर कमी केलेला आहे. पुढील काळात ही चूक होऊ नये, याकरिता मी हे सांगत आहे.

सभापती महोदया, सामाजिक न्यायाच्या गोष्टी केल्या जातात. शाहु फुले आंबेडकरांचा महाराष्ट्र असल्याच्या गोष्टी केल्या जातात, परंतु याकरिता १,१६,००० कोटी रुपयांचा खर्च मंजूर करण्यात आला होता. त्यामध्ये १५,००० कोटी रुपयांचा

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.....

खर्च कमी झालेला आहे. या वर्षी मात्र जे बजेट केलेले आहे, ते पूर्ण खर्च व्हावे, याची काळजी घेतली गेली पाहिजे. एकुण एक पैसा ज्या विषयाकरिता मंजूर केलेला आहे, त्यातील एकही पैसा शिल्लक राहू नये, याची काळजी शासनाने घेतली पाहिजे.

सभापती महोदया, नागपूर करार-१९५३ मध्ये काय म्हटले होते की, नागपूरला अधिवेशन होईलच, या कराराचा कोणीही भंग करणार नाही. ज्यावेळी करारावर सहया झाल्या त्यावेळी असे ठरले होते. आता स्थिती अशी आलेली आहे की, नागपूर येथील अधिवेशनाकरिता न्यायालयात धाव घ्यावी लागणार आहे. दोन वर्षे कोरोना महामारी आणि त्यानंतर माननीय मुख्यमंत्री महोदयांची प्रकृती ठीक नाही, यामुळे या सर्व बाबी आम्ही मान्य केलेल्या आहेत. परंतु पुढील अधिवेशनाबाबत बजेटच्या भाषणात सरकारची घोषणा असली पाहिजे की, "होय, पुढील अधिवेशन नागपूरात घेऊ, याकरिता आपल्याला न्यायालयात जाण्याची गरज पडणार नाही." अशी मी विनंती करीत आहे.

मी या ठिकाणी अपेक्षित करतो की, विदर्भ वैधानिक विकास मंडळ, मराठवाडा वैधानिक विकास महामंडळ, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ याकरिता माननीय उप सभापती, माननीय श्री. मधुकरराव किंमतकर, माननीय श्री. नितीन गडकरी यांनी वैधानिक विकास मंडळे तयार करण्याकरिता जी भूमिका घेतली होती. त्या काळात ज्या पध्दतीने म्हणजेच १९६० नंतर महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांनी नागपूर कराराचे आणि महाराष्ट्र कराराचे पालन केले नाही म्हणून दिनांक ३० एप्रिल,१९९४ मध्ये वैधानिक विकास मंडळ तयार केलेले आहे. कोकण, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडयाचा सारखा विकास झाला पाहिजे. परंतु काय झाले ? अचानक ! महाविकास आघाडीचे सरकार आले, म्हणजे, कशी हिम्मत होऊ शकते कुठल्या सरकारची ! की, या सदनाने जो कायदा तयार करुन वैधानिक विकास महामंडळे तयार केले,.... आता कोकणाचा बॅकलॉग कोण काढणार ! आता मराठवाडयाचा बॅकलॉग कोण कॅल्क्यूलेट करणार, वैधानिक विकास मंडळे कशासाठी असतात ?, ज्या ज्या विषयात जो जो बॅकलॉग तयार झालेला आहे,

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.....

सामाजिक विषय असो, ग्रामीण विकास हा विषय असो, त्या विषयाचा संपूर्ण बॅकलॉग हा सरकारला कळविण्याची जबाबदारी ही वैधानिक मंडळाची आहे. आता ही वैधानिक विकास महामंडळेच राहणार नसतील तर विदर्भ आणि मराठवाडयाचा बॅकलॉग कसा सरकारकडे जाईल. याकरिता या भाषणात सरकारकडून अपेक्षा आहे की, "होय, आम्ही घोषणा करीत आहोत की वैधानिक विकास मंडळे सुरु होणार !"

सभापती महोदय, दिनांक ०६ मार्च,२०२० रोजी माननीय श्री. अजित पवार यांनी माननीय डॉ.नितीन राऊत यांच्या सूचनेनुसार व प्रस्तावानुसार "सोलार पार्क उभा करु." अशी घोषणा केली होती. अद्याप या सोलार पार्ककरिता जागा मिळाली नाही. पर्यायाने हा सोलार पार्क उभा राहिलेला नाही. माझी अशी विनंती आहे की, सन २०२० मध्ये १२५ कोटी रुपयांचा सोलार पार्क उभा करु अशी घोषणा केली गेली होती, याकरिता अजून कुठेही जागा नाही. दिनांक ०६ मार्च,२०२० रोजी अशी घोषणा शासनाने केलेली आहे की, ५०,००० रुपये नियमित कर्ज भरणाऱ्याला देण्यात येतील. सरकार आता या बजेटमध्ये म्हणत आहे की, दोन वर्षे शासन हे पैसे देऊ शकले नाही, आता ते पैसे देण्यात येतील, किमान यातून कोणीही सुटता कामा नये, याची काळजी शासनाने घेतली पाहिजे. २०२० मध्ये याची घोषणा करुनही दोन वर्षे झाली तरीही याची अंमलबजावणी झालेली नाही.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती डॉ.मनिषा कायंदे )**

सभापती महोदया, दिनांक ०८ मार्च,२०२१ च्या अर्थसंकल्पामध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिवस या निमित्ताने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाने १५०० पर्यावरण पुरक बसेस विकत घेण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. हा निर्णय मुलींच्या शिक्षणाकरिता घेतला होता. अद्याप या अनुषंगाने शासनाने एकही बस खरेदी केलेली नाही. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाने शासनाने योजनेची घोषणा केलेली असताना ही योजना पूर्ण होत नसेल तर हे महाराष्ट्राकरिता योग्य नाही.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.....

सभापती महोदया, दिनांक ०८ मार्च, २०२१ रोजी शासनाने म्हटले होते की, "विकेल ते पिकेल"माननीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने कृषी व्यवसाय ग्रामीण परिवर्तन या २१०० कोटी रुपयांच्या प्रकल्पाबाबत घोषणा केली गेली. अद्यापपावेतो यातील एक रुपयाही खर्च करण्यात आलेला नाही. माननीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हे जर वरुन बघत असतील तर त्यांना कळेल की, याकरिता एकही रुपया खर्च झालेला नाही.

सभापती महोदया, कर्नाटकच्या धर्तीवर राज्य शासनाने स्वतंत्र कृषी अर्थसंकल्प सादर करण्याबाबतची घोषणा मागील वर्षी केली गेली होती. शासनाने अर्थसंकल्पाच्या भाषणात वेगळा अर्थसंकल्प जाहीर करण्यात येईल.

सभापती महोदया, अजून एक आरोप या ठिकाणी केला गेला होता की, माननीय श्री.देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात तूट किती ? माननीय श्री.देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात केवळ १५,००० कोटी रुपयांची तूट प्रस्तावित होती. ती तूट प्रत्यक्ष मात्र १३-१४,००० कोटी रुपयांपर्यंत गेली परंतु शेवटी ती १५,००० कोटी रुपयांच्या आतच होती. परंतु सन २०२०-२१ ची महाविकास आघाडी शासनाची तूट ४१,००० कोटी रुपयांची आहे. सन २०२१-२०२२ ची महाविकास आघाडी शासनाची तूट ३०,७२५ कोटी रुपयांची आहे. सन २०२२-२०२३ ची महाविकास आघाडी शासनाची तूट २४,३५३ कोटी रुपयांची आहे. आता ही तूट वाढण्यास अनेक कारणे असतील, त्याबाबत आमचे काही म्हणणे आहे. परंतु आरोप करताना विचार करणे आवश्यक आहे. या सरकारच्या काळात कोरोना संक्रमण झाले होते, यामुळे ही तूट वाढलेली आहे, हेही आम्ही मान्य केलले आहे.

यानंतर श्री.सोनावणे.......

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री. चंद्रशेखर बावनकुळे.......

पण तुटीच्या संदर्भात आपले अधिकारी कसे चुकतात याचा देखील विचार केला पाहिजे. कोरोना महामारीच्या काळात जगात खूपच वाईट परिस्थिती होती. तेव्हा केंद्र शासनाने पेट्रोलवर ५ रुपये आणि डिझेलवर १० रुपये अशा प्रकारे १ लाख ६० हजार कोटी रुपयांचा भार सहन केला होता. २२ राज्यांनी पेट्रोल ५ रुपये व डिझेलवर १० रुपये अशा प्रकारे सुट दिली होती. सन २०२०-२०२१ मध्ये आपल्या सरकारने पेट्रोलवर ३४ हजार कोटी रुपये, सन २०२१-२०२२ मध्ये आपल्या सरकारने पेट्रोलवर ४५ हजार कोटी रुपये आणि सन २०२२-२०२३ मध्ये आपल्या सरकारला पेट्रोलवर ५० हजार कोटी रुपयांचा फायदा होणार असल्याचे प्रस्तावित केले आहे. सन्माननीय सदस्य श्री. नाना पटोले यांनी सायकलवरुन मोर्चा काढला होता. २२ राज्यांनी जशी पेट्रोलवर ५ रुपये आणि डिझेलवर १० रुपयांची सुट दिलेली आहे, तशीच सुट महाराष्ट्राने देखील द्यावी, अशी मी आग्रहाची मागणी करीत आहे.

सभापती महोदया, छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने शेतकरी सन्मान योजना सुरु केली होती. त्या योजनेतील ३० टक्के लाभार्थी शेतकरी कर्जापासून आजही वंचित आहेत. आज जवळ जवळ ६ हजार ६० शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्यांच्या कुटुंबीयांना किती आर्थिक मदत दिली याचे देखील उत्तर आम्हाला मिळाले पाहिजे.

सभापती महोदया, १ लाख ४३ हजार ७५२ लोकांचा कोरोना महामारीत मृत्यू झाल्याची आकडेवारी दिलेली आहे. खरे पाहता २ लाख लोकांपेक्षा जास्त लोकांचा मृत्यू कोरोना महामारीत झालेला आहे. ग्रामीण भागात कोरोना महामारीत किती लोकांचा मृत्यू झाला त्याबाबतची नोंदच आपल्या सरकारकडे उपलब्ध नाही. मी यासंदर्भात आरोप करणार नाही. संबंधित यंत्रणेकडून कोरोनामुळे मृत्यू झालेल्या लोकांची आकडेवारी गोळा केली पाहिजे. अशा मृत कुटुंबीयांना शासनाने मदत द्यावी एवढीच माझी अपेक्षा आहे.

असुधारित प्रत

श्री. चंद्रशेखर बावनकुळे.......

सभापती महोदया, विदर्भ आणि मराठवाड्यात नोकर भरती ही तेथील लोकसंख्येप्रमाणे केली जावी अशा प्रकारचा करार आहे. पण अशी कार्यवाही होत नाही. शासनाने चक्राकार पध्दत बंद केलेली आहे. पदस्थापना ही चक्राकार पध्दतीने केली जाते. चक्राकार पध्दत काढून टाकल्यामुळे विदर्भ, मराठवाडा आणि कोकणात कोणीही जायला तयार नाही. शहरी भागात पदस्थापना करावी म्हणून मागणी केली जाते. त्यामुळे चक्राकार पध्दत पुन्हा सुरु केली पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदया, धानाला बोनस देण्याची आमची मागणी असून, त्यासंदर्भात शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, मी माननीय श्री. शंभुराज देसाई यांना सांगू इच्छितो की, १०५ मतदारसंघाला फायदा होईल अशी काळजी माननीय वित्त मंत्री महोदयांनी घेतलेली आहे आणि तेवढेच बजेट त्या मतदारसंघाला दिलेले आहे. बजेटमधील ९० टक्के भाग हा १०५ मतदारसंघांना दिलेला आहे. त्यावरील मतदारसंघाला निधी दिलेला नाही. माननीय मंत्री महोदयांनी आपल्या मतदारसंघात, हेवीवेट आमदारांनी आपले वजन वापरून आपल्या मतदारसंघात संपूर्ण बजेट घेतलेले आहे. काही मतदारसंघाला ३०० कोटी रुपयांचे बजेट मिळालेले आहे. मी यासंदर्भात सदनाचा वेळ घेऊ इच्छित नाही. माझ्याकडे यादी आहे. काही मतदारसंघाला २८०० कोटी रुपयांचे बजेट मिळालेले आहे. हा असमतोलपणा राज्याच्या हिताच्या दृष्टीकोनातून बरोबर नाही, याबाबत माननीय वित्त मंत्री महोदयांनी काळजी घेतली पाहिजे.

सभापती महोदया, बोरिवली संजय गांधी नॅशनल पार्कमधील सफारीची घोषणा केली होती, त्याचे काय झाले ? तृतीयपंथांना कौशल्य विकास प्रशिक्षण देणार होते, त्याचेही काहीच झाले नाही. आधुनिकपध्दतीने आश्रमशाळा केल्या जातील, पण त्याचेही काहीच झाले नाही. पुण्यात साखर संग्रहालय उभारले नाही. माननीय

असुधारित प्रत

स्व. बाळासाहेब ठाकरे स्मारकासाठी ४०० कोटी रुपयांचा कोणताही उल्लेख अर्थसंकल्पात दिसून येत नाही. बेरोजगारांना महिन्याला ६ हजार रुपये भत्ता दिला जाणार होता, त्याचा उल्लेख अर्थसंकल्पात दिसून येत नाही. शून्य टक्के व्याजदराने

असुधारित प्रत

श्री. चंद्रशेखर बावनकुळे.......

उच्च शिक्षणासाठी कर्ज देऊ, पण त्याचाही उल्लेख अर्थसंकल्पात दिसून येत नाही. गरीब नागरिकांसाठी आरोग्य विमा सत्राचा उल्लेख अर्थसंकल्पात दिसून येत नाही. माननीय कामगार मंत्री महोदयांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांना २१ हजार रुपये मासिक पगार दिला जाईल अशी घोषणा केली होती, याचा देखील निर्णय घेतलेला नाही. मराठी भाषा विद्यापीठाचा निर्णय घेतलेला नाही. ठिबक व तुषार सिंचनाकरिता १०० टक्के सबसिडीचा याचा देखील निर्णय घेतलेला नाही. दूधाला हमी भाव याचा देखील निर्णय घेतलेला नाही. असे अनेक निर्णय घेतले असून, त्याची अंमलबजावणी केलेली नाही. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत राज्यात अनेक ठिकाणी कामे बंद पडलेली आहेत. अर्थसंकल्पात ज्या घोषणा केल्या जातात, त्याची अंमलबजावणी करण्याकरिता सर्व विभागांच्या नियमितपणे बैठका आयोजित केल्या पाहिजेत. डीपीडीसीमधून निधी दिला जात आहे. हा निधी मार्च, महिन्याच्या अखेरीस खर्च होत आहे. मे महिन्यात जिल्हाधिकाऱ्यांकडे निधी वितरित केला तर त्याच्या ३ महिन्यानंतर प्रशासकीय मान्यता, त्यानंतर ३ महिन्यात बजेट खर्च करावेत असे सांगितले जाते. डीपीवर कोणाचेही नियंत्रण नाही. मार्च महिन्यात आदेश काढल्यामुळे निधी खर्च होत नाही. त्याला १ वर्षाची मुदत वाढ दिली जाते इथपर्यंत ठीक आहे. पहिल्याच ३ महिन्यात प्रशासकीय आदेश का दिले जात नाहीत असा माझा प्रश्न आहे. पहिल्याच ३ महिन्यात आपले विभाग प्रस्ताव का देत नाही असा माझा प्रश्न आहे. ३ महिन्याच्या आत तसे प्रस्ताव दिले पाहिजे.

सभापती महोदया, माननीय ऊर्जा मंत्री महोदयांनी ३ महिन्याकरिता वीज कनेक्शन कापणार नाही, अशी काल घोषणा केली होती. पण विद्युत देयकाची वसुली केली जाईल असे देखील त्यांनी सांगितले आहे. महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती या ३ कंपन्या फायद्यात आहेत. ४५ लक्ष शेतकऱ्यांना २८ हजार कोटी रुपयांची वीज दिलेली आणि त्यावेळी एकाही शेतकऱ्याची वीज कनेक्शन कापली नाहीत. माननीय श्री. शरदचंद्र पवार साहेबांनी अनेक वेळा राज्याचे नेतृत्व केलेले आहे. त्यांचा आदर करुन सन २०१८ मध्ये माननीय श्री. शरदचंद्र पवार साहेबांनी

श्री. चंद्रशेखर बावनकुळे.......

असे म्हटले होते की, माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन कापू नयेत असे म्हटले होते. तसेच त्यांच्याकडून विद्युत देयकाची वसुली करु नये असे देखील म्हटले होते. गेल्या ५ वर्षात २८ हजार कोटी रुपयांची विज दिलेली आहे. त्यावेळी आमच्या शेतकऱ्याने एकाही शेतकऱ्याचे विजेचे कनेक्शन कापले नाही. तीनही कंपन्यांना ४ हजार ७१५ कोटी रुपयांचा फायदा झालेला होता. नवीन सरकार स्थानापन्न झाल्यानंतर ७ हजार ५०० शेतकऱ्यांना विजेचे कनेक्शन दिले. दोन्ही सरकारने काय केले याच्या खोलात मी जाणार नाही. माननीय वित्त मंत्री महोदयांनी विधानसभेत अशी घोषणा केली होती की, आमचे सरकार कधीही विजेचे कनेक्शन कापणार नाही. पण तिसऱ्या दिवशी माननीय ऊर्जा मंत्री महोदयांनी असे सांगितले की, "होय" शेतकऱ्यांनी विद्युत देयके भरली नाही तर त्यांची विजेची कनेक्शन कापली जाईल. महाविकास आघाडी सरकारने कर्ज काढावे. शासनाने कंपन्यांकडून हमी घेतली पाहिजे. शेतकऱ्यांचे विजेचे कनेक्शन कापण्यासारखे दुसरे कोणतेही पाप नाही. कारण आज शेतकरी अडचणीत आहे. भविष्यात माननीय मंत्री महोदयांच्या मतदारसंघात मोर्चे निघणार आहेत. माननीय मंत्री महोदयांच्या मनात असे राहिले की, मी मोर्चाला जाऊ काय ? इतकी वाईट परिस्थिती येणार आहे. शेतकऱ्यांना विज दिल्यानंतर एकही कंपनी कधीही डबघाईला आलेली नाही. असा माझा दावा आहे. मराठवाड्यातील, विदर्भातील आणि कोकणातील शेतकऱ्यांची विजेची कनेक्शन कापू नयेत असा मंत्री महोदयांचा आग्रह असायचा. आमचे सरकार असताना कधीही शेतकऱ्यांचे विजेचे कनेक्शन कापले नाही. महाविकास आघाडी सरकार जोपर्यंत आहे, तोपर्यंत शेतकऱ्यांचे विजेचे कनेक्शन कापले जाणार नाही, असे आश्वासन आम्हाला देण्याची गरज आहे. भविष्यात कोणाचे सरकार येईल याबाबत मला काहीच म्हणावयाचे नाही. पण भविष्यात माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांचे सरकार आले तर शेतकऱ्यांचे विजेचे कनेक्शन कधीही कापले जाणार नाही.

आमच्या सरकारमध्ये ती क्षमता आहे. शेतकऱ्यांना विज दिल्यामुळे राज्याच्या जीडीपीमध्ये वाढ होते. आपल्या शासनाने शेतकऱ्यांना विज दिली तर पुढील

असुधारित प्रत

श्री. चंद्रशेखर बावनकुळे.......

अर्थसंकल्प सादर करताना ५० हजार कोटी रुपयांची तूट दिसणार नाही.

सभापती महोदया, ऊर्जा विभागात ५ हजार विद्युत सहाय्यकांची भरती करावी म्हणून सन २०१९ मध्ये जाहीरात देण्यात आली होती. सर्वच मतदारसंघात विद्युत सहाय्यकांची पदे भरण्यासाठी दीड लाख लोकांनी आवेदन दिले होते. सन २०१९ पासून भरती प्रक्रिया थांबलेली आहे. कोणत्याही माननीय न्यायालयाने स्टे दिलेला नाही, आरक्षणाचे कारण नाही किंवा इतर कोणतीही कारणे नाहीत. ५ हजार विद्युत सहाय्यकांची पदे तातडीने भरण्याची कार्यवाही करावी, अशी मी आग्रहाची विनंती करीत आहे. माननीय मंत्री महोदयांनी मी उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांचा विचार करुन उत्तर द्यावे अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

------

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

श्री.विलास पोतनीस (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदया, सन २०२२-२०२३ या वर्षाच्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, महाराष्ट्राच्या विकासासाठी महाविकास आघाडी सरकार ४ लाख कोटी रुपये उपलब्ध करुन देणार आहे. महाराष्ट्र हे १ ट्रिलीयन अर्थव्यवस्था असणारे पहिले राज्य ठरणार आहे अशी घोषणा माननीय वित्त मंत्री तथा उप मुख्यमंत्री यांनी केल्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्री, माननीय वित्त तथा उप मुख्यमंत्री आणि माननीय पर्यावरण मंत्री श्री.आदित्यजी ठाकरे यांचे मनापासून अभिनंदन करतो.

सभापती महोदया, या वर्षीच्या अर्थसंकल्पात पर्यावरणपूरक असलेल्या नैसर्गिक वायूवरील मूल्यवर्धित कराचा दर १३.५ टक्क्यांवरुन १० टक्के कमी करुन तो ३ टक्के प्रस्तावित करण्यात आला आहे. याचा फायदा घरगुती पाईप गॅस, सीएनजीवरील रिक्षा, टॅक्सी व खाजगी वाहनधारकांना होणार असून त्यांच्या इंधन खर्चात मोठी बचत होणार आहे. या बद्दल मी या सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदया, महाविकास आघाडी सरकारने मुंबईतील ५०० चौ.फुटापर्यंतच्या घरांना मालमत्ता कर माफीसंदर्भात घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयाबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदया, राज्यातील सर्व प्रलंबित प्रकरणांमध्ये मुद्रांक शुल्कावरील दंडाच्या रकमेत सवलत देण्यासाठी १ एप्रिल ते ३० नोव्हेंबर, २०२२ या कालावधीसाठी दंड सवलत अभय योजना राबविण्यात येणार आहे. मी विनंती करतो की, याच धर्तीवर महसूल विभाग आणि म्हाडाकडून मुंबई उपनगरातील गृहनिर्माण संस्थांना पाठविण्यात आलेल्या भरमसाठ अकृषिक कर वसुलीस तत्काळ स्थगिती देण्यात यावी. जेणेकरुन स्थानिक उपनगरीय जनतेला दिलासा मिळू शकेल.

सभापती महोदया, राज्यात जल वाहतुकीला चालना देण्यासाठी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डामार्फत दिनांक १ जानेवारी, २०२२ पासून नव्याने सुरु झालेल्या जल मार्गावरील फेरीबोट, रो-रो बोटींमधून प्रवास करणारे प्रवासी, वाहने, माल इत्यादींवर

श्री.विलास पोतनीस....

महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाकडून आकारण्यात येणाऱ्या करात पुढील तीन वर्षे सूट देण्यात येणार आहे. याचा लाभ सर्वसामान्य प्रवासी वर्गाला होणार आहे. अशा प्रकारची सूट दिल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदया, मरीन ड्राईव्ह चौपाटीवर जवाहर बालभवन या शैक्षणिक व सांस्कृतिक केंद्राच्या इमारतीच्या मजबुतीकरण, नूतनीकरण आणि विस्तारीकरणासाठी १० कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल मी शासनाचे आभार मानतो.

सभापती महोदया, पर्यटन विकासासाठी १७०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे पर्यटनाला चालना मिळणार आहे आणि त्या माध्यमातून बेरोजगार तरुणांच्या हाताला काम मिळणार आहे. शासनाने पर्यटनाबाबत केलेल्या तरतुदीचे मी मनापासून स्वागत करतो. महाविकास आघाडी सरकार हे शासन वासरसा स्थळांच्या विकासासाठी कटिबद्ध आहे. परंतु शासनाने दुर्लक्षित राहिलेल्या बोरीवली येथील मंडपेश्वर गुफेच्या संवर्धनासाठी निधी द्यावा, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदया, राज्य सरकारने मुंबई नजीकच्या आणि पर्यटकांचा आकर्षणबिंदू असलेल्या गोराई बिचचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्यासाठी प्रयत्न करावा, जेणेकरुन स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल.

सभापती महोदया, संजय गांधी हे पर्यटकांचे आकर्षण केंद्र आहे. सन २०२४ मध्ये या उद्यानास ५० वर्षे पूर्ण होत आहेत. या उद्यानात गत ४० वर्षांपूर्वी सुरु करण्यात आलेली जगप्रसिद्ध वनराणी रेल सेवा सध्या दयनीय अवस्थेत आहे. या वनराणीचे डबे आणि रुळ यांचे नूतनीरकण करण्यासाठी निधीची आवश्यकता आहे. राज्य सरकारने या कामासाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत

श्री.विलास पोतनीस....

सभापती महोदया, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात स्वर्गीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या संकल्पनेतून साकारण्यात आलेली टायगर सफारी, लायन सफारी सुरु करण्यात आली आहे. या उद्यानातील वाढत्या लेपर्डची संख्या पाहता त्या ठिकाणी लेपर्ड सफारी सुरु झाल्यास पर्यटकांच्या संख्येत वाढ होऊन उद्यानाच्या महसुलात देखील वाढ होणे शक्य होईल. त्यामुळे लेपर्ड सफारीसाठी निधीची तरतूद करण्यात यावी, अशी मी मागणी करतो.

सभापती महोदया, मुंबईत मराठी भाषा भवनचे भूमीपूजन गुढीपाडव्याला होणार आहे. यासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही तमाम मराठी बांधवांसाठी अभिमानास्पद बाब आहे. याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदया, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी राज्यातून माननीय राष्ट्रपतींना सुमारे लाखभर पोस्टकार्ड पाठविण्यात आलेली आहेत. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी राज्य शासनाने माननीय राष्ट्रपती महोदयांकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा करावा, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदया, राज्यातील उद्योगांना चालना देण्यासाठी "मॅग्नेटिक महाराष्ट्र-२" वर विशेष लक्ष देण्यात आले आहे. यासाठी राज्यातील उद्योग घटकांसाठी ९८ गुंतवणूक करार करण्यात आले आहेत. त्यातून १ लाख ८९ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून, त्यातून रोजगाराच्या तब्बल ३ लाख ३० हजार नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदया, मुंबईसारख्या महानगरातून दरवर्षी सुमारे २ लाख तरुण पदवी परीक्षा उत्तीर्ण होतात. या तरुणांना रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी आणि उच्च शिक्षण याकरिता शासनाच्या योजनांची माहिती मिळण्यासाठी एक दुवा असण्याची आवश्यकता आहे. युवकांची समाज माध्यमातील ओढ लक्षात घेता एक "महायुवा ॲप" निर्मितीची नितांत आवश्यकता आहे. शासनाने यासाठी निधीची तरतूद करावी. तसेच शासनाने बेरोजगारांच्या भत्त्यात वाढ करावी, अशी मी शासनास विनंती करतो.

असुधारित प्रत

श्री.विलास पोतनीस....

सभापती महोदया, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत १ लाखांहून अधिक उमेदवारांनी गुंतवणूक प्रस्ताव सादर केले आहेत. त्यातून १ हजार १०० कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. येत्या वर्षभरात ३० हजारांहून अधिक स्वयंरोजगार प्रकल्पातून सुमारे १ लाख प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी बेरोजगार उमेदवारांना उपलब्ध आहेत आहेत. ही निश्चितच कौतुकास्पद अशी बाब असून, त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदया, राज्यातील २३ नद्यांचे संवर्धन करण्यासाठी १५० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. यातून दहिसर आणि पोयसर नद्यांच्या संवर्धनाचे काम हाती घेण्यात यावे, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदया, इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण विषयाचा शालेय अभ्यासक्रम तयार करण्यात येणार आहे. ही खरोखरच स्वागतार्ह बाब आहे. याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदया, इतर राज्यात शालेय शिक्षणापासून युपीएससी, बँकींग, राज्य सेवा आयोगाच्या परीक्षेच्या अभ्यासक्रमाचा सराव केला जातो. त्यामुळे केंद्रीय आणि बँकींग आस्थापनेत इतर राज्यातील उत्तीर्ण उमेदवारांची संख्या लक्षणीय असते. आपल्या राज्यातही शालेय शिक्षणात युपीएससी, बँकींग आणि राज्य सेवा आयोगाच्या परीक्षेच्या अभ्यासक्रमाचा समावेश करण्याबाबत शासनाने सकारात्मक विचार करावा, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदया, मुंबईत कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांच्या तात्पुरत्या निवासाच्या सोयीसाठी "महाराष्ट्र भवन" उभारण्यात येणार आहे. त्यासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. माझी मागणी आहे की, मुंबईतील स्थानिक भूमीपूत्र असलेल्या आगरी-कोळी बांधवांसाठी दहिसर येथे आगरी-कोळी भवन बांधण्यासाठी पुरेशी तरतूद करण्यात यावी.

श्री.विलास पोतनीस....

सभापती महोदया, महाविकास आघाडी सरकारने अतिशय चांगला अर्थसंकल्प मांडल्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो. तसेच आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले सुद्धा मनापासून आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

----------

असुधारित प्रत

श्री.भाई गिरकर : सभापती महोदया, सत्ताधारी बाजूला एकूण तीन पक्ष आहेत. त्यामुळे सत्ताधारी बाजूच्या तीन सन्माननीय सदस्यांना भाषणाची संधी दिल्यानंतर चौथा क्रमांक भारतीय जनता पक्षाच्या सदस्यांना येतो. विरोधी पक्षात सहयोगी सदस्य श्री.महादेव जानकर हे सुद्धा आहेत. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु झाल्यापासून मी अजूनपर्यंत भाषण केलेले नाही. माझ्याप्रमाणेच वेळेच्या मर्यादेमुळे आमच्या बाजूच्या इतरही अनेक सन्माननीय सदस्यांना भाषण करता आलेले नाही. मला वाटते आज प्रश्नोत्तराचा तास १०-१५ मिनिटे पुढे गेला तरी हरकत नाही, परंतु आमच्या बाजूच्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी उपलब्ध करुन द्यावी. आज या आठवड्यातील अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु झाल्यापासून सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे, सन्माननीय सदस्य ॲड.निलय नाईक व इतर अनेक सन्माननीय सदस्यांना भाषण करता आलेले नाही. मला वाटते भारतीय जनता पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना किमान पाच-पाच मिनिटे बोलण्याची संधी द्यावी.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकरजी, आपण स्वत:हून पाच मिनिटे बोलण्याची संधी देण्याबाबत जी सूचना केली आहे ती स्वागतार्ह आहे. माननीय सभापतींशी चर्चा करुन विशेष बैठकीची वेळ वाढविता येते काय, ते पाहू या. मी निदर्शनास आणून देते की, दुपारी पुन्हा या चर्चेवर बोलण्यासाठी वेळ राखून ठेवण्यात आलेला आहे. त्यावेळी सन्माननीय सदस्यांना या चर्चेवर बोलता येईल. तरी सुद्धा सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी मांडलेल्या सूचनेच्या बाबतीत माननीय सभापतींशी चर्चा करण्यात येईल व त्यांच्या सूचनेवर विचार करण्यात येईल.

आता सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

असुधारित प्रत

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदया, सन २०२२-२०२३ या वर्षाच्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, माननीय वित्त मंत्री तथा उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी १ ट्रिलीयन डॉलर अर्थव्यवस्थेचे स्वप्न दाखवून महाविकास आघाडी सरकारचा अर्थसंकल्प मांडलेला आहे. परंतु १ ट्रिलीयन म्हणजे एकावर नेमके किती शून्य हे मला माहीत नाही. या राज्यातील उपेक्षित घटकांच्या पदरात त्यातील किती शून्य पडले हा मूळ प्रश्न आहे.

सभापती महोदया, कोविड काळात या राज्यावर आणि देशावर संकट होते. हे राज्य हाकणाऱ्या प्रशासनाने कोणतीही तक्रार न करता सरकारला साथ दिली. त्यांच्याबद्दल आता हे सरकार काय करणार आहे, हा खरा प्रश्न आहे.

नंतर श्री.कांबळे.....

असुधारित प्रत

श्री. कपिल पाटील ....

१ लाख ४१ हजार लोक मृत्युमूखी पडले. देशात एकूण ४ लाख ८५ हजार लोक मृत्युमूखी पडली आणि त्यामध्ये १४१७७९ ही राज्यातील संख्या आहे. आपत्ती मोठी होती म्हणून त्याचे समर्थन करायचे की १ लाख ४१ हजार म्हणजे जवळपास एक तृतियांश राज्याचा आकडा येतो, याबाबत खंत बाळगायची हा आपल्यापुढे प्रश्न आहे आणि त्याबाबतची खंत अर्थसंकल्पात व्यक्त झाली असती तर अधिक बरे झाले असते. अर्थसंकल्पात आरोग्य विभागाकडे अधिक लक्ष दिले जाईल अशी या मृत्युमूखी पडलेल्या संख्येच्या तुलनेत कल्पना होती. मात्र प्रत्यक्षात तसे घडलेले नाही. आपण २ वर्षांत आरोग्यावर खूप खर्च केला. मला आठवते की, मागच्या अर्थसंकल्पाच्या वेळी माननीय वित्तमंत्री म्हणाले होते की, आतापर्यंत आरोग्य विभागाकडे दुर्लक्ष झाले. परंतु आता लक्ष दिले पाहिजे. त्यामुळे गेल्या २ वर्षांत झालेल्या वाढीव खर्चाचे आपण सर्वांनी समर्थन केले. किंबहुना ते झाले नव्हते याबाबत खंत बाळगली गेली. पण आता पुन्हा एकदा खर्चाची तरतूद करताना ती एक टक्क्याहून कमी झालेली आहे याकडे मला लक्ष वेधावयाचे आहे.

सभापती महोदया, ५ राज्यांचे निकाल लागले, त्यानंतर आघाडी सरकार ज्यांना आधारवड मानते, ते देशाचे नेते माननीय श्री. शरद पवार यांची एबीपी माझा वाहिनीवर एक मार्मिक प्रतिक्रिया आली, ते असे म्हणाले की, माझ्या दिल्लीतील घरातील स्टाफला कोणाला मते दिली असे मी विचारले तेव्हा त्यांनी सांगितले की, आम्ही अमुक ठिकाणी मते दिली. आम आदमी पक्षाला मते दिली. त्यावेळी त्यांनी दिल्लीतील लोकांना का दिली असे विचारले तेव्हा त्यांनी उत्तर दिले की, शिक्षण व आरोग्य या दोघांची व्यवस्था या सरकारने चांगलेली केलेली आहे. हे मी नाही तर आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी म्हटले आहे. माननीय श्री. शरद पवार साहेबांनी ही प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. मला असे वाटले की, त्या प्रतिक्रियेनंतर सादर झालेल्या अर्थसंकल्पात माननीय श्री. शरद पवार साहेबांनी जी अपेक्षा व्यक्त केली ती प्रतिबिंबीत होईल, मात्र ती प्रतिबिंबीत झालेली नाही याचे दु:ख आहे.

श्री. कपिल पाटील ....

सभापती महोदया, मी काही आकडे सांगतो. आरोग्य व शिक्षण यावर किती खर्च करीत आहोत हे पहावे. आरोग्य व कुटुंबकल्याणचे आकडे आहेत. महाराष्ट्राचे ॲलोकेशन ४.४ टक्के आहे. मी तुलना करीत नाही. पण आपल्यापेक्षा अनेक लहान राज्यांनी यापेक्षा अधिक केले आहे. आपला आकार मोठा, त्यांचा आकार लहान, त्यांची लोकसंख्या कमी याचे उत्तर दिले जाऊ शकेल. पण आपल्या बरोबरची जी राज्ये आहेत ती आणि लहान राज्ये या दोघांची तुलना करावी. कर्नाटक आपल्या बरोबरीचे राज्य आहे. टक्केवारी ५.३ आहे. आपल्यापेक्षा एक टक्का अधिक आहे. पश्चिम बंगालची टक्केवारी ६.७ आहे. दिल्ली लहान असून मुंबई महानगरपालिकेइतकी आहे. त्यांची टक्केवारी १५.९ म्हणजे १६ आहे. आसामची टक्केवारी ७.१ आहे. बिहार आपल्या बरोबरीचे राज्य आहे. त्याची टक्केवारी ६.३ आहे. छत्तीसगडची टक्केवारी ६.१ आहे. आताही आपण इतका कमी खर्च का करीत आहोत ? १ लाख ४१ हजार मृत्यू कोविडने घेतले. ते केवळ कोविडचे मृत्यू नाहीत. कोविड हे निमित्त ठरले. कोमॉर्बिडीटीमुळे सर्व बाकीचे आजार उफाळून वर आले आणि त्यांनी त्यांचा बळी घेतला. अजुनही आपण आरोग्य सुविधांसाठी आणि माणसांचा जीव वाचविण्यासाठी किंवा त्यांच्या आरोग्यासाठी काहीही खर्च करीत नाही याबाबत मी अभिनंदन कसे करु असा माझ्यासमोर प्रश्न आहे.

सभापती महोदया, माननीय श्री. शरद पवार साहेबांनी शिक्षणाबाबतही उद्गार काढले. आपण शिक्षणावरील खर्चाची तुलना पहावी. महाराष्ट्र १७ टक्के आहे. तुम्ही वाटप दिले आहे. बाकीच्या राज्यांची स्थिती पहावी. राजस्थान १९ टक्के, पश्चिम बंगाल १८ टक्के, दिल्ली २५ टक्के, बिहार १९ टक्के, छत्तीसगड १९ टक्के, महाराष्ट्र १७ टक्के अशी ही टक्केवारी आहे. तुम्ही शिक्षणावर इतका कमी खर्च करीत आहात. शिक्षणाची पहिली अक्षरे महाराष्ट्रात बहुजनांसाठी खुली झाली हे अभिमानाने आपण सांगतो. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज ही नावे आपण जरुर घेतो पण महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज

यांच्या महाराष्ट्रात आजही इतर राज्यांच्या तुलनेत आपण अतिशय कमी खर्च करतो यासाठी अभिनंदन करायचे की खंत बाळगायची हा माझ्यापुढे प्रश्न आहे.

श्री. कपिल पाटील ....

सभापती महोदया, वारंवार बोलले गेले की, बसून पगार घेत आहेत. हे शिक्षकांबद्दल बोलले गेले. २ वर्षे कोविड होता. माझे म्हणणे असे आहे की, ऑनलाईन शिकवणीचा वर्ग घेऊन कोणीही २ तास मुलांना शिकवून दाखवावे. विखुरलेल्या मुलांना शोधायचे, जी मुले पालकांसोबत स्थलांतरित झाली आहेत त्यांना शोधायचे, त्यांना ऑनलाईन आणायचे, प्रत्यक्षात फिजिकली जे शिक्षण शक्य असते ते मुले विसरलेली आहेत, त्यांना पटरीवर आणायचे हे सर्व त्यांनी केले. केवळ ऑनलाईन शिक्षण नव्हे तर ऑफलाईन ड्युटी केल्या. राज्यात कोविडमुळे अनेक मृत्यू झाले, त्यात अनेक शिक्षक गेले. ऑनड्युटी काम केल्यामुळे कोविड झाला आणि त्यामुळे मृत्युमूखी पडले. नुसते कोविडमुळे नाहीत तर २ मृत्यू असे झाले की, त्यांची ड्युटी नाक्यावर, चेकपोस्टवर लावली, भरधाव ट्रकच्या मागे धावायला लावले, त्यामध्ये २ शिक्षक चिरडले गेले. तुम्ही सांगितले ते काम त्यांनी केले आणि बसून पगार घेतलना गेला असे सांगत आहेत याचे मला दु:ख वाटते. आपण त्यांची जबाबदारी घेणार नाही का ? मी मघाशी म्हणालो तशी या राज्याची २ वर्षांमध्ये त्यांनी काळजी घेतली. मी जरुर अभिनंदन करतो की, राज्य सरकारने चांगले काम केले आहे. आपण माननीय मंत्र्यांचेही काम करतो, यंत्रणेचही काम करतो. पण ज्या यंत्रणांनी प्रत्यक्षात मैदानात उभे राहून काम केले, त्या यंत्रणांच्या काळजीचे काय ? या अर्थसंकल्पामध्ये पगाराचा खर्च वाढत आहे म्हणून खंत बाळगली जाते याचे दु:ख होत आहे. साधारणत: २४ टक्के पगारावर खर्च होतो, त्यामध्ये एखादा टक्का वाढल्याने काय मोठे बिघडणार आहे, काय मोठा विकासाच्या योजनांवर परिणाम होणार आहे ? यंत्रणा सशक्त राहिली तर अधिक विकास योग्य आहे. आजही मी पगारवाढ मागत नाही. पण तुम्ही वेळेवर तरी पगार करावेत. आजही राज्यातील पगार वेळेवर झालेले नाहीत. कोविड होता. २ वर्षे लोकांनी सहन केले. १५ दिवस पगार

उशिरा, १ महिना पगार उशिरा असे झाले. शिक्षकांचा पगार तर २ महिने उशिरा होत होता. मी मुंबईचा प्रतिनिधी आहे. मला लोक विचारतात की, सर, आपला पगार

असुधारित प्रत

श्री. कपिल पाटील ....

वेळेवर कधी सुरु होणार आहे ? मला आज सकाळी एका शिक्षकांचा मेसेज आला होता. त्यांनी मला ८ तारखेला मेसेज पाठविला की, "When salary is expected in this month?" मी त्यांना म्हटले की,"Eight more days." मी राज्याची परिस्थिती सांगितली. त्यांनी मला उत्तर दिले की, "It means after 15th March." पुढे त्यांनी असे म्हटले की, "I have loan. EMI installment is going to be due." आठ दिवसांनंतर त्यांनी आज सकाळी मेसेज पाठविला आणि पुन्हा तेच म्हणाले की, "Good morning Sir, When salary is expected in this month?

**उप सभापती** : आपल्याला किती वेळ लागणार आहे ?

श्री. कपिल पाटील : सभापती महोदया, १० मिनिटे द्यावीत.

**उप सभापती** : आता सकाळी ११.४५ वाजता सभागृहाचे कामकाज थांबवावे लागणार आहे. त्यामुळे तुम्हाला ऑनलेग रहावे लागेल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदया, मी ऑनलेग राहीन. अतिशय महत्वाचे मुद्दे आहेत.

**उप सभापती** : इतर सन्माननीय सदस्यांचा थोडा विचार करावा.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदया, मी विचार करतो. मी आपल्या शब्दांच्या पलीकडे नाही.

**उप सभापती** : ३ सन्मानीय सदस्यांची भाषणे झाली असती. तुम्ही महत्त्वाचे मुद्दे मांडणार आहात. वेळेचे बंधन पाळले तर बरे होईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मी एकही मुद्दा रिपिट करणार नाही. मी हा मेसेज मुद्दाम वाचून दाखविला आहे.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

श्री.कपिल पाटील.....

लोक विचारतात की, कब सॅलरी होगी, हे पैसे त्यांच्या हक्काचे आहेत, उपकाराचे नाहीत. आम्ही काम करतो तर वेळेवर पगार मिळाला पाहिजे. सरकारने काही वर्षे वेळेवर पगार दिला. सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर मला म्हणाले की, आपण तिकडे बघून बोला. तुमच्या सरकारच्या काळात जे तंत्र बिघडले ते अद्यापही पटरीवर आले नाही. आता महाविकास आघाडी शासनाला कोविडचे निमित्त मिळाले आहे. शिक्षकांचे पगार वेळेवर व्हायला नकोत काय ? सर्वोच्च न्यायालयाने असा निकाल दिला की, शिक्षकांचे पगार राष्ट्रीयकृत बँकेतून करावे. महाविकास आघाडी शासन आल्यावर मला असे वाटले होते की, आता शिक्षकांचे पगार राष्ट्रीयकृत बँकेतून होतील. अजूनही राष्ट्रीयकृत बँकेबरोबर करार करण्यात आलेला नाही. अजूनही त्याच निर्णयांची री ओढली जात आहे. ज्यांनी काम केले त्यांचे पगार वाढवा असे मी म्हणत नाही, परंतु त्यांचा पगार वेळे वर तरी दिला पाहिजे. कोविड काळात विनाअनुदान शाळांतील शिक्षकांची जी ससेहोलपट झाली तीचे वर्णन करता येत नाही. शिकविण्याचे काम शिक्षकांनी केले पण त्यांना पगार नाही, अनुदान नाही, शासनाने असा निर्णय घेतला की, सरसकट २० टक्के अनुदान द्यावे. सरसकट अनुदान देणे हा निर्णय असू शकतो काय ? मूळ धोरण असे होते की, २०,४०,६०,८० व १०० टक्के अनुदान द्यावे त्याची वासलात लावण्यात आली. त्रुटी काढून घोषित व अघोषित अशी नवीन पध्दत सुरु करुन लोकांना रांगेत उभे केले. वर्षानुवर्षे माणसे उपाशीपोटी काम करीत आहेत.१०, १२, १५ वर्षे आता पगार सुरु होईल, नंतर पगार सुरु होईल, याची वाट पाहत होते. २० टक्के पगार सुरु झाल्यावर त्यातील १० टक्के पगार संस्था घेऊन टाकते. १० टक्केमध्ये त्यांचा संसार कसा काय चालेल. सरकार यावर नियंत्रण आणित नाही व पगारही देत नाही. पगार दिल्यामुळे शासनाच्या तिजोरीवर किती बोजा पडणार आहे. शिक्षण विभागासाठी जी तरतूद करण्यात आली त्या तरतूदीमध्ये अगदी किरकोळ वाढ होणार आहे. शिक्षकांचे पगार व इतर खर्चासाठी ८० हजार कोटी रुपये अपेक्षित रक्कम आहे. त्यामध्ये फक्त ३०० कोटी रुपये देण्याची मागणी आहे. ८० हजार कोटी रुपये कोठे व ३०० कोटी रुपये कोठे. ३०० कोटी रुपये म्हणजे अर्धा टक्का देखील रक्कम होत नाही. रुपयातील २४ पैसे

असुधारित प्रत

श्री.कपिल पाटील.....

शिक्षणावर खर्च केले जातात. फी वाढ अपेक्षित आहे. एक पैसा वाढविला तरी उच्च शिक्षणासह सर्व शिक्षण मोफत करता येईल. ती रक्कम वाढविण्यात येत नाही. .००१ पैसा आम्ही मागत आहोत. ती रक्कम देण्यास शासन तयार नाही. त्यामुळे लोकांनी त्यांचे संसार कसे रेटायचे व शिक्षणाची व्यवस्था पुढे कशी न्यायची हा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे.

सभापती महोदया, या शासनाने शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी अनेक चांगले निर्णय घेतले आहेत, त्यामुळे मी सरकारचे अभिनंदन करतो. शेतकऱ्यांना सांभाळित असताना सिंचन क्षमता वाढविण्याकडे शासनाला वेळ देता आला नाही. आता कोविड गेलेला आहे. शिक्षकांच्या पगाराबाबत कोविडचे कारण सांगता येणार नाही. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना त्यांच्या खाईतून बाहेर काढण्यासाठी सिंचनाचे क्षेत्र वाढविण्यासाठी आता पैसे कमी आहेत असे होता कामा नये. अनेक विभागांनी जे द्यायला पाहिजे होते ते त्यांनी दिले नाही.

सभापती महोदया, अंगणवाडी ताई व आशा वर्कर या दोन मोठ्या घटकांनी कोविड काळात मोठे काम केले आहे. त्या चळवळीशी आपण स्वत: संबंधित आहात. यांना अद्यापही किमान वेतन देण्यात आले नाही. फक्त मानधनात तुटपुंजी वाढ करण्यात येते. त्यांना अद्याप सेवेत सामावून घेतले नाही. त्यांना सेवेत कधी घेण्यात येईल. त्यांना किमान वेतन कधी देण्यात येईल असा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदया, एस.टी.कामगारांच्या मागण्यांबाबत फरक असू शकतो. उत्तर प्रदेशातील एस.टी. फायद्यात चालते. कर्नाटकातील एस.टी.कामगारांना जास्त पगार मिळतो. छोट्या राज्यातील एस.टी.कामगारांना चांगला, नियमित व वेळेवर पगार मिळतो. महाराष्ट्रासारख्या प्रगतीशील राज्याची एस.टी.कामगारांच्या लाल डब्याने शान वाढविली. माणसांचे दळणवळण वाढविले त्यांना वाढीव पगार देण्यासाठी इतका वेळ का लावला ? संप करावा किंवा न करावा हा वेगळा प्रश्न आहे. संघटना व पक्षांचा प्रश्न वेगळा आहे. त्यांना न्याय देण्याची भूमिका थोडी अधिक लवकर घेतली असती तर (...अडथळा....) हा ठीक आहे, लालपरी. आम्ही लाल

असुधारित प्रत

श्री.कपिल पाटील.....

डबा बोलत होतो. परी हा शब्द स्त्रीवादी असल्यामुळे मी लालपरी म्हणत नाही. त्याबाबत माझी अडचण आहे. सभापती महोदयांना ती बाब माहिती आहे.

**उप सभापती** : सभागृहाचे कामकाज आता थांबविण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील हे ऑनलेग राहतील. आता सभागृहाची विशेष बैठक स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक १२.०० वाजता सुरु होईल.

(सभागृहाची विशेष बैठक दुपारी ११.४५ ते १२.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**एसटी कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत**

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, एसटी कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत आपल्या दालनात बैठक झाली होती. ती बैठक होऊन आता एक आठवडा पूर्ण होत आहे. होळी सणापूर्वी संप मिटेल अशी अपेक्षा होती. आपल्या दालनात झालेल्या बैठकीत संप मिटण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यात आले. माननीय परिवहन मंत्र्यांनी एसटी कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत सभागृहात निवेदनही केले होते. एसटी कर्मचाऱ्यांचा संप होळी सणापूर्वी मिटेल व त्यांना चांगल्या प्रकारे होळी साजरी करता येईल, असे आम्हाला वाटले होते. एसटी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे विद्यार्थ्यांची मोठया प्रमाणावर गैरसोय होत आहे. सभागृहाचे आजचे कामकाज संपण्यापूर्वी परिवहन मंत्री महोदयांनी या संदर्भात निवेदन करावे, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे.

----------

असुधारित प्रत

## विधान भवन परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बदलण्याबाबत.

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदय, मागील वर्षभरापासून मी विधान भवन परिसरात येतो. परंतु तेव्हा पासून माझ्या मनात एक खदखद असून ती मला सभागृहात व्यक्त करावयाची आहे. विधान भवन परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आहे. तो पुतळा बदलण्याचे काम केव्हा सुरु होणार आहे याबाबत मला माहिती नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाला साजेसा पुतळा विधान भवन परिसरात असला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांचा सर्व कार्यात पराक्रम, शौर्य, गतीशीलता होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या गतीशीलतेला साजेसा अश्वारुढ, हातात तलवार असलेला भव्य पुतळा विधान भवन परिसरात उभारण्यात आला तर विधान भवन परिसरात येणाऱ्यांच्या डोळ्याचे पारणे फिटल्याशिवाय राहणार नाही आणि त्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, पराक्रम नवीन पिढीपर्यंत पोहोचेल. सभागृहाने या संदर्भात ठराव संमत करावा, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : या संदर्भात ठराव संमत करण्याची आवश्यकता नाही. माझ्या माहिती प्रमाणे पूर्वी असा ठराव झाला होता.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय,...

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे साहेब आपण कृपया जागेवर बसावे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, या संदर्भात कामकाज सल्लागार समितीमध्ये चर्चा झाली होती.

**सभापती** : मी ती माहिती घेऊन पुढील आठवड्यात या विषयावर बैठक आयोजित करणार आहे.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

**नागपूर येथील मानेवाडा विभागात ई-लायब्ररी सुरु करण्याबाबत**

**(१) * १२४८८ श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मानेवाडा विभागात रुपये १० कोटी खर्च करुन बांधण्यात आलेली ई-लायब्ररीचा वापर होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एनआयटी स्पर्धा परिक्षेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे यादृष्टीकोनातून ई-लायब्ररी सुरु करण्याकरीता नागरिक व विद्यार्थ्यांकडून मागणी होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर ई-लायब्ररी सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) "महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोई सुविधांचा विकास" योजनेंतर्गत शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१/नवि-१६, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ अन्वये नागपूर महानगरपालिका क्षेत्रात ई-लायब्ररी या कामाकरीता प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून दिनांक ८ मार्च, २०१९ अन्वये रुपये ५.०० कोटी निधी वितरित करण्यात आला आहे.

सदर कामासाठी "नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर" ही कार्यान्वयन यंत्रणा निश्चित करण्यात आली आहे.

सदर कामांवर रुपये २.६६ कोटी निधी खर्च झाला असल्याचे तसेच काम प्रगतीपथावर असल्याचा अहवाल नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांनी सादर केला आहे.

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदय, नागपूर शहरातील दक्षिण नागपूर विधानसभा क्षेत्रात मानेवाडा, बालाजी नगर परसिरात अनेक वर्षांपासून ई-लायब्ररीचे काम सुरु आहे. मी जो तारांकित प्रश्न उपस्थित केलेला आहे त्या प्रश्नाला नगरविकास

ता.प्र.क्र.१२७८८......

श्री.अभिजीत वंजारी.......

विभागाकडून उत्तर प्राप्त झालेले आहे. नगरविकास मंत्री चांगले काम करीत आहेत. त्यांच्याकडे महत्वाचे खाते आहे. त्यांनी अनेक विकासाची कामे हाती घेतलेली आहेत. परंतु माझ्या तारांकित प्रश्नाला जे लेखी उत्तर अपेक्षित होते तसे उत्तर प्राप्त झालेले नाही. तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरात जी माहिती दिलेली आहे त्यापेक्षा जास्त माहिती माझ्याकडे आहे. मी सांगू इच्छितो की, ई-लायब्ररीसाठी एकूण ७ कोटी ६६ लाख रुपये खर्च झालेले आहेत. उर्वरित कामासाठी अतिरिक्त निधी लागणार आहे. परंतु या संदर्भात लेखी उत्तरात माहिती दिलेली नाही. सदर ई-लायब्ररी लवकरात लवकर सुरु करण्यात यावी, अशी जनतेची मागणी आहे. केंद्र व राज्य शासनाचे ई-लायब्ररीचे सॉफ्टवेअर आहे. केंद्र व राज्य शासनाचे ई-लायब्ररी किंवा ई-बुक्स संदर्भात अनेक सॉफ्टवेअर्स आहेत. जेणे करुन कोणत्याही विद्यार्थ्याला त्याचा फ्री ॲक्सेस राहील. या निमित्ताने तो उल्लेख देखील केला पाहिजे. सदर ई-लायब्ररी अद्ययावत झाली तरच त्याचा सर्व सामान्य जनतेला उपयोग होईल. माझी मागणी आहे की, ई-लायब्ररीचे काम करताना जे इंटेरिअरचे काम सुरु आहे मग ते सोलर पॅनल, प्लम्बिंग फिटिंग, इलेक्ट्रीक फिटिंग, माहिती व तंत्रज्ञान, वातानुकूलित यंत्रणा इत्यादी कामे असतील. सदर ई-लायब्ररीसाठी लागणारे उपक्रम, सॉफ्टवेअर खरेदी करण्यात येणार आहेत काय ?

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अभिजीत वंजारी यांनी तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून ई-लायब्ररी संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. सद ई-लायब्ररीचे अद्ययावत बांधकाम झालेले आहे. डिजिटल माहितीचे संग्रहन, संघटन व पुन:प्राप्ती करणे, माहितीचे जतन करण्यासाठी डिजिटायजेशन करणे, ग्रंथालयीन कार्याची परिणामकारकता सुधारणे, ग्रंथालयासाठी अधिक प्रमाणात लागणाऱ्या जागेची समस्या आपण सोडविलेली आहे, वाचकांचा व ग्रंथालयीन सेवकांचा वेळ वाचविणे, तसेच इलेक्ट्रॉनिक स्वरुपात प्रकाशित होणाऱ्या राष्ट्रीय व

ता.प्र.क्र.१२७८८......

श्री.एकनाथ शिंदे......

आंतरराष्ट्रीय नियतकालिकाचा वापर वाढविणे, सीडीच्या स्वरुपात डेटाबेसचे संग्रहन करणे हे या ई-लायब्ररीचे उद्दिष्ट आहे. मी सांगू इच्छितो की, डिजिटल ग्रंथालय तालिकेचे अवलोकन करणे, इलेक्ट्रॉनिक स्वरुपात ग्रंथ प्राप्त करणे किंवा उसनवारीने मिळविणे, इंटरनेट व ब्राउझरचा उपयोग करुन डिजिटल ग्रंथालय केव्हाही व कोठेही उपस्थित होऊ शकते. त्याच बरोबर डिजिटल स्वरुपातील माहितीची एकच प्रत अनेक उपभोक्त्यांना वापरता येणार आहे. म्हणजे अनेक लोकांना त्याचा फायदा होणार आहे. माहितीचा महत्वाचा आशय संघटित व सुरचित स्वरुपात उपलब्ध करुन घेता येणार आहे. डिजिटल डेटाबेस संग्रहातील कोणताही शब्द, वाक्प्रचार, म्हणी यांचा त्वरित शोध घेता येणार आहे. त्याच बरोबर डिजिटल ग्रंथालयामुळे जागेची बचत होऊन मनुष्यबळ देखील कमी लागणार आहे. आपण या सर्व गोष्टींचा विचार केलेला आहे. दुर्मिळ व ऐतिहासिक ग्रंथहस्तलिखिते तसेच वेगवेगळ्या स्वरुपातील साहित्य जतन करता येते. यामध्ये ग्रंथ, नियतकालिके, संदर्भ ग्रंथ, छापील ग्रंथेत्तर साहित्य, ध्वनिमुद्रिका, चलचित्र व्हिडिओ चित्रफिती इत्यादी आहे. आपण कोविड संकट असताना सुद्धा ई-लायब्ररीचे उत्कृष्ट बांधकाम केलेले आहे. आपण स्वत: लायब्ररीचे बांधकाम बघितले आहे. आपण तेथे अद्ययावत ई-लायब्ररी सुरु करीत आहोत. आपण या संदर्भातील इतर कामे देखील युद्ध पातळीवर पूर्ण करीत आहोत. आपली जी सूचना आहे त्याचा देखील आपण यामध्ये अंतर्भाव करु. सदर ई-लायब्ररी तेथील विद्यार्थ्यांसाठी महत्वपूर्ण ठरणार आहे. आपण १ मे पर्यंत लायब्ररी सुरु करु असे मी सभागृहाला आश्वासन देतो.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, नगरविकास मंत्री महोदयांनी समर्पक व सविस्तर उत्तर दिलेले आहे. मंत्री महोदयांनी तेथे ज्या बाबी होणार आहेत त्यांचा उल्लेख केलेला आहे. आपण त्यातील एकही बाब सुटणार नाही याबाबत काळजी घ्यावी. सन्माननीय सदस्य श्री.अभिजीत वंजारी यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न

ता.प्र.क्र.१२७८८......

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.........

उपस्थित केलेला आहे. आता लायब्ररीचे काम बंद असल्यामुळे अनेक वेळा त्या संदर्भात वर्तमानपत्रात बातम्या छापून येतात. माझा प्रश्न असा आहे की, सदर कामासाठी जो निधी उपलब्ध आहे त्यामध्ये उर्वरित काम पूर्ण होणार आहे काय ? माझ्या माहितीप्रमाणे सदर कामासाठी आणखी ५ कोटी रुपये लागणार आहेत. त्यामुळे ३१ मार्च पूर्वी नागपूर सुधार प्रन्यासकडे ५ कोटी रुपये देण्यात येणार आहेत काय ?

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, तेथे उत्कृष्ट इमारत उभी राहिलेली आहे. आपण विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होईल या दृष्टीने आपण ती इमारत उभी केलेली आहे. सदर कामासाठी जो निधी लागेल तो उपलब्ध करुन दिला जाईल. सदर कामासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही.

--------

असुधारित प्रत

## नवी मुंबई येथील बेलापूर किल्ल्याच्या सुशोभिकरणांतर्गत बुरूजाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(२) * १२८५१ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील शिवकालिन ऐतिहासिक बेलापूर किल्ल्याचा विकास व सुशोभिकरण करण्यासाठी सन २०१८ मध्ये रुपये १८ कोटी खर्च करण्याचा शासनाने निर्णय घेऊन त्यामध्ये ॲम्फिथिएटर, एरियल प्लाझा, कॅफे एरिया, इंटरप्रेटेशन सेंटर, दुकाने व वॉच टॉवर इत्यादी बाबींचा समावेश करण्यात येवून त्याकरीता पुरातत्व विभागाची मान्यता घेण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर किल्ल्याच्या बुरुजाचे व इतर कामे निकृष्ट दर्जाची केलेली असल्यामुळे, किल्ल्याच्या बुरुजावर लोखंडी बीमचा भार आल्याने दिनांक १२ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास बुरुज ढासळण्याची दुर्घटना घडल्याने किल्ल्याशेजारील बसमधून प्रवास करणारी महिला जखमी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर किल्ल्याच्या विकास व सुशोभिकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत दुर्गप्रेमी व शिवप्रेमींनी शासनाकडे तक्रारी केल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर तक्रारींच्या अनुषंगाने मा.मंत्री महोदयांनी चौकशीचे आदेश देवून सर्व संबंधितांविरुध्द कारवाई करण्याचे त्याचवेळी आदेशित केलेले असतानाही सदरचे काम चालू ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, किल्ल्याच्या बुरुजासाठी आतापर्यंत रुपये ३ कोटी एवढा खर्च झाला असून ती रक्कम संबंधित ठेकेदाराला अदा करण्यात आली असल्याचे तसेच, सदर कामाचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित कंत्राटदाराचे नाव काळ्या यादीत टाकून त्याचेविरुध्द व त्याला सहाकार्य करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ता.प्र.क्र.१२८५१.....

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सिडकोने मे.किमया आर्किटेक्स या संवर्धन वास्तुशास्त्रज्ञाची बेलापूर किल्ल्याच्या जीर्णोध्दारासाठी नेमणूक केली होती. त्यांनी दिलेल्या आराखड्यानुसार संवर्धन व जीर्णोध्दाराची कामे सिडकोमार्फत करण्यात येत होती.

तथापि, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाने दिनांक १६/०९/२०२० व दिनांक ०७/१०/२०२० रोजी बेलापूर किल्ला या स्मारकावरील सुशोभिकरण व संवर्धन कार्याकरीता पुर्वपरवानगी आवश्यक असल्याचे व सदर कामे पुरातत्वीय विभागाच्या निकष व संकेतानुसार करणेबाबत सिडकोस कळविले होते. त्यानुषंगाने सिडकोचे अधिकारी व संचालनालयाचे प्रतिनिधी यांचेकडून संयुक्त स्थळपाहणी करण्यात आली. त्यानंतर सिडकोने सादर केलेला फेरप्रस्तावातील सर्व तांत्रिक बाबींची पडताळणी करुन संचालनालयाने दिनांक ०४/०३/२०२१ रोजी ना-हरकत परवानगी दिली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सततच्या पावसाच्या माऱ्यामुळे व शेजारील जड वाहतुकीच्या हादऱ्यांमुळे चौकोनी बुरुजाचा काही भाग ढासळला आहे.

(३) यासंदर्भात दिनांक ०७/०९/२०२० रोजी पुरातत्व व वस्तुसंग्रहालय, संचालनालयाकडे तक्रार केली आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणी पुरातत्व संचालनालयाने दिनांक २२/०४/२०२१ च्या पत्रान्वये पुढील कार्यादेशानंतर किल्ल्याचे काम हाती घेणेबाबत सिडकोस कळविल्यामुळे तेव्हापासून सदरचे काम स्थगित ठेवण्यात आले आहे.

(५) हे अंशत: खरे आहे.

बेलापूर किल्ल्याचा बुरुज व किल्ल्यातील इतर विकास कामांकरीता सदरचा खर्च झाला आहे. बेलापूर किल्ल्याचे संवर्धन ही योजना सुरु करण्यापुर्वी संवर्धन वास्तुशास्त्रज्ञ यांचेमार्फत स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले आहे.

(६) बेलापूर किल्ल्याचा चौकोनी बुरुज ढ़ासळण्याच्या घटनेनंतर तांत्रिक बाबींची पडताळणी करण्याकरीता सिडकोने चौकशी समिती गठीत केली आहे.

ता.प्र.क्र.१२८५१.....

असुधारित प्रत

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, नवी मुंबईतील बेलापूर येथे शिवकालिन ऐतिहासिक किल्ला आहे. सदर किल्ल्याबाबत तेथील जनतेच्या भावना तीव्र आहेत. सदर किल्ला पुरातन विभागाकडे असण्याऐवजी सिडकोकडे आहे. सदर किल्ल्याचा विकास करण्यात यावा अशी मागणी तेथील लोकांनी, शिवप्रेमींनी केली होती. सिडकोने १६ कोटी रुपयांचे टेंडर सुद्धा काढले. तेथे ५-६ बुरुज, पिंडीच्या आकाराची विहीर, शिलालेख, पुरातन तलाव, गोवर्धन मातेचे मंदिर आहे. सिडकोने १६ कोटी रुपयांचे टेंडर काढले. परंतु सिडकोकडे संवर्धन विभाग नसल्यामुळे, सदर किल्ल्याच्या कामाच्या माहितीचा अधिकार नसल्यामुळे चुकीच्या पद्धतीने निविदा काढली गेली. ज्यावेळी निविदा काढण्यात आली त्यावेळी आम्ही तक्रार सुद्धा केली होती.

यानंतर श्री.सांगळे ........

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२८५१....

श्री.शशिकांत शिंदे....

या बाबतीत चुकीच्या पद्धतीने निविदा काढण्यात आली. आम्ही त्या संदर्भात तक्रार देखील केली होती. आपण गड किल्ल्यांचे रक्षण करीत असतो. चुनखडी व गुळाचे मिश्रण वापरुन किल्ल्याचे बांधकाम होणे गरजेचे होते. परंतु तसे न करता सिमेंट व लोखंडी बिंब वापरुन बुरुजाचे काम करण्यात आले. त्यामुळे बुरुज ढासळला. आम्ही या संदर्भात तक्रार केलेली असताना देखील निविदा काढण्यात आली व कामकाज करण्यात आले. परिणामी निकृष्ट बांधकाम झाल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली. हा किल्ला संरक्षित किल्ल्यांच्या यादीत नसल्यामुळे त्याचा संरक्षित किल्ल्यांच्या यादीमध्ये समावेश करावा. पुरातन शास्त्रशुद्ध पद्धतीने सदर किल्ल्याचे काम होणे गरजेचे आहे. सिडकोने तेथे काही गेस्ट हाऊस व विविध कामांसंबंधीचे प्रस्ताव सादर केलेले आहेत. परंतु तसे काही न करता पुरातन असलेल्या किल्ल्याची व्यवस्था चांगल्या प्रकारे व्हावी. तसेच या किल्ल्याच्या कामाकरिता संवर्धनाविषयी निगडीत असलेली संस्था व तज्ज्ञांची एक समिती नेमावी अशी आमची मागणी आहे. या संदर्भात आयआयटीने शासनाकडे अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवाल लक्षात घेऊन या संदर्भात चुकीचे काम झाले असल्यास त्याबाबत चौकशी करुन संबंधितांविरुध्द कारवाई करावी. तसेच हा किल्ला सिडकोकडून पुरातत्त्व विभागाकडे दिल्यास त्याची निश्चितपणे काळजी घेतली जाईल. याबाबत शासन तातडीने निर्णय घेणार आहे का ?

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी बेलापूर किल्ल्याचा बुरुज ढासळल्यासंबंधी प्रश्न उपस्थित केला आहे. हा किल्ला संरक्षित किल्ल्यांच्या यादीत समाविष्ट नाही, ही वस्तुस्थिती आहे. १५६० ते १५७० या काळात हा किल्ला बांधण्यात आला होता. सोळाव्या व सतराव्या शतकामध्ये पोर्तुगीज वगैरे असा त्याचा इतिहास आहे. विविध मंडळांच्या मागण्या व त्यावर तत्कालीन राज्यमंत्री यांनी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने दिलेल्या निर्देशानुसार सदर किल्ल्याच्या संवर्धन व पुनर्विकासाचे काम सिडकोने हाती घेतले

ता.प्र.क्र.१२८५१....

श्री.एकनाथ शिंदे....

होते. सिडकोने सदर किल्ल्याच्या जीर्णोद्धाराचे काम दिनांक २८ मे, २०१९ रोजी सुरु केले. दिनांक ४ फेब्रुवारी २०१० रोजी प्रधान सचिव, पर्यटन विभाग यांनी सदर किल्ल्याचे जतन, संवर्धन व जीर्णोद्धार पूर्ण होईपर्यंत काम तहकूब ठेवण्यासाठी विनंती केली. दिनांक ४ मार्च, २०१० रोजीच्या पत्रान्वये व्यवस्थापकीय संचालक, सिडको बेलापूर किल्ला हे राज्यातील महत्त्वाचे स्मारक घोषित करण्यासंबंधी सूचना... तसेच हा किल्ला संरक्षित यादीमध्ये नसल्यामुळे या किल्ल्याच्या दुरुस्तीला वस्तू संग्रहालय, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक ४ मार्च, २०२१ रोजीच्या पत्रान्वये ना हरकत परवानगी दिली. त्यानंतर पुरातत्त्व विभाग आणि सिडको यांच्या माध्यमातून त्या किल्ल्याची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. तांत्रिक सहाय्यक, पुरातत्त्व विभाग यांनी दिनांक २२ एप्रिल, २०२१ रोजी स्थळाची पुन्हा पाहणी केली. त्यानंतर पुढील आदेश होईपर्यंत सदर काम स्थगित ठेवण्याचे निर्देश दिले. त्यानुसार सदर काम स्थगित आहे. सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी असा मुद्दा उपस्थित केला आहे की, किल्ल्याचा बुरुज ढासळला आहे. त्यावेळी पुरातत्त्व विभागाने काम बंद करण्याच्या सूचना दिल्या होत्या. या संदर्भात नेमलेल्या समितीमध्ये सहाय्यक संचालक, पुरातत्त्व विभाग श्री.विलास वाहने, श्री.आर.बी. धायटकर, मुख्य अभियंता तसेच श्री.संजय नाडगौडा, अतिरिक्त मुख्य अभियंता यांचा समावेश आहे. सदर समितीमध्ये आयआयटीच्या अधिकाऱ्यांचा देखील समावेश आहे. समितीच्या सदस्यांनी असा निष्कर्ष काढला आहे की, शेजारच्या रस्त्यांवरुन जाणाऱ्या अवजड वाहनांच्या हादऱ्यामुळे बुरुजावर विपरित परिणाम होऊन चौकोनी बुरुज ढासळण्याची शक्यता आहे. तसेच सातत्याने होणाऱ्या पावसामुळे दगड बांधकामांमधील चिरांमध्ये पाण्याचा शिरकाव झाल्यामुळे बुरुजावर विपरित परिणाम झालेला आहे. तसेच काम करण्याचा परवाना नसल्यामुळे दगड बांधकामामधील पॉईंटिंगचे काम प्रलंबित राहिल्यामुळे बांधकाम कमजोर झाले आहे. सिडकोने सदर काम हाती घेण्यापूर्वी बुरुजावर झालेल्या कामाचा विपरित परिणाम होणे हा देखील

ता.प्र.क्र.१२८५१....

श्री.एकनाथ शिंदे....

एक महत्त्वाचा मुद्दा आहे. तसेच वरच्या बाजूला प्लॅस्टीकचे एक आच्छादन टाकले होते. त्यावर पावसाचे पाणी जमा होऊन लोड वाढला. त्यामुळे बांधकामावर परिणाम झालेला आहे. तसेच बांधकामामध्ये लोखंडी बिंब टाकलेले आहेत. ते टाकावयास नको होते. सदर प्रकरणी मे.किमया आर्किटेक्ट यांच्यावर ठपका ठेवण्यात आलेला आहे. सदर किल्ल्याचे जतन व संवर्धन व्हावे याकरिता सिडकोने पुढाकार घेतला होता. परंतु पुरातत्त्व विभागाच्या माध्यमातून वारंवार नोटीसेस देऊन काम थांबविण्याचे प्रकार झाल्याचे समोर आले आहे. दिनांक २ मार्च, २०२२ रोजी सदर समितीचा शासनाकडे अहवाल प्राप्त झालेला आहे. आम्ही तो अहवाल व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्याकडे पाठविलेला आहे. सदर प्रकरणी आर्किटेक्ट व ठेकेदार यांना नोटीस देऊन त्यांच्याकडून खुलासा मागविण्यात येईल व त्यानंतर त्यांच्यावर आवश्यक ती कारवाई देखील केली जाईल. सदर कामासंबंधी मी व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांना सूचना देतो की, त्यांनी सदर काम पुरातत्त्व विभागाकडे सुपूर्द करावे. त्यानंतर पुरातत्त्व विभागाच्या देखरेखीखाली सिडकोने सदर काम करावे व त्याकरिता होणारा सर्व खर्च सिडकोने करावा. अशा प्रकारे आम्ही निर्णय घेऊ. जेणेकरुन त्यात कोणतेही अडथळे येणार नाहीत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, पुरातत्त्व विभाग हे काम न करण्यासाठी आहे. रायगड किल्ल्याची अशीच परिस्थिती आहे. आपण सर्व किल्ल्यांचे मालक आहोत असे पुरातत्त्व विभागाला वाटते, ज्याप्रमाणे फॉरेस्ट आहे. मंत्री महोदय, आपण या संदर्भात सविस्तर व चांगले उत्तर दिलेले आहे. त्यामुळे सदरहू काम आपल्या विभागामार्फतच करावे. मी सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांना सांगू इच्छितो की, सदर काम पुरातत्त्व विभागाकडे वर्ग करण्याची त्यांनी मागणी करु नये. सभापती महोदय, जंजिरा किल्ल्यावर गाईड करण्यासाठी काही मुले काम करीत होते. परंतु गाईड करण्यासाठी कोर्स करणे आवश्यक असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले. त्यानंतर सदर मुलांनी किल्ल्याचा इतिहास सांगण्यासाठी गाईडकरिता कोर्स

ता.प्र.क्र.१२८५१....

श्री.जयंत प्र.पाटील....

केला. परंतु पुरातत्त्व विभागाने अद्याप त्यांना गाईडचे काम करण्यासाठी परवानगी दिलेली नाही. सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, आपण आपल्या दालनात एक बैठक घेऊन त्यात पुरातत्त्व विभागातील सर्व अधिकाऱ्यांना बोलवावे. जेणेकरुन सर्व प्रश्न मार्गी लागू शकतील.

**सभापती** : या संदर्भात माझ्या दालनात बैठक घेण्यात येईल.

श्री.शशिकांत शिंदे : मी मंत्री महोदयांचे आभार मानतो की, त्यांनी या संदर्भात अतिशय सविस्तरपणे चांगले उत्तर दिलेले आहे. पुरातत्त्व विभाग आणि स्ट्रक्चरल ऑडिटच्या अनुषंगाने सिडकोने कामे केलेली आहेत. परंतु तेथे सिमेंटचा वापर केला. आयआयटीच्या रिपोर्टनुसार तेथे चुकीचे काम झालेले असल्यामुळे सदर कामासाठी स्थगिती देण्यात आली होती. सदर रिपोर्टमध्ये चुकीचे काम झाल्याची बाब मान्य करण्यात आली आहे. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, पुरातत्त्व विभागाला सिडकोने पैसे दिल्यानंतर सदर काम करण्यासाठी त्यांना टाईमबाऊंड कालावधी द्यावा. आपण पुरातत्त्व विभागाकडे गड किल्ले हस्तांतरीत करीत असतो. परंतु तेथे मॉल वगैरे अशा प्रकारे तेथे नियोजन करण्यात आले होते. किल्ला जतन व्हावा अशी शिवप्रेमींची इच्छा आहे. सदर अधिकार राज्याकडे असल्यामुळे त्याबाबतची कार्यवाही करण्यासाठी पुरातत्त्व विभागाकडे देण्यात यावे. तसेच त्याकरिता सिडकोने खर्च करावा. तसेच सभापती महोदय, या संदर्भात आपण एक बैठक घेऊन त्यात याबाबत निर्णय घ्यावा.

-------------

## रायगड जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांना १२.५ टक्के योजनेंतर्गत सिडकोचा भूखंड मिळण्याबाबत

**(३) * १२२५२ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धुतुम (ता.उरण, जि.रायगड) येथील श्री.दत्तु ठाकुर यांची जमीन सिडकोने सन १९८४ मध्ये संपादित केली असून जमिनीच्या मोबदल्यात १२.५० टक्के योजनेतील भूखंड देण्यास सिडकोकडून विलंब झाल्यामुळे श्री.दत्तू ठाकुर यांनी सिडको कार्यालयात आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचे दिनांक १ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबईसह रायगड जिल्ह्यातील सिडकोने संपादित केलेल्या जमिनींना १२.५० टक्के योजनेचा लाभ देण्यासंदर्भात नगरविकास विभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रस्तावाबाबत निर्णय घेऊन संपादित जमिनीचा मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

असुधारित प्रत

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे,

श्री.दत्तु भिवा ठाकुर व इतर यांची मौजे-नवघर, ता.उरण, जि.रायगड येथील एकूण २-८७-३ हे.आर. इतकी जमीन नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित झालेली असून त्यापैकी क्षेत्र १-१६-० हे.आर. क्षेत्र १२.५% योजनेंतर्गत भूखंड वाटपासाठी पात्र आहे. उर्वरित क्षेत्र १-७०-८ हे. आर. नियाज खातेशी संबंधित असल्याने शासन निर्णय, दिनांक ०६/०३/१९९० व दिनांक २८/१०/१९९४ मधील तरतुदीनूसार १२.५% योजनेंतर्गत पात्र ठरत नाही. तसेच, पात्र क्षेत्रासाठी १००० चौ.मी. चा भूखंड देय असून त्यांना द्रोणागिरी नोड येथे भूखंड क्र.५६, सेक्टर क्र.५९, क्षेत्र ३०० चौ.मी. भूखंडाचे वाटप पूर्ण करण्यात आले असून शिल्लक ७०० चौ.मी. ची भूखंड पात्रता संभाव्य सोडतीमध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहे.

(२) व (३) नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनींबाबत शासन निर्णय, दिनांक ०६/०३/१९९० व दिनांक २८/१०/१९९४ मधील तरतुदीनूसार १२.५

ता.प्र.क्र.१२२५२....

श्री.एकनाथ शिंदे....

टक्के योजनेंतर्गत संबंधितांना भूखंड वाटपाची कार्यवाही सिडकोकडून करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्यात साडेबारा टक्के योजनेचा लाभ दिला जात आहे. परंतु काही ठिकाणी ज्यांना साडेबारा टक्के योजनेचा लाभ दिलेला आहे, त्यांना एनओसी दिली जात नाही. सदर तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरासंबंधी माझा कोणताही आक्षेप नाही. मंत्री महोदयांनी योग्य उत्तर दिलेले आहे. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपल्या दालनात या संदर्भात बैठक घेणार आहात का ?

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात केलेली विनंती मला मान्य आहे. या संदर्भात माझ्या दालनात बैठक घेण्यात येईल.

**सभापती** : मंत्री महोदय, सदर बैठकीच्या वेळी सर्व संबंधित सन्माननीय सदस्यांना बोलवावे.

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, ठीक आहे.

-------------

यानंतर श्री.गागरे.....

असुधारित प्रत

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगारांच्या वसाहतींचा आश्रय योजनेंतर्गत पुनर्विकास करण्याबाबत

**(४) * १२०८९ श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.राजहंस सिंह, श्री.रमेश कराड, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके, डॉ.रणजित पाटील, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगारांच्या वसाहतींच्या आश्रय योजनेंतर्गत सुरु असलेल्या पुनर्विकासाच्या कामामध्ये रुपये १८८४ कोटींचा गैरव्यवहार झाला असून, सफाई कामगारांना मालकी हक्काने घरे न देता पुन्हा सेवा निवासस्थानातच ठेवले जाणार आहे, त्यामुळे याप्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याच्या मागणीबाबतचे एक सविस्तर निवेदन महानगरपालिकेतील एका पक्षनेत्यांनी मा.मुख्यमंत्री, मा.नगरविकास मंत्री, आयुक्त, महानगरपालिका, मुंबई इ. यांचेकडे सादर केले आहे, सदर निवेदनावर कोणतीही कारवाई न झाल्याने मा.राज्यपाल यांचेकडे एका शिष्टमंडळाने दिनांक १८ डिसेंबर, २०२१ रोजी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांसाठी सुरु करण्यात आलेल्या आश्रय योजनेची चौकशी करण्याचे निर्देश मा.राज्यपाल यांनी लोकायुक्तांना माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांच्या १२ वसाहतींचा आश्रय योजनेंतर्गत पुनर्विकास करण्याचे काम ठाणे महानगरपालिकेतील कंत्राट शायोना कार्पोरेशन कंपनीला देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निविदा प्रक्रियेत किमान ३ कंपन्यांनी सहभाग घेऊन स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया होणे अपेक्षित असून, एकमेव निविदा प्राप्त झाल्यास पुनर्निविदा मागविण्याबाबत केंद्रीय दक्षता आयोगाची मार्गदर्शक तत्वे असतानाही याबाबत उप अभियंता यांनी कोणतीही कार्यवाही न करता एकमेव कंपनीला रुपये १६०० कोटींचे काम देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२०८९.....

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करुन सफाई कामगारांच्या ३९ वसाहतींचा पुनर्विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सफाई कामगारांच्या ४६ वसाहती असून त्यामधील साधारणत: २९८१६ सफाई कामगारांपैकी अंदाजे ५५९२ सफाई कामगारांना महानगरपालिकेमार्फत सेवा निवासस्थाने देण्यात आली आहेत. सफाई कामगारांच्या सद्य:स्थितीत मोडकळीस आलेल्या चाळी व इमारतींचा (वसाहतींचा) आश्रय योजनेंतर्गत पुनर्विकास करुन अंदाजे १४००० घरे बांधण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे सफाई कामगारांसाठी मालकी हक्काची घरे बांधण्याकरीता महानगरपालिका हद्दीत जागा उपलब्ध नसल्यामुळे प्रथमत: सेवानिवासस्थाने उपलब्ध करुन देऊन तद्नंतर जागा उपलब्ध झाल्यास डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेंतर्गत मालकी हक्काच्या सदनिकांसाठी प्रक्रिया राबविणे शक्य होईल. तसेच, सदर प्रकरणी मा.लोकप्रतिनिधी यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे पत्रव्यवहार केला आहे.
(२) मा.राज्यपाल महोदयांनी मा.लोक आयुक्त यांना माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांसाठी सुरु करण्यात आलेल्या आश्रय योजनेची चौकशी करण्याचे निर्देश दिले असल्याबाबत माहिती उपलब्ध नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

परंतु, मे.शायोना कॉर्पोरेशन या कंत्राटदाराची आर्थिक क्षमता न तपासता कंत्राट दिल्याच्या वृत्तपत्रामधील बातमीच्या अनुषंगाने स्वाधिकारे चौकशी करण्याकरीता, सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश मा.लोकआयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २०/०८/२०२१ रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेस दिले होते. त्यानुषंगाने महानगरपालिकेने माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये मा.लोकआयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना अहवाल सादर केला आहे.
(३) हे खरे आहे.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२०८९.....

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ३५ वसाहतींचा पुनर्विकास करण्यासाठी ११ गट तयार करुन डिझाइन ॲण्ड बिल्ट टर्नकी बेसिस (Design and Built Turnkey Basis) च्या निविदांकरीता महानगरपालिका आयुक्तांची मान्यता घेऊन वृत्तपत्रांमध्ये दिनांक ११/०९/२०१९ रोजी प्रथम जाहिरात प्रकाशित करण्यात आली. तथापि, निविदांमध्ये येत असलेल्या विविध अडचणी व तांत्रिक कारणास्तव सदर निविदांची मुदत, २ परिशिष्ट व ५ शुध्दिपत्रकांद्वारे विविध अटी व शर्ती सहीत दिनांक २९/०२/२०२० पर्यंत वाढविण्यात आली. तथापि, कमी प्रतिसादामुळे व झालेल्या बऱ्याच बदलांमुळे सदर निविदा रद्द करण्यात आली.

तद्नंतर महानगरपालिका आयुक्तांच्या मंजूरीने दिनांक २८/०४/२०२० रोजीच्या वृत्तपत्रास जाहिरात प्रकाशित करुन फेर-निविदा मागविण्यात आल्या. तद्नंतर गट २ व गट ३ च्या (१२ वसाहतींच्या) निविदांना ९ वेळा मुदतवाढ व अंदाजे ५ महिने कालमर्यादा देऊनही दिनांक ०६/११/२०२० रोजी प्रत्येकी १ अंतिम प्रतिसाद प्राप्त झाला.

सफाई कमगारांच्या वसाहती या सन १९६० दरम्यानच्या असून सद्य:स्थितीत जीर्णावस्थेत आहेत. त्यामुळे कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार व जिवितहानी टाळण्यासाठी सदर वसाहतींचा पुनर्विकास करणे गरजेचे होते. निविदांना ९ वेळा मुदतवाढ व अंदाजे ५ महिने कालमर्यादा देऊनही येणारा अल्प प्रतिसाद व निविदा प्रक्रियेत होत असलेला कालपव्यव लक्षात घेऊन गट-२ व गट-३ (१२ वसाहतींचा पुनर्विकास) या निविदांचे एकमेव प्रतिसाद असलेले लिफाफे उघडण्यात आले, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) सदर प्रकरणी कोणत्याही प्रकारची अनियमितता झाली नसल्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. प्रसाद लाड : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांच्या आश्रय योजनेबाबत सदरहू प्रश्न असून तो कायम अनुत्तरीत राहिला आहे. यांच्याकरीता योजलेले धोरण शासन पटलावर ठेवणार का. तसेच आजपर्यंत महानगरपालिकेने किती सफाई कर्मचाऱ्यांचे वसाहतीसंदर्भातील प्रश्न सोडविले

ता.प्र.क्र.१२०८९.....

श्री. प्रसाद लाड .....

आहेत. किती सफाई कर्मचाऱ्यांचा आश्रय योजनेमध्ये पुनर्विकास केला आहे. सदर योजनेसाठी केंद्रीय दक्षता आयोगाच्या सूचनांचे पालन केले गेले आहे का, राज्यपाल व लोकआयुक्तांनी चौकशी करण्याचे आदेश दिले होते, त्या मे.शायोना कार्पोरेशनच्या कंत्राटाबाबत समिती नेमली आहे का, याबाबत आपण खुलासा करणार का ?

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांनी अनेक मुद्दे उपस्थित केलेले आहेत. सफाई कामगारांच्या वसाहतीबाबत प्रश्न उपस्थित केला आहे. राज्यपाल महोदयांनी लोकआयुक्तांकडे व लोकआयुक्तांनी त्याची माहिती मागवली आहे. यापूर्वी देखील लोकआयुक्तांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे मागवली होती व याचा अहवाल लोकआयुक्तांकडे सादर केलेला आहे. गट २ व गट ३ ही योजना १२ हजार सफाई कर्मचाऱ्यांना घरे मिळावीत म्हणून हाती घेतलेली आहेत. वास्तविक २९ हजार सफाई कामगार आहेत, आपण टप्प्याटप्प्याने २९ हजार कर्मचाऱ्यांपर्यंत पोहचणार आहोत. परंतु सुरुवातीला १२ हजार घरांची योजना आहे. या हाती घेतलेल्या योजनेचे मॉडेल त्यांनीच डिझाईन करायचे आहे, आराखडा सादर करायचा आहे. त्यांनी केलेले काम पाहून त्याप्रमाणे पैसे दिले जातील. डिझाईन, बील व टर्न की बेसीस वर हे काम त्यांना दिलेले आहे. १२ हजार घरांकरीता एकदा निविदा काढली होती परंतु प्रतिसाद मिळाला नाही. पुन्हा टेंडर काढले तेव्हा त्याला ९ वेळा मुदतवाढ झाली, तेव्हा ही निविदा फायनल झाली. यामध्ये जवळपास १२ हजार घरे होतील. त्यांना ३०० स्क्वेअरफुटाची घरे मिळतील. टप्प्याटप्प्याने ही घरे द्यायची आहेत. २९ हजार कर्मचाऱ्यांना घरे द्यायची आहेत, पहिल्या टप्प्यात सध्या ५५९२ सफाई कर्मचारी निवासस्थाने आहेत. ही निवासस्थाने दाटीवाटीच्या क्षेत्रात आहेत. अशा ठिकाणी कोणी काम करण्यासही तयार होत नाही. सुदैवाने ३ एफएसआय गृहीत धरुन डिझाईन झाले होते, त्यानंतर ४ एफएसआय झाला, त्यानंतर तेथील परिस्थिती, रस्ते यामुळे एफएसआय वाढला, तेथे उंच इमारत

ता.प्र.क्र.१२०८९.....

श्री.एकनाथ शिंदे .....

बांधता येते. तो एफएसआय, फंजीबल एफएसआय यामुळे ५.४ एफएसआय यामध्ये लागू झालेला आहे. नाही तर जास्तीत जास्त ८ हजार घरे झाली असती. म्हणून आपण १२ हजार घरांचा प्रकल्प पुढे नेत आहोत.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, अगोदर सफाई कामगारांच्या घरासंबंधी आपल्या दालनात बैठकही आयोजित केली होती. त्यावेळी मंत्री महोदयांना वेळ मिळाली नाही म्हणून ते येऊ शकले नाहीत. कायमस्वरुपी व आश्रय योजनेबाबत हा प्रश्न २००८ ते २०१२ पासूनचा हा प्रश्न आहे, त्यावेळी श्री.पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री होते. त्यानंतर मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस आल्यानंतर त्यांनी ४ चा एफएसआय दिला. मुंबईमध्ये सफाई कर्मचाऱ्यांच्या ३९ वसाहती आहेत. ५५२२ ही सेवा निवासस्थाने आहेत. ३९ वसाहतींचा आपण पुनर्विकास केला तर २९ हजारापेक्षा जास्त घरे होतील. परंतु आता आपण काही ठराविक वसाहती घेतल्या असून काम सुरु आहे. आपल्याकडे बिलो टेंडर असल्यामुळे, महानगरपालिकेत कसे चालते ते आपणास माहिती आहे, त्यामुळे कोणी कंत्राटदार येत नाही. नसता मुंबईत काम करण्यासाठी कंत्राटदार येणार नाही असे होणारच नाही. मी दोन प्रश्न विचारु इच्छितो की, मुळ प्रश्नी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी आश्वासन दिले होते की, सफाई कामगारांची २९ हजार घरे बांधल्यानंतर सेवा सदनिका म्हणून दिली जातील. ज्यांची सेवा २५ वर्षाच्या वर सेवा झालेली आहे किंवा सेवेत असताना जे मृत होतील त्यांना कायमस्वरुपी घरे द्यावयाची आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेअंतर्गत हा विषय आहे व आश्रय योजना आहे. पाच वर्षापासून अजून बांधकामास सुरुवात झालेली नाही. आपण २९ हजार घरे कधीपर्यंत बांधणार आहात. या बांधकामास सुरुवात कधी होणार आहे, ही घरे कधी मिळणार आहेत. मी सांगितल्याप्रमाणे निम्म्या कर्मचाऱ्यांना सेवा निवासस्थाने, ज्यांची सेवा २५ वर्षापेक्षा जास्त झाली आहे व जे कामगार मृत होतात त्यांना आपण कायमस्वरुपी घरे देणार का ?

ता.प्र.क्र.१२०८९.....

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांना मी सांगू इच्छितो की, ८५१ सदनिका तयार झालेल्या आहेत. १२ हजार सदनिकांकरीता वर्क ऑर्डर दिलेली आहे. आता या कामास सुरुवात झालेली आहे एवढे लक्षात ठेवावे. या ठिकाणी कंत्राटदाराने डिझाईन, बांधकाम, संकल्पचित्र, आराखडे, सीआरझेड परवानगी, रेल्वेची परवानगी, एमओएफचे ना हरकत प्रमाणपत्र, अग्नीशमन एनओसी हे सर्व घ्यायचे व करायचे आहे. येथे अरुंद रस्ते आहेत, शहरातील ठिकाणे आहेत त्यामुळे दाट लोकवस्तीमध्ये त्या लोकांच्या वसाहती आहेत. मोकळया मैदानावर आपण लगेच इमारत उभी करु शकतो तशी परिस्थिती येथे नाही हे सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांना माहिती आहे. अगोदर ३६ महिने कामाचा कालावधी होता ती बदलून २४ महिने मुदत दिलेली आहे. डीएलपी म्हणजे दायीत्व कालावधी तीन ते पाच वर्षाचा होता तो आता १० वर्षाचा केला आहे. विकासक इमारत बांधतात व पळून जातात असे आता होणार नाही. १० वर्षे त्याची जबाबदारी असणार आहे. २९ हजारपैकी १२ हजार घरांबाबत माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे बैठकही झाली आहे, त्यांच्याकडे हा विषय मी उपस्थित केला आहे. सदरहू विषय चर्चेला येईल. तुम्हाला कोणते उत्तर अपेक्षीत आहे हे मला माहिती होते, २९ हजार लोकांना घरे द्यायची आहेत, त्यांना सर्व्हीस क्वॅार्टर्स दिलेच पाहिजेत. त्यांच्या कामावर देखील त्याचा चांगला परिणाम होतो. हे करीत असातना जे सेवेत आहेत त्यांच्या वारसाहक्ककाने लोक नोकरीस लागतात, त्याबाबतचा नियम तुम्हाला माहिती आहे. ज्याला कोणी नसेल त्यांनी देखील ॲडॉप्ट केले व हा अमुक माझी जबाबदारी घेत आहे त्यांनाही घर देत आहोत. म्हणून या योजनेत कोणीही वाऱ्यावर जाणार नाही. त्यामुळे २९ हजार घरे पूर्ण करण्याचे पहिले टारगेट आहे. दुसरा टप्पा ज्यांना २५ वर्षे पूर्ण झाली त्यांना घरे देण्याचा आहे. आपल्या सहकार्यामुळे हे टारगेट नक्की पूर्ण करण्याचा प्रयत्न करु.

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२०८९..........

श्री.एकनाथ शिंदे..........

कारण २९,००० घरे ज्यावेळी होतील, त्यावेळी कोणीही वाऱ्यावर जाणार नाही. त्याचा मुलगा, नातेवाईक, कोणी ना कोणी कामावर आलेले असेल, त्यायोगे त्याला ते सेवा निवासस्थान मिळालेले असेल. हे एक टार्गेट आहे, ते निश्चितपणे शासन पूर्ण करण्याचा प्रयत्न करेल. याकरिता दोन वर्षांचा कालावधी लागेल.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, मागील वेळी या कारणाकरिता इमारती बांधल्या, त्या दहा-बारा वर्षातच मोडकळीस आल्या. पुन्हा त्यांना रस्त्यावर, ट्रान्झिट कॅम्पमध्ये जावे लागले. हा जो कोणी ठेकेदार आहे, त्याच्याकडून शासन गॅरंटेड काम करुन घेण्यात येणार आहे का ? महापालिकेप्रमाणे काम झाले तर ते निकृष्ट दर्जाचे होईल, कारण महापालिकेचे काम हे बिलो एस्टीमेट असते, ते निकृष्ट दर्जाचे असते, या कामाची गॅरंटी घेऊन शासन मोठया ठेकेदाराकडून ही घरे बांधून घेणार आहे का ? ही घरे बांधण्याकरिता किती कालावधी लागणार आहे ?

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, या कामाच्या निविदेमध्ये सर्वसाधारण आरसीसी कामामध्ये एम-३५ ग्रेडचे काँक्रीट वापरले जाते. परंतु या कामामध्ये एम-४० ग्रेडचे काँक्रीट वापरण्याची अट करारनाम्याध्ये अट टाकलेली आहे. २४ महिन्यात जर ठेकेदाराने काम केले नाही, तर त्याच्यावर पेनाल्टी लावलेली आहे. या कामाचा त्याचा डीएलपी दहा वर्षांचा ठेवलेला आहे. या कामात दर्जा आणि योग्य कालावधीत काम होण्याची काळजी घेण्यात आलेली आहे. यामध्ये कोणालाही निकृष्ट दर्जाचे काम करण्यास वावच नाही.

श्री.सुनील शिंदे : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तरात म्हटलेले आहे की, वारसा दाखवून अनेक सफाई कामगारांना घर देण्याकरिता पात्र ठरविलेले आहे. याचे कारणच हे आहे की, त्या सफाई कामगाराला मुंबईत घराची गरज आहे. त्यामुळे तो ग्रॅज्युएट-पोस्ट ग्रॅज्युएट झालेला त्याचा पुतणा किंवा नातू असेल त्याला वारस दाखवून मिळालेले घर स्वत:च्या ताब्यात राहावे म्हणून प्रयत्न करतो. शासनाने लाड-पागे समितीचा स्वीकार केलेला आहे. लाड-पागे समितीने अशी शिफारस केलेली आहे की, यांना यांची घरे मिळावीत. आजतागायत आश्रय

योजनेंतर्गत बनविली जाणारी घरे ही सेवा निवासस्थाने म्हणून बनविली जात आहेत.
ता.प्र.क्र.१२०८९..........
श्री.सुनील शिंदे..........
या ठिकाणी माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, यांना घरे देण्याकरिता शासनाने १९८७ पासून २२.१०.२००८ ते २०२० या कालावधीत वेगवेगळी अशी तीन परिपत्रके जारी केलेली आहेत. जेणेकरुन सफाई कर्मचाऱ्यांना मालकी हक्काची घरे मिळावीत, याकरिता ही परिपत्रके होती. त्या अनुषंगाने शासन निर्णय का घेत नाही. माझ्या माहिती नुसार वरळीच्या अटारिया मॉलच्या बाजूला आणि तुळशीवाडी येथे काही सफाई कामगारांना मालकी हक्काची घरे दिली गेलेली आहेत. त्या अनुषंगाने शासन सफाई कर्मचाऱ्यांना भविष्यात मालकी हक्काची घरे देण्यासंदर्भात विचार करेल का ?

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, २९००० सेवा निवासस्थानांचे टार्गेट पूर्ण झाल्यानंतर शासनाला कायमस्वरुपी घरांचा विचार हा विचाराधीन आहे. आता सेवा निवासस्थानामध्ये जी काही घरे आहेत, त्यातील जो कोणी कामाला लागलेला आहे, त्याच्या वारसा हक्काने दुसऱ्याला नोकरी लागतेच,त्याच्या योगे ते सेवा निवासस्थान त्याला खाली करण्याची आवश्यकता नाही. २९००० चे टार्गेट पूर्ण झाल्यानंतर कायमस्वरुपी घरांबाबत शासन आणि महापालिका विचार करेल.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, एखादा मुलगा ग्रॅज्युएट किंवा डबल ग्रॅज्युएट असेल तरीही त्याला सफाई कर्मचाऱ्याचे काम केले तरच पिटी केस होते. त्यामुळे माझी विनंती आहे की, जो मुलगा शिकलेला असेल त्याला त्याच्या योग्यतेप्रमाणे नोकरीवर रुजू करावे आणि घर द्यावे.

**सभापती :** परवाच सभागृहामध्ये या विषयावर चर्चा झालेली आहे.

-------------

असुधारित प्रत

**अकोला-अकोट (जि.अकोला) महामार्गाच्या**
**दुरुस्तीचे काम जलदगतीने करण्याबाबत**

**(५) * ११९६५ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड : तारांकित प्रश्न क्रमांक ९१६ ला दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला-अकोट (जि.अकोला) या ४५ कि.मी. महामार्गाचे गत चार वर्षापासून काँक्रिटीकरणाचे काम संथगतीने सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देवरी फाटा ते रौंदळा, अडसुळ फाटा, चोहोट्टाबाजार, बळेगांव फाटा, पाटसुळ रेल्वे या ठिकाणी रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याने अनेक अपघात वारंवार घडत असून, दिनांक ११ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास रौंदळा नजीक कार झाडावर आदळून चार युवकांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेगाव मार्गावरील पाटसुळ रेल्वेजवळ व अकोला-अकोट मार्गावरील बळेगांव फाटा येथे वन विभागाची जागा असलेल्या परिसरात अपघाताचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अकोला-अकोट महामार्गाच्या दुरुस्तीचे काम जलदगतीने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे, अशोकराव चव्हाण यांच्याकरिता :** (१) अकोला-अकोट रा.म.क्र.१६१ ए रस्त्याच्या ३९.२९ कि.मी. लांबीमध्ये सुधारणा व पुन:स्थापनेचे काम ऑगस्ट, २०१७ मध्ये हाती घेण्यात आले होते. तथापि, कंत्राटदाराकडून कामाची गती राखून विहित मुदतीत काम पूर्ण न झाल्यामुळे सदर करारनामा जून, २०२० मध्ये समाप्त करण्यात आला. त्यानंतर उर्वरित कामासाठी नव्याने निविदा निश्चित करुन नोव्हेंबर २०२० मध्ये कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. सद्य:स्थितीत काम प्रगतीपथावर आहे. तथापि, कोविड-१९ परिस्थितीमुळे कामाची गती राखणे शक्य झाले नाही.

ता.प्र.क्र.११९६५
श्री.अशोक चव्हाण....
(२) शेगांव-देवरी रा.म.क्र.५४८ सी वरील देवरी फाटा ते रौंदळा मधील काम पाटसुळ येथील वन विभागातील ३५० मी. लांबी वगळता व अडसुळ फाटा येथील रस्त्याचे काम पूर्ण झाले असून रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.

पाटसुळ येथील वन विभागाच्या हरकतीमुळे प्रलंबित असलेले ३५० मी. चे काम वन विभागाची परवानगी प्राप्त होताच दिनांक १२/०१/२०२२ रोजी सुरु करण्यात आले आहे.

अकोला-अकोट रस्त्यावरील चोहोट्टाबाजार येथील रस्त्याचे काम प्रगतीपथावर असून काँक्रिटीकरणाचे काम पूर्ण झालेली लांबी वाहतुकीसाठी खुली करण्यात आली असून उर्वरित लांबी देखील लवकरच वाहतुकीसाठी सुरु होणार आहे.

बळेगांव फाटा येथील वन विभागाच्या हरकतीमुळे प्रलंबित असलेले ३२० मी. लांबीचे काम वन विभागाची परवानगी प्राप्त होताच दिनांक १३/०१/२०२२ रोजी सुरु करण्यात आले आहे.

दिनांक १० जानेवारी, २०२२ रोजी रौंदळा ते पाटसुळ दरम्यान भरधाव कार अनियंत्रित होऊन झाडावर आदळल्याने चार युवकांचा दुर्देवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

(३) शेगांव-देवरी मार्गावरील पाटसुळ रेल्वे जवळ व अकोट-अकोला मार्गावरील बळेगांव फाटा येथे वन विभागाच्या हरकतीमुळे प्रलंबित राहिलेल्या रस्त्याची लांबी वगळता पूर्ण झालेल्या काँक्रिट रस्त्यावरुन भरधाव येणाऱ्या वाहनांचा वेग नियंत्रित न झाल्यास अपघाताची शक्यता राहते.

(४) अकोला-अकोट महामार्गाचे काम व शेगांव-देवरीवरील उर्वरित काम लवकरच पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

अपघात होऊ नयेत यादृष्टीने रस्त्यावर आवश्यक सुरक्षा उपाययोजना जसे वेग मर्यादा फलक, सूचना फलक इ.लावण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११९६५

श्री.अमोल मिटकरी : सभापती महोदय, शासनाच्या या प्रश्नाच्या लेखी उत्तरावरच माझा आक्षेप आहे. सदर उत्तर काही अंशी मला समाधानकारक वाटत असून त्यावर मी काही अंशी असमाधानी आहे. अकोला-अकोट हा ४५ कि.मी.चा महामार्ग आहे. अकोला जिल्हयामध्ये आणि विदर्भामधील अकोला हे शहर दळणवळणाचे सर्वात मोठे शहर आहे. तेल्हारा-अकोला, बाळापूर –अकोला, अकोट-अकोला, मुर्तिजापूर-अकोला हे जे काही रस्ते आहेत, या रस्त्यांची बांधकामे उत्तरामध्ये तर बऱ्याच अंशी पूर्ण झालेली आहेत, असे म्हटलेले आहे. आता शेवटच्या टप्प्यात ही बांधकामे आहेत. प्रश्न तो नाही की,.....अडथळा....

**सभापती :** सन्माननीय सदस्यांनी केवळ प्रश्न विचारावेत.

श्री.अमोल मिटकरी : सभापती महोदय, बेसिक प्रश्न हा आहे की, हे सर्वच्या सर्व रस्त्यांची कामे केवळ वन विभागाची एनओसी नसल्यामुळे ३००-४०० मीटरपर्यंत थांबलेली आहेत. यावर शासनाने दिलेल्या उत्तरात मी समाधानी नाही. राज्य मंत्रीमहोदयांना माझी विनंती आहे की, अकोला जिल्हयाच्या रस्त्यांच्या प्रश्नासंदर्भात लवकरात लवकर तुमच्या दालनात बैठक लावणार आहात का ?

श्री.दत्तात्रय भरणे : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, वन विभागाच्या हरकतीमुळे ३२० मीटर लांबीवर रस्त्याचे काम थांबले होते. परंतु त्यांनी तेही सांगितले की, १० जानेवारी, २०२२ रोजी देवरी-फाटा येथे रौंदाळा दरम्यान कार-धडकेमध्ये चार लोकांचा मृत्यू झालेला आहे. त्यासंदर्भात उप विभागीय अधिकारी आणि बांधकाम चे अधिकारी यांची एक बैठक झाली. वन विभागाची जी यावर हरकत होती, हा जो विभाग आहे, तो वन विभागाच्या बाहेरचा आहे. वन विभागाने घेतलेल्या हरकतीवर ना-हरकत दिलेली आहे. यामुळे या रस्त्याचे काम पुन्हा सुरु झालेले आहे. त्यांना जी मुदत दिलेली आहे, त्याप्रमाणे दिनांक १२ जानेवारी,२०२२ पासून काम सुरु झालेले आहे. साधारणत: एप्रिलच्या अगोदर ते काम लवकरात लवकर पूर्ण होईल. या संदर्भात अजूनही काही म्हणणे सन्माननीय सदस्यांचे असेल तर त्याबाबत जरुर बैठक लावली जाईल.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमोल मिटकरी यांनी अकोट-अकोला बाबत प्रश्न मांडलेला आहे. मंत्रीमहोदयांनी उत्तर देताना केवळ

वन विभागाचा प्रश्न समोर आहे, ३०० मीटरचा तो प्रश्न आहे, त्याबाबतचे कारण या

ता.प्र.क्र.११९६५

डॉ.रणजित पाटील.....

रस्त्याच्या कामासंदर्भात दिलेले आहे. पण तो अकोटला जोडणारा रौंदळा-शेगांव रस्ता आहे. पहिला प्रश्न असा आहे की, अकोला-अकोट रस्ता जो ४५ कि.मी. आहे. त्याचे काम गेली तीन-चार वर्षे म्हणजेच २०१७ पासून सुरुच आहे. त्या रस्त्याची वाईट स्थिती आहे. त्या रस्त्याच्या कामाचे कंत्राट दोन वेळा दिले गेलेले आहे. या दरम्यान जी बाकीची कंत्राटे दिलेली आहेत, ते सगळे रस्ते पूर्ण झालेले आहे. माहिती अशी आहे की, या ठेकेदाराने जाणीवपूर्वक ते काम लांबविलेले आहे. या उत्तरालाच माझा आक्षेप आहे की, बाकीची सर्व कामे वेळेवर होत असताना याबाबत शासनाने असे म्हटलेले आहे की, तथापि कोविड-१९ परिस्थितीमुळे कामाची गती राखणे शक्य झालेले नाही. केवळ या कामाला कोविड-१९ लागलेले आहे का, चार-पाच वर्षे हे काम होत नाही, हे योग्य नाही. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, ज्या ठेकेदारामुळे या कामाला विलंब झाला, लोकांची जीवं गेली, त्याच्यावर कारवाई शासन करणार आहे का ? याच्यापुढील या कामाचे माईलस्टोन रोडमॅप करुन वेळेवर शासन गाठणार आहे का ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, एकतर सन्माननीय सदस्यांना मला सांगितले पाहिजे की, हा राष्ट्रीय महामार्ग आहे, त्याच्यामुळे या कामाबाबतची ठेकेदार नेमून त्याच्यावर देखरेख व कारवाई करणे ही सर्व प्रक्रिया केंद्र शासनाच्या अखत्यारित येते. तरी देखील हा विषय महत्त्वाचा आहे, म्हणून शासन राष्ट्रीय महामार्गाचे अनेक विषय सभागृहामध्ये चर्चिले जातात. याबाबतच्या सभागृहाच्या भावना केंद्रशासनाला कळवितो. या विषयात मूळचे जे ठेकेदार होते, ते एम.बी.पाटील कन्स्ट्रक्शन्स लिमिटेड होते. त्यांच्याकडून त्यांना सन २०१७ मध्ये काम दिले होते. त्यांनी काम केले नाही. त्यांना या कामातून २०२० मध्ये टर्मिनेट करण्यात आले होते. त्यांनी हे काम केवळ ०८ कि.मी. पर्यंतच केले होते. उर्वरित कामाची लांबी जवळपास ३० कि.मी. इतकी होती. त्या कंत्राटदाराची परफार्मन्स जप्त करण्याची कारवाई करण्याबाबत केंद्रीय परिवहन मंत्रालयात कळविण्यात आलेली आहे. उर्वरित काम ३१ डिसेंबर,२०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे. हे काम ३१ डिसेंबर,२०२२ पर्यंत पूर्ण होईल, अशी आम्हाला शाश्वती आहे. यामध्ये दोन

असुधारित प्रत

विषय जे होते, त्यापैकी एक म्हणजे ३२० मीटरचे वनक्षेत्र यामध्ये होते.

ता.प्र.क्र.११९६५

श्री.अशोक चव्हाण.......

आपल्याला कल्पना आहे की, वनक्षेत्राच्या बाबत कुठेही अडचणी येतात, मग ते काम थांबविले जाते. परंतु माननीय श्री.नितीन गडकरी आणि माननीय श्री.प्रकाश जावडेकर यांच्या स्तरावर याबाबत बैठक झाली. याबाबत त्यांनी निर्णय घेतलेला आहे की, जे १९८० च्या अगोदरची जी काही राज्यशासनाची ओनरशीप असेल, तेथे हा जो जुनाच रस्ता आहे, या ठिकाणी इन सी टू कन्स्ट्रक्शन आहे. त्यामुळे याकरिता नव्याने परवानगीची आवश्यकता नाही. अशा प्रकारचे परिपत्रक केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागाने २६ ऑक्टोबर रोजी काढल्यामुळे तो प्रश्न आता मार्गी लागलेला आहे. तोच नव्हे तर महाराष्ट्रातील अनेक रस्ते जे एका विशिष्ट तारखेच्या अगोदरची राज्य शासनाची ओनरशीप असेल, तेथे असलेले रस्ते, जे जुने असतील तेथे पुन्हा परवानगीची गरज नसावी, अशा प्रकारचा सारांश या संदर्भातील परिपत्रकामध्ये आहे.

यानंतर श्री.सोनावणे.....

-----------------

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११९६५.....

श्री. अशोक चव्हाण......

त्यामुळे तो प्रश्न मार्गी लागलेला आहे. फॉरेस्ट कन्झर्व्हेशन ॲक्टचा विषय आता राहिलेला नाही. यासंदर्भातील परिपत्रक निघाल्यामुळे तो प्रश्न सुटलेला आहे. उर्वरित कामे दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. गोपिचंद पडळकर यांनी जर अकोला जिल्ह्याशी निगडित असलेला प्रश्न विचारला तरच मी त्यांना प्रश्न विचारण्याची संधी देणार आहे. मी प्रश्नाची व्याप्ती वाढवू देणार नाही.

श्री. गोपिचंद पडळकर : सभापती महोदय, सदरहू प्रश्न अकोला जिल्ह्याशी निगडित नसला तरी बांधकाम विभागाशी निगडित आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. गोपिचंद पडळकर हे नवीन आहेत. त्यांनी माझे थोडेस ऐकून घेतले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. अमोल मिटकरी यांनी प्रश्न विचारलेला आहे. त्यानंतर माननीय मंत्री महोदयांनी अकोला जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाची माहिती घेतलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. गोपिचंद पडळकर यांनी आटपाडी येथील प्रश्न विचारला तर माननीय मंत्री महोदय कसे उत्तर देतील ?

श्री. गोपिचंद पडळकर : सभापती महोदय, हा सार्वजनिक विषय आहे.

**सभापती** : ठीक आहे.

श्री. गोपिचंद पडळकर : सभापती महोदय, मी एका विषयाकडे माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधणार आहे. केंद्र सरकारचे आणि राज्य सरकारचे अनेक रस्ते आपल्या राज्यात आहेत. सदरहू रस्ते हे टोलच्या माध्यमातून सुरु आहेत. बांधकाम विभागाशी रिलेटेड असलेले राज्यातील टोल बंद केलेले आहेत. टोल प्लाझाची बांधकामे खूप चांगल्या पध्दतीची आहेत. पण काही कारणास्तव त्या ठिकाणी टोल वसुली बंद आहे. अशा सर्व टोल प्लाझाची बेरीज केली तर करोडो रुपये होऊ शकते. आपल्या ताब्यात ते टोल असतील तर त्या टोल प्लाझाच्या बांधकामाचे लिलाव

असुधारित प्रत

करुन त्यामाध्यमातून शासनाला चांगले पैसे मिळणार असतील तर तसा निर्णय मंत्री महोदयांनी घ्यावा एवढेच मला त्यांना सांगावयाचे आहे.

ता.प्र.क्र.११९६५.....

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, हा प्रश्न थोडा वेगळया स्वरुपाचा आहे. पूर्वीच्या सरकारने अचानकपणे टोल का बंद केले हे मला काही कळाले नाही. अनेक अजिटेशन झाले आणि काही विषय उपस्थित झाले होते. पूर्वीच्या शासनाने अचानकपणे टोल बंद केल्यामुळे संबंधित कंत्राटदारांना नुकसानभरपाई देण्याची जबाबदारी ही विद्यमान सरकारवर आली होती. टोलवर आधारित रस्ते असल्यामुळे संबंधित कंत्राटदारांना नुकसानभरपाई देण्याची जबाबदारी ही विद्यमान सरकारवर आली आहे.

सभापती महोदय, केंद्र शासनाचे सर्वच रस्ते हे टोलवर आधारित आहेत. राज्य शासनाला सर्वांना विश्वासात घेऊन असा निर्णय करावा लागणार आहे की, राज्यामध्ये ज्या ठिकाणी अजूनही रिकव्हरी होणे बाकी आहे, अशा ठिकाणी टोल पुनश्च लावायचा काय, असा धोरणात्मक निर्णय घेण्याचे अपेक्षित आहे. कारण की, आज रस्त्याची लांबी वाढत चालली आहे, मागणी वाढत चालली आहे. पण अर्थसंकल्पात जेवढ्या तरतुदी केलेल्या आहेत, त्या तशाच्या तशाच आहेत. मग अशा वेळी कामे कशी करायची असा देखील प्रश्न निर्माण होत आहे. टोलची प्रथा आज सगळीकडेच पडलेली आहे. चांगले रस्ते हवे असतील आणि रस्त्यांची देखभाल दुरुस्ती करावयाची असेल तर त्यासाठी निधी उपलब्ध झाला पाहिजे. म्हणून सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने शासन धोरणात्मक निर्णय घेण्याचा शासनाकडून विचार केला जात आहे.

**सभापती** : ठीक. सदरहू प्रश्नावरील चर्चा संपलेली असल्यामुळे आता पुढील प्रश्न चर्चेला घेतला जात आहे.

असुधारित प्रत

------

असुधारित प्रत

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या आरक्षित भूखंडावर अनधिकृत इमारतींचे बांधकाम केल्याबाबत

**(६) * १२३०९ श्री.रविंद्र फाटक, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) येथील शासन मालकीच्या गुरचरण आणि वतन जमिनीवर तसेच महानगरपालिकेच्या आरक्षित भूखंडावर भूमाफिया आणि विकासकांनी अनधिकृतरित्या इमारतींचे बांधकाम केल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलाठी, सर्कल आणि तहसिलदार यांचेशी भूमाफियांनी आर्थिक संगनमत करुन शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविला असून, कल्याण-डोंबिवलीतील ४५० हेक्टर जमीन विक्रीचा गैरव्यवहार निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी व नगरसेवकांनी शासनाकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गुरचरण जमिनीची बेकायदेशीर खरेदी-विक्री करणाऱ्या दोषी अधिकारी व विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका येथील शासन मालकीच्या गुरचरण आणि वतन जमिनीवर तसेच महानगरपालिकेच्या आरक्षित भूखंडावर भूमाफिया आणि विकासकांनी बेकायदेशीररित्या इमारतींचे बांधकाम करुन टॉवर उभारले, अशी वस्तुस्थिती नसल्याचे, महानगरपालिकेने कळविले आहे.

तथापि, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात एकूण १७१७ आरक्षित भूखंड असून महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या एकूण ५२५ भूखंडापैकी ४९६ भूखंड विकसित/खुले असून, १६ भूखंडावर अंशत: तर १३ भूखंडावर पूर्णत: अतिक्रमण आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) ही बाब वस्तुस्थितीवर आधारित नसल्याचे जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयाच्या अहवालात नमूद केले आहे.

ता.प्र.क्र.१२३०९.........

श्री.एकनाथ शिंदे.........

(३) अशा आशयाची तक्रार श्री.वामन म्हात्रे, माजी नगरसेवक यांनी दिनांक ११/१२/२०२१ रोजी आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचेकडे केली, हे खरे आहे.

(४) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील गुरचरण जमिनीची बेकायदेशीर खरेदी-विक्री केली, ही बाब वस्तुस्थितीस धरून नाही. तथापि, यापुर्वी शासकीय जमिनीवरील अनधिकृत बांधकामांबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात आली असल्याचे जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयाने कळविले आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रभागक्षेत्र कार्यालयामार्फत अनधिकृत बांधकामांविरूध्द विहित केलेल्या कार्यप्रणालीनुसार (S.O.P.) वेळोवेळी कार्यवाही करण्यात येते.

सन २०१५ ते २०२१ या कालावधीत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या १० प्रभागक्षेत्र कार्यालयामार्फत ११,४४२ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली असून ४५५ अनधिकृत बांधकामधारकांविरूध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत गुन्हे दाखल केले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. रवींद्र फाटक : सभापती महोदय, माझे स्पेसिफिक दोन प्रश्न आहेत. माननीय मंत्री महोदयांनी असे म्हटले आहे की, १६ भूखंड आणि १३ भूखंडावर पूर्ण अतिक्रमण झालेले आहे. सदर अतिक्रमण केव्हापर्यंत काढले जाणार आणि ज्यांनी अतिक्रमण केलेले आहे अशा लोकांच्या विरोधात कोणती कारवाई करणार असा माझा पहिला प्रश्न आहे.

असुधारित प्रत

सभापती महोदय, शासकीय जमिनीवरील अनधिकृत बांधकामांवर नियमानुसार कारवाई करुन शासनाने दंड वसुल केलेला आहे काय, असल्यास किती दंड वसूल केलेला आहे असा माझा दुसरा प्रश्न आहे.

ता.प्र.क्र.१२३०९.........

श्री. एकनाथ शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रवींद्र फाटक यांनी अनधिकृत बांधकामासंदर्भातील प्रश्न उपस्थित केलेला आहे. कल्याण-डोंबिवली महानगपालिकेच्या माध्यमातून ११ हजार ४४२ अनधिकृत बांधकामांवर कारवाई केलेली आहे. तसेच ४५५ बांधकाम करणाऱ्या लोकांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. आरक्षित भूखंडावर काही लोकांनी अतिक्रमण केलेले आहे. अशा लोकांच्या विरोधात देखील कठोर कारवाई केलेली आहे. ज्वॉ क्रशर हा चार ते पाच मजल्यांवर चढवून तेथील जमिनीचा भुसा करतो. अशा प्रकारच्या यंत्रणेने त्या ठिकाणी कार्यवाही केलेली आहे. त्यामुळे आता त्या ठिकाणी कोणीही अनधिकृत बांधकामे करण्याची हिंमत करणार नाहीत. आरक्षित भूखंड असल्यामुळे मी कल्याण-डोंबिवली महानगपालिकेचा बोर्ड लावलेला आहे. त्यामुळे कोणीही अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करणार नाही. तसेच अनधिकृत बांधकामे करणाऱ्या लोकांच्या विरोधात एमआरटीपीए आणि नियमानुसार कारवाई केलेली आहे.

**सभापती** : सदरहू प्रश्नावरील चर्चा संपलेली असल्यामुळे आता पुढील प्रश्न चर्चेला घेतला जात आहे.

----------

असुधारित प्रत

## चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील बाधितांना मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(७) * १२३२३ श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचा (जि.चंद्रपूर) विस्तार करतांना सन २००७ मध्ये कोळसा येथील ४९ कुटुंबे व बोटेझरी येथील २० कुटुंबांचे पुनर्वसन भगवानपूर येथे केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुनर्वसित कुटुंबाना मूलभूत सुविधा व शेतीला योग्य प्रमाणात सिंचन उपलब्ध होत नसल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भगवानपूर येथील पुनर्वसित कुटुंबाना मूलभूत सोयी सुविधा, रोजगार व पिकांना पाणी इ. उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे, श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्याकरिता :** (१) सन २००७ मध्ये कोळसा येथील ४९ कुटुंब व बोटेझरी येथील ७९ कुटुंब असे एकूण १२८ कुटुंबांचे पुनर्वसन भगवानपुर येथे करण्यात आले आहे.

(२) व (३) भगवानपूर येथे पुनर्वसित झालेल्या कुटुंबियांना खालीलप्रमाणे विविध सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक १७/०७/२००० अन्वये विविध १८ नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

प्रती कुटुंब रुपये ४७,०००/- प्रोत्साहनात्मक रक्कम अदा करण्यात आली आहे.

जनावरांसाठी गोठा बांधकामासाठी प्रती कुटुंब रुपये ५८,०००/- स्टेट कॅम्पा

मधुन अदा करण्यात आले आहेत.

वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी प्रती कुटुंब रुपये १३,०००/- ताडोबा-अंधारी व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानमधून अदा करण्यात आले आहेत.

ता. प्र.क्र.१२३२३.......

श्री. दत्तात्रय भरणे.........

मौजे भगवानपूर येथील लाभार्थ्यांना पूर्वी वाटप करण्यात आलेल्या शेत जमिनी व्यतिरीक्त प्रती कुटुंब २.०० हेक्टर शेत जमीन वाटप करण्यात आली आहे. तसेच शेत जमीन शेती योग्य करण्यासाठी गावकऱ्यांच्या मागणीनुसार मजगीचे कामासाठी कृषी विभागाचे दरानुसार जिल्हास्तरीय पुनर्वसन, समितीद्वारे लाभार्थ्यांना रुपये ३३.०० लक्ष अदा करण्यात आले आहे.

मौजा भगवानपूर येथील इको विकास समितीस डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेंतर्गत गाव विकासाच्या विविध कामांसाठी रुपये २५.०० लक्ष व व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान अंतर्गत Post Rehabilitation Plan करीता रुपये ५.०० लक्ष अनुदान अदा करण्यात आले आहे.

शेती सिंचनाकरीता उपसा सिंचन प्रकल्प परिरक्षण व देखभाल करीता जिल्हास्तरीय पुनर्वसन समितीद्वारे रुपये ७१.०३ लक्ष अनुदानाचे नियोजन करुन कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जल संधारण) विभाग, चंद्रपूर यांचेमार्फत सदर योजना राबविण्यात आली आहे.

शेती सिंचनाकरीता गटानुसार वैयक्तिक मोटार पंप व पाईपलाईन करीता जिल्हास्तरीय पुनर्वसन, समितीद्वारे प्रती गटानुसार रुपये २३.१५ लक्ष अनुदान लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले आहे.

सन २०१५-१६ मध्ये ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठानमधून पाटबंधारे विभाग, चंद्रपूर यांना रुपये ७.९७ लक्ष अनुदान वाटप करुन २ तलावाचे खोलीकरण करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत

श्री. रामदास आंबटकर : सभापती महोदय, चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे विस्तारीकरण यावर आधारित प्रश्न आहे. कोळसा आणि बोटेझरी येथील १२८ कुटुंबे विस्थापित झालेली आहेत. त्यांच्या पुनर्वसनाची सोय भगवानपुर येथे करण्यात आलेली आहे. माननीय मंत्री महोदयांनी प्रश्नाचे उत्तर खूप मोठे दिलेले आहे. प्रश्नाचे उत्तर जे वितरित करण्यात आलेले आणि तेथील गावातील

असुधारित प्रत

ता. प्र.क्र.१२३२३.......

श्री. रामदास आंबटकर.........

परिस्थिती अतिशय दयनीय आहे. पूर्वी त्या ठिकाणची जमीन ही वहिवाटीत होती आणि आता त्यांना पडिक जमीन मिळालेली आहे. जंगलातील जमीन कशी असते ही सर्वांना माहीत आहे. त्या ठिकाणी सखल भागात तळे बांधलेले आहेत. त्यामुळे तिथे सिंचन आणि महिलांना रोजगार मिळत नाही. माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले असले तर तेथील परिस्थिती खूपच बिकट आहे. त्या ठिकाणी करण्यात आलेल्या पुनर्वसनाची चौकशी केली जाईल काय ?

श्री. दत्तात्रय भरणे : सभापती महोदय, चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील, कोअर क्षेत्रातील मौजे बोटेझरी, कोळसा, नवेगांव, जामनी आणि पळसगांव व राळतकोंदे अशा ६ गावांमध्ये महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम १९९९ नुसार करण्यात आलेली आहेत. ६ गावांपैकी २ गावांचा प्रश्न आहे. कोळसा, भगवानपुर आणि बोटेझरीच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. कोळसा गावातील १८६ कुटुंबांपैकी ४९ कुटुंबे आणि बोटेझरी येथील ७९ कुटुंबे अशा प्रकारे एकूण १२८ कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे. उर्वरित ९७ गावांचे पुनर्वसन गोलापुर तालुका मूल, जिल्हा चंद्रपूर येथे करण्यात येणार आहे. विशेष बाब म्हणून पुनर्वसन करताना ४७ हजार रुपयाप्रमाणे प्रत्येक कुटुंबाला प्रोत्साहनपर धनादेशाद्वारे रक्कम वाटप केलेली आहे. १०० टक्के अनुदावावर गोठ्याचे बांधकाम करण्यासाठी स्टेट कॅम्पातून प्रत्येक कुटुंबाला ५८ हजार रुपये आरटीजीएसद्वारे लाभार्थ्यांना वाटप केलेले आहे. वैयक्तिक शौचालये बांधण्यासाठी प्रत्येक कुटुंबाला १३ हजार रुपयांचे आरटीजीस प्रमाणे कार्यवाही केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी जमीन वन विभागात असल्याचा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे अतिरिक्त शेत जमीन बावनपुरे येथे लाभार्थ्यांना पूर्वी वाटप केलेले आहे. प्रती कुटुंब २ हेक्टर जमिनीचे वाटप केलेले आहे. गावकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर पुनर्वसन समितीद्वारे दोन टप्प्यांमध्ये ३३ लाख रुपयांचे अनुदान दिलेले आहे. अंधारी

ता. प्र.क्र.१२३२३.......

श्री. दत्तात्रय भरणे.........

नदीवर उपसा सिंचन प्रकल्प असून, एक, दोन व तीन करिता परीरक्षण व देखभालीकरिता जिल्हास्तरीय पुनर्वसन समितीने ७१ लाख रुपयांच्या खर्चाचे नियोजन करुन....

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२३२३.....

श्री.दत्तात्रय भरणे.......

कार्यकारी अभियंता ( लघुसिंचन), जलसंधारण विभाग, चंद्रपूर यांच्या माध्यमातून सदरहू योजना राबविण्यात आलेली आहे. तसेच वैयक्तिक योजनेतून मोटार पंप आणि पाईपलाईनसाठी साधारणत: २३ लाख १५ हजार रुपयांचे अनुदान आरटीजीएस मार्फत अदा करण्यात आलेले आहे. तलावाच्या खोलीकरणासाठी सुद्धा पूर्वी निधीचे वाटप केलेले आहे. या बाबतीत सांगू इच्छितो की, भगवानपूर येथे इको विकास समिती स्थापन करण्यात आली असून, त्या समितीमार्फत गाव विकासाची नवीन कामे हाती घेतली आहेत. भगवानपूर हे पुनर्वसित गाव होते. या गावाला आता महसुली गाव म्हणून घोषित केलेले आहे. त्या ठिकाणी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन केलेली आहे. सन्माननीय सदस्यांचे या व्यतिरिक्त काही प्रश्न असतील तर ते त्यांनी माझ्या निदर्शनास आणून द्यावेत.

श्री.रामदास आंबटकर : सभापती महोदय, या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची स्थिती अतिशय वाईट आहे. या प्रश्नाला देण्यात आलेले लेखी उत्तर माझ्याकडे सुद्धा आहे. परंतु त्या पुनर्वसित गावामध्ये आजची स्थिती अत्यंत दयनीय आहे. मी स्वत: त्या गावाला दोन वेळा भेट दिलेली आहे. त्या पुनर्वसित गावात घरकुल योजना राबविण्यात आली. परंतु त्या घरकुलांना भेगा पडल्या आहेत. या बरोबरच त्या गावातील महिलांना रोजगार मिळत नाही. मी स्पेसिफिक विचारतो की, या पुनर्वसित गावाच्या घरकुलाच्या बाबतीत चौकशी करण्यात येईल काय ?

श्री.दत्तात्रय भरणे : सभापती महोदय, या संदर्भात चौकशी केली जाईल.

---------

असुधारित प्रत

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील नालेसफाईच्या कामामध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(८) * १२४७२ डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.सुरेश धस, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.राजहंस सिंह** : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने गेल्या १५-२० वर्षात नालेसफाईच्या कामांकरीता रुपये १२ हजार कोटी खर्च केल्याचे तसेच ब्रिमस्टोवॅड प्रकल्प, नाला रुंदीकरण प्रकल्प, पंम्पिग स्टेशन व मुंबई शहरामध्ये पावसाचे पाणी तुंबू नये याकरीता केलेल्या उपाययोजनावर रुपये ६ हजार कोटींचा खर्च केल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१६ मध्ये नालेसफाईच्या कामांमध्ये निदर्शनास आलेल्या गैरव्यवहाराप्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर क्षुल्लक स्वरुपाची कारवाई करण्यात आल्यामुळे, नालेसफाईच्या कामांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नालेसफाईच्या कामामध्ये गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कारवाई करुन मुंबई मधील पावसाच्या पाण्याचा निचरा होण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) मुंबई महानगरपालिकेने ब्रिमस्टोवॅड प्रकल्प, नाला रुंदीकरण प्रकल्प, पंम्पिंग स्टेशन व मुंबई शहरामध्ये पावसाचे पाणी तुंबू नये याकरीता केलेल्या उपाययोजनांवर रुपये ६ हजार कोटींचा खर्च करण्यात आला आहे. तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेने एप्रिल, २००९ ते मार्च, २०२१ पर्यंत नालेसफाईच्या कामाकरीता रुपये ११३६ कोटी खर्च केले असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

असुधारित प्रत

(२) सन २०१६ मध्ये नालेसफाईच्या कामांमध्ये निदर्शनास आलेल्या गैरव्यवहार

ता.प्र.क्र.१२४७२....
श्री.एकनाथ शिंदे....

प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर क्षुल्लक स्वरुपाची कारवाई करण्यात आल्यामुळे नालेसफाईच्या कामांत झालेल्या गैरव्यवहाराची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी करण्याची मागणी या आशयाचे पत्र प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या नालेसफाईच्या कामातील भ्रष्टाचाराची लाचलुचपत विभागामार्फत चौकशी करण्याबाबत मा.तत्कालीन विरोधी पक्षनेता यांचे दिनांक २२/०६/२०१५ रोजीचे पत्र प्राप्त झाल्याचे दिसून येते.

(३) सन २०१५-२०१६ या कालावधीतील नालेसफाईच्या कामात झालेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या आदेशान्वये १४ कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यापैकी १ कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या विरुध्द निलंबनाची कार्यवाही करणे शक्य झाले नाही.

त्यानुसार, पहिल्या टप्प्यामध्ये १३ कर्मचारी व दुसऱ्या टप्प्यामध्ये ८० अशा एकूण ९३ अपचारी कर्मचाऱ्यांवर सर्वंकष चौकशी पूर्ण करण्यात आली असून तद्नुसार एकूण ७० अपचारी कर्मचाऱ्यांवर दंडात्मक शिक्षेचे शिक्षादेश बजाविण्यात आले आहेत. तसेच, २० सेवानिवृत्त अपचारी कर्मचाऱ्यांबाबत त्यांच्या निवृत्ती वेतनातून दंडात्मक शिक्षेची कार्यवाही सुरु आहे. उर्वरित ३ कर्मचाऱ्यांचे दरम्यानच्या कालावधीमध्ये निधन झाले असून त्यांचेबाबत देखील यथोचित आदेश प्राप्त करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच दोन्ही कंत्राटदारांवरही कारवाई करण्यात आली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविल्यानुसार, मुंबईमधील पुरस्थिती कमी करण्याकरीता ब्रिमस्टोवॅड प्रकल्पांतर्गत प्रस्तावित केलेल्या एकूण ५८ कामांपैकी ४२ कामे पूर्ण झालेली असून १३ कामे प्रगतीपथावर आहेत व उर्वरित ३ कामांच्या निविदा प्रस्तावित आहेत. तसेच, ब्रिमस्टोवॅड प्रकल्पांतर्गत प्रस्तावित एकूण ८ पर्जन्य

असुधारित प्रत

जल-उदंचन केंद्रापैकी ६ पर्जन्य जल उदंचन केंद्रासाठी कंत्राटदाराची नियुक्ती

ता.प्र.क्र.१२४७२....
श्री.एकनाथ शिंदे....

करण्याकरीता निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. मोगरा येथील पर्जन्य जल-उदंचन केंद्रासाठी निविदा मागविण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली असली तरी जागेच्या मालकीबाबत प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे व न्यायालयाच्या आदेशानुसार केवळ सर्वेक्षण व आराखडे तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ.परिणय फुके : सभापती महोदय, दरवर्षी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून नाले सफाईच्या कामांवर करोडो रुपये खर्च करण्यात येतो. परंतु दरवर्षी नालेसफाईच्या कामांत भ्रष्टाचार झाल्याबाबत तक्रारी होतात. मागील १५-२० वर्षांपासून या तक्रारींबाबत आपण नेहमी ऐकतो व वाचतो. परंतु या तक्रारींच्या अनुषंगांने महानगरपालिका किंवा राज्य शासनाच्या माध्यमातून दोषींवर कोणत्याही प्रकारची ठोस कारवाई होत नाही. मी स्पेसिफिक विचारतो की, मुंबई महानगरपालिकेतील नालेसफाईच्या कामांमध्ये अनेक वर्षांपासून जो भ्रष्टाचार होत आहे त्याची चौकशी करण्यासाठी एसआयटीची स्थापना करुन दोषींवर कारवाई करण्यात येईल काय, तसेच नालेसफाईच्या कामातील भ्रष्टाचार थांबविण्यासाठी शासनाने आतापर्यंत काय उपाययोजना केल्या आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मोठ्या नाल्यांच्या सफाईकरिता सन २०१५-१६, २०१६-१७ या कालावधीसाठी ३२ कंत्राटदारांची निविदा प्रक्रियेद्वारे नियुक्ती करण्यात आली होती. २०१५-१६ मध्ये नालेसफाईच्या कामात अनियमितता झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यामुळे आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांनी चौकशीचे आदेश दिले होते. त्यानुसार दि.२३/०६/२०१५ रोजी आयुक्तांच्या आदेशान्वये उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२४७२....
श्री.एकनाथ शिंदे....

यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समितीची नियुक्ती करण्यात आली होती. सदर समितीने मोठ्या नाल्यांच्या सफाईसंदर्भातील ३२ कंत्राटांपैकी ९ कंत्राटी कामांची तपासणी करुन, दि.३१/०८/२०१५ रोजी आयुक्त, महानगरपालिका यांना अहवाल सादर केला. त्या अहवालाच्या अनुषंगाने आयुक्तांनी दि.०२/०९/२०१५ रोजी विभागीय चौकशीचे आदेश पारित केले. दि.१९/०९/२०१५ रोजी आझाद मैदान पोलीस स्टेशन येथे नालेसफाईच्या बाबतीत व्हीटीएस कंत्राटदार आणि तीन वजनकाटा कंत्राटदार यांच्याविरुद्ध गुन्हा रजि.क्र.२५८/२०१५ नोंदविण्यात आला. सदरहू प्रकरण पोलिसांनी आर्थिक गुन्हे शाखेकडे दि.०७/११/२०१५ रोजी हस्तांतरित केले आहे. परंतु यातील १३ कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांना महानगरपालिकेच्या सेवेतून निलंबित करता आले नाही. सदरहू प्रकरणी सर्वंकष चौकशीसाठी उपायुक्त, अभियांत्रिकी यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. प्रथमत: १ जलनिस्सारण सहायक, २ मुकादम, ६ दुय्यम अभियंता, ४ सहायक अभियंता व १ प्रमुख अभियंता अशा १४ जणांवर दोषारोप बजाविण्यात आले. तद्नंतर सर्वंकष विभागीय चौकशीअंती १३ कर्मचाऱ्यांवर शिक्षादेश बजावलेले आहेत. यातील एका कर्मचाऱ्याची वयाच्या ५५ वर्षांपुढील सेवा प्रशासनाने सातत्य नाकारल्याची बाब लक्षात घेऊन माननीय न्यायालयाने त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी रद्द करण्याबाबतचे निर्देश दिले. तद्नंतर महानगरपालिकेने या निर्णयाच्या पुनर्विलोकनासाठी माननीय उच्च न्यायालयात अर्ज सादर केला. कनिष्ठ न्यायालयाने त्या कर्मचाऱ्याच्या बाजूने निर्णय दिल्यामुळे, महानगरपालिकेने त्या कर्मचाऱ्यावर कारवाई होण्यासाठी माननीय उच्च न्यायालयात अपील केले. माननीय उच्च न्यायालयाने या प्रकरणी पूर्वीचा निर्णय कायम ठेवला. या प्रकरणी पुढील कार्यवाही सुरु आहे.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२४७२....

श्री.एकनाथ शिंदे....

सभापती महोदय, दि.३/१२/२०१५ रोजी पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने ८० अपचारी कर्मचारी सहभागी आहेत. यामध्ये ७ जलनिस्सारण सहायक, ४ मुकादम, ५१ दुय्यम अभियंता, सहाय्यक अभियंता इत्यादी आणि उपरोक्त १३ अपचारी कर्मचाऱ्यांवर यापूर्वी बजाविण्यात आलेल्या दोषारोपपत्राच्या आधारे सातत्याने पुरवणी दोषारोप बजावलेले आहेत. तसेच मोठ्या नालेसफाई कामांच्या ३२ कंत्राटदारांसंबंधी निदर्शनास आलेल्या अनियमिततेच्या बाबतीत एकूण २४ नालेसफाई कंत्राटदारांसह संबंधित दोन व्हीटीएस कंत्राटदारांवर देखील आर्थिक गुन्हे शाखेकडे गुन्हा दाखल केला आहे. अशा प्रकारची कारवाई महानगरपालिकेने केली असून, या प्रकरणी चौकशी सुरु आहे.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, २०१५ मध्ये घडलेल्या अनियमिततेबाबत मंत्री महोदय २०२२ मध्ये सांगत आहेत. दरवर्षी पावसाळ्यात पाणी तुंबून मुंबईतील नाले भरतात. मी स्वत: बोईसर नदीच्या बाजूला जो नाला झालेला आहे त्याच्या बाजूलाच राहतो. दरवर्षी त्या भागातील तळमजला पाण्याखाली जातो. मी दरवेळी बघतो की, एक बुलडोजझर येतो व त्या नाल्यातील गाळ काढतो. तो गाळ डम्परमध्ये टाकून तो वजनकाट्याच्या ठिकाणी नेला जातो. नालेसफाईचे दरवर्षी ११,५०० कोटी रुपयांचे कंत्राट असते. मी विचारु इच्छितो की, नाल्यातून काढण्यात आलेल्या गाळाची मोजणी कशी केली जाते, तोच तोच गाळ नाल्यात पुन्हा कसा येतो ? दरवर्षी नालेसफाईच्या कामासाठी ११,५०० कोटी रुपये लागणार असतील तर ते योग्य नाही. जर या ३२ कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकले तर त्यांचेच नातेवाईक ही कामे करण्यासाठी पुढे येतात. मी स्पेसिफिक विचारतो की, या प्रकरणी २०१५ नंतर आपण काय कारवाई, सर्व कंत्राटदारांची नियमित तपासणी करण्यात येईल का, तसेच या सर्व प्रकारामध्ये अधिकारी व कंत्राटदार यांचे संगनमत

ता.प्र.क्र.१२४७२....

श्री.भाई गिरकर .....

असल्यामुळेच हा भ्रष्टाचार होत असल्यामुळे संबंधितांवर काय कारवाई करण्यात येईल ?

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी सांगितले की, महानगरपालिकेने नालेसफाईच्या कामावर दरवर्षी ११,५०० कोटी रुपये खर्च केले आहेत. परंतु तशी वस्तुस्थिती नाही. मी सांगू इच्छितो की, मुंबईतील नालेसफाईच्या कामावर एप्रिल, २००९ ते मार्च, २०२१ या कालावधीत १,१३६ कोटी रुपये खर्च केले आहेत. नाल्यातील गाळ काढण्यासाठी दरवर्षी १०० ते १२५ कोटी रुपये खर्च होतात. मुंबईत जवळपास ३८६ ठिकाणी पाणी पूर्णत: साचते. ८ पम्पिंग स्टेशनपैकी ६ पम्पिंग स्टेशन कार्यान्वित झालेली आहेत. मुंबईतील वरळी, ब्रिटानीया, रे-रोड, हाजीयाली, ग्लीव्हलँड प्रभादेवी, इरला अंधेरी, सांताक्रुझ हिंदमाता आणि मुंबई उप नगरातील मोगरा, माहुल, दहिसर या भागात पाणी साचते. या भागातील पाण्याचा निचरा जलद गतीने होण्यासाठी प्रती तास ३ हजार घन मीटर क्षमतेचे १५ पंप बसविले आहेत. हिंदमाता येथे सुद्धा पंप बसविले आहेत.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

--------

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मला प्रश्न विचारावयाचा आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तरे संपली आहेत. आपण पुन्हा उपप्रश्न विचारणार आहात. तुम्ही त्यांचे उत्तर ऐकले आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

मी यासाठीच नको म्हणत आहे. तुम्ही वेगळा प्रश्न घ्यावा. मुंबईचा मोठा प्रश्न आहे. मला माहीत आहे. मला सन २००४ चा पूर आठवत आहे. त्यामुळे तुम्ही वेगळा प्रश्न विचारावा. मी तुम्हाला वेगळा वेळ देतो.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील चर्चेचा आज शेवटचा दिवस आहे. दोन्ही बाजुंचे काही सन्माननीय सदस्य बोलावयाचे बाकी आहेत. आमची आपणास विनंती आहे की, एकूण कामकाज लक्षात घेता आम्ही लेखी भाषणे आपल्याकडे दिली तर त्याची उत्तरे लेखी स्वरुपात आम्हाला मिळावीत, जेणेकरुन आपल्याला पुढे जाता येईल.

**सभापती** : उद्या होळीसाठी शासनाने आपल्याला सुट्टी दिलेली आहे. मी तुमच्याशी सहमत आहे. आज मी आल्यावर पाहिले आहे की, जवळपास २६ सन्माननीय सदस्य बोलावयाचे बाकी आहेत. सन्माननीय प्रतोद उपस्थित आहेत. मला दोन पर्याय दिसत आहेत की, ५ मिनिटांच्यावर कोणीही सन्माननीय सदस्यांनी बोलायचे नाही किंवा ....(अडथळा).... मग तुम्ही न बोललेले बरे. अशामुळे याला काही अर्थ राहत नाही. शासनाने सुट्टी दिलेली आहे. सर्वांना विशेषत: कोकणातील लोकांसाठी हा सण नक्कीच महत्त्वाचा आहे. हा जनरल बजेटचा प्रश्न आहे. मी निदर्शनास आणू इच्छितो की, विभागनिहाय अर्थसंकल्प असतो, तेव्हा हा विषय आपल्याला मांडता येईल, असे काही नाही की, आजच बोलावे. बाब व पृष्ठ क्रमांक वाचल्यानंतर तुम्ही बोलू शकाल. आपले अर्थसंकल्पावरील कामकाज जवळजवळ

असुधारित प्रत

**सभापती ....**

३-४ दिवस चालणार आहे. आजच तुम्हाला सर्व संपविण्याची का घाई आहे हे मला समजत नाही. आपण जनरल अर्थसंकल्पावर न बोलता, पाहिजे तर एक तासभर अजून अर्थसंकल्पावरील चर्चा चालवावी. मी माझ्या डिस्क्रेशनरी पॉवरमध्ये ५ मिनिटांच्या वर कोणाला वेळ देणार नाही. मान्य आहे का ?

(सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्य "होय" असे म्हणतात.)

-----

असुधारित प्रत

## नियम २८९ अन्वयेच्या प्रस्तावाच्या सुचनेबाबत

**सभापती** : आज दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी सन्माननीय सदस्य श्री. सदाभाऊ खोत व इतर यांनी "कोल्हापूर जिल्ह्यातील महावितरण कार्यालयात शेतकऱ्याने सक्तीच्या वीज तोडणी विरोधात केलेले आत्मदहन" या विषयाबाबत नियम २८९ ची सूचना दिलेली आहे, ती मी सदनात नाकारली आहे.

----

असुधारित प्रत

## पटलावर ठेवण्यात येणारी कागदपत्रे त्याच दिवशी प्राप्त होण्याबाबत

श्री. अभिजीत वंजारी : सभापती महोदय, माझा आक्षेप आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांचा कागदपत्रे पटलावर ठेवण्याबाबत आक्षेप आहे.

श्री. अभिजीत वंजारी : सभापती महोदय, माझा कागदपत्रे पटलावर ठेवण्याबाबत आक्षेप नाही.

**सभापती** : आपणच बोलला आहात.

श्री. अभिजीत वंजारी : सभापती महोदय, तसे नाही. परंतु पार्लमेंटरी सिस्टिममध्ये अनेक विधेयके ज्या दिवशी टेबल करतात, त्याच दिवशी पास करतात. दिल्लीच्या पार्लमेंटमध्ये सर्व राज्यांचा अशाप्रकारच्या पार्लमेंटरी प्रोसिजरवर आढावा घेतला आणि त्यामध्ये महाराष्ट्र राज्य क्रमांक १ वर आहे. ५९ टक्के विधेयके किंवा आपण जी कागदपत्रे, शासकीय अहवाल ठेवतो किंवा ज्या दिवशी चर्चेला ठेवतो त्याच दिवशी पास करतो.

**सभापती** : तुम्हाला काय म्हणायचे आहे ?

श्री. अभिजीत वंजारी : सभापती महोदय, मला असे म्हणायचे आहे की, जी बाबी पास करायची आहे, तिच्या प्रती सर्व सन्माननीय सदस्यांना मिळाली पाहिजे. पटलावर ठेवताना त्याच दिवशी सकाळी ते मिळाले पाहिजे.

**सभापती** : कागदपत्रे पटलावर ठेवली जातात. विधेयके व कागदपत्रे पटलावर ठेवणे या दोन बाबी आहेत.

श्री. अभिजीत वंजारी : सभापती महोदय, आपल्या सभागृहात विधेयकावर चर्चा होते.

**सभापती** : कागदपत्रे पटलावर ठेवली जातात. कागदपत्रे पटलावर ठेवल्यानंतर आपल्याकडे येतात. आपण ती आवर्जून पहावीत. आपल्याला पुढील अधिवेशनात त्यावर प्रश्न विचारता येतील.

**पृ.शी./मु.शी.** : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

श्री.अब्दुल सत्तार (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा सोळावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री. एकनाथ शिंदे (नगरविकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री. अब्दुल सत्तार (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा त्रेसष्टावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री. अब्दुल सत्तार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे छत्तीसावा व सदतीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमरेर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

असुधारित प्रत

----

श्री. अब्दुल सत्तार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.** : विधानपरिषद आश्वासन समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. विलास पोतनीस (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानपरिषद आश्वासन समितीचा २०५ वा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : विधानपरिषद आश्वासन समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.** : नियम ९३ अन्वये सूचना

**सभापती** : माझ्याकडे आज दिनांक बुधवार, दिनांक १६ मार्च,२०२२ रोजी प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मी मान्य केलेल्या सूचना व त्यावरील माझे निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येत आहेत.

(**प्रेस** : येथे नियम ९३ च्या सूचना व त्यावरील निर्णय जोडावेत.)

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.** : राज्यात खाजगी व्यवस्थापनांच्या शाळांकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्काला आळा घालण्यासाठी शिक्षण सहसचिवांच्या अध्यक्षतेखाली शुल्क सुधारणा समितीची स्थापना करण्यात येणे, या समितीच्या अहवालात खाजगी शाळांतील शुल्क फेरनिश्चितीचे धोरण ठरविले नसल्याबाबत श्री नागोराव गाणार, वि.प.स. यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना

प्रा. वर्षा गायकवाड (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी सूचना क्रमांक ३ चे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. नागोराव गाणार : सभापती महोदय, राज्यात खाजगी व्यवस्थापनांच्या शाळांकडून आकारण्यात येत असलेल्या मनमानी शुल्काला आळा घालण्यासाठी वर्षभरापूर्वी शिक्षण सचिवांच्या अध्यक्षतेखाली शुल्क सुधारणा समितीची स्थापना करण्यात आली. दिनांक ५ मार्च, २०२१ ही तारीख होती. समितीने ४ बैठका घेतल्या. सूचना स्वीकारल्या. परंतु अजुनपर्यंत शिफारशी सादर केल्या नाहीत. शिफारशी किती कालावधीत सादर केल्या जातील आणि शासन पुढील निर्णय घेईल ?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महादेय, सन्माननीय सदस्यांना माहीत आहे की, आपण ज्यावेळी जे निर्णय आवश्यक होते ते निर्णय शैक्षणिक शुल्काच्या बाबतीत घेतले आहेत. कोरोना काळात सक्ती करु नये, फी घेताना टप्प्याटप्प्याने घ्यावी असे विविध निर्णय घेतले आहेत आणि त्या व्यतिरिक्त प्रत्येक ठिकाणी तक्रार निवारण कक्ष केले आहेत. आपल्याला माहीत आहे की, ॲक्टमध्ये २५ टक्के पालक जोपर्यंत एकत्र येत नाहीत तोपर्यंत आपण डीएफआरसीकडे जाऊ शकत नाही असे आहे. एखाद्या व्यक्तीची जरी तक्रार असेल तरी त्याला ती संधी उपलब्ध व्हावी म्हणून आपण तक्रार निवारण कक्ष केले आणि त्या माध्यमातून काही तक्रारी सोडविण्याचा प्रयत्न केला.

सभापती महोदय, पहिल्यांदा असे झाले आहे की, आपल्या सगळ्या डीएफआरसी निर्माण झाल्या आहेत. राज्याचे पर्यवेक्षक मंडळ निर्माण झाले आहे. डीएफआरसीकडे ज्या तक्रारी प्राप्त आहेत, त्याची संख्या माझ्याकडे आहे. मी ती तुमच्यासाठी पटलावर देखील ठेवते. सन्माननीय सदस्यांनी समितीचा उल्लेख केला. आपण बनविलेली ही समिती आहे. महाराष्ट्र शैक्षणिक शुल्क विनियम अधिनियमांतर्गत सहसचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती आहे. सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला आहे की, त्या समितीच्या बैठका झाल्या आहेत. ॲक्टमध्ये कोणते बदल केले पाहिजेत, काय गोष्टी आहेत, त्यामध्ये आपल्याला थोडेसे अभ्यासपूर्वक गेले पाहिजे, याबाबत त्यांच्या बैठका झाल्या आहेत आणि त्यांनी सूचना देखील

असुधारित प्रत

प्रा. वर्षा गायकवाड ....

मागविल्या असून त्यांना सूचना प्राप्त झाल्या आहेत आणि त्यांनी सूचनांवर पूर्ण अभ्यास केला असून त्यांनी एक अहवाल तयार केला आहे. समितीमध्ये विधी व न्याय विभागाचे सचिव देखील आहेत. कारण आपण प्रत्येक विभागाच्या लोकांना ते काम दिले आहे. आपल्याला त्यांच्याकडे जायचे आहे. ते त्यामध्ये सदस्य आहेत. काल देखील मी त्यांच्याशी बोलले, परवाच्या आधीच्या दिवशी देखील त्यांच्याशी बोलले. सध्या त्यांचे २ कायदे बनविण्याचे काम सुरु आहे. त्यामध्ये ते व्यस्त आहेत. त्यांनी सांगितले की, हे काम झाल्यानंतर पाहू. आम्ही हा प्रस्ताव अगोदरच त्यांच्याकडे पाठविला आहे. त्यामुळे ते त्यावर अभ्यास करतील. कायद्यामध्ये काय बसते हे पहावे लागेल. कारण कायद्यामध्ये देखील बसणे आवश्यक आहे. कारण हा कायदा आहे. कायद्यामध्ये काय बसते याबाबत पाहून ते आम्हाला अहवाल सादर करतील. अहवाल आल्यानंतर पाहिजे तर सभागृहातील सन्माननीय सदस्यांशी मी एकदा चर्चा करते. कारण शेवटी हा एक धोरणात्मक निर्णय होणार आहे. त्यामुळे त्यावर चर्चा करुन ठरविणार आहोत.

**सभापती** : ठीक आहे. आनंद आहे.

----

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.** : कोट्यवधीचा व्यवसाय करणाऱ्या सुमारे २०० थकबाकीदारांकडे मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता कराची थकबाकी असणे याबाबत सर्वश्री प्रसाद लाड, प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना

श्री.प्राजक्त तनपुरे (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी सूचना क्रमांक ७ चे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत

श्री.प्रसाद लाड : सभापती महोदय,कोट्यवधी रुपयांचा व्यवसाय करणाऱ्या सुमारे २०० थकबाकीदारांकडून मुंबई महानगरपालिकेची २२९४ कोटी रुपयांची मालमत्ता थकबाकी येणे बाकी आहे, दहा वर्षापासून २०० जणांवर व कॉर्पोरेट कंपन्यावर कोणतीही कारवाई केली नाही. यामध्ये सरकारचे बरेच पैसे येणे बाकी आहेत. टॉप टेन डिफॉल्टरमध्ये एमएमआरडीए, एल ॲन्ड टी कंपनी आहे, सुमेर असोसिएटस् आहे, श्रीनिवास कॉटन मिल्स् आहे, जवाहरलाल रिएल इस्टेट आहे, एससीसी कन्स्ट्रक्शन कंपनी आहे. नॅशनल स्पोर्ट क्लब आहे. लिलावती हॉस्पीटलची थकबाकी सर्वात जास्त आहे. वाधवा रिॲलिटी आहे, सीईसी आयटीडी ही कंपनी आहे. या व्यतिरिक्त २०० लोक या यादीमध्ये आहेत. २००० कोटी रुपयांपेक्षा जास्त रुपयांचा मालमत्ता कर मुंबई महानगरपालिकेचा भरण्यात आलेला नाही. या थकबाकीदारांवर कोणती कारवाई करण्यात आली किंवा भविष्यात कोणती कारवाई करण्यात येणार आहे. तसेच यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, नियम ९३ च्या निवेदनात सविस्तर माहिती नमूद केली आहे. कोणालाही यामध्ये पाठीशी घातलेले नाही. नियमानुसार ज्या तरतुदी आहेत त्यानुसार प्रापर्टी जप्त करुन त्यापुढील कारवाई करण्यात आलेली आहे. अशा सर्व प्रक्रिया कायद्यानुसार महानगरपालिकेने केलेल्या आहेत. यातील काही प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत, त्या प्रकरणाबाबत न्यायालयाचा निर्णय झाल्यावर कारवाई करता येईल. अशा प्रकारे सविस्तर माहिती निवेदनात नमूद करण्यात आलेली आहे.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.** : राज्यातील स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी सर्व विद्यापीठांमध्ये बॅचलर ऑफ सिव्हील सर्विसेस अभ्यासक्रम सुरु करणे याबाबत ॲड.निरंजन डावखरे वि.प.स. यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, राज्यातील लाखो विद्यार्थी दरवर्षी स्पर्धा परीक्षेची तयारी करतात यासंदर्भात माझा महत्वाचा प्रश्न आहे. स्पर्धा परीक्षामध्ये राज्यातील विद्यार्थ्यांचा टक्का वाढविण्यासाठी बॅचलर ऑफ सिव्हील सर्विसेस हा अभ्यासक्रम राज्यात राबविला जावा. शासनाने निवेदनात असे नमूद केले आहे की, बॅचलर ऑफ सिव्हील सर्विसेस या अभ्यासक्रमास कवी कुलगुरु कालिदास विद्यापीठामार्फत संपूर्ण महाराष्ट्रात मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे राज्यातील उर्वरित अकृषी विद्यापीठांमध्ये तसेच त्यांच्याशी संलग्न महाविद्यालयांमध्ये बॅलचर ऑफ सिव्हील सर्विसेस हा अभ्यासक्रम शिकविला जात नाही. या अनुषंगाने माझे दोन स्पेसिफिक प्रश्न आहेत. मुंबई विद्यापीठ, पुणे विद्यापीठ या नामांकित विद्यापीठांमध्ये हा कोर्स सुरु करण्यात येईल काय ? मणिपूर या छोट्या राज्याने असा कोर्स राबविला आहे, त्यामुळे आपल्या राज्याने हा कोर्स राबविला तर चांगल्या दर्जाचे अधिकारी प्रत्येक विभागातून मिळू शकतील. महाराष्ट्रातील मुले मोठ्या संख्येने अधिकारी व्हावेत यासाठी हे कोर्स नामांकित विद्यापीठात राबविण्यात येतील काय ? तसेच किती कालावधीत याची सुरुवात करण्यात येईल.

**सभापती** : उच्च व तंत्र शिक्षण मंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सूचना क्रमांक ५ मी उत्तरासाठी राखून ठेवतो.

-------

**पृ.शी./मु.शी.** : ठाण्यातील घोडबंदर रोडवर आनंदनगर येथे अंमली पदार्थांची विक्री करणे याबाबत सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर,प्रवीण दरेकर, प्रसाद लाड वि.प.स. यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना

श्री. शंभूराज देसाई (गृह राज्यमंत्री (ग्रामीण)) : सभापती महोदय, नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी सूचना क्रमांक ४ चे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, ठाण्यातील घोडबंदर रोडवर आनंदनगर येथे अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या एका नायजेरियन व्यक्तीला अटक केली असणे, या व्यक्तीकडून आफ्रिकेतून अंमली पदार्थ आणून मुंबई, ठाणे व नवी मुंबई येथे व्यापार, तस्करी करुन चोरीचा माल विकला जात आहे. या शहरात अनेक आफ्रिकन लोक व्हीसाची मुदत संपल्यावर वास्तव्य करीत आहेत. यामध्ये बहुतेक लोक गुन्हेगारी स्वरुपाच्या कारवायामध्ये गुंतलेले आहेत. ड्रग्जची तस्करी, विक्रीमध्ये या लोकांचा मोठा सहभाग असतो. तरुण मुलांकडे पैसे नसतील तर घरातील किंमती वस्तू देऊन ड्रग्ज घेतले जात आहेत. व्हीसा संपलेल्या परदेशी लोकांवर कारवाई करुन त्यांना त्यांच्या देशात पाठविण्यात येईल काय ? काही विशिष्ट भागात वास्तव्य करणाऱ्या नायजेरियन, आफ्रिकन किंवा इतर परदेशी लोकांवर किंवा गुन्हेगारी स्वरुपाच्या लोकांवर पाळत ठेऊन त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.शंभूराज देसाई : सभापती महोदय, ठाणे शहरातील दोन नायजेरियन व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. डीक्सन जेडीब्येरे निरजे आणि चिंकु बेब्रु इजोवेज अशी या दोन नायजेरियन व्यक्तींची नावे आहेत. त्यांच्याकडून ३८६ ग्रॅम कोकीन व ६० ग्रॅम एमडी पावडर हे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. त्यांना अटक करुन १५ दिवसांची पोलीस कोठडी घेण्यात आली होती. आता ते न्यायालयीन कोठडीत आहेत. नवी मुंबई येथील दोन व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून ७१ ग्रॅम वजनाचे इन्फेटाईममीन हा अंमली पदार्थ व १२० ग्रॅम मेथॅक्युलॉन जप्त केले आहे. त्यांना ९ दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली होती आता ते न्यायालयीन कोठडीत आहेत. या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे परदेशी लोकांच्या व्हीसाची मुदत संपली आहे तरी ते येथे राहतात. जे न्यायालयीन कोठडीत आहेत त्यांची न्यायालयीन कोठडी जेव्हा संपेल त्यानंतर त्यांना तत्काळ आपल्या देशातून त्यांच्या देशात जाण्याचे निदेश देण्यात येतील त्यांना येथे राहता येणार नाही. अशा पध्दतीने केंद्राच्या परराष्ट्र मंत्रालयाशी संपर्क साधून येथे ते राहणार नाहीत, त्यांना बाहेर जावे लागेल अशा सूचना संबंधितांना देण्यात येतील. ज्या परिसरात हे रॅकेट आढळून येते तेथील उपायुक्तांना आजच सक्त सूचना देण्यात येतील. विशेषत: कॉलेज परिसर असेल, क्लासेस असतील, तेथील पानटपरीची

श्री.शंभूराज देसाई....

दुकाने किंवा इतर कोणतीही दुकाने असतील त्याबाबत आढावा घेण्यात येईल. याबाबत सर्च ऑपरेशन करण्यात येईल. अंमली पदार्थांचा व्यवसाय करणाऱ्या लोकांवर कारवाई करण्याचे आदेश संबंधित उपायुक्तांना तातडीने देण्यात येतील.

--------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.** : डोंबिवली एमआयडीसी मधील कारखान्यातून होणाऱ्या प्रदूषणामुळे परिसरात आरोग्याच्या समस्या निर्माण होणे याबाबत सर्वश्री प्रवीण दरेकर, विजय ऊर्फ भाई गिरकर, सुरेश धस, सदाभाऊ खोत, प्रसाद लाड, गोपिचंद पडळकर, विनायक मेटे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.रणजित पाटील, श्री.नागोराव गाणार वि.प.स. यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना

श्री.सुभाष देसाई (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी सूचना क्रमांक ६ चे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत

श्री.प्रसाद लाड : सभापती महोदय, डोंबिवली व बोईसर एमआयडीसीतील कारखान्यातून होणाऱ्या प्रदूषणामुळे कामगारांच्या व परिसरात आरोग्याच्या समस्या निर्माण झालेल्या आहेत. डोंबिवली एमआयडीसीमधील १५६ कारखाने पातळगंगा एमआयडीसीत स्थलांतरित केले जाणार आहेत. पाताळगंगा व रसायनी एमआयडीसीमधून अगोदरच पाताळगंगा नदी प्रदूषित झाली आहे. डोंबिवलीतील कारखाने इतरत्र हलविले पाहिजे याबाबत दुमत नाही. हे करीत असताना रायगड व डोंबिवलीतील लोकप्रतिनिधी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेणे व स्थलांतरित होणाऱ्या उद्योजकांशी चर्चा करणे आवश्यक होते. डोंबिवली एमआयडीसीतील कारखान्यांच्या स्थलांतराचा निर्णय घेण्यापूर्वी पाताळगंगा नदीचे प्रदूषण व उपाय योजनेबाबत अभ्यास केला आहे काय ? उद्योग मंत्री, पर्यावरण मंत्री रायगड जिल्हाधिकारी, लोकप्रतिनिधी, स्थानिक लोकप्रतिनिधी व उद्योजक यांच्या बरोबर संयुक्त बैठक आयोजित करण्यात येईल काय ?

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.प्रसाद लाड.........

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न बोईसर संदर्भात आहे. मी लविनोकपूर इंडस्ट्रीबाबत सातत्याने तक्रार करीत आहे. ती कंपनी शंभर टक्के मेडिकल कॉटन तयार करते. ती कंपनी २२ ते २४ देशात मालाचा पुरवठा करते. शेतकऱ्यांच्या शेतात सातत्याने विषारी केमिकल टाकले जाते. जे विषारी केमिकल तयार होते त्यामध्ये कामगारांना कोणतीही सेफ्टी दिली जात नाही, अनधिकृत बांधकाम आहे. कामगारांनी श्रमिक उत्कर्षच्या माध्यमातून विषय मांडण्याचा प्रयत्न केला असता अनधिकृतपणे १७८ कामगारांना घरी बसविण्यात आले. शासन सदर कंपनीवर कारवाई करणार आहे काय ?

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी डोंबिवली व बोईसर संदर्भात प्रश्न उपस्थित केलेले आहेत. हे दोन्ही प्रश्न परस्पर विरोधी आहेत. एका ठिकाणी कारवाई केली तर कारवाई का करण्यात आली आणि दुसरीकडे कारवाई होत नाही म्हणून आग्रह धरण्यात येत आहे. परंतु हरकत नाही. मी सांगू इच्छितो की, डोबिवली येथे प्रदूषणाचा अतिरेक झाला. मुख्यमंत्री महोदयांनी तेथे भेट दिली असता प्रदूषणाचा अक्षरश: हिरवा पाऊस पडला. एक कुत्रा नाल्यात शिरला, तो नाल्यातून कायम स्वरुपी निळा होऊन बाहेर पडला. तेथील सर्व उद्योजक व नागरिकांबरोबर चर्चा केल्यानंतर उद्योजकांना यंत्र बसवून प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी दोन वर्षे संधी देण्यात आली. परंतु प्रदूषण नियंत्रणात आले नाही. त्यानंतर हा उपाय योजण्यात आला. आम्ही तेथून कारखाने हलवावेत असे म्हणतच नाही. प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा राष्ट्रीय हरित लवात यांनी वारंवार सूचना व आदेश देऊनही ज्यांनी प्रदूषण नियंत्रणात आणले नाही त्यांनी तेथे उत्पादन करु नये. त्यांना ते उत्पादन करण्यासाठी पर्याय दिलेला आहे. पाताळगंगा येथे संपूर्ण व्यवस्था करण्यात आलेली आहे. तेथील सीईटीपी पूर्ण क्षमतेने कार्यान्वित असून तेथे त्यांना प्रदूषण वाढू देता येणार नाही, अशी व्यवस्था करण्यात आली आहे. डोंबिवलीतील ८५५ कारखान्यांपैकी केवळ १५६ कारखाने निवासी इमारतीपासून ५० मिटरच्या

असुधारित प्रत

श्री.सुभाष देसाई.......

अंतरावर आहेत. तेथे निवासी विभाग व औद्योगिक विभागाची सरमिसळ झालेली आहे. मागील काही वर्षात ज्या बरोबर किंवा चुकीच्या परवानग्या दिल्या असतील किंवा जे असेल ते, परंतु दोन वर्षे संधी देऊन ज्यांनी प्रदूषण नियंत्रणात आणले नाही त्यासाठी हा उपाय करण्यात येत आहे. त्यापैकी १५६ कारखान्यांचे स्थलांतर नाही तर त्यांनी तिकडे त्यांचे उत्पादन करावे, त्यांना पर्यायी जागा देत आहेत. आपण त्यांची येथील जागा तशीच ठेवलेली आहे, त्यांची येथील जागा काढून घेतली जात नाही, फक्त त्यांनी प्रदूषण न करणारे उद्योग करावेत. आपण माहिती व तंत्रज्ञान, व्यापारी वापर अशा सर्व सवलती दिलेल्या आहेत. त्यामुळे त्यांचे उद्योगातून उच्चाटन होणार नाही. तेथील नागरिकांचे आरोग्य पूर्णपणे धोक्यात आले असून ते नियंत्रणात आणण्यासाठी हा उपाय करण्यात येत आहे. कामगारांचे व उद्योजकांचे काही प्रश्न असतील तर त्याबाबत सातत्याने चर्चा सुरु आहे आणि समन्वयाने यातून मार्ग काढला जाईल.

श्री.प्रसाद लाड : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी बोईसर संदर्भात उत्तर दिलेले नाही. आपण त्या संदर्भात किमान बैठक तरी आयोजित करावी.

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, बोईसर येथे सातत्याने कारवाई सुरु आहे. आपण अनेक वेळा तेथे कारखाने सुद्धा बंद केलेले आहेत.

श्री.प्रसाद लाड : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी बैठक आयोजित करावी.

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, आवश्यकता असेल तर बैठकही आयोजित करण्यात येईल.

-------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.** : राज्यातील विद्यापीठांमध्ये बॅचलर ऑफ सिव्हील सर्व्हिसेस अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी नियम ९३ अन्वये दिलेली सूचना.

श्री.उदय सामंत (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : सभापती महोदय, नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी आपल्या अनुमतीने सूचना क्रमांक ५ चे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

असुधारित प्रत

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, राज्यातील लाखो विद्यार्थी प्रत्येक वर्षी स्पर्धा परीक्षेची तयारी करतात. राज्यातील विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षेतील टक्केवारी वाढविण्याच्या दृष्टिकोनातून बॅचलर ऑफ सिव्हील सर्व्हिसेस अभ्यासक्रम राज्यातील विद्यापीठांमध्ये राबविण्यात यावा यासाठी मी नियम ९३ अन्वये सूचना उपस्थित केलेली आहे. नियम ९३ अन्वये सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, "बॅचलर ऑफ सिव्हील सर्व्हिसेस हा अभ्यासक्रम कवी कुलगुरु कालीदास विद्यापीठामार्फत संपूर्ण महाराष्ट्रभर मान्यता देण्यात येते." तसेच निवेदनात पुढे असू नमूद केले आहे की, "राज्यातील उर्वरित अकृषी विद्यापीठांमध्ये तसेच त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये बॅचलर ऑफ सिव्हील सर्व्हिसेस हा अभ्यासक्रम शिकविला जात नाही." माझा प्रश्न असा आहे की, आपण सदर अभ्यासक्रम मुंबई, पुणे असे जे नामांकित विद्यापीठ आहेत तेथे त्यासाठी मान्यता देणार आहात काय आणि ठराविक कालावधीत हा उपक्रम राबविण्यात येणार आहे काय ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, मी या संदर्भातील पार्श्वभूमी सांगू इच्छितो. महाराष्ट्रातील पीआयएस सेंटर्स अपग्रेड करण्यासाठी राज्य शासनाने समिती गठित केलेली आहे. मुंबई किंवा महाराष्ट्रातील जी मुले महाराष्ट्र सदनमध्ये जातात त्यांची व्यवस्था उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या जागेत व्हावी यासाठी देखील आम्ही प्रयोजन केले असून आम्ही तेथे वसतिगृह व अभ्यासिकेचे बांधकाम करीत आहोत. सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी सिव्हील सर्व्हिसेसचे अभ्यासक्रम सर्व विद्यापीठात सुरु केले जातील काय असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. शासनाने या संदर्भात सकारात्मक भूमिका घेतलेली आहे. आपण समिती गठित केलेली आहे. पुढील ९० दिवसात हा अभ्यासक्रम प्रत्येक विद्यापीठात कशा पद्धतीने द्यावा या संदर्भात अहवाल प्राप्त होईल आणि सकारात्मक विचार करुन हा अभ्यासक्रम सुरु केला जाईल.

---------

## विशेष उल्लेखाच्या सूचना.

**सभापती** : आज बुधवार, दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी म.वि.प. नियम १०१-अ अन्वये मान्य करण्यात आलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे मी घोषित करतो.

--------

असुधारित प्रत

## औचित्याचे मुद्दे

**सभापती** : सोमवार, दिनांक १४ मार्च, मंगळवार, दिनांक १५ मार्च व आज बुधवार दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी मान्य करण्यात आलेले औचित्याचे मुद्दे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे मी घोषित करतो.

--------

असुधारित प्रत

## शालेय पोषण आहाराच्या धान्याबाबत पॉईंट ऑफ इन्फर्मेशनबाबत

डॉ.परिणय फुके : सभापती महोदय, गोंदिया जिल्ह्यातील जिल्हापरिषद शाळा, चेंगरा येथे दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी शालेय पोषण आहार पुरविणारे कंत्राटदार श्री.हरि राईस ॲण्ड ॲग्रो लिमिटेड, महालक्ष्मी राईस मिल जवळ, गोविंदपूर रोड, गोंदिया यांनी पुरवठा केलेल्या धान्याची पाहणी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षण व उप सरपंच यांच्या उपस्थितीत केली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा, धूळ, सिमेंट व गुटख्याचे पाऊच आढळून आले. या विरोधात प्राथमिक शिक्षणाधिकारी, गोंदिया यांच्याकडे तक्रारही करण्यात आली. परंतु अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. सदर कंत्राटदार शालेय पोषण आहाराच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळत असून अशा प्रकारे मुलांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या भ्रष्टाचारी कंत्राटदारावर निर्बंध घालून यापुढे त्यांना कोणतेही कंत्राट देण्यात येऊ नये. तसेच या प्रकरणी चौकशी करुन कारवाई करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

**सभापती :** शासनाने नोंद घ्यावी.

-------

असुधारित प्रत

## मानननीय विरोधी पक्षनेते सभागृहात उपस्थित नसल्याबाबत पॉईंट ऑफ इन्फर्मेशन

डॉ.मनिषा कायंदे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते सकाळपासून सभागृहात उपस्थित नाहीत. ते अतिशय महत्वाच्या पदावर काम करतात. विरोधी पक्षनेता हे संविधानिक पद आहे. विरोधी पक्षनेता हे मंत्री दर्जाचे पद आहे. त्यांना अटक झालेली आहे का ते फरार आहेत याबाबत सभागृहाला माहिती मिळावी, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : मी माहिती घेऊन ती आपल्याला कळवितो.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया जागेवर बसावे. या मुद्यावर चर्चा होणार नाही. सन्माननीय सदस्या डॉ.मनिषा कायंदे यांनी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून मुद्दा उपस्थित केलेला आहे. आपण कृपया विषय वाढवू नये. माननीय विरोधी पक्षनेते सभागृहात का येत नाही याबाबत मी माहिती घेणार आहे. मी स्वत: त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करणार आहे. मी या संदर्भात माहिती घेऊन ती सन्माननीय सदस्या डॉ.मनिषा कायंदे यांना देईन. आपण कृपया या विषयावर चर्चा करु नये.

---------

## इयत्ता १० व १२ वी परीक्षेबाबत पॉईंट ऑफ इन्फर्मेशन

श्री.जयंत आसगावकर : सभापती महोदय, राज्य मंडळाच्या इयत्ता १० वी व १२ वीच्या परीक्षा सुरु आहेत. प्रश्नपत्रिका काही ठिकाणी व्हॉट्सॲपच्या माध्यमातून प्रसारित झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत. तसेच, औरंगाबाद येथील एका शाळेतील मुख्याध्यापक व कर्मचाऱ्याने कॉपी पुरविण्याबाबतची घटना वर्तमानपत्रात छापून आलेली आहे. त्यामुळे जे पेपर झालेले आहेत ते पुन्हा घेण्यात येतील काय अशी विद्यार्थ्यांमध्ये साशंकता आहे. शासनाने याबाबत उपायोजना करावी, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री.सांगळे.......

असुधारित प्रत

**सभापती :** शासनाने याबाबतची नोंद घ्यावी.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. महाराष्ट्रातील विद्यार्थी व पालक यांच्यामध्ये या प्रश्नामुळे मोठया प्रमाणात संभ्रमाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. सन्माननीय सदस्य ॲड. निरंजन डावखरे यांनी दोन दिवसांपूर्वी हा प्रश्न उपस्थित केला होता. दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी दहावीच्या मराठी विषयाची परीक्षा होती. जयभद्र बहुउद्देशीय शिक्षण संस्था, गिरणे तांडा संचालित लक्ष्मीबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, निलजगावकर, ता.पैठण, जिल्हा औरंगाबाद येथे महाराष्ट्र टाईम्स वर्तमानपत्राचे पत्रकार गेले होते. राज्यात करोनाची परिस्थती असल्यामुळे प्रत्येक शाळेला परीक्षा केंद्र करण्यात आले आहे. त्यानुसार उक्त शाळेला देखील परीक्षा केंद्र करण्यात आले होते. पत्रकार त्या शाळेच्या ठिकाणी गेल्यानंतर काही शिक्षकमंडळीच्या मदतीने कॉपी करण्याचे प्रकार तेथे सुरु होते. मी सदनाला सांगू इच्छिते की, आम्ही सदर शाळेची मान्यता रद्द करण्याचा निर्णय घेतलेला आहे. भविष्यात अशा प्रकारे शाळांमध्ये गैरप्रकार झाल्यास त्यांची मान्यता रद्द केली जाईल व त्यांना पुढे कधीही दहावीची परीक्षा देता येणार नाही अशा प्रकारे देखील निर्णय आम्ही घेतला आहे.

सभापती महोदय, मी ३-४ दिवसांपासून ऐकत आहे की, पेपर फुटलेले आहेत. तसेच सातत्याने सामाजिक व प्रसिद्धीच्या माध्यमातून या विषयी चर्चा होत आहे. सन्माननीय सदस्य ॲड. निरंजन डावखरे यांनी दोन दिवसांपूर्वी असा प्रश्न विचारला केला होता की, बारावीचा रसायनशास्त्राचा पेपर फुटला होता का ? त्यावर मी सदनामध्ये अशी माहिती दिली होती की, साधारणत: सकाळी १०.२० वाजता विद्यार्थ्यांच्या हातामध्ये पेपर वाचण्यासाठी दिला जातो. विद्यार्थ्यांनी १० मिनिटे पेपर वाचावा. त्यानंतर सकाळी १०.३० वाजता त्यांनी पेपर लिहिण्यास सुरुवात करावी असे अपेक्षित आहे. मधल्या काळात असा प्रकार घडला की, सदर विद्यार्थिनी परीक्षा केंद्रावर पेपर देण्यासाठी सकाळी १०.३० वाजता येण्याऐवजी १०.५० वाजता आली. तेथे उपस्थित असलेल्या पर्यवेक्षकांनी तिचा मोबाईल तपासल्यानंतर त्यात १०.२४ वाजता पेपरमधील काही भाग आढळून आला. त्यामुळे सदर विद्यार्थिनी उशिरा

प्रा.वर्षा गायकवाड .....

आली होती. तसेच तिच्याकडे विचारणा केल्यानंतर काही गोष्टी संशयास्पद वाटल्यामुळे तिचा मोबाईल तपासण्यात आला होता.

सभापती महोदय, दुसऱ्या घटनेचा सातत्याने उल्लेख केला जात आहे. चंपानेर, ता.कन्नड, जिल्हा औरंगाबाद येथे दुसरी घटना घडली. तेथे देखील विद्यार्थिनी उशिरा परीक्षा केंद्रावर आली होती. तेथे भरारी पथक गेले होते. भरारी पथकाला असे वाटले की, त्या मुलीकडे कदाचित मोबाईल असू शकतो. त्यानुसार त्या मुलीचा मोबाईल तपासल्यानंतर लक्षात आले की, दुपारी १२.३० वाजता तिच्या मोबाईलमध्ये सदर मेसेज होता.

सभापती महोदय, सदनामध्ये अहमदनगरमधील घटनेसंबंधी उल्लेख करण्यात आला. मी अहमदनगरच्या घटनेसंबंधी सदनाला सांगू इच्छिते की, दिनांक १४ मार्च, २०२२ रोजी गणित व संख्याशास्त्राचा पेपर होता. तो पेपर सकाळी ११.२५ वाजता मिळाला. परंतु परीक्षा सकाळी १०३० वाजता होती. याचा अर्थ आपला पेपर फुटलेला नाही. मुलांना १० मिनिटे पेपर वाचण्यासाठी दिला जातो त्या वेळेत कोणी तरी मोठया प्रमाणात गैरवर्तणूक केल्याचे आम्हाला आढळून आलेले आहे. मध्यंतरीच्या काळात आम्ही बैठका घेऊन कडक निर्णय घेण्याचे ठरविले. सभापती महोदय, मला आपल्या माध्यमातून महाराष्ट्रातील विद्यार्थी, पालक आणि जनतेला नम्रपणे सांगायचे आहे. आपण सर्वांनी परीक्षा केंद्रावर एक तास अगोदर म्हणजे सकाळी ९.३० वाजता पोहोचले पाहिजे. परंतु काही विद्यार्थी उशिरा येतात. आता आम्ही असा निर्णय घेतला आहे की, परीक्षा केंद्रावर कोणत्याही विद्यार्थ्याला सकाळी १०३० वाजेनंतर आत घेत असताना जोपर्यंत त्याची पूर्ण होत नाही तोपर्यंत त्यांना परीक्षेला बसू दिले जाणार नाही. याबाबत सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घेतली पाहिजे. तसेच आपल्या परीक्षेची वेळ सकाळी १०.३० वाजता असल्यास आपण परीक्षा केंद्रावर सकाळी ९.३० वाजेपर्यंत पोहोचले पाहिजे. किंवा परीक्षेची वेळ दुपारी ३.०० वाजता असल्यास आपण परीक्षा केंद्रावर दुपारी २.०० वाजेपर्यंत पोहोचले पाहिजे. एखाद्या

प्रा.वर्षा गायकवाड .....

वेळी एखाद्या जेन्युईन कारणामुळे परीक्षेला येण्यास वेळ झाल्यास अशा विद्यार्थ्यांची पूर्ण तपासणी केल्याशिवाय त्याला परिक्षेला बसता येणार नाही.

सभापती महोदय, प्रत्येक शाळा परीक्षा केंद्र असल्यामुळे त्यांची संख्या मोठया प्रमाणात आहे. त्यामुळे आम्ही त्या संदर्भात माननीय गृह मंत्री यांची भेट घेतली. माननीय गृह मंत्री यांनी पोलीस महासंचालक तसेच पोलीस सह आयुक्त यांना असे सांगितले आहे की, परीक्षा केंद्रावर जास्तीचा पोलीस बंदोबस्त ठेवावा. आम्ही जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांना लेखी पत्राद्वारे कळविले आहे की, त्यांनी परीक्षा केंद्रावर वारंवार भेटी द्याव्यात. काही वर्तमानपत्रांमध्ये बातम्या छापून आल्या आहेत की, काही परीक्षा केंद्रांवर काही जिल्हाधिकाऱ्यांनी भेटी देऊन पाहणी केलेली आहे. अशा प्रकारे आम्ही विविध प्रयत्न करीत आहोत. चांगल्या प्रकारे परीक्षा झाल्या पाहिजेत. परीक्षा हा मुलांच्या जीवनामधील महत्त्वाचा टप्पा असतो. परीक्षा मोठया प्रमाणात होत असल्यामुळे माझी आपल्या सर्वांना अशी विनंती आहे की, कोणतीही गोष्ट आपल्या निदर्शनास आल्यानंतर सर्वप्रथम ती तपासून घेतली पाहिजे. तसेच त्यावर चर्चा करण्यासाठी व्यक्ती उपलब्ध असली पाहिजे. माझी या निमित्ताने लोकप्रतिनिधी आणि समाज माध्यमांना विनंती आहे की, आपल्याला काही गोष्टींची माहिती करुन घ्यायची असल्यास आम्ही त्याकरिता बोर्डचे संपर्क नंबर देत आहोत. जेणेकरुन आपल्याला राज्यस्तरीय किंवा विभाग स्तरावर संबंधितांसमवेत चर्चा करता येऊ शकेल. जेणेकरुन अशा प्रकारे संभ्रम आणि भीतीचे वातावरण मुलांमध्ये पसरु नये. तसेच महाराष्ट्रामध्ये गैरसमजाचे वातावरण निर्माण होऊ नये अशी मी आपल्या माध्यमातून सदनाला विनंती करते. मुले ही आपल्या देशाचे भवितत्व्य आहे. मुलांनी सुरक्षित वातावरणामध्ये निर्भिडपणे परीक्षा द्यावी यासाठी राज्य शासन प्रयत्न करीत आहे.

---------

असुधारित प्रत

## टायपिंग परीक्षांचा निकाल जाहीर करण्यासंबंधी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन

ॲड. निरंजन डावखरे : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे ऑक्टोबर, नोव्हेंबर, २०२१ मध्ये टायपिंग परीक्षा घेण्यात आली. परीक्षा होऊन ४ ते ५ महिन्यांचा कालावधी उलटून देखील अद्याप टायपिंग परीक्षांचा निकाल लागला नाही. राज्यातील जवळपास २ लाख विद्यार्थी सदर परीक्षेच्या निकालाची वाट बघत आहेत. परिणामी त्यांना मिळणाऱ्या संधीपासून वंचित रहावे लागत आहे. सदर टायपिंग परीक्षांचा निकाल लवकरात लवकर जाहीर व्हावा याकरिता माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे.

**सभापती :** शासनाने याबाबतची नोंद घ्यावी.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** ठाणे पूर्व कोपरी येथील सॅटिस-२ प्रकल्पाच्या डेक कामाच्या भुमिपूजन कार्यक्रमासाठी निमंत्रण न देणे

**मु.शी.:** ठाणे पूर्व कोपरी येथील सॅटिस-२ प्रकल्पाच्या डेक कामाच्या भुमिपूजन कार्यक्रमासाठी निमंत्रण न देणे या विषयाबाबत सन्माननीय सदस्य ॲड. निरंजन डावखरे यांनी श्री.विपिन शर्मा, आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांच्याविरुध्द दिलेली विशेषाधिकार भंगांची सूचना

**सभापती :** सन्माननीय सदस्य ठाणे पूर्व कोपरी येथील सॅटिस-२ प्रकल्पाच्या डेक कामाच्या भुमिपूजन कार्यक्रमासाठी निमंत्रण न देणे या विषयाबाबत श्री.विपिन शर्मा, आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांच्याविरुध्द विशेषाधिकार भंगांची सूचना दिली आहे. सदस्यांना त्यावर आपले म्हणणे मांडायचे असल्यास थोडक्यात मांडावे.

ॲड. निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, दिनांक १८ फेब्रुवारी, २०२२ रोजी ठाणे महानगरपालिकेअंतर्गत ठाणे पूर्व येथील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी उभारल्या जाणाऱ्या कोपरी सॅटिस-२ प्रकल्पाच्या डेकच्या कामाचे भूमिपुजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाच्या वेळी फक्त एकाच पक्षाचे प्रतिनिधी आणि लोकप्रतिनधी उपस्थित होते. उर्वरित पक्षांच्या लोकप्रतिनिधींना सदर कार्यक्रमाकरिता बोलाविण्यात आले नाही. मी स्वत: त्या भागाचे प्रतिनिधित्व करीत असताना मला सदर कार्यक्रमाचे निमंत्रण देखील देण्यात आले नाही. त्या अनुषंगाने मी सदर विशेषाधिकार भंगाची सूचना देत आहे.

**सभापती :** सन्माननीय सदस्यांनी दिलेली विशेषाधिकार भंगाची सूचना मला प्राप्त झाली असून, त्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. निरंजन डावखरे यांनी उपस्थित केलेला मुद्दा बरोबर आहे. सरकारी कामांच्या कार्यक्रमासाठी कोणाला बोलवायचे याबाबत मंत्री महोदय ठरवत नाहीत. हा प्रोटोकॉल आहे. त्यानुसार अधिकाऱ्यांनी कार्यवाही करायची असते. सभापती महोदय, आपण त्या प्रमाणे संबंधित सचिव व अधिकाऱ्यांना याबाबतची जाणीव करुन द्यावी की, सरकारी निधीतून होणाऱ्या कार्यक्रमांसाठी प्रोटोकॉलप्रमाणे सर्व लोकप्रतिनिधींना बोलाविले पाहिजे. हा नियम, कायदा व प्रोटोकॉल आहे. परंतु तसे घडत नसल्यास ही गंभीर बाब आहे. या संदर्भात ज्या अधिकाऱ्यांनी कार्यवाही केली नाही. त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

**सभापती** : ठीक आहे.

-----------

असुधारित प्रत

## फुटपाथधारक रोजगारदार व व्यावसायिकांना न्याय मिळण्यासंबंधी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, गडचिरोली नगरपरिषद हद्दीतील फुटपाथ अतिक्रमण हटविण्याच्या मोहिमेमध्ये नगरपरिषद प्रशासनाने बळजबरीने फुटपाथ दुकाने उद्धस्त केली. गांधी चौक ते आरमोरी रोड लगतची जागा नगरपरिषदेची नसताना देखील तेथील दुकाने उद्धस्त करण्यात आली. बँकांतून कर्ज काढून या भागात लहान व्यवसाय करणाऱ्यांवर अन्याय होत आहे. नवेगाव येथील हेमंत कोरडे या फुटपाथधारकाने रोजगार गेल्याच्या धक्क्यामुळे दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी विहिरीत उडी मारुन आत्महत्या केल्याचे उघडकीस आले. गडचिरोलीसारख्या उद्योग विरहित जिल्ह्यात मोठया व्यापाऱ्यांच्या आणि राजकीय दबावामुळे चुकीची कार्यवाही करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करुन अन्याय झालेल्या फुटपाथधारक रोजगारदार तसेच व्यावसायिकांना न्याय देण्यात यावा.

सभापती महोदय, मी पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून २ दिवसांपूर्वी गडचिरोली येथील झोपडीधारकांचा व दुकानदारांचा प्रश्न मांडला होता. त्यानंतर सदर प्रकरणी ताबडतोब दुसऱ्या दिवशी कारवाई करण्यात आली. परंतु त्यावेळी एका व्यक्तीने तेथे आत्महत्या केली. ही गंभीर बाब आहे. गडचिरोली हा नक्षलग्रस्त आदिवासी भाग आहे. तेथे अशा घटना घडणे योग्य नाही. तेथे अधिकाऱ्यांनी गांभीर्यपूर्वक काम करीत असताना तेथील आदिवासी व गरीब व्यक्तींना संरक्षित केले पाहिजे. अशी मी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनद्वारे मागणी करीत आहे.

**सभापती :** शासनाने याबाबत गांभीर्याने नोंद घ्यावी व उचित कार्यवाही करावी.

---------

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत

## सभागृहाच्या कामकाजासंबंधी

**सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेत दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना मी पुढे ढकलत आहे, सोमवार दिनांक १४ मार्च रोजी सकाळी विशेष बैठकीत लक्षवेधी सूचना घेतल्या जातील. अर्धा-तास चर्चेबाबत नंतर बघू. आता माननीय महिला व बालविकास मंत्री महोदयांना नियम ४६ अन्वये निवेदन करायचे आहे.

असुधारित प्रत

## पॉईंट ऑफ इन्फर्मेशन

श्री.नरेंद्र दराडे : सभापती महोदय, नाशिक शहरात डीकेनगरमध्ये काल रात्री एक घटना घडली. एक व्यक्ती पोलीस स्टेशनला रात्री १२ वाजता गेली, तक्रार देण्यास गेलेल्या इसमाने पोलीस स्टेशनचा दरवाजा उघडला तेव्हा पोलीस दारु पीत होते. त्यांची तक्रार घेतली नाही व तक्रारदारास मारहान करण्यास सुरुवात केली, ही काल रात्री घडलेली गंभीर घटना आहे. याकरीता मंत्री महोदयांना विनंती करतो.

**सभापती** : शासनाने नोंद घ्यावी.

-----

असुधारित प्रत

**पृ.शी.** : मिशन वात्सल्यमध्ये सर्व जिल्हयात समित्या स्थापन करणे.

**मु.शी.** : मिशन वात्सल्यमध्ये सर्व जिल्हयात समित्या स्थापन करणे यासंबंधी माननीय महिला व बालविकास मंत्र्यांचे निवेदन

श्रीमती यशोमती ठाकूर (महिला व बालविकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम ४६ अन्वये पुढील निवेदन करते.

(सोबत : येथे जोडलेले निवेदन छापावे.)

------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** निकमार विद्यापीठ, पुणे विधेयक

L.C.BILL NO. I OF 2022

(A BILL TO PROVIDE FOR ESTABLISHMENT, INCORPORATION AND REGULATION OF NICMAR UNIVERSITY, PUNE FOR THE DEVELOPMENT AND ADVANCEMENT OF HIGHER EDUCATION IN THE STATE OF MAHARASHTRA AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.उदय सामंत (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक १ महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृध्दी करण्याकरिता, निकमार विद्यापीठ, पुणे यांची स्थापना करणे, त्यांचे विधिसंस्थापन करणे व विनियमन करणे आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.प.वि.क्रमांक १ मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.प.वि.क्रमांक महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृध्दी करण्याकरिता, निकमार विद्यापीठ, पुणे यांची स्थापना करणे, त्यांचे विधिसंस्थापन करणे व विनियमन करणे आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी

असुधारित प्रत

श्री.उदय सामंत.....

तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, नवीन शैक्षणिक धोरणात प्रत्येक राज्यात असलेली महाविद्यालये एकत्र करुन खाजगी विद्यापीठ स्थापन करावे किंवा क्लस्टर विद्यापीठ स्थापन करावे अशा प्रकारचे धोरण ठरविण्यात येत आहे.

**सभापती** : निकमार शब्दाचा अर्थ काय आहे ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, निकमार शब्दाचा अर्थ म्हणजे संबंधित ट्रस्टीने विद्यापीठाला दिलेले हे नाव आहे. असे विद्यापीठ निर्माण करण्यासाठी त्यांनी शासनाचे विहीत शुल्कही भरलेले आहे. सर्व कागदपत्रांची पुर्तता त्यांनी केलेली आहे. म्हणून नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यापीठाला मान्यता देण्याबाबतचे हे विधेयक आहे.

सभापती महोदय, मी सभागृहाला पुनश्च विनंती करतो की, सभागृहाने सदरहू विधेयक विचारात घ्यावे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे, आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड २ ते ५२ (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक १ संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन २०२२ चे वि.प.वि.क्रमांक १ संमत झाले आहे.

-------

असुधारित प्रत

**सभागृहाच्या कामकाजासंबंधी**

**सभापती** : दुपारी २.३० वाजेपर्यंत सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे.

(दुपारी १.४७ ते २.३० वाजेपर्यंत मध्यंतर)

------

असुधारित प्रत

**( मध्यंतरानंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी**. : महाविकास आघाडी सरकारने राबविलेल्या कल्याणकारी योजना

**मु.शी**. महाविकास आघाडी सरकारने राबविलेल्या कल्याणकारी योजना या विषयावर सर्वश्री शशिकांत शिंदे, दिवाकर रावते, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री विक्रम काळे, रविंद्र फाटक, अमरनाथ राजूरकर, सतीश चव्हाण, नरेंद्र दराडे, डॉ.वजाहत मिर्झा, सर्वश्री विप्लव बाजोरिया, मोहनराव कदम,अनिकेत तटकरे, विलास पोतनीस, राजेश राठोड, अमोल मिटकरी, डॉ.मनिषा कायंदे,सर्वश्री अभिजित वंजारी, संजय दौंड,अंबादास दानवे, जयंत आसगावकर, दुष्यंत चतुर्वेदी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुनिल शिंदे, वि.प.स..यांचा प्रस्ताव.

श्री.शशिकांत शिंदे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम २६० अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यातील अस्तित्वात असलेल्या व दुरवस्था झालेल्या ग्रामीण रस्त्यांची दर्जोन्नती करणे यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-१ च्या धर्तीवर राज्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ या योजनेची टप्प्याटप्प्यात अंमलबजावणी करण्यात आली असणे, प्रथम टप्प्यात रस्ते दर्जोन्नतीसाठी १० हजार किलोमीटर लांबीवर काम करण्यात येणार असून त्यापैकी सन २०२१-२२ या वर्षात ३ हजार किलोमीटर लांबीवर काम करण्यात आले. या प्रकल्पाची एकूण किंमत ७ हजार ५०० कोटी रुपये असणे, सन २०२२-२३ मध्ये ३ हजार कोटी इतक्या निधीची आवश्यकता असून रस्त्याच्या कामात निधी कमी पडल्यास नाबार्ड बँक आशियाई विकास बँक वा तत्सम संस्थेकडून कर्जरुपी निधी उपलब्ध करुन घेण्याचा निर्णय सुध्दा शासनाने घेतलेला असणे, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-१ मध्ये बऱ्याच

असुधारित प्रत

श्री.शशिकांत शिंदे....

त्रुटी आहेत. त्या दूर करण्याची आवश्यकता आहे. पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत एकूण ६ हजार ५५० किलोमीटर रस्त्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला असून पहिल्या टप्प्यात २९२५ किलोमीटर बांधकामाला मान्यता प्राप्त झाली असून २०१७७ कोटी रुपये खर्च होणार असणे, ग्रामीण भागातील कोरोनामुक्तीच्या कामाला प्रोत्साहन मिळावे यासाठी राज्यातील प्रत्येक महसूली विभागात पहिल्या ३ ग्रामपंचायतींना अनुक्रमे ५० लाख, २५ लाख व १५ लाख रुपयांचे बक्षीस देण्याचा शासनाने चांगला निर्णय घेतलेला असणे, राज्यात ५ लाख ४२ हजार ९४४ महिला स्वयंसहाय्यता गट कार्यरत असून ५५ लाख ३५ हजार ४३२ कुटूंबांचा त्यात समावेश करण्यात आला असून ११ हजार १४० कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आलेले असणे, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेअंतर्गत १० हजार २३१ गटांना २६ कोटी रुपये बीजभांडवल वाटप करण्यात आलेले असणे, ग्रामीण भागातील घरकूलांच्या निर्मितीला गती देण्यासाठी ग्रामीण महाआवास अभियानाचा शासनाने प्रारंभ केला असून आतापर्यंत ४ लाख २५ हजार घरकुले पुर्ण करण्यात येणे, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतून ५,३९,५२,२६८ इतके मनुष्यबळ निर्मिती करण्यात आली. स्वच्छ भारत मिशनमधून ८ लाख ७८ हजार ७११ शौचालये बांधण्यात आली. प्रधानमंत्री उज्वला योजनेतून ५ लाख ७५ हजार १८३ महिलांना गॅस जोडणी करण्यात आलेली असणे, सौभाग्य योजनेतून ५ लाख ७८ हजार १५१ विद्युत जोडण्या देण्यात आलेल्या असणे, अनुसूचित जमातींचे बनावट जात वैधता प्रमाणपत्रे सादर करुन इतर जातीच्या उमेदवारांनी शासकीय नोकरी मिळविली असणे, ज्यांनी अशी बनावट जातप्रमाणपत्रे दिली आहेत त्यांच्यावर कार्यवाही करणे आवश्यक असणे, आदिवासी शालेय विद्यार्थीनींना शालेय भत्ता गेल्या २० वर्षापासून प्रत्येक दिवशी १ रुपया देण्यात येतो यात वाढ करुन आदिवासी विद्यार्थीनींना कमीतकमी १० रुपये शालेय भत्ता देण्यात यावा. मानव विकास निर्देशांकास उंची देण्यासाठी राज्य शासनाने आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ राज्यात सुरु करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतलेला असणे, ऑलिम्पिकसाठी राज्यातील निवड झालेल्या १०

असुधारित प्रत

खेळाडूंना प्रशिक्षण व सरावासाठी रु. ५ कोटी इतकी आर्थिक सहाय्य करणारे देशातील महाराष्ट्र

श्री.शशिकांत शिंदे....

एकमेव राज्य असून नवीन व्यायाम शाळेच्या बांधकामाची मर्यादा ७ लक्ष रुपयावरुन १२ लक्ष इतकी करण्याची आवश्यकता, नवीन व्यायाम शाळांच्या साहित्य खरेदीसाठी जास्त निधीची तरतूद करण्यात यावी. डीपीसी योजनेअंतर्गत क्रिडांगण विकास योजनेला व्यापक स्वरुप देऊन तरतूद ७ लक्ष रुपयावरुन १० लक्ष करण्यात यावे त्यात रनिंग ट्रॅक, जॉगिंग ट्रॅक विकसित करावे जेणे करुन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पोलीस भरती व इतर मैदानी खेळासाठी चालना मिळेल, विदेशी गार्यींच्या जातीपैकी सर्वात जास्त दूध देणारी गाय होलस्टीन फ्रिजीयन ( एका वेतात सरासरी ९ त े १२ हजार लिटर) ही आहे. तसेच भारतीय जातीपैकी सर्वात जास्त दुध देणारी गाय साहीवाल (एका वेतात सरासरी ४ ते ६ हजार लिटर) ही आहे. महाराष्ट्र राज्यातील जातीपैकी सर्वात जास्त दुध देणारी गाय देवणी (एका वेतात १ ते दीड हजार लिटर) ही आहे. होलस्टीन फ्रिजियन गाय सध्या पुणे येथील भाग्यलक्ष्मी फार्म, येथे असून भारतीय वातावरणात ही गाय एका वेतात ११,५०० लिटर दूध देत आहे. होलस्टीन फ्रिजियन गाय राज्यात आणण्यासाठी शेतकऱ्यांना अनुदान देण्याची गरज, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी. "

सभापती महोदया, कोविडची ही परिस्थिती आणि महाविकास आघाडी सरकारची स्थापना या एकाच वेळी आलेल्या कार्यक्रमाच्या निमित्ताने सरकारने कोविडच्या परिस्थितीमध्ये काम करत असताना मुलभूत सुविधांना प्राधान्य देण्यासाठी निधी उपलबध केलेला आहे. या संदर्भातील सर्व कामे करत असताना शासनाने महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्या माध्यमातून विविध प्रकारचे प्रस्ताव, विविध प्रकारची कामे मंजूर करण्याचे निर्णय घेतले गेलेले आहेत.

सभापती महोदया, प्रामुख्याने अर्थसंकल्पामध्ये सांगितल्याप्रमाणे पंचसुत्री कार्यक्रमाच्या माध्यमातून या महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेला अपेक्षित असलेले रस्ते, आरोग्य, महिलांचे सक्षमीकरण, गरिबांचे घरकुल स्वप्नपुर्ती, मानव विकास निर्देशांकास उंची देणे या संदर्भातील काम करत असताना क्रीडा संबंधित अन्य

श्री.शशिकांत शिंदे....

बाबींना प्राधान्य देण्यात आलेले आहे. सर्वसामान्य शेतकऱ्याकरिता जोडधंदा हा शेतीच्या उत्पादनाच्या व्यतिरिक्त उभा राहावा, याकरिता शासनाने विविध प्रकारच्या योजना कार्यान्वित केलेल्या आहेत. हे काम करत असताना.....

**उप सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांना माझी विनंती आहे की, आपण ऑन लेग राहावे. आज रोजी अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेचा शेवटचा दिवस आहे. याकरिता आपण अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेस प्राधान्य देत आहोत.

आता अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेस सुरुवात होईल.

असुधारित प्रत

**पृ.शी.:** अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु.शी.:** सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर
सर्वसाधारण चर्चा

( चर्चा पुढे सुरु.......

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील ऑनलेग आहेत. त्यांनी भाषणास सुरुवात करावी. आपण आतापर्यंत १६ मिनिटे बोलला आहात, आपण वेळेची मर्यादा पाळावी. माननीय सभापती महोदयांनी यावरील भाषणाकरिता प्रत्येक सन्माननीय सदस्यांना केवळ पाच मिनिटांचा अवधी दिलेला आहे, त्याप्रमाणे आपण आता पाच मिनिटात आपल्या भाषणाचा समारोप करावा.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदया, या बजेटमध्ये २४,००० कोटी रुपयांची महसूली तूट दाखविलेली आहे. या बजेटमध्ये फिस्कल डेफिशियट देखील २.५ टक्के इतकी आहे. परंतु तूट भरुन काढण्यासाठी जी कात्री चालविली जाते, ती शिक्षकांवर चालविली जाते. विकास कामांकरिता पैसे उपलब्ध व्हावेत, याकरिता जी कात्री चालविली जाते, ती शिक्षकांवर !, शिक्षणाशी निगडित बाबींवर चालविली जाते. शिक्षकांची मागणी किरकोळ आहे. विना-अनुदानित, कायम विना-अनुदानित, अंशत: विना अनुदानित, जे २० टक्क्यांवर आहेत, किंवा जे त्याच्या पुढील टप्प्यावर आहेत. जे त्रुटीयुक्त, जे त्रुटीपात्र, जे अघोषित आहेत, अशा शाळांतील शिक्षकांवर ही कात्री चालविली जाते. त्या शिक्षकांची मागणी अत्यंत किरकोळ आहे. ती किरकोळ मागणी पूर्ण केल्याने तूट वाढणार आहे, अशातला भाग नाही.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विक्रम काळे)**

यामुळे बजेटवरील भार वाढणार आहे, अशातलाही भाग नाही. दात कोरुन तुम्ही किती खाणार आहात ! दात कोरुन पैसे वाचविण्याचे दिवस संपलेले आहेत. सरकार हिम्मतवान आहे. उप मुख्यमंत्री महोदय कर्तबगार आहेत. तर मग त्यांना माझी अशी विनंती आहे की, या पुढे तरी किमान दात कोरुन बजेट सांभाळण्याचे दिवस त्यांनी मोजू नयेत, हिंमतीने निर्णय करावेत. ज्यांच्या खांद्यावर.....(अडथळा)

असुधारित प्रत

( वेळ संपल्याचे बेल वाजविली जाते.)

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्यांनी वेळेची मर्यादा पाळावी. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील मी आपल्याला वेळेचे महत्त्व लक्षात आणून दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी भाषणाचा समारोप करावा.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, प्रश्न असा आहे की, या सर्व जणांना ते पात्र असल्यामुळे वर्षानुवर्षे वाट पाहिलेली असल्यामुळे यापुढे तरी १०० टक्के पगार तरी शासनाने दिला पाहिजे. मी याकरिता अनुदानाची मागणी करीत नाही. १०० टक्के पगाराबाबत निर्णय शासनाने घेतला पाहिजे.

सभापती महोदय, पेन्शनचा प्रश्नही महत्त्वाचा आहे. जुनी पेन्शन योजना मिळाली पाहिजे, याकरिता आज या राज्यातील सरकारी, निम-सरकारी कर्मचारी, शिक्षक हे तिघेही रस्त्यावर उतरलेले आहेत. सन २००५ च्या पूर्वी ज्यांची नेमणूक झालेली आहे, त्यांना देखील समन्यायाने वागविले जात नाही. सरकारी कर्मचारी सन २००५ च्या पूर्वी नेमला गेला असेल आणि सन २००५ नंतर कायम झाला तरीही जुनी पेन्शन योजनेकरिता तो पात्र होतो. मात्र शिक्षकांच्या बाबत या संदर्भात शासनाने दुजाभाव दाखविलेला आहे. एका बाजूला हा दुजाभाव संपविला पाहिजे. दुसऱ्या बाजूला राजस्थान आणि छत्तीगढ सरकारने जो निर्णय घेतलेला आहे, त्या निर्णयाचे अनुकरण शासनाने केले पाहिजे. राजस्थान आणि छत्तीसगड या दोन्ही सरकारने ही काही महाराष्ट्र राज्यासारखी प्रगतीशील राज्ये मानली जात नाहीत. पण त्या दोन्ही राज्यांनी जुन्या पेन्शनचा निर्णय घेतलेला आहे. याच पध्दतीने अन्य राज्येही त्या मार्गावर असताना महाराष्ट्र शासनाने सरसकट जुन्या पेन्शनचा पुरस्कार केला पाहिजे.

सभापती महोदय, वेळ कमी असल्याने मी केवळ काही मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधणार आहे. यापूर्वी मी आशा वर्कर, अंगणवाडी ताईंचा उल्लेख केला होता. या दोघांनाही नियमित कर्मचारी समजून पगार दिला पाहिजे. जे कंत्राटी कर्मचारी राज्य शासन सेवेत, निम-सरकारी सेवेत आहेत, त्या सर्वांना सामावून घेऊन कायम केले पाहिजे. यापुढच्या काळात राज्य सरकारी सेवेत तरी कंत्राटी योजना असता कामा नये. कारण कंत्राटी कर्मचाऱ्यांना जे वेतन कंत्राटदारामार्फत दिले जाते, ते

असुधारित प्रत

श्री.कपिल पाटील......

किमान वेतन कायद्याचा भंग करणारे आहे. सरकार आपण स्वत:च केलेल्या कायद्याचा भंग करते, असे होता कामा नये. याकरिता या सर्व क्षेत्रातील प्रत्येक खात्यातील कंत्राटी पध्दत पूर्णपणे बंद केली पाहिजे, अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, मागील सरकारशी फारकत घेतल्यानंतर हे सरकार सत्तेवर आल्यानंतर एक महत्त्वाचा मुद्दा उचलला गेला. माननीय मुख्यमंत्री नेते यांनी आणि या सभागृहाच्या नेत्यांनी वारंवार उच्चारलेला मुद्दा जो आहे, तो म्हणजे असली आणि नकली हिंदुत्त्वाचा! मी त्या वादात शिरत नाही. या महाराष्ट्रामध्ये हिंदु धर्मशास्त्राचे संशोधन करणारे आणि हिंदु धर्माची उदार परंपरा सांगणारे वाईचे पीठ आहे.

यानंतर श्री.सोनावणे.....

असुधारित प्रत

श्री. कपिल पाटील.....

ते तर्कतीर्थांमुळे आपण ओळखतो. पण हे केवळ तर्कतीर्थांमुळे नाही. स्वामी परमानंद किंवा स्वामी केवलानंद यांनी पायाभरणी केली आणि नेहमी हिंदू धर्मातील उदारतेचा पुरस्कार केला आणि अस्पृश्यतेलाही विरोध केलेला आहे. त्या पीठाकडे यशवंतराव चव्हाण यांनी सातत्याने मदतीचा हात पुढे केला होता. तसेच माननीय श्री. शरदचंद्र पवार साहेबांनी देखील मदतीचा हात पुढे केला होता. पण तो हात आता आखडता घेतलेला आहे. या पीठाला पूर्णपणे नव्याने मदत केली पाहिजे. ज्यावेळी सोरटी सोमनाथांचे मंदिर पुन्हा बांधले गेले त्यावेळी हे मंदिर सर्वांसाठी खुले राहील अशी घोषणा सरदार पटेलांनी केली. त्यावेळी तेथील पुरोहित वर्गाने, सनातन्यांनी, तिथल्या बडव्यांनी मंदिराच्या पायाभरणीला आणि पुजेला विरोध केला होता. त्यावेळी महाराष्ट्रातून वाईच्या पंडीतांना बोलाविण्यात आले. तेच हे प्राज्ञ पाठशाळेचे धर्मपीठ आहे. तेथून तर्कतीर्थ आणि स्वामी केवलानंद गेले आणि सोरटी सोमनाथांची स्थापना केली. या पीठाला आज मदतीची गरज आहे. धर्मकोष आणि स्वायत्त विद्यापीठाचा दर्जा देऊन त्यांच्या पुर्नउभारणीची गरज आहे. त्यावेळी सरकारकडे मागणी केली नव्हती कारण त्यावेळी आपला देश स्वतंत्र झालेला नव्हता. तीन भारतरत्नांनी या धर्मपीठाला लोकांनी मदत करावी असे सांगितले होते. यामधील पहिले नाव पंडीत मदन मोहन मालविय आहे. यांना माननीय पंतप्रधान महोदयांनी भारतरत्नाचा पुरस्कार दिला होता. दुसरे नाव महामहोपाध्याय पा. वा. काने यांना भारतरत्नाचा पुरस्कार मिळाला होता. तिसरे नाव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आहे. एवढे त्या विद्यापीठाला महत्व आहे. ज्यांनी मनस्मृतीसाठी हिंदू धर्म नाकारला असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, हिंदू धर्म शास्त्राच्या उदार परंपरेला पुढे नेणारा, सर्व धर्मांचा अभ्यास करणारा, त्यांची चिकित्सा करणाऱ्या पीठाच्या मागे उभे राहिले पाहिजे आणि धर्मकोषाची पायाभरणी झाली पाहिजे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी अलिकडच्या काळात वादात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख केला होता. ते असे म्हणतात की, "Taking into consideration the importance of the project, it is the duty of all true lovers of ancient Hindu to encourage." "True lovers" हा शब्द आहे. म्हणून माझी मागणी

श्री. कपिल पाटील.....

आहे की, माननीय उप मुख्यमंत्री तथा माननीय वित्तमंत्री महोदयांना विनंती करतो की, या पीठाला भेट द्यावी. पूर्वी अनेक ज्येष्ठ मंडळींनी त्या पीठाला भेटी दिलेल्या आहेत. मी काही नावे वाचून दाखविणार आहे. स्वातंत्र्य सेनानी अच्युत पटवर्धन, टाईम्स ऑफ इंडियाचे तत्कालिन संपादक दिलीप पाडगावकर, महाराष्ट्र टाईम्सचे तत्कालिन संस्थापक गोविंद तळवलकर, कपिला वात्सायन आणि रजनी कोठारी इत्यादी मान्यवर मंडळी त्याच्या पाठीमागे उभी होती. म्हणून या प्राज्ञ पाठशाळेला विशेष दर्जा देऊन त्याला स्वायत्त विद्यापीठाचा किंवा अन्य कोणताही दर्जा द्यावा अशी मी माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री महोदयांकडे विनंती करीत आहे. राज्य शासनाने धर्मकोषासाठी आणि विद्यापीठाच्या रचनेसाठी पूर्णपणे आर्थिक हातभार दिला पाहिजे. त्या विद्यापीठाची, प्राज्ञपाठ शाळेची संपूर्ण आर्थिक जबाबदारी राज्य शासनाने उचलली पाहिजे आणि एक नवा वास्तूपाठ घालून दिला पाहिजे. अशी मागणी करतो आणि मला माननीय पीठासीन अधिकारी महोदयांनी भाषण करण्याची संधी दिल्याबद्दल आभार व्यक्त करतो आणि थांबतो.

-----------

असुधारित प्रत

श्री. जयंत आसगांवकर (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, गेल्या दोन वर्षापासून कोरोना महामारीमुळे संपूर्ण जग हादरुन गेलेले आहे. त्याचा महाराष्ट्र राज्याला मोठा फटका बसलेला आहे. गेल्या दोन वर्षाच्या कोरोनाच्या संकटात महाविकास आघाडी सरकारने अतिशय चांगली कामे केलेली आहेत. कोरोनावर मात करुन राज्याने योग्य पध्दतीने यंत्रणा उभी करण्याचे काम केलेले आहे. महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री, महाविकास आघाडी सरकारमधील सर्व माननीय मंत्री आणि माननीय राज्यमंत्री महोदयांनी राज्यासाठी एक चांगल्या प्रकारचा अर्थसंकल्प तयार केलेला आहे. त्या अर्थसंकल्पात पंचसुत्री कार्यक्रमाचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. एखाद्या राज्याचा विकास होण्यासाठी कृषी, आरोग्य, मनुष्यबळ, दळणवळण आणि उद्योग अशा पाच पंचसुत्रांचा योग्य पध्दतीने नियोजन करुन विकास केलेला आहे. माननीय वित्तमंत्री श्री. अजित पवार आणि माननीय वित्त राज्यमंत्री श्री. शंभुराज देसाई यांनी चांगल्या प्रकारचा अर्थसंकल्प सभागृहात सादर केलेला असून, मी त्यांचे मनापासून अभिनंदन करीत आहे. अर्थसंकल्पात मराठी भाषा विभागासाठी ५२ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद, उच्च व तंत्र शिक्षण विभागासाठी १६१९ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद, शालेय शिक्षण विभागासाठी २३५४ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद, बार्टी, सार्टी, महाज्योती अशा संस्थांसाठी प्रत्येकी २५० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद, क्रीडा विभागासाठी ३८५ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद, कोशल्य विभागासाठी ६१५ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद आणि वैद्यकीय शिक्षणासाठी २०६१ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद अर्थसंकल्पात केलेली आहे. या माध्यमातून तळागाळातील गरजूंना चांगल्या पध्दतीचे शिक्षण मिळणार आहे आणि राज्याला पुढे जाण्याची एक चांगली संधी मिळणार आहे. १० शाळांची निवड करुन प्रत्येक शाळेला १ कोटी रुपयांचा निधी दिलेला आहे. थोर महापुरषांच्या गावातील प्रत्येक शाळांना १ कोटी रुपयांचा निधी दिलेला आहे. त्याबद्दल मी महाविकास आघाडी सरकारचे अभिनंदन करीत आहे. कोरोना नंतर हा पहिलाच अर्थसंकल्प सादर झालेला असून, तो अतिशय महत्वाचा

श्री. जयंत आसगांवकर.....

आहे. त्यामुळे सर्वांच्याच या अर्थसंकल्पातून काही अपेक्षा आणि मागण्या आहेत. मी गेल्या ३५ वर्षापासून शिक्षण क्षेत्रात काम करीत आहे. एक विद्यार्थी, एक शिक्षक, एक पालक, एक संस्थाचालक आणि शिक्षकांचे प्रतिनिधी म्हणून काम करीत असताना काही मागण्या मांडण्याचा मी प्रयत्न करीत आहे. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना एक चांगली आरोग्य योजना शासनाकडून दिली पाहिजे. कोरोना काळात २० टक्क्यावरील कर्मचारी, ४० टक्क्यावरील कर्मचारी किंवा १०० टक्क्यांवरील कर्मचारी....अनेक कर्मचारी कोरोनाग्रस्ताने आजारी होते. कोरोनामध्ये ॲडिम होऊन डिसचार्ज मिळालेला कर्मचारी जेव्हा वैद्यकीय बिलाच्या प्रतीपूर्तीसाठी मागणी करतो त्यावेळी काही कर्मचाऱ्यांना १०० टक्के वैद्यकीय बिलाची प्रतीपूर्ती मिळते. आजार हा कधीही टक्केवारी पाहून होत नसतो. त्यामुळे सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी कॅशलेस योजना दिली गेली पाहिजे. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी कोरोनाच्या काळात, निवडणुकीच्या काळात आपापली जबाबदारी ओळखून काम करीत असतो. कोरोनामुळे ज्या कर्मचाऱ्यांचे निधन झाले अशा कर्मचाऱ्यांच्या वारसांना शासकीय सेवेत सामावून घेण्याची गरज आहे. शिक्षण क्षेत्रासाठी २ हजार ५३४ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला. आताच थोड्या वेळापूर्वी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी शिक्षण क्षेत्राबद्दल सांगितले आहे. शिक्षण क्षेत्राच्या माध्यमातून एक चांगली पिढी घडविण्याचे काम होत असते. शिक्षण क्षेत्राच्या माध्यमातून असे काम होत असून, त्या माध्यमातून कोणताही महसूल जमा होत नाही ही बाब लक्षात न घेता ही पिढी सक्षम बनविण्यासाठी आणखी खर्च करणे गरजेचे आहे. सर्वच शिक्षकांना १०० टक्के पगार मिळाला पाहिजे. कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू झाली पाहिजे. त्यासाठी अर्थसंकल्पात चांगल्या प्रकारची तरतूद केली पाहिजे. मध्यंतरी माझ्या मतदारसंघा शेजारील कोल्हापूर, सांगली आणि सातारा या तीन जिल्ह्यांमध्ये महापूरामुळे जिल्हापरिषदेच्या शाळांचे मोठे नुकसान झाले होते. खाजगी शिक्षण शाळांचे देखील मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. त्यांना शासनाच्या माध्यमातून विशेष अनुदान दिले पाहिजे.

असुधारित प्रत

असुधारित प्रत

श्री. जयंत आसगांवकर.....

मानानीय पीठासीन अधिकाऱ्यांनी मला भाषण करण्याची संधी दिल्याबद्दल आभार व्यक्त करतो आणि वेळे वेळेअभावी माझे भाषण या ठिकाणी संपवितो.

----------

यानंतर श्री. बोर्डे....

डॉ.परिणय फुके (भंडारा तथा गोंदिया स्था.प्रा.संस्था) : सभापती महोदय, सन २०२२-२०२३ या वर्षाच्या अर्थसंकल्पावरील सर्वसावधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या वर्षीच्या अर्थसंकल्पात ६० हजार कृषी पंप जोडण्या देण्याबाबतची घोषणा करण्यात आलेली आहे. माननीय ऊर्जा मंत्र्यांनी मागे वीज बील माफीची घोषणा किंवा शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन खंडित करता कामा नये या बाबत विविध अधिवेशनात घोषणा केली होती. परंतु त्या बाबतचा उल्लेख या वर्षीच्या अर्थसंकल्पात कुठेही नाही. वास्तविक पाहता या संकटाच्या काळात राज्यातील शेतकऱ्यांना वीज बील माफी देणे गरजेचे होते. परंतु या वर्षीच्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना वीज बील माफीमध्ये कुठेही दिलासा देण्यात आलेला नाही. मध्य प्रदेशमध्ये कालच शेतकऱ्यांना ६५ हजार कोटी रुपयांची वीज बील माफी देण्यात आली आहे. मध्य प्रदेश राज्यात हा एकप्रकारे ऐतिहासिक निर्णय झाला. त्या राज्यातील ८८ लाख वीज ग्राहकांचे वीज बील माफ करण्यात आलेले आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे वीज बील माफ होणे अपेक्षित होते. परंतु शेतकऱ्यांच्या वीज बील माफीसंदर्भात या वर्षीच्या अर्थसंकल्पात साधा उल्लेख देखील नाही.

सभापती महोदय, पेट्रोल आणि डिझेल दरवाढीच्या विरोधात महाविकास आघाडी सरकारमधील तिन्ही घटक पक्षांनी मोठमोठे आंदोलन केले, मोठमोठे मोर्चे काढले. त्यांनी सायकलवरुन सुद्धा मोर्चा काढला. परंतु या वर्षीच्या अर्थसंकल्पात पेट्रोल आणि डिझेलच्या बाबतीत कुठेही करमाफी दिलेली नाही. भाजपाशासित राज्यांमध्ये पेट्रोल व डिझेलवरील टॅक्स मोठ्या प्रमाणात कमी केल्यामुळे त्या राज्यांत लीटरमागे तीन ते चार रुपये पेट्रोल व डिझेल स्वस्त मिळते. महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात हा टॅक्स कमी करुन, त्या संदर्भातील तरतूद करावयास पाहिजे होती. परंतु ती तरतूद करण्यात आलेली नाही. माझी विनंती आहे की, या संदर्भात अर्थसंकल्पात तरतूद करण्यात यावी.

असुधारित प्रत

डॉ.परिणय फुके....

सभापती महोदय, शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी या वर्षीच्या अर्थसंकल्पात काहीही नाही. धान उत्पादक शेतकऱ्यांना दरवर्षी बोनसच्च्या माध्यमातून अनुदान मिळत होते. परंतु ते अनुदान सुद्धा या सरकारने बंद केलेले आहे. महाविकास आघाडी सरकारने घोषणा केल्यानुसार २०२०-२१ मध्ये धान उत्पादक शेतकऱ्यांना ७०० रुपये प्रमाणे बोनस देण्याची घोषणा केली होती. त्यानुसार धान उत्पादक शेतकऱ्यांना २५६ कोटी रुपये अनुदान मिळणे अपेक्षित होते. परंतु ते अद्यापपर्यंत दिले गेलेले नाही. किमान या वर्षी बोनसपोटी द्यावयाच्या २५६ कोटी रुपयांची तरतूद करुन ते धान उत्पादक शेतकऱ्यांना अदा करण्यात यावे, अशी मी विनंती करतो. सभापती महोदय, मागील अधिवेशनामध्ये माननीय श्री.अजितदादा पवार यांनी सांगितले होते की, यावेळी शेतकऱ्यांना प्रत्यक्ष बोनस न देता त्यांच्या बँक खात्यामध्ये डीबीटीच्या माध्यमातून बोनसची रक्कम ट्रान्सफर करण्यात येईल. परंतु बोनस देण्यासाठी या वर्षीच्या अर्थसंकल्पात एक रुपयाची सुद्धा तरतूद करण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, हा अर्थसंकल्प ओबीसी समाजाला निराश करणारा आहे. महाराष्ट्रातील ओबीसी समाजाच्या डोळयात धूळफेक करण्याचे काम या सरकारने केलेले आहे. या सरकारने मागे घोषणा केली होती की, महाराष्ट्रात ओबीसींची जातीनिहाय जनगणना करण्यात येईल. परंतु या वर्षीच्या अर्थसंकल्पात ओबीसींची जातीनिहाय जनगणना करण्याबाबतचा उल्लेख नाही. किंबहुना त्यासाठी करावयाची आर्थिक तरतूद सुद्धा अर्थसंकल्पात केलेली नाही. माननीय सर्वोच्च न्यायालयाने दि.३ मार्च, २०२२ रोजी ओबीसी आयोगाने दाखल केलेला अहवाल फेटाळला. सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारकडून त्रिसूत्री कार्यक्रम मागविला होता. त्या माध्यमातून सरकारला ओबीसी समाजाचा इम्पिरीकल डाटा गोळा करण्यास सांगण्यात आले होते. या सभागृहात माननीय इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांनी सांगितले होते की, मागासवर्ग आयोगाला ४३४ कोटी रुपये देण्यात येतील. परंतु या रकमेची तरतूद या वर्षीच्या अर्थसंकल्पात करण्यात आलेली नाही, हे मला खेदाने सांगावे लागते.

असुधारित प्रत

डॉ.परिणय फुके.....

सभापती महोदय, विदर्भाला इतर महाराष्ट्राशी जोडणारा समृद्धी महामार्ग हा तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट होता. समृद्धी महामार्गाचा विस्तार करुन तो महामार्ग नागपूर ते गोंदिया आणि नागपूर ते गडचिरोलीपर्यंत करण्यात येणार आहे. या समृद्धी महामार्गासाठी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी फार मेहनत केली आहे. या महामार्गाची संपूर्ण संकल्पना त्यांची होती. या महामार्गासाठी निधी सुद्धा माननीय श्री.देवेंद्रजी फडणवीस यांनी आणला होता. महाविकास आघाडी सरकार सत्तेवर आल्यानंतर समृद्धी महामार्गाचे नाव हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग असे करण्यात आले. या महामार्गाचा नागपूर-शिर्डी हा पहिला टप्पा दि.१ मे, २०२१ रोजी सुरु होणार होता. परंतु अद्यापपर्यंत हा मार्ग सुरु झालेला नाही. या वर्षीच्या अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेल्या नागपूर ते गोंदिया या रस्त्याला माननीय श्री.उद्धवजी ठाकरे यांचे आणि नागपूर ते गडचिरोली या रस्त्याला माननीय मंत्री श्री.आदित्य ठाकरे यांचे नाव द्यावे. कारण या नेत्यांची नावे दिली तरच या रस्त्यांसाठी काही तरी निधी मिळेल व तो रस्ता पूर्ण होईल.

सभापती महोदय, गडचिरोली एयरपोर्ट.....

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.परिणय फुके, आपली वेळ संपली असल्यामुळे आता आपण भाषण थांबवावे. आता सन्माननीय सदस्य श्री.संजय दौंड यांनी भाषणास सुरुवात करावी.

डॉ.परिणय फुके : सभापती महोदय, मला अजून काही मुद्दे मांडावयाचे होते. परंतु वेळेची मर्यादा असल्यामुळे मी माझे भाषण येथेच संपवितो.

---------

अमुद्रित प्रत

श्री.संजय दौंड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन २०२२-२०२३ या वर्षाच्या अर्थसंकल्पावरील सर्वसावधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय वित्त मंत्री तथा उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी विधानसभेत आणि माननीय वित्त राज्यमंत्री श्री.शंभुराज देसाई यांनी विधानपरिषदेत सन २०२२-२०२३ या वर्षाचा अर्थसंकल्प मांडलेला आहे. या अर्थसंकल्पाचे स्वागत करुन त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय वित्त मंत्री तथा उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी राज्यातील जनतेला व समाजातील सर्व घटकांना न्याय देणारा असा अर्थसंकल्प सादर केलेला आहे. या अर्थसंकल्पामध्ये कृषी, आरोग्य, मनुष्यबळ, दळणवळण, उद्योग यांसह विविध क्षेत्राला भरभरुन निधी उपलब्ध करुन देण्यात आल्याबद्दल मी महाविकास आघाडी सरकारचे मनापासून आभार मानतो.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या दृष्टीने दिलासादायक असा हा अर्थसंकल्प आहे. नियमित पीक कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर ५० हजार रुपये अनुदान देण्याचे त्यांनी घोषित केले आहे. या अनुदानाचा लाभ राज्यातील अंदाजे २० लाख शेतकऱ्यांना होणार असून, त्यासाठी या वर्षीच्या अर्थसंकल्पात १० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, विदर्भ, मराठवाडा या भागातील शेतकरी सोयाबीन व कापसाचे पीक मोठ्या प्रमाणात घेतात. या शेतकऱ्यांसाठी मूल्यसाखळी विकासाच्या विशेष कृती योजनेसाठी येत्या तीन वर्षात १ हजार कोटी रुपयांचा निधी देण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, शाश्वत कृषी सिंचन योजनेचा विस्तार करुन त्यामध्ये शेततळ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच शेततळ्यांच्या अनुदानात ७५ हजार रुपयांची वाढ देखील करण्यात आलेली आहे.

श्री.संजय दौंड....

सभापती महोदय, सहकार हा महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे असे आपण म्हणतो. शेतमालासाठी किमान आधारभूत किंमत मिळण्यासाठी आगामी रब्बी व खरीप पणन हंगाम २०२२-२०२३ अंतर्गत २ कोटी ३३ लाख ६० हजार क्विंटल धानाची व ३२ लाख ३२ हजार क्विंटल भरड धान्याची खरेदी अपेक्षित असून दोन्ही हंगामाकरिता ६,९५२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याबद्दल मी सरकारला मनापासून धन्यवाद देतो. सन २०२२-२०२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागासाठी १,५१२ कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

सभापती महोदय, जलसंपदा विभागांतर्गत गेल्या दोन वर्षात २८ प्रकल्पात पाणीसाठी करण्यात आलेला आहे. तसेच येत्या दोन वर्षात १०४ प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सभापती महोदय, सन २०२२-२०२३ या वर्षासाठी कार्यक्रम जलसंपदा विभागासाठी १३,५५२ कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

सभापती महोदय, मी निदर्शनास आणून देतो की, बीड जिल्ह्यात अनेक वर्षांपासून साठवण तलावाचे प्रश्न प्रलंबित आहेत. आम्ही गेल्या २० वर्षांपासून हे प्रकल्प मार्गी लागण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहोत. परळी तालुक्यातील मांडवा, खोडवा सावरगांव, लेंडेवाडी, दौंडवाडी, उजनी, मलकवाडी या साठवण तलावांचा अर्थसंकल्पात समावेश करावा, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, कृषी पंप वीज जोडणी संदर्भात विधानसभेत माननीय ऊर्जा मंत्र्यांनी थकीत वीज बिलाच्या कारणास्तव शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन तीन महिने खंडित करु नये असा निर्णय जाहीर केल्याबद्दल मी माननीय ऊर्जा मंत्री यांना आणि शासनाला मनापासून धन्यवाद देतो. जवळपास ६० हजार नवीन कृषी पंपांना वीज जोडणी देण्याचे उद्दिष्ट राज्य सरकारने ठरविलेले आहे. शासनाने अतिशय चांगला निर्णय घेतल्याबद्दल मी शाासनाने आभार मानतो.

असुधारित प्रत

श्री.संजय दौंड...

सभापती महोदय, मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजना.....

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.संजय दौंड यांना सांगू इच्छितो की, आपली वेळ संपली असल्यामुळे आता आपण भाषण थांबवावे. आता सन्माननीय सदस्या डॉ.प्रज्ञा सातव यांनी भाषणास सुरुवात करावी.

श्री.संजय दौंड : सभापती महोदय, मला अजून काही मुद्दे मांडावयाचे होते. परंतु वेळेची मर्यादा असल्यामुळे मी माझे भाषण येथेच संपवितो.

---------

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत

डॉ. प्रज्ञा सातव (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील सामान्य माणसांच्या आशा-आकांक्षांना उभारी देणारा असा हा दिशादर्शक अर्थसंकल्प आहे.

" महाविकास आघाडी का बजट कुछ ऐसा कमाल कर गया ,

किसानों, गरिबों और बेरोजगारों का दिल खुशहाल कर गया."

सभापती महोदय, आमच्या हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यात कृषी संशोधन केंद्र उभारण्यात येणार आहे. या केंद्रामध्ये प्रामुख्याने हळद पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी संशोधन करण्यात येणार आहे आणि यासाठी १०० कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिल्याबाबत मी हिंगोली जिल्ह्याच्या सर्व शेतकऱ्यांतर्फे महाविकास आघाडी सरकारला मनापासून धन्यवाद देते. बळीराजाचा आधार महाविकास आघाडी सरकार. कारण यामुळे जिल्ह्याच्या कृषी क्षेत्राच्या विकासाला खरी चालना मिळणार आहे. "आरोग्यम् धनसंपदा" "Health is wealth" हिंगोली येथे महिला व नवजात शिशू यांच्यासाठी १०० कोटी रुपयांचे रुग्णालय उभारण्यात येणार आहे. मी यासाठी हिंगोली जिल्ह्याच्या सर्व महिला भगिनींतर्फे सरकारचे आभार मानते.

सभापती महोदय, मला शाळेत शिकत असतानाची मराठी भाषेवरील एक कविता आठवते.

"माझी मराठी असे माय भाषा,

हिच्या किर्तीचे तेज लोकी चढे,

गोडी न राहे सुधे माझी आता,

पळाली सुधा स्वर्ग लोकीकडे"

सभापती महोदय, मराठी भाषेचा विकास व संवर्धन यासाठी मुंबईत १०० कोटी रुपये खर्चाचे मराठी भाषा भवन उभारण्यात येणार आहे. मराठी भाषेचा वारसा

डॉ. प्रज्ञा सातव ....

जपण्यासाठी हा अतिशय उत्तम निर्णय आहे. परंतु नेहमीप्रमाणेच विरोधी पक्ष या अर्थसंकल्पामध्ये काही तरी खोड काढणार म्हणून त्यावर मी एक लहानसा शेर सांगत आहे.

"नई नवेली दुल्हन की तरह,
सरकार पक्वान रुपी बजट बनाती है,
लेकिन विपक्ष सासु माँ की तरह,
बहुत सारी खामियां गिनवा देती है."

सभापती महोदय, राज्यातील सामान्य, मध्यमवर्गीय, महिला, विद्यार्थी, मजूर, शेतकरी यांच्यासाठी एक आशादायी असे वातावरण निर्माण करुन त्यांच्या जीवनात आनंद व समाधान निर्माण करणारा हा अर्थसंकल्प आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. एवढे बोलून मला बोलण्याची संधी दिल्याबाबत मी आपले आभार मानते.

----

असुधारित प्रत

श्री. महादेव जानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे. माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री श्री. अजितदादा पवार यांनी विधानसभेत आणि माननीय वित्त राज्यमंत्री श्री. शंभूराज देसाई यांनी विधानपरिषदेत अर्थसंकल्प मांडला आहे, त्या अनुषंगाने बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, चांगल्या कामासाठी समर्थन आहे. स्वराज्याचे छत्रपती संभाजी महाराजांच्या तुळापूर, वडूसाठी २५० कोटी रुपये दिले आहेत, त्याबाबत अभिनंदन आहे. छत्रपती संभाजी महाराज शौर्य पुरस्कार योजना केल्याबाबत देखील सरकार अभिनंदनास पात्र आहे. परंतु त्याचवेळी क्रांतिसूर्य लहुजी वस्ताद साळवे व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या भिडे वाड्यातील स्मारकासाठी देखील तरतूद केली असती तर फार चांगले झाले असते. राज्यात अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. शेतकरी पूर्ण अडचणीत आहे. शेतकऱ्यांच्या पीक कर्जाबाबत देखील रक्कम मिळाली नाही, ती मिळण्याची विनंती मी सरकारला करीत आहे.

सभापती महोदय, बाळासाहेब ठाकरे कृषी संशोधन केंद्र हिंगोली येथील वसमतला केले आहे, त्याबाबत अभिनंदन आहे. आपण कोकणपट्ट्यात भातशेतीसाठी, आंबा व काजूसाठी संशोधन केंद्र उभे केले तर ते देखील फार चांगले होईल अशी मी विनंती करतो. महाराष्ट्रात १० महापुरुषांच्या शाळा आहेत, त्या शाळांचा विकास करण्यासाठी स्वातंत्र्य अमृत महोत्सवाच्या माध्यमातून शासनाने पैसे दिले आहेत, त्यात त्या महापुरुषांचे संग्रहालय व त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव करण्यासाठी कलादालन त्या गवात उभे करावे अशी मी आपल्याला सूचना करतो.

सभापती महोदय, अंगणवाडीसेविका व पर्यवेक्षिका यांना ई शक्ती आयोजनार्थ मोबाईल सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत सांगितले आहे. कोविड काळात अंगणवाडीसेविका व पर्यवेक्षिका गावात काम करीत होत्या, त्यांना आरोग्याचा संरक्षण विमा मिळण्यात यावा आणि हे आपल्या माध्यमातून व्हावे अशी मी शासनाला विनंती करतो. शासनाने बार्टी, महाज्योति, सारथी या संस्थांना एससी, एसटी व दुर्बल घटकांतील विद्यार्थी रोजगार शिक्षणेतरसाठी २५० कोटी रुपयांप्रमाणे

श्री. महादेव जानकर ....

७५० कोटी रुपये दिले आहेत. पण हा निधी तोकडा आहे. सन १९५० चा पार्लमेंटरी ॲक्ट आहे. ओबीसीची जातनिहाय जनगणना केली तर त्या समाजाची प्रगती होईल. त्यामुळे शासनाने तो ठराव देखील केंद्र सरकारला पाठवावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, सन २००० मध्ये धनगर व तत्सम समाजासाठी नोंदणीकृत महिला सहकारी संस्था, ठाणबंद शेळीपालनासाठी १२५ संस्था केल्या आहेत, त्याला ७५ टक्के शासनाने व २५ टक्के लाभार्थ्यांने हिस्सा द्यावा असे आहे, त्यासाठी देखील अर्थसंकल्पात तरतूद करावी. धनगर समाजासाठी पुण्यश्लोक अहिल्याबाई शेळी विकास महामंडळात कोणतीही तरतूद केली नाही, ती तरतूद करण्याचा प्रयत्न करावा. धनगर समाजातील महिला लाभापासून वंचित राहू नयेत आणि त्यासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद करावी अशी मी शासनाकडे विनंती करतो.

सभापती महोदय, महत्त्वाची व गंभीर बाब आहे. वसंतराव नाईक मेडिकल कॉलेज, यवतमाळ येथे अशोककुमार पाल या विद्यार्थ्याचा खून झालेला आहे. त्याला माननीय राज्यपालांशिवाय काहीही मदत मिळालेली नाही. मी माननीय आरोग्यमंत्र्यांना देखील पत्र दिले आहे की, त्यांना मदत मिळावी. मी या संदर्भात आपल्याला विनंती करतो. सातारा जिल्ह्यातील म्हसवड, देवापूर, दिघंची, आटपाडीला जाणारा हा दोन जिल्ह्याला लागून रस्ता आहे. तो रस्ता जिल्हा परिषदेचा आहे. तो सार्वजनिक बांधकाम विभागाला दिला आणि त्यांनी मदत केली तर तो रस्ता फोर लेन होईल आणि दोन जिल्ह्यांचा कारभार चांगला होईल, एवढी विनंती करतो आणि आपण बोलण्यास वेळ दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण पूर्ण करतो.

----

अप्रकाशित प्रत

ॲड निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन २०२२-२३ चा अर्थसंकल्प मांडलेला आहे, त्या संदर्भात खेद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, छत्रपती संभाजी महाराज यांच्या कार्यकर्तृत्वाला साजेसे स्मारक आपण वडुबुद्रकला उभारत आहात अशी घोषणा केली, त्यासाठी आपले मनापासून अभिनंदन आहे. पण आपण औरंगाबादचे नाव संभाजीनगर कधी करणार, या संदर्भातील भूमिका कधी घेणार याची आम्ही सर्वजण वाट पाहत आहोत. आपण कोणाला व कोणामुळे घाबरत आहात ?

सभापती महोदय, ९ टक्के अंदाजित खर्च म्हणजे ४ लाख ९५ हजार कोटी सन २०२२-२३ साठी नियोजित केला आहे. ११ टक्के नेट रिसिव्ह्स या संदर्भातील होतील म्हणजेच साधारणपणे ४ लाख ५ हजार कोटी रुपये होतील. आपण जीएसटीपीमधील फिस्कल डेफिसिट २.७९ दाखविले आहे. आपण निश्चितच केंद्र सरकारचे जे धोरण आहे, त्यानुसार साडेचार टक्क्यांच्या मर्यादेच्या आतच आहोत. आपल्या म्हणण्याप्रमाणे साडे तीन टक्के आहे. पण आपले बॉरॉईंग २३ टक्के आहेत. त्यामुळे आपण त्याबाबत बोलणे कदाचित विसरला आहात. आपला ओव्हरऑल डेफिसिट ३४ टक्के होत आहे.

सभापती महोदय, कृषी व ग्रामविकास यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत नियोजन केले पाहिजेत होते, ते निश्चितपणे कमी आहे. आपण आरोग्य विभगात यावर्षी १३ टक्क्यांची घट  केली आहे. आता कोविडचे सावट पुन्हा येत चालले आहे. आता चीनमध्ये सर्व ठिकाणी लॉकडाऊन सुरु झाले आहेत. आपण तरतुदीमध्ये १३ टक्क्यांची घट केली आहे, ती घट न करता, या संदर्भात योग्य तरतूद करावी अशी विनंती आहे. आपण प्रोजेक्श्नमध्ये १३ टक्क्यांनी व्याज परतावा भरायचा आहे. त्यामध्ये १३ टक्क्यांनी वाढ दाखविली आहे. पण प्रोजेक्टमध्ये उशीर झाल्यामुळे १३ टक्के व्याज भरावे लागत आहे. उशीर झालेल्या प्रकल्पांमुळे ते होत आहे का हा प्रश्न आहे.

ॲड निरंजन डावखरे ....

सभापती महोदय, कोविडमध्ये मृत्युमूखी पडलेल्या व्यक्तिंच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक सहाय्य देणार असे म्हटले आहे. पण ठाण्यामध्ये कोणत्याही नातेवाईकाला या संदर्भातील आर्थिक सहाय्य मिळाले नाही. नवीन मनोरुग्णालयाची घोषणा केली आहे. पण ठाण्यामध्ये असलेले मनोरुग्णालय खचत चालले आहे, त्याला मेंटेनन्ससाठी एक रुपयाचीही तरतूद केलीली नाही हे खेदाने सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, ट्रॉमा केअर सेंटर स्थापन करताना १८ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. पण पालघर जिल्ह्याबाबत आपल्याला विसर पडला आहे. मुंबई-गुजरात हायवेवरील प्रमुख ठिकाण पालघर जिल्हा असताना आणि सर्वात जास्त अपघातांचे प्रमाण या रस्त्यावर असताना येथे ट्रॉमा केअर सेंटरचा आपल्याला विसर पडला आहे. अर्थसंकल्पात नवीन घोषणा आहेत. दोन वर्षांपासून महाविकास आघाडी सरकारकडून अर्थसंकल्पातील वेगवेगळया योजनांच्या माध्यमातून जनतेची दिशाभूल झाली आहे.

नंतर श्री. खर्चे ....

अप्रकाशित प्रत

ॲड.निरंजन डावखरे....

ठाणे येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल करण्यात येईल अशी घोषणा या सरकारने दोन वर्षापूर्वी केली आहे. काल मांडण्यात आलेल्या अर्थसंकल्पामध्ये यासाठी आर्थिक तरतूद केल्याचे दिसून येत नाही ठाणे शहरातील सर्व जनता १५ वर्षापासून क्लस्टर योजनेची आतुरतेने वाट पाहत आहे, त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद केली नाही. अनेक ठिकाणी भूमीपूजन करुन लोकांना स्वप्न दाखविण्यात आले. हे गोंडस स्वप्न वास्तव्यात कधी येईल हे या बजेटमध्ये दिसत नाही. ठाणे जिल्ह्यातील शहापूर शहर ठाणे व मुंबई शहराला पाणी पुरविते त्याच शहराला पिण्याच्या पाण्यापासून वंचित ठेवण्यात आले आहे. तेथील अमृतकुंभ धरण पूर्ण करण्यासाठी मी गेल्या दोन वर्षापासून पाठपुरावा करीत आहे त्यासाठी कोणतीही तरतूद करण्यात आली नाही.

सभापती महोदय, तीन हजार नवीन बसेस एस.टी.महामंडळ घेणार असे सांगण्यात आले. जे एस.टी.कर्मचारी या बसेस चालवितात त्यांच्यासाठी अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद करण्यात आली नाही. या बसेस पुन्हा खाजगीकरणासाठी देण्यात येतील असा संशय यातून निर्माण होतो. शाळांसाठी जिल्हा नियोजन निधीतून पाच टक्के तरतूद केली असे सांगण्यात आले. अनुदानित शाळांबाबत शासनाची काय भूमिका आहे ती अर्थसंकल्पात स्पष्ट करण्यात आली नाही. सुशिक्षित बरोजगार तरुणांना नोकऱ्या व रोजगार मिळावा यासाठी मागील दोन वर्षापासून कोणतीही उपाययोजना शासनाने केली नाही. राज्यातील ६० हजार ग्रामपंचायत कर्मचारी, हजारो ग्रंथालय कर्मचारी यांच्या अनेक मागण्या प्रलंबित आहेत, याबाबत कोणताही निर्णय शासनाने घेतला नाही. शेतकऱ्यांच्या कृषी पंपाची वीज तीन महिने तोडण्यात येणार नाही अशी घोषणा काल विधानसभेत मंत्री महोदयांनी केली. परंतु आता या सरकारने एक नवीन खेळ सुरु केला आहे. कृषी पंपाची वीज कापण्यात येत नसून डीपीतून वीज कपात करण्यात येते. या शासनाने कोकणावर मोठ्या प्रमाणात अन्याय केलेला आहे.

असुधारित प्रत

ॲड.निरंजन डावखरे...

"आपने ख्वाब दिखाये खूबसूरत
वादों में दिए चांद सितारे,
हकीकत में हाथ न आए हमारे कुछ
बस हम रहे और हालात हमारे."

एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-------

असुधारित प्रत

श्री.अनिकेत तटकरे (रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग स्था. प्रा. संस्था ) : सभापती महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या विकासाला चालना देणारा अर्थसंकल्प माननीय वित्त मंत्री व वित्त राज्यमंत्री यांनी सादर केला त्याबाबत मी महाविकास आघाडी शासनाचे मनापासून अभिनंदन करतो. "बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले" या म्हणीला अनुसरुन राज्याचे माननीय अर्थमंत्री श्री.अजित पवार व माननीय अर्थ राज्यमंत्री श्री.शंभूराज देसाई तसेच मुख्यमंत्री महोदयांनी एक ट्रिलीयन डॉलरची अर्थव्यवस्था होईल असे स्वप्न आपणाला दाखविले आहे. मला खात्री आहे की, आदरणीय अर्थमंत्री महोदयांनी जे स्वप्न दाखविले ते एका वर्षात पूर्ण करतील. राज्यातील महापुरुषांच्या स्मारकासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. तांत्रिक चुकीमुळे किंवा काही उणिवांमुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक होऊ शकले नाही परंतु हे स्मारक लवकर मार्गी लागावे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. किल्ले रायगड परिसर विकासासाठी १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला त्यासाठी मी राज्य सरकारचे अभिनंदन करतो. महाविकास आघाडी शासन स्थापन झाले तेव्हा पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीत २० कोटी रुपये स्वराज्याच्या राजधानीसाठी देण्यात आले. कोकणातील लोक फार साधी भोळी आहेत त्यांच्या फार अपेक्षा राज्य सरकारकडून नसतात. कोकण पर्यटनाच्या दृष्टीने रस्ते विकासासाठी तरतूद करावी अशी मी अपेक्षा करतो. ३२०० कोटी रुपये कोकणासाठी उपलब्ध करुन दिले त्याचा नियोजनबध्द आराखडा तयार व्हावा व विशिष्ट कालावधीत सुरु असलेले प्रकल्प पूर्ण व्हावेत. अशी अपेक्षा कोकणातर्फे मी करतो.

सभापती महोदय, पद्मभूषण डॉ.चिंतामणराव देशमुख यांच्या नावाने जैविक उद्यान जामगांव येथे होणार आहे त्यासाठी निधी मंजूर केला त्यामुळे मी शासनाचे मनापासून आभार मानतो. विजेबाबत शासनाने घेतलेले निर्णय ऐतिहासिक आहेत. कॉंग्रेस राष्ट्रवादी या आघाडी सरकारच्या काळात महापारेषण कंपनीची तूट

श्री.अनिकेत तटकरे....

३० टक्क्यावरुन १३ टक्क्यापर्यंत कमी झाली होती. नंतर त्याचे श्रेय इतरांनी घेण्याचा प्रयत्न केला. महाविकास आघाडी शासनाच्या काळात ही तूट आणखी कमी करण्यात यश येईल असा मी विश्वास व्यक्त करतो. अपारंपारिक ऊर्जेसंदर्भात सरकारने लक्ष द्यावे अशी मी विनंती करतो. बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठाला ५० कोटी रुपयांचा निधी दिला त्यासाठी आभार व्यक्त करतो. एसएनडीटी व इतर महिला विद्यापीठांना निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. श्रीवर्धन येथे एसएनडीटी विद्यापीठाचे कॉलेज आहे. त्या कॉलेजची इमारत अपूर्ण आहे त्यासाठी निधी उपलब्ध होईल अशी अपेक्षा व्यक्त करतो. अंगणवाडी सेविकांना चार ते पाच हजार रुपयांचे मानधन देण्यात येते. महाराष्ट्र राज्य मानधन देण्यामध्ये नेहमी अग्रेसर असते. वेळेअभावी इतके बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

------

असुधारित प्रत

**(सभापती स्थानी माननीय उप सभापती)**

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदया, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्री महोदयांनी सरकारच्या वतीने काही चांगल्या गोष्टी करण्याचा प्रयत्न केला. अर्थमंत्री महोदयांचे मी सुरुवातीला मनापासून अभिनंदन करतो. छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक वढु बुद्रुक व तुळापूर ता.हवेली, जिल्हा पुणे या परिसरात उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याचप्रमाणे छत्रपती संभाजी महाराजांच्या नावाने शौर्य पुरस्कार देण्याचा निर्णय जाहीर केला त्याबाबत मी आपले मनापासून अभिनंदन करतो.

सभापती महोदया, मी आपणाला सांगू इच्छितो की, विरोधी पक्षातील सर्व सन्माननीय सदस्य या अर्थसंकल्पावर नाखूश आहोत, परंतु सत्ताधारी पक्ष देखील नाखूश आहे, अर्थसंकल्पावर सभागृहात चर्चा होत असताना व त्यावर बोलण्यासाठी व अर्थ राज्यमंत्री यांचे भाषण ऐकण्यासाठी सभागृहात सत्ताधारी बाजूने अनेक सदस्य उपस्थित नाहीत. इतकी खंत व खेद या सर्वांना वाटतो.अर्थसंकल्पाच्या माध्यमातून जे फसवणुकीचे चित्र सादर केले ते जनतेसमोर आणण्याचे काम आम्ही करीत आहोत. अर्थमंत्री महोदयांनी विकासाची पंचसूत्री जाहीर केली ही पंचसूत्री म्हणायची की, याला फसवणुकीचे चित्र म्हणायचे ? याबाबत आमच्या मनात शंका आहे. या राज्यातील एकही घटक व वर्ग अर्थसंकल्पावर खूश नाही. अर्थसंकल्पाचे अभिनंदन करावे असे त्यात काहीही नाही. महाराष्ट्राच्या प्रत्येक माणसावर जवळपास व्याजासह ५५,६६२ रुपयांचे कर्ज आहे. म्हणजे ढोबळमानाने प्रत्येक माणसाच्या डोक्यावर जवळपास ६० हजार रुपयांचे कर्ज आहे. यामुळे सामान्य माणूस कसा खूश राहील. सामाजिक कारणासाठी कोणताही घटक खूश नाही. शालेय शिक्षण हा आपला कणा आहे. शालेय शिक्षणासाठी आतापर्यंत जी तरतूद होत होती त्यामध्ये १५ ते २० टक्के घट करण्यात आली आहे.

या नंतर श्री.बोरले....

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे..........

सामाजिक न्यायामध्ये अनेक घटकांचा समावेश होतो. सामाजिक न्याय विभागासाठी २५ ते २६ टक्क्यांची कपात करण्यात आलेली आहे. मग कोण खूष असणार आहे ? आदिवासी विकास मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. आदिवासी विकास मंत्री काय करीत आहेत, हे मला कळत नाही. आपण ज्येष्ठ मंत्री आहात. आपल्या काळात आदिवासी विकास विभागाचा २५ टक्के निधी कपात केला जातो. आदिवासींना वाऱ्यावर सोडले जाते तरी सुद्धा तुम्ही खुर्चीवर बसता, आवाज उठवत नाहीत, आदिवासींच्या अन्यायाला वाचा फोडत नाहीत, हे कशाचे लक्षण आहे ? हे खुर्चीला चिकटून बसण्याचे काम आहे. आपल्याला खुर्ची मिळाल्यामुळे आनंद होत असेल परंतु आदिवासी बांधवांना न्याय मिळत नसल्यामुळे आम्हाला दु:ख होत आहे. आपण हे अर्थसंकल्पातून प्रतिबिंबित करीत आहात यापेक्षा दुसरे कोणतेही दु:ख असू शकत नाही. मी सर्व समाजाचा उल्लेख करीत नाही. परंतु सर्व समाज घटकांच्या निधीमध्ये कपात करण्यात आलेली आहे. ती कपात का करण्यात आली ? त्यामुळे खूष का व्हायचे असा प्रश्न निर्माण होतो.

सभापती महोदया, राज्यात दिवसेंदिवस बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे. बेरोजगारीचे प्रमाण २० ते २५ टक्क्यापेक्षा जास्त वाढलेले आहे.

**उप सभापती** : मी सभागृहाला सांगू इच्छिते की, आपण सर्वांनी माननीय सभापतींनी दिलेला निर्णय ऐकलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे साहेब आपण ज्येष्ठ सदस्य आहात.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया, मी माननीय सभापतींसमवेत चर्चा केली होती. मला आणखी १५-२० मिनिटे वेळ द्यावा, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**उप सभापती** : आपण इतर सन्माननीय सदस्यांचा देखील विचार करावा. विधानसभेत अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला माननीय वित्तमंत्री उत्तर देत आहेत. आपण प्रत्येक वेळी अशा प्रकारे बोलण्याचा आग्रह धरणे बरोबर नाही.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया, मी भाषण थांबवू काय ?

**उप सभापती** : होय. आपण कृपया नाराज होऊ नये. मला इतर सन्माननीय सदस्यांना देखील बोलण्याची संधी द्यावयाची आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया, आपण आमची मुस्कटदाबी करीत आहात त्याचा आम्ही निषेध करतो.

**उप सभापती** : ठीक आहे, आपण बोलावे. आपण इतर सन्माननीय सदस्यांचा विचार करणार नाही काय ? आपण अशा प्रकारे पीठासीन अधिकाऱ्यांसमवेत हुज्जत घालत आहात हे बरोबर नाही. आपल्याला ५ मिनिटांचा वेळ दिलेला आहे. मी आपल्याला आणखी २-३ मिनिटांचा वेळ देऊ शकते. परंतु, १५-२० मिनिटांचा वेळ देणे शक्य नाही, हे आपण समजून घ्यावे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया, आम्ही विरोधी पक्षाच्या वतीने सहकार्य करतो. सभागृहात मंत्री, सन्माननीय सदस्य उपस्थित नसताना देखील आम्ही सभागृहाचे कामकाज सुरु ठेवतो. आम्ही शासनाला सहकार्य करतो. परंतु विरोधी पक्षाच्या सदस्यांना बोलू दिले जात नाही.

**उप सभापती** : आम्ही आपल्याला बोलण्यासाठी वेळ देतो. इतर सन्माननीय सदस्यांना देखील बोलण्यासाठी वेळ मिळाला पाहिजे. आपण वेळेची मर्यादा पाळावी, अशी माझी विनंती आहे. आपले भाषण सुरु होऊन ५-६ मिनिटे झालेली आहेत. आपण पाहिजे तर आणखी १० मिनिटे बोलावे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया, आपण अर्थसंकल्पावरील चर्चेचे उत्तर सोमवारी घ्यावे.

**उप सभापती** : आपल्या एकट्याच्या म्हणण्याप्रमाणे सभागृहाचे कामकाज चालणार नाही. सर्वांच्या सहमतीने निर्णय झालेला आहे. आपण सभापती महोदयांकडे जाऊन विचारणा करावी.

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया, विधानसभेत अर्थसंकल्पावरील चर्चेचे उत्तर सुरु झाले म्हणजे विधानपरिषदेत देखील उत्तर सुरु झालेच पाहिजे असे नाही.

**उप सभापती** : आपण कृपया माझ्याबरोबर वादविवाद करु नये. सभापती महोदयांनी प्रत्येक सन्माननीय सदस्यांना ५ मिनिटे बोलण्याची परवानगी दिलेली आहे. आपण ज्येष्ठ सदस्य आहात. आपण अशा प्रकारे वादविवाद करु नये, नाही तर इतर सन्माननीय सदस्य देखील अशाच प्रकारे वादविवाद करतील. अशा प्रकारे वागणे हे बराबर नाही.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया, आपण अर्थसंकल्पावरील चर्चेचे उत्तर सोमवारी घ्यावे.

**उप सभापती** : आपण म्हणाल तसे होणार नाही. आपण सभापती महोदयांनी दिलेला निर्णय ऐकून सुद्धा माझ्याबरोबर वादविवाद करीत आहात, हे बरोबर नाही. आपण कृपया २-३ मिनिटात भाषणाचा समारोप करावा.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया, शिवसेना पक्षाचा जाहीरनामा आहे. त्यामध्ये स्थानिक भुमिपुत्रांना ८० टक्के नोकऱ्या द्याव्यात असे म्हटले आहे. आपण १ टक्का तरी न्याय दिला काय ? एका माणसाला न्याय दिलेला आहे. आपण प्रत्येक वर्षी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात १० हजार रुपये जमा करणार आहात. एक रुपया तरी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केलेला आहे काय तर नाही. आपण जाहीरनामा काढता, लोकांना नोकरीचे आश्वासन देता. त्याचे प्रतिबिंब अर्थसंकल्पात उमटले पाहिजे. परंतु तसे झालेले नाही. शेतकरी ग्रामीण भागाचा कणा आहे. माननीय रोजगार हमी योजना मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. ते ज्येष्ठ मंत्री आहेत. त्यांना रोजगार हमी योजनेमध्ये अडकविण्यात आले, त्यांना न्याय दिला जात नाही, ते तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करीत आहेत. मी सांगू इच्छितो की, महाराष्ट्र राज्यात एमआरईजीएससाठी स्वतंत्र कर आकारणी केली जाते. सन २००८ पर्यंत तो निधी रोजगार हमी योजना विभागाला मिळत होता. परंतु सन २००८ मध्ये एमआरईजीएस लागू झाल्यापासून तो निधी एकत्रित खात्याम जमा होतो. सन २००८-०९ पासून

श्री.विनायक मेटे..........

आता पर्यंत कराच्या माध्यमातून किती रक्कम जमा झाली ? ही शासनाची मेहरबानी नाही. ग्रामीण भागातील गरीब मजुरांसाठी जनतेकडून टॅक्सच्या रुपाने निधी प्राप्त झालेला आहे. २६५१७ कोटी रुपये जमा झालेले आहेत. रोजगार हमी योजना विभागाला आता पर्यंत केवळ १४१३७ कोटी रुपये दिलेले आहेत. उर्वरित १२.५ हजार कोटी रुपये गबन केलेले आहेत. गोरगरीबांचा पैसा तुम्ही वाटेल त्या भ्रष्टाचारासाठी वापरत आहात हे राज्यातील जनता पचवू देणार नाही. मी सभागृहाचा जास्त वेळ घेत नाही. परंतु काही गोष्टींचा उल्लेख करणे गरेजेचे आहे.

**उप सभापती** : आपण कृपया दोन मिनिटात भाषणाचा समारोप करावा.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने जाहीरनामा काढला होता. सुशिक्षित बेरोजगारांना मासिक ५ हजार रुपये भत्ता देण्यात येईल, असे सांगण्यात आले होते. परंतु काहीही नाही. सुशिक्षित बेरोजगार फाशी घेत आहेत तरी तुम्हाला त्यांच्याविषयी काही वाटत नाही. आपण अर्थसंकल्पात सुशिक्षित बेरोजगारांसाठी एका दमडीची सुद्धा तरतूद केली नाही.

सभापती महोदया, माननीय वित्तमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणात मान्य केले की, आम्ही ५० हजार रुपये अनुदान देण्याचे घोषित केले होते परंतु आम्ही आर्थिक अडचणमुळे त्या रक्कमेचे वाटप करु शकलो नाही. वित्तमंत्री महोदयांनी स्वत: तशी कबुली दिलेली आहे. आम्ही यावर्षी विचार करु, असे आपण सांगत आहात. आपण किती थापा मारत आहात ? आपण मराठवाड्यासाठी एक चांगले काम केले. आपण हळदीचे केंद्र सुरु केले त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. आपण त्या केंद्राला स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे नाव दिले त्यांचेही मी कौतुक करतो. बीड जिल्ह्यातील सिताफळ केंद्र कित्येक वर्षांपासून बंद आहे. त्या केंद्राला कुलूप लावण्यात आलेले आहे. त्या केंद्रात उंदीर, मांजरी खेळतात. आपल्याला त्या केंद्राची आठवण येत नाही. सिताफळ खूप महत्वाचे फळ आहे. सिताफळाचा औषधापासून आईस्क्रीम तयार करण्यापर्यंत उपयोग होतो. परंतु आपल्याला त्या केंद्राची आठवण येत नाही.

श्री.विनायक मेटे..........

आपण बीड येथील सिताफळ केंद्राबाबत कोणता निर्णय घेणार आहात ? बाजार समित्यांमध्ये पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येतात. परंतु आपण अजूनही तेथे बोटानेच भाव ठरवितो. मी सांगू इच्छितो की, मराठवाडा वॉटर ग्रीड बंद पडलेले आहे. आपण अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त ते सुरु करावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, मी माननीय वित्त राज्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो. आपल्या जिल्ह्यातील शिवसागर जलाशय येथे पर्यटन केंद्र सुरु करण्यात आलेले आहे. परंतु आपण जायकवाडी येथील पर्यटन केंद्र बंद केले....

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे साहेब आपण कृपया भाषण संपवावे. आता सन्माननीय सदस्य श्री.निलय नाईक यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया,.....

**उप सभापती** : मी आपल्याला भाषण संपविण्याबाबत वारंवार विनंती केलेली आहे. मी आता आपल्याला बोलण्याची परवानगी देणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे साहेब आपण १३ मिनिटे भाषण केले. मला सर्व सन्माननीय सदस्यांना न्याय देणे क्रमप्राप्त आहे. मी सर्वांचे म्हणणे ऐकून घेतलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी ५ मिनिटांची मर्यादा पाळावी अन्यथा मी पुढील सन्माननीय सदस्यांचे नाव पुकारणार आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.निलय नाईक यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया, विधानसभेत माननीय तालिका सभाध्यक्षांनी २ तास वेळ वाढवून दिलेली आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे साहेब आपण कृपया माझ्या सहनशक्तीचा कडेलोट करु नका. आपण म.वि.प. नियम २६० अन्वये दोन्ही प्रस्ताव पुढे ढकलले आहेत.

यानंतर श्री.सांगळे......

असुधारित प्रत

**उप सभापती....**

आपण कार्यक्रमपत्रिकेवरील सर्व लक्षवेधी सूचना पुढे ढकलल्या व अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेकरिता वेळ दिला. तसेच त्यावर आपल्याला १२ मिनिटे बोलण्याची संधी दिली तरी आपण माझ्याशी वादविवाद का करीत आहात ? आपल्याला भाषण करण्यासाठी दिलेली वेळ संपलेली आहे. सन्माननीय सदस्य ॲड. निलय नाईक यांनी आपल्या भाषणाला सुरुवात करावी. सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड आपली इच्छा असल्यास मी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना संध्याकाळपर्यंत बोलण्याची अनुमती देते. ही सभागृह चालविण्याची कोणती पद्धत आहे ?

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया, आम्हा सर्वांना अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चेमध्ये आमचे विचार मांडावयाचे आहेत.

**उप सभापती** : माननीय सभापती यांनी आपल्याला ५-५ मिनिटांमध्ये भाषण करावे असे सांगितले तरी तुम्ही १२ - १२ मिनिटे भाषण करीत आहात. त्यामुळे इतर सन्माननीय सदस्यांना भाषण करावयास संधी द्यायची नाही का ?

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया,....

**उप सभापती** : तुम्हाला शिस्त पाळायची नाही. तुम्ही सदनामध्ये उभे राहून माझ्यासमवेत अशाप्रकारे चर्चा करणार असल्यास ही बाब योग्य नाही.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया, आपण मला अर्थसंकल्पावर माझे पूर्ण म्हणणे मांडू दिले नाही, मी या गोष्टीचा निषेध करतो.....

**उप सभापती** : आपल्या सारख्या वरिष्ठ सन्माननीय सदस्यांनी सदनामध्ये अशा प्रकारे वागण्याची पद्धत बरोबर नाही. मी आपल्याला अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाषण करण्यासाठी १२ मिनिटांचा वेळ दिला होता....

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया, ***

---

*** आदेशानुसार विलोपित मजकूर.

**उप सभापती** : ठीक आहे. आपण वेळेसंबंधी काही ऐकणार नसाल व इतर सन्माननीय सदस्यांचा विचार करणार नसल्यास ते योग्य नाही. आपण सन्माननीय सदस्यांचे भाषण शांतपणे ऐकावे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया,....

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी या संदर्भात केलेला सर्व उल्लेख पटलावरुन काढून टाकावा.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया,.... ****

**उप सभापती** : तुम्ही बेजबाबदारपणे वागत आहात.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया,.... मी बेजबाबदारपणे वागलेलो नाही.

**उप सभापती** : मी इतर सन्माननीय सदस्यांना बोलण्यास देत आहे. हे चुकत आहे का ? काही मर्यादा नावाची गोष्टच नाही. ****

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया,...

**उप सभापती** : *** आता सन्माननीय सदस्य ॲड. निलय नाईक यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

( सन्माननीय सदस्य सदनातून बहिर्गमन करतात व त्यानंतर एका मिनिटामध्ये सदनामध्ये येतात.)

---

**** आदेशानुसार विलोपित मजकूर.

असुधारित प्रत

ॲड. निलय नाईक (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, शासनाने छत्रपती संभाजी राजे यांच्या स्मारकासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद केल्याबद्दल मी मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. आपला देश कृषीप्रधान देश असल्याचे आपण म्हणत असतो. महाराष्ट्र हा कृषीसंबंधी नेहमीच अग्रेसर राहिला आहे. महाराष्ट्र शासनाने राज्यात कृषीसंबंधी अद्ययावत योजनांचा अवलंब केला पाहिजे अशा प्रकारे काही सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला होता. कृषी धोरणासंबंधी सांगायचे झाल्यास ३० राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र शासनाने कृषीकरिता ६ टक्के बजेट दिलेले आहे. परंतु ३० राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील कृषीकरिता ६.२ टक्के बजेट असणे आवश्यक आहे. शासनाने ३० राज्यांच्या तुलनेत कृषी विशेषत: आरोग्याकरिता ४.६ टक्के बजेट दिलेले आहे. जिल्हा परिषदांमधील काही शाळांची अतिशय दयनीय परिस्थिती झाली आहे. त्या शाळांमध्ये गरीब लोकांची मुले जातात, श्रीमत लोकांची मुले त्या शाळांमध्ये शिक्षण घेण्यासाठी जात नाहीत. म्हणून मी माननीय वित्त राज्य मंत्र्यांना विनंती करतो की, आपल्याला ग्रामीण भागांचा विकास करायचा असल्यास जिल्हा परिषदांच्या शाळा दुरुस्तीकरिता अर्थसंकल्पामध्ये विशेष निधीची तरतूद करावी.

सभापती महोदया, काल सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांनी एका गोष्टीचा उल्लेख केला होता. तत्कालीन सभापती स्वर्गीय शिवाजीराव देशमुख यांनी पूर्वीच्या काळात या सदनाचे नेतृत्व केले होते. मी माननीय वित्त राज्य मंत्र्यांना विनंती करतो की, शासनाने स्वर्गीय शिवाजीराव देशमुख यांच्या स्मारकासंबंधी योग्य तो निर्णय घेतला पाहिजे.

सभापती महोदया, नागपूर येथे कै.वसंतराव नाईक यांच्या नावाने सभागृह तयार करण्यासाठी एनआयटीमध्ये २० कोटी रुपयांचा निधी जमा झालेला आहे. या संदर्भात माननीय वित्त राज्य मंत्री आणि शासनाने तातडीने निर्णय घ्यावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

असुधारित प्रत

ॲड. निलय नाईक ....

सभापती महोदया, आपण एका बाजूला सामान्य माणूस व शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी विचार करीत असतो. बंजारा समाज वाशिमच्या पोहरादेवीला मानतो. माननीय वित्त राज्यमंत्री तेथील पालक मंत्री आहेत. मंत्री महोदयांनी विशेष लक्ष देऊन सदर काम जलद गतीने सुरु करावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

सभापती महोदया, यवतमाळ जिल्हयातील पुसद तालुक्यामध्ये अतिरिक्त ऊस पडलेला आहे. या संदर्भात माननीय पालक मंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांची एखादी बैठक घेऊन तो ऊस गाळपासाठी कसा नेता येईल ? याबाबत विचार केला पाहिजे अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदया, माननीय मंत्री श्री.विजय वडेट्टीवार यांनी ओबीसी आरक्षणाच्या बाबतीत चांगली भूमिका घेतली. याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. या संदर्भात शासनाने विशेषत: माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री असो, त्यांनी माननीय मंत्री श्री.विजय वडेट्टीवार तसेच सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांच्या समवेत चर्चा करुन उच्च न्यायालयामध्ये ओबीसी आरक्षण टिकले पाहिजे यासाठी विशेष दखल घेतली पाहिजे. अन्यथा ओबीसीची एक पूर्ण पिढी गारद झाल्याशिवाय राहणार नाही. यवतमाळ जिल्हयातील दिग्रस तालुक्यामध्ये एका माजी सैनिकाची ९८ वर्षांची विधवा पत्नी राहत आहे. त्यांनी शासनाकडे अर्ज केलेला आहे की, गुजरात राज्यामध्ये माजी सैनिकांच्या विधवा पत्नींना ९ हजार रुपये, ओडीसा राज्यामध्ये १० हजार रुपये मानधन दिले जाते. याउलट महाराष्ट्र शासनाकडून माजी सैनिकांच्या विधवा पत्नींना फक्त ६ हजार रुपये मानधन दिले जात आहे. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, राज्यातील माजी सैनिकांच्या विधवा पत्नींच्या संदर्भात शासनाने तातडीने निर्णय घ्यावा.

सभापती महोदया, पुसद येथे २-३ महिन्यांच्या काळात २ दंगली झाल्या. त्यात काळी दौलतखाना विभाग तसेच शेंबाळ पिंप्री परिसराचा समावेश आहे. यवतमाळ जिल्हयाच्या पोलीस अधीक्षकांनी पुसद येथे अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षकाचे कार्यालय करुन देण्याबाबत शासनाकडे विनंती केलेली आहे. शासनाने सदर

ॲड. निलय नाईक ....

कार्यालयासाठी ५-१० कोटी रुपयांची तरतूद केली पाहिजे अशी मी मंत्री महोदयांना विनंती करतो. काळी दौलतखाना येथे दंगल झाली होती. तेथे जातीय स्वरुपाची परिस्थिती अतिशय वाईट आहे.

सभापती महोदया, माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या काळात राज्यात यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना सुरु होती. त्या योजनेमध्ये बंजारा, धनगर, वंजारी किंवा वडार समाज असो त्यांना त्या वसाहतीमध्ये घर मिळण्याची योजना होती. मी माननीय मंत्री यांना विनंती करतो की, शासनाने राज्यात सदर योजना सुरु ठेवली पाहिजे. माननीय आरोग्य मंत्री श्री.राजेश टोपे यांनी कोविड राज्यात अतिशय चांगल्या प्रकारे कामे केलेली आहेत. परंतु कोविड काळात अतिशय काही ठिकाणी अन्याय झाला आहे. पुसद तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयामध्ये कोविड काळात संडास, बाथरुममध्ये पाणी देखील उपलब्ध नव्हते. अशा प्रकारे तेथे अतिशय वाईट परिस्थिती होती. याबाबत सर्व वर्तमानपत्रांमध्ये बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. आम्ही याबाबत संबंधितांकडे विनंती केली होती. परंतु कोविड काळ सुरु होता. पुसद येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये एक महिला प्राध्यापक तिच्या पतीसमवेत ॲडमीट होती. परंतु रुग्णालयामधील संडास बाथरुममध्ये पाणी नसल्यामुळे त्या महिलेला बिसलरीची पाणी घेऊन उघडयावर शौचाला जावे लागले. त्यानंतर सदर महिला प्राध्यापकांनी रात्री साडेदहा वाजता मला फोन केला. मी ही बाब तातडीने जिल्हाधिकाऱ्यांना सांगितली. शासनाने या संदर्भात गांभीर्याने विचार केला पाहिजे. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या काळात राज्यात काही चांगल्या योजना सुरु होत्या. शासनाने त्या योजना आता बंद केलेल्या आहेत. याचे आम्हाला अतिशय दु:ख होत आहे.

असुधारित प्रत

ॲड. निलय नाईक ....

"मुठ्ठी में कुछ सपने लेकर,
भरकर जेबों में आशाएं,
दिल में है अरमान यही,
कुछ कर जाएं, कुछ कर जाएं,
सुरजसा तेज नहीं मुझमें,
दीपकसा जलता देखोगे,
अपनी हद रोशन करके,
तुम मुझको कब तक रोकोगे ? "

सभापती महोदया, एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो, धन्यवाद.

---------------

असुधारित प्रत

श्री.रामदास आंबटकर (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्था.प्रा.सं.) : सभापती महोदय, फार कमी वेळात मी अर्थसंकल्पावर बोलणार आहे. अर्थसंकल्पाच्या निमित्ताने सांगू इच्छितो की, यातील अनेक तरतूदी जुन्या प्रोजेक्ट किंवा जुन्या कल्पनेवर आधारीत आहेत. वर्धा हा जिल्हा शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा आहे. या जिल्हयात काही वर्षापासून आम्ही प्रयत्नशील आहोत. वर्धा नदीवर आजनसरा गावाजवळ आजनसरा नावाचा बॅरेज आहे. जून २०१९ मध्ये सरकारने त्यावेळी यास पूर्ण मंजूरी देऊन मार्च २०२० मध्ये हा प्रोजेक्ट सुरु करु अशा प्रकारे अर्ध्या तासाच्या चर्चेत अभिवचन दिले होते. माझी अर्थमंत्री महोदयांना विनंती आहे की, याचा नक्की विचार करावा. दुसरा विषय सभागृहासाठी महत्वपूर्ण आहे. राजा उदार झाला व हाती भोपळा दिला अशी या अर्थसंकल्पाची अवस्था आहे. देश स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहे. देशाच्या माननीय पंतप्रधानांनी स्वातंत्र्याच्या शतक महोत्सवापर्यत्च्या काळात देशात अमृतकाळ आहे असे सांगून शतकपूर्तीच्या वेळी हा देश बलवान राष्ट्र म्हणून उदयास येईल व बलवान राष्ट्र म्हणून यास मान्यता मिळेल अशा अर्थाने हे धोरण आखले आहे. मात्र राज्य सरकारने या संदर्भात आपले दळभद्री धोरण व कृती दाखवून दिलेली आहे. स्वातंत्र्याचा दैदिप्यमान इतिहास आपल्यासमोर आहे. तुटपुंजे उल्लेख करुन राज्याचे अमृतमहोत्सवी वर्ष आपण साजरे केले पाहिजे का. केवळ १० महापुरुषांच्या गावातील शाळांना एक कोटी रुपये दिले व त्यातून या सर्व महापुरुषांना श्रध्दांजली वाहिली हे होणार नाही. महाराष्ट्रात असे अनेक स्फुलींग आहेत. बॅ.ए.आर.अंतुले हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना महाराष्ट्रात जेथे आंदोलन व क्रांती झाली अशा सर्व ठिकाणी स्मारके उभारण्याचा मोठा प्रयत्न केला होता. महाराष्ट्रात हे सर्वत्र आपणास पहावयास मिळाले. आज या स्मारकाची अवस्था दयनिय आहे. क्रांतीचा इतिहास कोणाला सांगावा व कोणी सांगावा. त्यामुळे माझा प्रश्न आहे की, महाराष्ट्रातील महापुरुषांच्या स्मरणार्थ आपण काही करणार का. २-३ गोष्टींचा उल्लेख करतो. चंद्रपूर जिल्हयांमध्ये वीर बाबुराव शेडमाके नावाचे क्रांतीकारक होऊन गेले. इंग्रजांनी त्यांना फासावर लटकवले. आदिवासी समाजातील ते मोठे व्यक्ती होते. यांचे स्मारक सुध्दा गडचिरोलीमध्ये व्हायला पाहिजे ही आमची मागणी आहे. आष्टी व चिमूर या मोठया क्रांती झालेल्या

श्री.रामदास आंबटकर.....

आहेत, चिमूरची क्रांती तर मोठी झाली, युनियन जॅक खाली उतरवला गेला, टोकिओ येथून सुभाषचंद्र बोस यांनी भारतातील चिमूर हे गाव स्वतंत्र झाले अशा प्रकारची घोषणा केली होती. आष्टीचाही रणसंग्राम असाच आहे. माझी सरकारला विनंती आहे की, या इतिहासाला पुन्हा उजाळा द्यायचा असेल, युवकांसाठी प्रेरणेचा इतिहास लिहायचा असेल तर सर्व महापुरुषांना कोठेही वर्गवारी न करता देशात घडलेल्या क्रांतीची स्फुलींग आपण पेटवली पाहिजेत. त्या अर्थाने याचा विचार केला पाहिजे. आपणास मिळालेले स्वातंत्र्य केवळ ५-२५ वर्षात मिळालेले नाही. १८५७ ते १९४७ हा पूर्ण संघर्षाचा काळ होता. महाराष्ट्रातील मराठी सैन्य मोठया प्रमाणात अटकेपार व कटकेपार गेले होते. याची आपणा सर्वांना इतिहास माहिती आहे. या इतिहासाला पुनर्जिवित करणारा एक विषय आपल्या सर्वांच्या समोर मांडतो. रंगो बापूजी गुप्ते यांचे स्मारक यवतमाळ जिल्हयात आहे, पण सातारचे शेवटचे राजे असे त्यांचे स्थान होते. ते शिवाजी महाराजांचे शेवटचे वारस होते, ते १८०८ मध्ये गादीवर आले व १८३९ पर्यत त्यांनी राज्य केले व नंतर इंग्रजांच्या नितिप्रमाणे त्यांचे राज्य खालसा झाले. त्यांचे दिवाणजी रंगो बापूजी गुप्ते होते, ते इंग्लंडला गेले. ते १५ वर्ष इंग्लंड सरकारशी भांडले, ते झगडले. तोपर्यत १८५५ चा काळ उजडला व १८५७ ची क्रांती सुरु झाली. या दुर्दैवी क्रांतीनंतर आपण पराभूत झालो. त्यातून निराश झालेली माणसे वेगवेगळया ठिकाणी होती. रंगो बापूजी गुप्ते यांनी त्यावेळी लपतछपत माहुरच्या जंगलामध्ये अनेक दिवस काढले. दारव्हयाजवळ त्यांनी एक मठ स्थापन केला व युवकांसाठी शक्ती प्रदर्शनाची व्यायामशाळा सुरु केली. रंगो बापूजी गुप्ते यांची सरकारने दखल घेतलेली आहे. या स्मारकासाठी माझी अर्थमंत्री महोदयांना विनंती आहे की, या स्मारकाच्या ठिकाणी कोणत्या प्रकारचा प्रोजेक्ट व्हावा, कोणता प्रकल्प उभारावा. ज्यातून राष्ट्रभक्ती निर्माण होईल, देशात नवीन प्रेरणा मिळेल अशा प्रकारे स्मारकाच्या ठिकाणी काही काम सुरु व्हावे अशी मी आपणास विनंती करतो. १८५७ च्या सर्व स्वातंत्र्यविरांना व १९४७ च्या क्रांतीला आपण सर्वजण नमन करुया. धन्यवाद.

---------

श्री.रमेशदादा पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावर बोलण्यास उभा आहे. अर्थसंकल्पामध्ये सरकारने मच्छिमार बांधवांसाठी विशेष तरतूद करावी. शासनाने सादर केलेला अर्थसंकल्प हा मच्छिमार बांधवांच्या तोंडाला पाने पुसणारा आहे. मच्छिमार बांधवांसाठी ठोस वाढीव तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे महाविकास आघाडी सरकारवर नाराजी व्यक्त करीत आहे. केंद्र शासनाच्या मार्फत शेतकरी बांधवांकरीता किसान क्रेडीट योजना राबविली जाते. यांना बिनव्याजी कर्ज दिले, त्याच धर्तीवर राज्य शासनाने मच्छिमार बांधवांना किसान क्रेडीट कार्ड योजना चालू करावी. यासाठी तरतूद करावी. कारण मच्छिमार बांधवांना बऱ्याच संकटांना तोंड द्यावे लागते. चक्रीवादळामध्ये नुकसान होते, त्यामुळे तातडीची आर्थीक मदत गरजेची असते. शेतकऱ्यांकरीता ३ लाख रुपयांची तरतूद किसान क्रेडीट कार्डमध्ये केलेली आहे, तशी तरतूद मच्छिमारांकरीता करण्यात यावी अशी शासनाला विनंती करतो. आपण किसान क्रेडीट कार्ड मच्छिमारांसाठी उपलब्ध करुन द्यावे.

सभापती महोदया, जून व जुलै महिन्यात मासेमारी बंद कालावधीत तामिळनाडू व आंध्रप्रदेश राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्रात दरमहा मच्छिमार बंधू व भगिनींना ५००० रुपये देण्याची खावटी योजना चालू करावी. यासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद करावी. तामिळनाडू व आंध्रप्रदेश अशा राज्यांमध्ये चालू असलेली अशी योजना महाराष्ट्रात चालू करावी अशी विनंती राहील. मच्छिमार बंधू भगिनी दोन महिने मासेमारीचा व्यवसाय करु शकत नाही. मच्छिमार बांधवांसाठी डिझेल परताव्याची प्रत्येक अर्थसंकल्पात मागणी केली जाते, पण शासन त्याचा विचार करीत नाही. पुढील वर्षासाठी शासनाने अर्थसंकल्पात याकरीता तरतूद करावी. मच्छिमार बांधवांचा ३०० कोटीपेक्षा जास्त रकमेचा डिझेल परतावा बाकी असून शासनाकडे प्रलंबित आहे. त्यासाठी वाढीव म्हणून ८०० कोटीपर्यंत तरतूद करावी म्हणजे पुढील वर्षासाठी ती उपयोगी येईल. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी थोडया वेळापूर्वी सांगितले की, पुढील बजेटमध्ये त्याची तरतूद करावी. कोकण किनारपट्टीवर अनेकदा नैसर्गिक आपत्ती येत असते. यामध्ये मोठया प्रमाणावर मच्छिमार बांधवांचे नुकसान होते. त्यात एनडीआरएफचे निकष बदलून

असुधारित प्रत

श्री.रमेशदादा पाटील.....

मच्छिमारांसाठी विशेष आर्थिक तरतूद करावी. गेल्या दोन वर्षात तीन वादळे आली, नुकसान भरपाई तुटपुंजी मिळाली आहे. २१०० कोटीचे नुकसान झाले तेव्हा ६५ कोटी रुपये दिले. एनडीआरएफचे निकष आहेत. १००० रुपयांचे नुकसान झाले तर १०० रुपयांची तरतूद केली जाते. त्यामुळे एनडीआरएफचा निकष बदलण्यात यावा. मच्छिमारांचा ॲक्चुअल सर्व्हे करावा, शासनाने निकष बदलण्यासाठी समिती नेमावी. मच्छिमारांची वादळामुळे होणारी नुकसानभरपाई द्यावी. महाराष्ट्रात ओएनजीसी व मत्स्यव्यवसाय विभागामार्फत मागील १० वर्षात सेसेमीक सर्व्हे सुरु केलेला आहे. ओएनजीसीने मत्स्यव्यवसाय विभागासोबत ॲग्रीमेंट केले. त्यामुळे सेसेमीक सर्व्हे करीत असताना मासेमारी बंदीच्या कालावधीत मच्छिमार बांधवांना नुकसान भरपाई म्हणून ५०० कोटी रुपयांची विशेष तरतूद करण्यात यावी. ओएनजीसीकडून सेसेमीक सर्व्हेकरीता ऑईल शोधण्याची मशीन लावल्यामुळे मासे मरतात. माशांना त्रास होतो व मासे पळून जातात. दोन तीन महिन्यांसाठी मासेमारी बंद केली जाते. अशी १० वर्षांपासून मच्छिमारांना नुकसानभरपाई मिळाली नाही.

यानंतर श्रीमती नाफडे .....

अप्रकाशित प्रत

श्री.रमेशदादा पाटील.....

५०० कोटी रुपये ओएनजीसीकडून येणे आहे. याकरिता महाराष्ट्र शासनाला आमची विनंती आहे की, केंद्र आणि राज्य शासन यांनी यामध्ये सहकार्य करणे अपेक्षित आहे. प्रत्येक जिल्हयात मच्छिमार बांधवांकरिता जिल्हा नियोजन विभागामार्फत मच्छिमारांना आवश्यक ती सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात जास्तीत जास्त आर्थिक तरतूद शासनाने करावी, अशी मी विनंती करत आहे.

सभापती महोदया, शेतकऱ्यांना ३३,००० कोटी रुपयांचे कर्ज माफ केले, त्याच धर्तीवर मच्छिमारांना एनसीडीसी बोटींवर घेतलेले कर्ज, इतर सर्व प्रकारचे थकित कर्जे माफ करण्यासाठी अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये ५०० कोटी रुपयांची तरतूद करावी. शेतकऱ्यांकरिता पावसाच्या प्रमाणावर आधारित दुष्काळ जाहीर केला जातो. परंतु या बोटधारकांनी एनसीडीसीचे जे कर्ज घेतलेले आहे, ते शेतकऱ्यांच्या कर्जाप्रमाणे शासनाने माफ करणे आवश्यक आहे.

सभापती महोदया, राज्य शासनामार्फत मुंबईमध्ये कोळी मच्छिमार भवन उभारण्याकरिता ५० कोटी रुपयांची तरतूद करणे आवश्यक आहे. इतर राज्यातून आलेल्या लोकांचे भवन आणि इतर बांधकामे झाली, इतर लोकांना त्यांच्या समाजाकरिता मोठमोठे प्लॉट दिले गेलेले आहेत. तरी कोळी समाजाकरिता काही मिळालेले नाही, याकरिता शासनाने आवश्यक ती तरतूद करावी. राज्यात प्रत्येक जिल्हयात सागरी जिल्हयात अत्याधुनिक वातानुकूलित मासळी बाजार उभारण्याकरिता १०० कोटी रुपये तरतूद करण्यात यावी. कारण वातानुकूलित मासळी बाजार नवी मुंबई, मुंबई, ठाणे या सारख्या शहरात जर उभे केले तर ते अधिक फायद्याचे ठरेल. तेथे कॉस्मोपॉलिटियल लोक राहतात. तेथे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील लोक वास्तव्य करतात.

( वेळ संपल्याचे बेल वाजविली जाते. )

सभापती महोदया, प्रधानमंत्री मत्स्योद्योग योजनेंतर्गत शासनाने ५० कोटी रुपयांची तरतूद करावी.

श्री.रमेशदादा पाटील.....

सभापती महोदया, महाराष्ट्रात अनुसूचित जमातीच्या लोकांच्या खावटी योजनेकरिता वाढीव आर्थिक तरतूद करावी, कारण खावटीकरिता २००० रुपये प्रत्येकी आदिवासी यांना दिले जातात. काही आदिवासींना खावटीचे किट देखील दिले जाते. परंतु आम्ही अनुसूचित जमाती कल्याण समिती दौऱ्याच्या निमित्ताने ज्यावेळी राज्यात जिल्हया-जिल्हयात जातो, त्यावेळी आम्ही पाहिले की, अनुसूचित जमातीच्या लोकांना खराब व निकृष्ट दर्जाची खावटी दिली जाते. तेथे शासनाने प्रत्यक्ष इन्स्पेक्शन करावे, जे लोक तेथे हे काम करत आहेत, त्यांच्याविरुध्द कारवाई करायला पाहिजे, कारण सर्वांना हे मिळत नाही. आमची विनंती आहे की, शासनाकडून या खावटीकरिता २००० रुपये नगद दिले जातात, तसेच, त्यांना २००० रुपयांचे खावटी किट दिले जाते. यापेक्षा त्यांच्याकरिता ४००० रुपयांची प्रत्येकी प्रत्यक्ष तरतूद दिली तर ते त्यांचे रेशन घेऊ शकतात. याकरिता शासनाने वेगळी व उपयोगी येईल, अशी तरतूद करावी.

(वेळ संपल्याची बेल वाजविली जाते. )

सभापती महोदया, राज्यात आदिवासी क्षेत्रात अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेण्याकरिता वाढीव शिष्यवृत्ती देण्याकरिता शासनाने तरतूद केली पाहिजे. आदिवासी यांच्याकरिता या राज्याचा एकूण अर्थसंकल्प आहे, त्यापैकी ९.२७ पर्सेंट म्हणजेच ९९०० कोटी रुपयांची उपलब्धतता करुन ठेवलेली आहे. परंतु आदिवासींची मुले ज्यावेळी परदेशात शिक्षणाकरिता जातात, त्यांच्याकरिता २ कोटी रुपये तरतूद करुन ठेवलेली आहे. ती तरतूद वाढविली तर त्यांना परदेशात जाऊन चांगले शिक्षण घेता येईल.

**उप सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.रमेशदादा पाटील आपण गेली आठ-नऊ मिनिटांपासून बोलत आहात, काही मुद्दे राहिले असतील तर त्याबाबतचे निवेदन पटलावर ठेवावे. आता आपण आपल्या भाषणाचा समारोप करावा.

असुधारित प्रत

श्री.रमेशदादा पाटील : सभापती महोदया, जे लोक शासकीय व निम शासकीय अधिसंख्य पदावर कार्यरत होते, त्यापैकी जे लोक सेवानिवृत्त झालेले आहेत, त्यांचे वेतन गोठून ठेवलेले आहे. त्यांना रिलीज केले जात नाही, कारण त्यांनी व्हॅलिडिटी सर्टिफिकेट दिलेले नाही म्हणून त्यांना रिलीज केले जात नाही. केंद्र शासनाने याबाबत बारा खासदारांची कमिटी नेमलेली आहे. त्यात एक निर्णय घेतला गेलेला आहे की, ज्यांचे निवृत्ती वेतन रोखलेले असेल, ते रिलीज करण्यात यावे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विभागाने एक कमिटी नेमून ज्यांचे सेवानिवृत्ती वेतन रोखलेले आहे, त्यांना ते रिलीज करावे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------------------

असुधारित प्रत

श्री.नागोराव गाणार (नागपूर विभाग शिक्षक): सभापती महोदया, सन २०२२-२३ चा अर्थसंकल्प दिनांक ११ मार्च,२०२२ रोजी विधीमंडळात सादर करण्यात आला. त्यामध्ये राजस्थान सरकारने घोषित केल्याप्रमाणे तसेच, माननीय श्री.अजित पवार यांनी ०२ जुलै,२०१९ रोजी विधानसभेत मागणी केल्याप्रमाणे राज्यातील शिक्षक कर्मचाऱ्यांना पुर्वव्रत जुनी पेन्शन योजना लागू करण्याची घोषणा केली नाही. याबद्दल मी सर्वप्रथम खेद व्यक्त करतो.

सभापती महोदया, शासन निर्णय दिनांक १२, १५ व २४ फेब्रुवारी, २०२१ अन्वये निर्देशित केलेल्या त्रुटयांची पुर्तता केलेल्या शाळांना अनुदान देण्यासाठी ५,७७,२२,००० रुपयांची तरतूद करण्याची विनंती शिक्षण विभागाने केलेली आहे, ती मान्य झालेली नाही. मी या निमित्ताने मागणी करतो की, ती मागणी मंजूर करुन शिक्षकांना अंशत: अनुदान देण्यात यावे.

सभापती महोदया, अघोषित शाळा, तुकडया, नैसर्गिक वाढीच्या तुकडया, ज्यांचे अनुदानास मुल्यांकन करण्यात आले, परंतु प्रस्ताव मंत्रालयात प्रलंबित आहेत, ते प्रस्ताव निधीसह मंजूर करुन त्या सर्वांना शिक्षक कर्मचाऱ्यांना वेतन देण्याची व्यवस्था करावी, अशी विनंती या निमित्ताने मी करतो.

सभापती महोदया, उच्च माध्यमिक शाळा, ख्रिस्त महाविद्यालयातील एकूण १२९३ वाढीव पदांचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे. तो तत्काळ निकाली काढून शिक्षक कर्मचाऱ्यांना व विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी मी करतो.

सभापती महोदया, शिक्षण क्षेत्रात सुरु असलेला घोषित, अघोषित, विना-अनुदानित शाळांचा जो प्रश्न आहे, ज्यामुळे सतत शिक्षण क्षेत्रात आंदोलन सुरु असते आणि त्यामुळे शिक्षण क्षेत्राच्या गुणवत्तेवर प्रश्न निर्माण होतो. तो प्रश्न संपूर्णपणे अंतिमत: निकाली काढावा, अशी विनंती करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----------------

असुधारित प्रत

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदया, शुक्रवार, दिनांक ११ मार्च,२०२२ रोजी या राज्याचे कर्तबगार उप मुख्यमंत्री, अर्थ व नियोजन मंत्री सन्माननीय श्री.अजित पवार, राज्याचे अर्थ राज्यमंत्री महोदय, श्री.शंभुराज देसाई यांनी राज्याला शोभेल अशा आवाजामध्ये अर्थसंकल्प विधीमंडळात मांडलेला आहे.

सभापती महोदया, राज्यातील सर्वसामान्य जनतेला दिलासा देण्याचे काम शासनाने अर्थसंकल्पातून केलेले आहे. इतकेच नव्हे तर या देशाचा जो पोशिंदा शेतकरी बांधव आहे, शेतमजूर बांधव यांना डोळयासमोर ठेवून राज्याचा अर्थसंकल्प सादर करण्याचे काम शासनाने केलेले आहे.

सभापती महोदया, आज मराठवाडयातील हिंगोली जिल्हयातील वसमत तालुक्यात मोठया प्रमाणात हळदीचे पीक घेण्यात येते. याकरिता तेथे हळद संशोधन केंद्र स्थापन करावे, अशी लोकप्रतिनिधी म्हणून मी सातत्याने मागणी करत होतो. ती मागणी शासनाने पूर्ण केलेली आहे. केवळ घोषणाच नव्हेतर त्याकरिता निधी देण्याचे काम शासनाने केलेले आहे. मराठवाडयाचा शिक्षक प्रतिनिधी या नात्याने देखील मी मंत्रीमहोदयांचे मनापासून अभिनंदन करत आहे.

सभापती महोदया, दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत आहे. मग ते वाहन दुचाकी, चारचाकी वाहने असो, त्यांची संख्या दिवसेंदविस सातत्याने वाढतानाच पाहायला मिळत आहे. परंतु रोड मात्र वाहन संख्येच्या प्रमाणात रुंद करु शकत नाही. त्याकरिता मर्यादा आहेत. आज खऱ्या अर्थाने जर विकासाला चालना द्यायची असे तर रस्त्याचे जाळे मजबूत करायची गरज आहे. त्याकरिता पुणे-मुंबई हा मार्ग तयार होत आहे, त्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. औरंगाबाद –नांदेड हा देखील त्याला जोडणारा समांतर मार्ग करण्याची देखील घोषणा सार्वजनिक बांधकाम मंत्रीमहोदयांनी केलेली आहे, ही आनंदाची बाब आहे. जिल्हया-जिल्हयाला जोडणारे रस्ते जे आहेत, त्यांचे देखील चौपदरीकरण झाले पाहिजे. कारण काम-व्यवसाय निमित्ताने अनेक लोकांना नेहमी जिल्हयांतर्गत प्रवास करावा लागतो. परंतु त्यात वाढती वाहनांची संख्या, अरुंद रस्ते यामुळे अपघात होतात. यामुळे वेळ व इंधन देखील वाया जाते. या सर्व बाबींचा विचार राज्य शासनाने धोरणात्मक आणि क्रांतिकारक पाऊल उचलले पाहिजे.

यानंतर श्री.सोनावणे.......

असुधारित प्रत

श्री. विक्रम काळे..........

राज्यात जिल्ह्या-जिल्ह्यांना जोडणारे रस्ते आहेत. असे रस्ते चौपदरीकरण करण्याच्या दृष्टीकोनातून एक कृती आराखडा तयार करावा अशी मी शासनाकडे सूचना करीत आहे.

सभापती महोदया, राज्याच्या विकासात शिक्षण संस्थांचे फार मोठे योगदान आहे. स्व. यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यामध्ये विनाअनुदानीत धोरणासंदर्भात एक क्रांतीकारी निर्णय घेतला होता. विनाअनुदानीत शाळांना आणि संस्थांना परवानगी देण्याचे धोरण त्यांनी तयार केले होते. त्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर इंजिनिअरींग आणि मेडिकल महाविद्यालये उभी राहिली आहेत. नव्हे तर आज राज्यात विद्यापीठे उभी राहिली असून, त्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांना ज्ञानदान देण्याचे काम झालेले आहे. हा सर्व निधी शैक्षणिक संस्थांनी दिलेला आहे. राज्यात इंजिनिअरींग आणि मेडिकल महाविद्यालये उघडावयाची असतील तर त्यासाठी किती खर्च येतो हे मी सांगण्याची गरज नाही. शासनाने त्याकडे लक्ष देण्याचे महत्वाचे काम आहे. अनेक संस्था या स्वातंत्र्यपूर्व काळात सुरु झालेल्या आहेत. अशा संस्थांना सरकार एक विशेष अनुदान देईल अशी घोषणा तत्कालिन मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख साहेबांनी केली होती. त्या घोषणेला चालना देण्याचे काम महाविकास आघाडी सरकारने करावे अशी मी विनंती करीत आहे.

सभापती महोदया, मराठी ही सर्वांची बोली भाषा, न्याय भाषा आहे. आपण तिला जननी किंवा आई म्हणतो. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवा यासाठी आम्ही सातत्याने भांडत आहोत. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी केंद्रात जाऊन मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यांनी जर मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून दिला तर महाविकास आघाडी सरकार आपले अभिनंदन करणार आहे.

सभापती महोदय, विनाअनुदानित शाळांचे प्रश्न, त्रुटी पूर्ण केलेल्या शाळा असतील, अघोषित शाळा असतील किंवा प्रचलित धोरण असेल किंवा जुन्या पेन्शन योजनेचे प्रश्न सोडविण्यासाठीचा प्रयत्न माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप

असुधारित प्रत

असुधारित प्रत

श्री. विक्रम काळे..........

मुख्यमंत्री करतील असा विश्वास आमच्या सर्वांच्या मनात आहे. सन्माननीय सदस्या डॉ. मनिषा कायंदे या शिक्षक आमदार नसल्या तरी त्या प्राध्यापिका या नात्याने त्यांनी माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे जाऊन प्रयत्न करण्याची गरज आहे.

सभापती महोदया, माननीय वित्त राज्यमंत्री श्री. शंभुराजे देसाई यांना विनंती करतो की, मी माझ्या भाषणात ज्या काही सूचना केलेल्या आहेत, त्याची अंमलबजावणी ते करतील अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण या ठिकाणी संपवितो. धन्यवाद.

-------------

असुधारित प्रत

डॉ. रणजित पाटील ( अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदया, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे.

सभापती महोदया, मी शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी बोलणार आहे. शेतकऱ्यांसाठी महाविकास आघाडी सरकारने ज्या चांगल्या योजना आणलेल्या आहेत, त्याचे मी समर्थन करणार आहे. तसेच ज्या योजनांमधील उणिवा आहेत त्या दूर करण्यासाठी मी शासनाला काही सूचना करणार आहे. या अर्थसंकल्पात कापूस आणि सोयाबिन पिकांमध्ये प्रगतशील शेतकऱ्यांना बरोबरीने आणण्यासाठी मूल्य साखळी व्यवस्था निर्माण करण्याची घोषणा करण्यात आली असून, मी त्याचे स्वागत करतो. विदर्भात सोयाबीनसोबत इतर अनेक महत्वाची पिके घेतली जातात. उदाहरण द्यायचे झाले तर विदर्भात हरभरा म्हणजे चण्याची आवक ही साधारणपणे १५ ते २० हजार पोत्यांची आहे. जो हमी भाव दिला जातो, त्यापेक्षा बाजारभाव कमी आहे. हमी भाव हा ५ हजार २०० ते ५ हजार ३०० इतका आहे. चण्याचे भाव ज्या पध्दतीने ठरविले जातात.... आताच सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी सांगितले आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये व्यापारी दुप्पटाखाली हात ठेऊन ४४०० ते ४८०० रुपयांचा भाव निश्चित करतो. ५०० रुपये म्हणजे १० टक्के उत्पन्नावर आधारित शेतकरी जो माल विकतो त्याच्यावर १० टक्क्यांचा फरक येथेच पडून जातो. ४ ते ५ महिन्यानंतर व्यापारी शासनाला विकतो किंवा चढ्या दराने तो दुसऱ्या बाजात कर्टेल करुन विकतो. मी यासंदर्भात शासनाला सूचना करणार आहे. एपीएमसीला मूल्यवर्धीत करण्यासाठी, श्रेणीवर्धन करण्यासाठी त्यांना दिलेल्या कर्जावर व्याज १०० टक्के माफ केले जाते. काही हरकत नाही. या गोष्टीचे समर्थन आहे. आमच्याकडील प्रत्येक एपीएमसी जी कृषी उत्पन्न बाजार समिती आहे ती करोडो रुपयांच्या नफ्यात आहे. अशा परिस्थितीत आपण कृषी उत्पन्न बाजार समितीला पायाभूत सुविधेवर दिलेल्या कर्जावर व्याज माफ करतो. पण त्यासोबत अशी अपेक्षाही करु या की, या कृषी उत्पन्न बाजार समितीचा एक कायदा आहे. या कायद्याने जर हमी भावापेक्षा कमी भावाने व्यापारी माल खरेदी करीत असेल तर त्याच्या विरोधात फौजदारी गुन्हा दाखल केला पाहिजे. पण अशी अंमलबजावणी

असुधारित प्रत

डॉ. रणजित पाटील.......

होत नाही. एपीएमसीला माल दिला जातो. त्यामध्ये चोविस तासाच्या आत संबंधित शेतकऱ्याला त्याचे पैसे मिळाले पाहिजे असा देखील एपीएमसीचा कायदा आहे. पण त्याचीही अंमलबजावणी होताना दिसून येत नाही. या गोष्टीकडे सरकारने निश्चितपणे लक्ष देण्याची गरज आहे.

सभापती महोदया, नियमित कर्ज फेडण्याऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर ५० हजार रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. याचे मी स्वागत करतो. प्रत्येक जिल्ह्यातील सहकारी बँकेला... विदर्भातील शेतकऱ्यांना कर्जमाफी झालेली आहे. तेव्हा त्या शेतकऱ्यांना विश्वासात न घेता त्याचे जुन्याचे नवे केलेले आहे. अशी कार्यवाही करीत असताना त्याची परवानगी न घेता त्याचे गठन केलेले आहे. त्याचे खाते एनपीएमध्ये दिसू नये म्हणून बँकेने हे सर्व केलेले आहे. अकोला जिल्ह्यातील १७ हजार शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिलेले आहेत. याकडे देखील शासनाने लक्ष द्यावे अशी मी विनंती करीत आहे. शेतकऱ्यांची इच्छा नसताना त्यांचे गठन केल्यामुळे ही कर्जमाफी मिळाली नाही असे होता कामा नये यासाठी माननीय मंत्री महोदयांनी लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदया, किसान क्रेडीट कार्डचा उल्लेख झालेला असून, त्याचा अर्थ असा आहे की, ज्या शेतकऱ्यांना ३ लाखापर्यंत कर्ज मिळते ते त्यांना व्याजातून फ्री असते. त्यांना व्याज लागत नाही. ते त्यांचे क्रेडीट लोन असते. त्यांची ती कॅश क्रेडीट असते. सेवा बळकटीकरणाचा अर्थसंकल्पात उल्लेख झालेला आहे. त्याचा कोअर बँकेशी जोडण्याचा उल्लेख अर्थसंकल्पात केलेला असून, मी त्याचे स्वागत करतो. सेवासोसायट्या या विदर्भातील शेतकऱ्यांकडून कर्ज घेतात. त्यावेळी त्यांच्याकडून दोन स्लीपवर स्वाक्षरी घेतली जाते. एक स्लीप असते. त्यामध्ये शेतकऱ्याचे पूर्ण कर्ज काढून त्याच्या सेव्हिंगमध्ये टाकणे आणि दुसरी स्लीप असते ती त्याच्या विथड्रॉलमधून पैसे काढण्यासाठी. पण असे अपेक्षित नाही. शेतकऱ्याला जेवढे लागते तेवढेच तो काढतो. कॅश क्रेडीट म्हणजे जेवढी उचल केली जाते, त्यावर मला इंटरेस्ट द्यायला पाहिजे. असे आपल्याकडे होत नाही. आपल्याडे तीन

असुधारित प्रत

डॉ. रणजित पाटील.......

लाखाच्या कर्जाला पहिल्या दिवसापासून व्याज द्यावे लागते. असे होता कामा नये. श्रेणीवर्धन करीत असताना त्याकडेही लक्ष दिले पाहिजे. मी आज २५ हजार रुपये घेतले तर मला २५ हजार रुपयांवर व्याज आकारले पाहिजे. उद्या माझ्या घरी माल आला आणि त्यामुळे मी पुन्हा बँकेत ५० हजार रुपये भरल्यानंतर माझे ते व्याज कमी झाले पाहिजे. याचा अर्थ कॅश क्रेडीट होते. खरे तर त्या कॅश केसीसीला अर्थ राहिल. या केसीसीचा अर्थ जर आपल्याला पूर्ण समजून घ्यावयाचा असेल तर आपल्याला या योजनेचे श्रेणीवर्धन करताना त्याचा अंतर्भाव करुन तसा विचार केला पाहिजे. ज्यावेळी बाजारात तीन ते चार वर्षापूर्वी साधारणपणे तुरीला ९ ते १० हजार रुपयांचा भाव होता, त्यावेळी सर्व शेतकऱ्यांनी तुरीची शेती केली. पण दुसऱ्या वर्षात तुरीला भाव कमी आला. पण राज्य शासानाने हमी भाव देण्याचे मान्य केले होते. त्यावेळी भाड्याची गोडाऊन्स घेतली. आज श्रेणीवर्धन करीत असताना मला हे देखील सांगितले पाहिजे की, ज्याचे नियतन ठेवायला...म्हणजे धान्यातून अन्न देतो. ते ठेवायला वेअर हाऊसेस नाहीत. राज्य शासनाने वेअर हाऊस, गोडाऊन आणि कोल्ड स्टोअरेजसाठी अर्थसंकल्पात तरतूद केली असती तर ते अधिक सोयीचे झाले असते.

सभापती महोदया, विदर्भात जलसिंचन प्रकल्प आहेत. पूर्णाचे खोरे आहे. ५ प्रकल्पावर ९० टक्के कामे झालेली अनेक बॅरेजेस आहेत. माझ्या मतदारसंघातील बॅरेजचे काम ९५ टक्के पूर्ण झालेले आहे. बंद पाईपलाईनद्वारे त्याची वितरण व्यवस्था सुरु करावयाची आहे. त्याचे देखील २५ टक्के काम झालेले आहे. ३ टक्के काम बाकी आहे. त्यामुळे तेथील शेतकरी सिंचनापासून गेल्या ३ वर्षापासून वंचित आहे. यासाठी शासनाने लक्ष देण्याची गरज आहे. शासनाने अर्थसंकल्पात अनेक योजनांचा समावेश केलेला आहे. पण या दोन, तीन किंवा चार किंवा पाच टक्क्यांचा पैसा ठेकेदारांना दिलेला आहे. शासनाने अशा ठेकेदारापर्यंत जाण्यासाठी प्रयत्न करावा अशी सूचना करीत आहे. व्यक्तीगत लाभाच्या किंवा सार्वजनिक लाभाच्या योजना कितीही चांगल्या असतील. पण जोपर्यंत शासन कनिष्ठ पातळीवर जाऊन त्यांचा आढावा घेत नाही तोपर्यंत त्याचे आपल्याला देणे होत नाही.

असुधारित प्रत

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

डॉ.रणजित पाटील.....

या निमित्ताने मला एवढेच निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, माननीय श्री.देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना ते प्रत्येक अधिवेशनाच्या वेळी प्रत्येक जिल्ह्यातील आमदारांची बैठक घेत होते. त्या बैठकीमध्ये आमदार आपापल्या मतदारसंघातील प्रश्न मांडत होते. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांनी एकही जिल्हा सोडला नाही की, त्यांनी मुख्य प्रकल्पांच्या ठिकाणी जाऊन भेटी दिल्या नाहीत किंवा बैठका घेतल्या नाहीत. त्यांच्यासारखा मुख्यमंत्री आजपर्यंत झाला नाही. त्यांनी कन्व्हीक्शन रेटच्या बाबतीत प्रत्येक जिल्ह्यातील सरकारी वकिलांकडे विचारणा केली, पोलीस निरीक्षकांकडे विचारणा केली. माझा सांगण्याचा हेतू एवढाच आहे की, या योजना राबवावयाच्या असतील तर क्षेत्रीय पातळीपर्यंत जाणे आवश्यक आहे. जोपर्यंत माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री क्षेत्रीय पातळीपर्यंत जाणार नाहीत तोपर्यंत चार जिल्ह्यातील रुग्णालयांमध्ये १५० कोटी रुपये प्रमाणे एकूण ६०० कोटी रुपये खर्च करुन देखील तेथील यंत्रसामुग्री वापरात नाही ते समजू शकणार नाही. तीन वर्षांपासून त्या चार जिल्ह्यांमध्ये सी.टी.स्कॅन व एमआरआय मशीन उभ्या असताना सुद्धा त्या लोकांच्या कामी येत नाहीत. कोरोना काळात सी.टी.स्कॅन मशीन उभी असताना सुद्धा तिचा लोकांना उपयोग झाला नाही. या सर्व बाबी क्षेत्रीय पातळीपर्यंत गेल्याशिवाय कळणार नाहीत.

सभापती महोदया, सरकार कोणाचेही असले तरी योजना या जनतेच्या कल्याणासाठीच सुरु केल्या जातात. त्या योजनांची परिणामकारक अंमलबजावणी करावयाची असल्यास आपल्याला क्षेत्रीय स्तरापर्यंत जावे लागेल. माननीय राज्यमंत्री श्री.शंभुराज देसाई यांच्याकडे कौशल्य विकास व उद्योजकता विभाग आहे. कृषी विभागाचे अनेक स्नातक असून त्यांच्यासाठी आपण काहीना काही करु शकतो. परंतु गेल्या दोन वर्षात कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या योजनेंतर्गत व्हीटीपीला काय उद्दिष्ट दिले हे मला माहीत नाही. माननीय श्री.शंभुराज देसाई साहेब, आपण वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री आहात. तीन-चार वर्षांपूर्वी कौशल्य विकास व उद्योजकता विभागात जे धोरण सुरु होते ते पुन्हा कार्यान्वित करुन व या विभागासाठी

असुधारित प्रत

डॉ.रणजित पाटील.....

जास्तीत जास्त निधी मिळवून घ्यावा. तसेच त्या माध्यमातून कृषी व इतर स्नातकांसाठी रोजगार मेळावे आयोजित करावे. आपल्या आस्थापनेवर व्हीटीपीची परवानगी दिली तर एक्सरे टेक्निशीयन असतील, सी.टी.स्कॅन टेक्निशीयन असतील, या सर्वांना सर्टिफिकेट कोर्स करता येईल व त्यांना सुद्धा रोजगाराची संधी उपलब्ध होईल.

सभापती महोदया, या अर्थसंकल्पावरील चर्चेच्या निमित्ताने अनेक विषयांवर बोलावयाचे आहे. परंतु वेळेची मर्यादा लक्षात घेता मला माझे भाषण आटोपते घ्यावे लागत आहे.

सभापती महोदया, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले मनापासून आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

धन्यवाद.

-----------

असुधारित प्रत

श्री.गोपिचंद पडळकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मला संधी दिल्याबद्दल मी आपले मन:पूर्वक आभार मानतो.

सभापती महोदया, पानिपतच्या पराभवानंतर हिंदवी स्वराज्याची पताका ज्यांनी खांद्यावर घेतली, या पराभवानंतर ज्यांनी स्वराज्याचा प्रसार अटकपासून कटकपर्यंत केला, ज्यांनी मुघलशाहीला अक्षरश: टाचेखाली घेऊन, "मल्हार आया, भागो भागो," असे म्हणत मुघल सैनिकांची भंबेरी उडविली अशा थोरले सुभेदार मल्हारराव होळकर यांची आज जयंती असून, त्यांच्या जयंतीनिमित्त मी महाराष्ट्रातील तमाम जनतेला हार्दिक शुभेच्छा देतो. थोरले सुभेदार मल्हारराव होळकर यांनी बांधलेल्या वापगावच्या किल्ल्यामध्ये इंग्रजांना ज्यांनी सलग २५ वेळा हरविले त्या महाराजा यशवंतराव होळकर यांचा जन्म झाला होता. ती वास्तू व्यवस्थित असली तरी त्या वास्तूचे जतन होणे गरजेचे आहे. मी यापूर्वी अनेकदा विनंती केलेली आहे आणि आता सुद्धा हात जोडून विनंती करतो की, रयत शिक्षण संस्थेकडून ती वास्तू त्वरित सरकारकडे जमा करुन त्या वास्तूची डागडुजी व जिर्णोद्धार करावा.

सभापती महोदया, वेळेची मर्यादा असल्यामुळे मी अधिक न बोलता केवळ काही सूचना करणार आहे. सभापती महोदया, महाराष्ट्रात डाळिंब शेती मोठ्या प्रमाणावर आहे. डाळिंब शेतीमध्ये पीनहोल नावाचा एक नवीन रोग आला आहे. हा रोग एका झाडाला लागल्यानंतर संपूर्ण बाग उद्ध्वस्त होते. या रोगामुळे आज कोणत्याही गावात डाळिंब शिल्लक राहिलेले नाही. पूर्वीच्या सरकारने स्व.पांडुरंग फुंडकर फळबाग लागवड योजना सुरु केली होती. परंतु या सरकारने ती योजना बंद केली आहे. आता रोजगार हमी योजनेतून नवीन फळबाग लागवडीसाठी निधी देण्यात येत आहे. मी सांगू इच्छितो की, सर्वसामान्य लोकांना त्या योजनेतून निधी उपलब्ध करुन घेणे शक्य होत नाही. या निमित्ताने मी मागणी करतो की, स्व.पांडुरंग

श्री.गोपिचंद पडळकर....

फुंडकर फळबाग लागवड योजना नव्याने सुरु करुन, महाराष्ट्रातील फळबाग शेतकऱ्यांना न्याय द्यावा.

सभापती महोदया, सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या भागातील लोकांना न्यायालयीन प्रकरणांसाठी मुंबईतील उच्च न्यायालयात यावे लागते. गेल्या ३५ वर्षांपासून मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापूर येथे करण्याबाबतची मागणी आहे. माननीय राज्यमंत्री श्री.सतेज पाटील यांनी या विषयी मागील दोन आठवड्यात दोन बैठका घेतल्या आहेत. राज्य सरकारने कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ मंजूर करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मी विनंती करीत आहे.

सभापती महोदया, आटपाडी ही ग्रामपंचायत आहे. अनेक तालुक्याच्या ग्रामपंचायती या नगर पंचायती किंवा नगरपरिषदा म्हणून अस्तित्वात आल्या आहेत. आटपाडी ग्रामपंचायतीला नगरपंचायत म्हणून मंजुरी देण्याबाबतचा प्रस्ताव २०१८ साली शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे. मी मागणी करतो की, आटपाडी नगर पंचायतीबाबतची घोषणा लवकरात लवकर राज्य सरकारकडून करण्यात यावी,

सभापती महोदया, आटपाडीमध्ये एक वेगळेपणे आहे. मी सांगू इच्छितो की, कोणताही गुन्हेगार हा जन्मत: गुन्हेगार नसतो. त्या व्यक्तीकडून चुकून गुन्हा घडतो व नंतर त्याला जन्मठेपेची शिक्षा होऊन त्याला तुरुंगवास होतो. आटपाडी येथे औंधच्या राजाने त्यांच्या गांधीवादी विचारवंत असलेल्या पोलंडच्या मॉरीस फिडमन ऊर्फ भारतानंद या मित्राच्या संकल्पनेतून १९३९ साली आटपाडी येथे जगातील आगळावेगळा कैद्यांच्या खुल्या वसाहतीचा पहिला प्रयोग केला. आटपाडीपासून ५ कि.मी.अंतरावर स्वतंत्रपूर येथे कैद्यांची खुली वसाहत निर्माण केली आहे. ज्यांना जन्मठेप झालेली असते व ज्यांची वर्तणूक चांगली असते त्यांना सरकारच्या सूचनेनुसार स्वतंत्रपूर येथील खुल्या वसाहतीत ठेवले जाते. या ठिकाणी कैद्यांची व कुटुंबाची राहण्याची व्यवस्था आहे, तेथे एकप्रकारे मुक्त वातावरण आहे. त्या

असुधारित प्रत

श्री.गोपिचंद पडळकर....

ठिकाणी कैद्यासारखी वागणूक दिली जात नाही. स्वतंत्रपूर कारागृहाची ३० हेक्टर सुपीक जमीन आहे. त्या जमिनीच्या ५०० मीटरवर आटपाडीचा साठवण तलाव आहे. त्या जमिनीवर आतापर्यंत सर्व कैदी शेती माल पिकवित होते. त्या ठिकाणी पिकविलेला शेती माल बाजारात जाऊन विकायचे. त्या कैद्यांसोबत त्यांचे कुटुंब सुद्धा असायचे. मागच्या सरकारने त्या ठिकाणी खूप चांगली इमारत बांधली आहे. मी परवा तेथील जेलर यांच्याकडे त्यांच्या कोणत्या मागण्या गरजेच्या आहेत या बाबत विचारणा केली. मी माननीय गृह राज्यमंत्री यांना विनंती करतो की, स्वतंत्रपूर कैदी वसाहतीच्या गरजा बघून त्या पूर्ण केल्या पाहिजेत. सध्या त्या ठिकाणी १०-१२ कैदी आहेत. इतर कारागृहातील ज्या कैद्यांचे वर्तन चांगले आहे त्यांना त्या ठिकाणी पाठविले तर एकप्रकारे त्यांना न्याय मिळू शकेल. या कारागृहावर जुन्या काळात काढण्यात आलेला "दो आँखे, बारह हाथ" नावाचा सिनेमा फार गाजला होता. माझी विनंती आहे की, स्वतंत्रपूर कारागृहाला चांगले वैभव प्राप्त करुन द्यावे.

सभापती महोदया, २०१० साली सरकारच्या माध्यमातून राजीव गांधी घरकुल योजना भाग-२ सुरु करण्यात आली होती. राज्यातील ज्या गोरगरीब लोकांना घर मिळत नाही त्यांना १ लाख रुपयांत घर दिले जात होते. १ लाख रुपयांतील १० हजार रुपये लाभार्थी भरत होते व ९० हजार रुपये बँकेकडून कर्ज दिले जात होते. बँकेकडून घेण्यात आलेल्या ९० हजार रुपयांवरील कर्जाचे व्याज सरकार भरणार होते. लोकांनी या योजनेंतर्गत घेतलेल्या कर्जाचे नियमितपणे हप्ते भरलेले आहेत. परंतु सरकारने व्याज न भरल्यामुळे गोरगरीब लोकांच्या खात्यात किसान सन्मान योजना, गॅस अनुदान, कृषी अनुदान किंवा अन्य माध्यमातून जमा होणारे अनुदान बँक लगेच त्या शेतकऱ्यांच्या खात्यातून काढून घेत आहे. मी विनंती करतो की, सरकारने या लोकांच्या व्याजाचे पैसे ताबडतो जमा करावेत.

श्री.गोपिचंद पडळकर....

सभापती महोदया, खरसुंडी येथे खिलार जातीच्या बैलांची मोठी यात्रा भरते. आपल्या देशात गोवंश जतन व संवर्धन होण्यासाठी सांगली जिल्हा परिषदेने खरसुंडी येथे खिलार जातीच्या बैलांचे संवर्धन होण्यासाठी केंद्र स्थापन करण्याबाबतचा ठराव केला होता. या केंद्राच्या उभारणीच्या कामाकडे सरकारने लक्ष द्यावे, अशी मी मागणी करतो.

सभापती महोदया, राज्यातील मेंढपाळांच्या खूप अडचणी आहेत. गारांचा पाऊस, वादळ, वीज पडल्यामुळे तसेच लांडग्याच्या किंवा वाघाच्या हल्ल्यात हजारो मेंढ्या मृत्युमुखी पडतात. परंतु मेंढपाळाच्या दृष्टीने राज्य सरकारने विम्याची कोणतीही योजना आखलेली नाही. मेंढपाळांसाठी विम्याची चांगली योजना आखण्याबाबत मी सरकारला अनेकदा विनंती केलेली आहे. मुसळधार पावसामुळे, वीज पडल्यामुळे, औषध फवारलेल्या शेतीतील पाणी प्यायल्यामुळे या वर्षी तब्बल १५ हजार शेळ्या-मेंढ्यांचा मृत्यू झालेला आहे. परंतु पशुसंवर्धन विभागाने या बाबतीत साधा पंचनामा देखील केलेला नाही. मी आपल्या माध्यमातून सरकारला हात जोडून विनंती करतो की, कर्नाटक सरकारच्या अनुग्रह विमा योजनेंतर्गत मिळणाऱ्या मदतीच्या धर्तीवर महाराष्ट्रातील मेंढपाळ समुहासाठी विमा संरक्षण योजना सुरु करावी.

सभापती महोदया, मेंढपाळांसाठी पूर्वी चराई पास दिली जात होती. मी त्या चराई पासची प्रत देखील सोबत आणलेली आहे. मी यापूर्वी विनंती केलेली आहे आणि आता सुद्धा हात जोडून विनंती करतो की, झाडे लावल्यानंतर पाच वर्षांनी ते वन शेळ्या-मेंढ्यांना वा तेथील जनावरांना चरण्यासाठी खुले केले पाहिजे.

नंतर श्री.कांबळे.....

श्री. गोपिचंद पडळकर ....

तुम्ही बाकीच्या अटी घाला की, तेथे कुऱ्हाडबंदी असली पाहिजे, तेथे कोणते नुकसान होता कामा नये. पण तुम्ही या मेंढ्यांना जर वन भागामध्ये, कुरणामध्ये जाऊ देणार नसाल आणि त्यांना चराई पास देणार नसाल तर हे पशुधन संपल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे मी राज्य सरकारला हात जोडून विनंती करतो की, या विषयामध्ये तुम्ही लक्ष घालावे.

सभापती महोदया, मला महाज्योतिचा एक खूप महत्त्वाचा विषय येथे मांडावयाचा आहे. विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव होईल, विद्यार्थ्यांमध्ये असमानता निर्माण होईल असे सरकार वागत आहे. राज्यात ३ महत्त्वपूर्ण संस्था आहेत, त्यामध्ये पहिली सारथी, दुसरी बार्टी व तिसरी महाज्योति आहे. तुम्ही महाज्योतिच्या संस्थेच्या माध्यमातून राज्यातील लोकांना सहाय्य केले पाहिजे. अनेक गोष्टी मांडण्यासारख्या आहेत. पण त्यातील मी एकच गोष्ट मांडतो. आपण असा दुजाभाव कशासाठी करीत आहात ? बार्टीसारख्या या दोन्ही संस्था संशोधक विद्यार्थ्यांना मानधन म्हणून पहिली २ वर्षे ३१ हजार रुपये प्रति महिना व नंतरची ३ वर्षे ३५ हजार रुपये प्रति महिना याप्रमाणे रक्कम देतात. तसेच घरभाडे म्हणून पहिली २ वर्षे ७४४० रुपये प्रति महिना आणि नंतरची ३ वर्षे ८४०० रुपये प्रति महिना याप्रमाणे रक्कम देतात. तसेच आकस्मिक खर्च म्हणून पहिली दोन वर्षे १२ हजार रुपये प्रति महिना आणि नंतरची ३ वर्षे २५ हजार रुपये प्रति महिना याप्रमाणे रक्कम देतात आणि याशिवाय ३ टक्के दिव्यांगासाठी प्रति विद्यार्थी अतिरिक्त सहाय्य म्हणून २ हजार रुपये प्रति महिना रक्कम देतात. या सर्व सोयीसुविधा युजीसीच्या मार्गदर्शनानुसार देण्यात येतात. मात्र याला अपवाद महाज्योति संस्था आहे. ही संस्था पहिल्या २ वर्षांसाठी २० हजार रुपये देते म्हणजे तुम्ही सारथी व बार्टी संस्थांना ३१ हजार रुपये देता तर मग महाज्योति संस्थेला २० हजार रुपये का देत आहात ? ११ हजार रुपये कमी देत आहात. नंतरच्या ३ वर्षांसाठी २१ हजार रुपये देत आहात. तुम्ही संशोधन छात्र विद्यार्थी फेलोशीप यासाठी सोयीसुविधा उपलब्ध करुन देत नाही. विद्यार्थ्यांच्या मनामध्ये सारथी, बार्टी व महाज्योति यांच्याबाबत काही येता कामा नये, त्यांच्या संदर्भात आपल्या सरकारचे

असुधारित प्रत

सर्व नियोजन एकसारखे असले पाहिजे. त्यामुळे माननीय मंत्र्यांनी या विषयी निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो.

श्री. गोपिचंद पडळकर ....

सभापती महोदया, मला शेवटचा विषय ओबीसी आरक्षणाविषयी मांडावयाचा आहे. ओबीसीच्या राजकीय आरक्षणाच्या बाबतीत वेळकाढू धोरण सुरु आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये म्हणजे ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका यांमध्ये ओबीसींना नेतृत्व करण्याची संधी आहे. आमदारीकी किंवा खासदारकीला आरक्षण नाही. दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाला इम्पिरिकल डेटा गोळा करण्यासाठी सांगितले. तुम्ही राज्य मागास आयोगाची निर्मिती केली नाही. दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर तुम्ही दिनांक २४ मार्च, २०२१ रोजी आयोग स्थापन करीत आहात. तुम्ही आयोग स्थापन केल्यानंतर सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी २ महिने २१ दिवस लावले. सदस्यांची नियुक्ती केल्यानंतर निधीची प्रस्ताव मागण्यासाठी ३ महिन्यांचा वेळ घालविला आणि नंतर दिनांक १० डिसेंबर, २०२१ रोजी ५ कोटी रुपये मंजूर झाले. दिनांक ७ फेब्रुवारी, २०२२ रोजी अंतरिम अहवाल आला. अंतरिम अहवाल देताना मागासवर्ग आयोगाच्या अध्यक्षांची आणि त्या सर्व सदस्यांची एक बैठक झाली. त्यांनी ठराव केला की, आम्ही अंतरिम अहवाल देऊ शकत नाही. त्यांनी असे म्हटल्यानंतर सरकारने पुन्हा दबाव टाकून त्यांच्याकडून अंतरिम अहवाल घेतला. त्यावर सही, शिक्का मारुन तो अहवाल दिला होता. परंतु पेन ड्राईव्हमधील एक प्रत काढून तुम्ही सर्वोच्च न्यायालयात सादर केली. खरे म्हणजे ही राज्यातील लोकांसाठी चांगली गोष्ट नाही. तुम्ही पुन्हा हा आयोग बरखास्त केला. तुम्ही हे कशासाठी केले ? तुम्ही हा प्लॅन अगोदर केला होता. या आयोगावर असलेले उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश माननीय आनंद वसंत निरगुडे हे शिंपी समाजाचे आहेत, दुसरे न्यायाधीश चंद्रपाल मेश्राम भोई समाजाचे आहेत.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते की, आपले भाषण सुरु होऊन १२ मिनिटे झाली आहेत. आपण मुद्दे लक्षात घ्यावेत. आपण इतर

सन्माननीय सदस्यांना भाषणासाठी ५ मिनिटे दिली आहेत. मी वारंवार विनंती केली आहे. तुम्ही अर्ध्या मिनिटांत भाषण संपवावे.

श्री. गोपिचंद पडळकर : सभापती महोदया, अतिशय महत्त्वाचा मुद्दा आहे. राज्यातील ३४६ जातींचा समावेश असणाऱ्या ओबीसींचा मुद्दा मला २ मिनिटे मांडू द्यावा.

सभापती महोदया, बालाजी भिल्लारीकर सगर समाजाचे होते, संजीव सोनावणे माळी समाजाचे होते, गजानन खराटे धनगर समाजाचे होते, निलिमा सराफ कुणबी समाजाच्या होत्या, गोविंद काळे मराठा समाजाचे होते, लक्ष्मण हाके धनगर समाजाचे होते, ज्योतिराम चव्हाण बंजारा समाजाचे होते. हे सर्व विद्वान लोक आहेत. बबनराव तायवडे यांनी राजीनामा दिला. इतका व्यवस्थितपणे हा मागासवर्ग आयोग स्थापन केलेला असताना असे झाले. सदस्यांना सामजिक ज्ञान आहे, हे कोणत्याही राजकीय पक्षाचे लोक नाहीत आणि तरीही तुम्ही ४३४ कोटी रुपयांपैकी ८९ कोटी रुपयांचा नव्याने निधी दिला होता, तो परत घेतला आहे. मी राज्य सरकारचा जाहीर निषेध करतो. कारण महाराष्ट्रातील ओबीसींचा राजकीय खून करण्याचे तुम्ही ठरविले आहे. पण राज्यातील लोक तुम्हाला माफ केल्याशिवाय राहणार नाहीत. एवढे बोलून मी माझे भाषण वेळेअभावी पूण करतो.

----

असुधारित प्रत

**(सभापतीस्थानी तालिका सभापती डॉ. मनिषा कायंदे)**

श्री. सदाभाऊ खोत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, शेती क्षेत्रासाठी या अर्थसंकल्पामध्ये ११४७८ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. परंतु सरकारने एखादी नवीन महत्त्वकांक्षी अशी कोणतीही योजना शेती क्षेत्रासाठी अर्थसंकल्पामध्ये जाहीर केलेली नाही. ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्याचे जाहीर केले. पण ते २ वर्षांपूर्वी जाहीर केले होते. दारु तीच आहे, बाटली तीच आहे, फक्त लेबल बदलले आहे. ही घोषणा झाली आहे. पण हे पैसे सरकारने वेळेत द्यावेत. पीक कर्जाचे पुनर्गठण झाले. मात्र शेतकऱ्याला याचा लाभ मिळणार का याबाबत देखील खुलासा होणे अत्यंत गरजेचे आहे. अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी कोणतही योजना आलीच नाही. महात्मा फुले कर्जमाफी योजनेंतर्गत २ लाख रुपयांच्या वर ज्या शेतकऱ्यांनी कर्ज घेतले आहे त्यांच्यासाठी एकरकमी कर्ज परतफेड योजना आम्ही राबवू असे म्हटले होते. परंतु त्याबाबत देखील अर्थसंकल्पात कुठेही निर्णय घेतलेला दिसून येत नाही.

सभापती महोदया, अर्थसंकल्पात सांगितले आहे की, ६० हजार शेतकऱ्यांना विजेचे कनेक्शन नव्याने देऊ. परंतु मागणी पाहिली तर ती २ लाखांपेक्षा जास्त म्हणजे २ लाख ६० हजार शेतकऱ्यांची आहे. सर्व शेतकरी संपण्यास किमान ३-४ वर्षे लागतील, तोपर्यंत शेतकऱ्यांनी वीज वापरायची नाही का हा प्रश्न उपस्थित होतो. विजेच्या बाबतीत निर्णय घेतला आहे की, ३ महिन्यांपर्यंत शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन कापण्यास स्थगिती दिली आहे. ३ महिन्यांपर्यंत कोणाचेही कनेक्शन तोडणार नाही. संध्याकाळी फाशी देण्याऐवजी उद्या सकाळी देणार आहात असा तुमचा निर्णय आहे. राज्यातील शेतकऱ्यांना वीजमाफी मिळायला पाहिजे होती. पण त्याही बाबतीत कोणताही निर्णय घेतलेला दिसून येत नाही.

सभापती महोदया, अर्थसंकल्प मोठा म्हणजे ५ लाख ४८.७७७ कोटी रुपयांचा आहे. पण हा अर्थसंकल्प महाविकास आघाडी सरकारचा आहे की राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा आहे असा माझ्यासारख्याला प्रश्न पडतो. कारण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला या

श्री. सदाभाऊ खोत ....

अर्थसंकल्पातून ५७ टक्के रक्कम मिळाली आहे, काँग्रेस पक्षाला २६.२७ टक्के रक्कम मिळाली आहे आणि शिवसेना पक्षाला फक्त १६ टक्के रक्कम मिळाली आहे. अर्थसंकलपामध्ये शेतमजुरांसाठी काहीही मिळालेले नाही. शेतकऱ्यांना काहीही मिळालेले नाही. शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीमध्ये जी मदत मिळाली पाहिजे होती, ती वेळेत मिळाली नाही. शेतकऱ्यांना १० महिने, एक वर्ष मदत मिळाली नाही. आम्ही माननीय श्री. देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात एक निर्णय घेतला होता की, जर शेतकऱ्यांची जमीन विकास कामासाठी घेतली तर त्याला चौपट मदत दिली जाईल. मात्र आपण केवळ दुप्पट मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांवर तेथेही अन्याय करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे.

सभापती महोदया, अन्नप्रक्रिया उद्योगाला चालना देण्याची घोषणा केली आहे. पण राज्यामध्ये २ वर्षात शेतकऱ्यांच्या शेतमालावरील कोणताही नवीन उद्योग उभा राहू शकलेला नाही. मी आपल्या लक्षात वस्त्रोद्योगाबाबतची एक गोष्ट आणून देतो. कोरोना काळात वस्त्रोद्योगाला चालना देण्यासाठी वीजमाफी सवलत योजना लागू करायला पाहिजे होती. इचलकरंजी, मालेगाव, भिवंडी येथे मोठ्या प्रमाणात वस्त्रोद्योग आहेत. त्यांना कोणत्याही प्रकारची वीज सवलत दिली नाही. विदर्भ, मराठवाड्याला पूर्वी सन २०१९ मध्ये वीज सवलत दिली होती. परंतु तुम्ही तीही वीज सवलत उद्योगांना दिली नाही. त्यामुळे उद्योगवाढीला देखील या अर्थसंकल्पातून काही मिळाले आहे असे दिसून येत नाही.

सभापती महोदया, मला पणन विभागाच्या बाबतीत सांगावयाचे आहे. शेतकऱ्यांना दलाल, अडते यांच्या कचाट्यातून मुक्त केले पाहिजे होते आणि त्यासाठी त्या दृष्टीने शेतकऱ्यांसाठी काही योजना फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या माध्यमातून राज्यात राबविल्या पाहिजे होत्या. पण त्या देखील योजना राबविण्याचे धोरण कुठेही दिसत नाही. विकेल ते पिकेल. नेमके विकायचे कसे, पिकवायचे काय याबाबतीत देखील कोणतेही स्पष्ट धोरण नाही. गेल्या वर्षीचे पीक विम्याचे पैसे देखील राज्यातील शेतकऱ्यांना अजुनपर्यंत मिळालेले नाहीत. तुमचे शेतीवरील प्रेम

श्री. सदाभाऊ खोत ....

फार आहे. कारण वाईन उद्योजकांना खूष करण्यासाठी काही निर्णय घेतले आहेत. देशी, परदेशी दारुवरील कर देखील कमी केले आहेत. मला वाटते की, आता वनस्पती हर्बल तंबाखूला देखील उत्तेजन दिले पाहिजे होते, जेणेकरुन राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या असत्या.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

श्री.सदाभाऊ खोत....

अतिवृष्टी व महापुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना एनडीआरएफच्या निकषाच्या बाहेर जाऊन आमच्या सरकारने राज्यातील शेतकऱ्यांना चार पट मदत केली होती. या सरकारने त्या दृष्टीने कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

सभापती महोदया, तालुका स्तरावरील गृह विभागाच्या अनेक कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी घरे नाहीत. तालुक्याच्या ठिकाणी अत्यंत जुनी घरे आहेत ती मोडकळीस आली आहेत. तेथे शौचालयाची व्यवस्था नाही. त्याबाबत चांगला निर्णय शासनाला घ्यावा लागेल. जे पोलीस सेवानिवृत्त झाले त्यांना त्यांची देणी वेळेत मिळत नाही. त्यांना आरोग्याच्या सुविधा मिळत नाहीत. याबाबत योग्य घोषणा झाली असती तर बरे झाले असते.

सभापती महोदया, मराठा आरक्षण मिळविण्यासाठी न्यायमूर्ती श्री.दिलीप भोसले यांच्या समितीने १२ मुद्दे सूचविले होते, त्यामध्ये मराठा मागासवर्ग आयोग स्थापन करुन मराठा समाज मागासलेला आहे हे सिध्द करायचे होते, याबाबत हे शासन कोणताही निर्णय घेत नाही. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी स्वतंत्रपणे अर्थसंकल्पात निधीची तरतूद केल्याचे दिसून येत नाही.

सभातपी महोदया, मंत्री महोदयांना मी विनंती करतो की, शेतकऱ्यांचे नेते व शेतकरी चळवळीचे प्रणेते प्रा.एन.डी.पाटील यांचे उचित स्मारक होणे अत्यंत गरजेचे आहे. त्याच बरोबर कर्मवीर भाऊराव अण्णा पाटील यांनी शिक्षणाची गंगा सर्व सामान्य माणसाच्या दारात पोहचविली त्यांचे उचित स्मारक व्हावे अशी मी विनंती करतो. गृह राज्यमंत्री महोदयांना मी विनंती करतो की, "द काश्मीर फाईल्स" हा चित्रपट आठ राज्यात करमुक्त केला आहे. हा चित्रपट आपल्या राज्यात करमुक्त करावा. गृह राज्यमंत्री शिवसेना पक्षाचे आहेत. यासाठी ९० आमदारांनी पत्रे दिली आहेत. शिवसेना ही हिंदुत्वाला खऱ्या अर्थाने विसरलेली नाही असे मी समजतो. त्यामुळे हा चित्रपट करमुक्त होणे अत्यंत गरजेचे आहे. धन्यवाद.

-----

असुधारित प्रत

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**श्रीमती आदिती तटकरे, माननीय राज्यमंत्री यांचे**

**वाढदिवसाबाबत अभिष्टचिंतन**

**सभापती** : माननीय राज्यमंत्री श्रीमती आदिती तटकरे यांचा आज वाढदिवस आहे सभागृहाच्या वतीने मी त्यांचे अभिष्टचिंतन करतो.

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशनबाबत**

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने पॉईंट ऑफ इन्फर्मेशन मांडत आहे. या विषयाबाबत गृह राज्यमंत्री महोदयांकडून मला उत्तर हवे आहे. काल मुंबई विद्यापीठात साने गुरुजी ट्रस्ट व काही संस्थांच्या वतीने चर्चा सत्राचे आयोजन केले होते. चर्चा सत्राच्या वेळी तेथे पुस्तकांचे काही स्टॉल लावण्यात आले होते. त्यामध्ये मार्क्सवादी साहित्याच्या संदर्भात एक स्टॉल होता तो तेथून पोलिसांच्या सहाय्याने काढून टाकण्यात आला. खरे तर विद्यापीठात पोलीस येऊ शकत नाही. त्या स्टॉलवर कोणतेही आक्षेपार्ह साहित्य नव्हते, बंदी घातलेली पुस्तके नव्हती. राहूल सांस्कृत्यायन सारख्या विज्ञान पंडितांची पुस्तके तेथे होती. साने गुरुजींच्या संस्थेतर्फे तो कार्यक्रम आयोजित केला होता. तो स्टॉल उचलण्यात आला. त्यांना विचारण्यात आले की, हे कोणी सांगितले. त्यांनी असे सांगितले की, वरतून प्रेशर आहे. वरतून म्हणजे मंत्रालयातून की, दिल्लीतून प्रेशर आहे हा प्रश्न आहे. मला वाटते आपल्या राज्यात आपण अशा पध्दतीचे कोणतेही प्रेशर टाकत नाही. अभिव्यक्ती स्वातंत्र्याला, प्रचार साहित्याला पूर्णपणे आपण मूभा देतो. गृह राज्यमंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, याबाबत चौकशी झाली पाहिजे. विद्यापीठांमध्ये पोलिसांनी आंगतुकपणे प्रवेश करणे हे मुळात अत्यंत चुकीचे आहे. असा पायंडा पाडला जाऊ नये. ही गंभीर घटना आहे. याची दखल मंत्री महोदयांनी गंभीरपणे घ्यावी.

असुधारित प्रत

श्री.शंभूराज देसाई : सभापती महोदय, या संपूर्ण प्रकरणाची माहिती घ्यावी लागेल. सदर माहिती प्राप्त झाल्यावर सन्माननीय सदस्यांना त्याबाबत अवगत केले जाईल.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु.शी. :** सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

(चर्चा पुढे सुरु....

श्री.शंभूराज देसाई (अर्थ राज्यमंत्री) : सभापती महोदय, गेल्या तीन दिवसापासून या सभागृहात अर्थसंकल्पावर चर्चा सुरु आहे. या चर्चेमध्ये एकूण ३५ सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. या चर्चेची सुरुवात माननीय विरोधी पक्ष नेते श्री.प्रवीण दरेकर यांनी केली. त्यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.मनिषा कायंदे, सन्माननीय सदस्य श्री. शिशिकांत शिंदे, सन्माननीय सदस्य श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र दराडे, सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड, सन्माननीय सदस्य श्री.अभिजीत वंजारी, सन्माननीय सदस्य श्री.अमोल मिटकरी, सन्माननीय सदस्य श्री.अंबादास दानवे, सन्माननीय सदस्य श्री.प्रवीण दटके, सन्माननीय सदस्य श्री.राजेश राठोड, सन्माननीय सदस्य श्री.रामराव पाटील, सन्माननीय सदस्य श्री.रविंद्र फाटक, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे, सन्माननीय सदस्य श्री.अरुण लाड, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे, सन्माननीय सदस्य श्री.विलास पोतनीस, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील, सन्माननीय सदस्य श्री.जयंत आसगावकर, सन्माननीय सदस्य डॉ. परिणय फुके, सन्माननीय सदस्य श्री.संजय दौंड, सन्माननीय सदस्या डॉ.प्रज्ञा सातव, सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर, सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे, सन्माननीय सदस्य श्री.अनिकेत तटकरे, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे, सन्माननीय सदस्य ॲड.निलय नाईक, सन्माननीय सदस्य श्री. रामदास आंबटकर, सन्माननीय सदस्य श्री.रमेशदादा पाटील, सन्माननीय सदस्य श्री.नागोराव गाणार, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे, सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील, सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर, सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत या सन्माननीय सदस्यांनी या चर्चेत भाग घेतला. या चर्चेला सुरुवात झाल्यापासून समारोप होईपर्यंत सन्माननीय सदस्य काय बोलले ते बारकाईने मी लिहून घेतले. त्या संपूर्ण चर्चेचे टीपण काढून विभागाकडून माहिती मिळविली.

असुधारित प्रत

श्री.शंभूराज देसाई...

आता यातील ८० ते ९० टक्के सन्माननीय सदस्य चर्चेचे उत्तर ऐकण्यासाठी सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे रिकाम्या बाकांपुढे उत्तर देण्यापेक्षा जे सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत त्यांनी जे मुद्दे मांडले त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न मी सरकारच्या वतीने करतो.

सभापती महोदय, दिनांक ११ मार्च २०२२ रोजी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्मृतीदिनी महाविकास आघाडी शासनाने छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करुन तिसरा अर्थसंकल्प विधिमंडळात सादर केला. महाविकास आघाडीचे नेते माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार, रमाननीय महसूल मंत्री श्री.बाळासाहेब थोरात या तिघांच्या मार्गदर्शनाखाली व मुख्यमंत्री महोदयांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडी शासनाचा तिसरा अर्थसंकल्प सभागृहात सादर केला.

सभापती महोदय, आपणा सर्वांना कल्पना आहे की, महाविकास आघाडी सरकार आल्यानंतर सन २०२० हे पूर्ण वर्षे व सन २०२१ मधील ८ ते १० महिने म्हणजे जवळपास पाऊणे दोन वर्षे या सरकारला कोरोना महामारीला सामोरे जावे लागले. त्याचा परिणाम राज्याच्या तिजोरीत जी रक्कम जमा व्हायला पाहिजे होती त्या प्रमाणात ती रक्कम जमा होऊ शकली नाही. कर्ज काढावे लागले हे आपणा सर्वांना माहिती आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी त्याचा उल्लेख केला. त्यासंदर्भातील खुलासा मी पुढे करणार आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, योजना दिल्या व अर्थसंकल्पीय तरतुदीला कट लावला. मागील वर्षाचा अर्थसंकल्प मांडत असताना अपेक्षित रक्कम जमा होईल असे गृहित धरण्यात आले होते. कोविडची दुसरी व तिसरी लाट येईल असे अपेक्षित नव्हते. त्या आधारे व्यवसाय, कारखानदारी, व्यापार, आयात निर्यात पहिल्या सारखे सुरु होईल व तिजोरीत अपेक्षित रक्कम जमा होईल त्या अनुषंगाने योजनांवर खर्च करता येईल. अशा पध्दतीचे अनुमान शासनाच्या वतीने करण्यात आले होते. निधी वितरीत करण्याची वेळ आली व मार्च अखेर कोरोनाचा प्रादुर्भाव वाढला. दीड ते दोन

असुधारित प्रत

श्री.शंभूराज देसाई...

महिन्यांनी माननीय अर्थमंत्री श्री.अजित पवार व मी आढावा घेतो. सभापती महोदय, आपण साताऱ्या जिल्ह्यातील आहात. वित्त मंत्री महोदयांची कामाची पध्दत आपणाला माहिती आहे.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.शंभुराज देसाई.......

आपण ग्रामीण भागातील म्हणी प्रमाणे अंथरुन पाहून पाय पसरले पाहिजेत. माननीय वित्तमंत्री श्री.अजित पवार साहेबांनी प्रत्येक वेळी वित्त विभागाचा आढावा घेताना अपेक्षित उत्पन्न जमा झालेले आहे किंवा नाही, केंद्र शासनाकडून मागील पंधरवाड्यातील जीएसटीचा परतावा प्राप्त झालेला आहे काय, राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे काही कागदपत्रे सादर करावयाची राहिलेली आहेत काय, टॅक्स कलेक्शनच्या सोर्स प्रमाणे प्रत्येक विभाग टॅक्स जमा करतो किंवा नाही या बाबींवर मागील वर्षभरात बारवाईने लक्ष ठेवले. महसुलाचे अपेक्षित उत्पन्न जमा झाले पाहिजे. एखादा विभाग कराचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात कमी पडत असेल तर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलावून त्यांच्याबरोबर चर्चा करुन वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे कराचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी तगादा लावण्यात येत होता. त्याचा परिणाम असा झाला की, आपण योजनांसाठी जेवढी तरतूद केली होती तेवढी तरतूद नाही परंतु आपण विभागानुसार प्रत्येक योजनेसाठी ६०, ७० ते ८० टक्के तरतूद उपलब्ध करुन देण्याचे काम केलेले आहे.

सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, माननीय विरोधी पक्षनेते काही कारणामुळे दोन दिवसांपासून सभागृहात उपस्थित नाहीत. विरोधी पक्षनेते पदाचा मान आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचा मी थोडक्यात आढावा घेणार आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, मागील वर्षात सरकारवरील कर्जाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढलेले आहे. प्रत्येक कुटुंबातील व्यक्तीवर किती कर्ज आहे याचा उल्लेख त्यांनी केला. मी या निमित्ताने माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, केंद्र शासनाने मागील वर्षी जीएसडीपीच्या तुलनेत राज्याला साधारणत: ३ टक्के व कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अर्धा टक्के जास्तीचे कर्ज असे एकूण ३.५ टक्क्यापर्यंत कर्ज काढण्याची सवलत दिली. महाराष्ट्र शासनाने ३.५ टक्क्याच्या आत राहून २.६४ टक्के इतकेच कर्ज काढलेले आहे. मध्यप्रदेश सरकारने ५.४४ टक्के, राजस्थान सरकारने ५.८६ टक्के, कर्नाटक सरकारने ३.२३

असुधारित प्रत

श्री.शंभुराज देसाई.......

टक्के कर्ज काढलेले आहे. आपण उपरोक्त ४ राज्यांनी काढलेल्या कर्जाचे प्रमाण बघितले तर सर्वात कमी कर्ज महाराष्ट्र राज्याने काढलेले आहे. कर्ज काढण्याची मूळ मर्यादा ३ टक्के आहे, वाढीव मर्यादा ३.५ टक्के आहे. आपण ३ टक्क्याची मर्यादा सुद्धा ओलांडली नाही. माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव ठाकरे साहेब व माननीय वित्तमंत्री श्री.अजित पवार साहेबांच्या नेतृत्वाखालील सरकारने २.६४ टक्यांच्या मर्यादेत कर्ज काढून राज्य चालविण्याचा, आर्थिक शिस्त लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. राज्यातील जनतेसमोर ती आकडेवारी आली पाहिजे. परंतु प्रत्येक व्यक्तीच्या डोक्यावर अमूक हजाराचे, तमूक हजाराचे कर्ज आहे अशा पद्धतीची भाषणे करुन, तशा प्रकारची आकडेवारी रकॉर्डवर आणून राज्यातील जनतेमध्ये संभ्रम निर्माण केला जातो. आमच्या पक्षाचे सरकार सत्तेवर असताना चांगले काम सुरु होते. परंतु मागील दोन वर्षांपासून यांची सत्ता आल्यानंतर यांनी जनतेच्या डोक्यावर कर्ज करुन ठेवले असे सांगण्याचा प्रयत्न केला जातो. परतु अशातला भाग नाही. केंद्र शासनाने ३.५ टक्क्यापर्यंत कर्ज काढण्याची मर्यादा दिलेली आहे. राज्याकडे आणखी एक टक्का कर्ज काढण्याची मर्यादा असताना आपण त्या मर्यादेच्या आत कर्ज काढून राज्य चालविण्याचा प्रयत्न केला. आपण कोविडच्या कामासाठी एक पैसाही कमी पडू दिला नाही. आपण मागील वर्षभरात जेम्बो कोविड सेंटर चालविले, मोठया प्रमाणावर कोविड लसीकरण केले, मुलांचे लसीकरण सुरु केले, जेम्बो कोविड सेंटर सुरु केले, कोविड केअर सेंटर्स सुरु केले. आपण ग्रामीण रुग्णालयांमध्ये ऑक्सिजनचे प्लँट सुरु केले. आम्ही अर्थसंकल्प सादर करताना सांगितले की, ज्यावेळी कोविडची पहिली लाट आली त्यावेळी शेजारच्या २-३ राज्यांमधून ऑक्सिजन आणावा लागला. कोरोना काळात शेजारच्या राज्यात रेल्वे वॅगन पाठवून तेथून ऑक्सिजन आणावा लागला. परंतु आपण मागील दिड वर्षांपासून प्रत्येक जिल्हा रुग्णालय, उप जिल्हा रुग्णालय किंवा तालुका स्तरावरील ग्रामीण रुग्णालयात सुद्धा ऑक्सिन निर्मितीचे स्वतंत्र प्लँट उभे केलेले आहेत. महाराष्ट्र राज्य ऑक्सिजनच्या बाबतीत स्वंपूर्ण झालेले आहे. मी सभागृहाला पुन्हा सांगू इच्छितो की, राज्याची कर्ज

श्री.शंभुराज देसाई.......

काढण्याची मर्यादा शिल्लक असताना आपण राज्याला आर्थिक शिस्त लावण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, यावर्षी अपेक्षित महसूल जमा ९.५ टक्क्यांनी वाढलेली आहे. आपण कर महसुलात साधारणत: ७.९१ टक्क्यांनी वाढ अपेक्षित धरलेली आहे. राजकोषिय तूट निश्चितपणे २.५ टक्क्यापर्यंत आहे. आपण मागील आर्थिक वर्षाची तुलना केली तर ती मर्यादा २.७९ टक्के एवढी होती. म्हणजे आपण यावर्षी राजकोषिय तूट देखील कमी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मी सांगू इच्छितो की, कोविडचे संकट कमी झाल्यानंतर आपण राज्याच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याचा प्रयत्न केलेला आहे. जेथे टॅक्स लिकेज होते ते शोधून काढून अधिकचे उत्पन्न कसे मिळेल यासाठी आपण प्रयत्न केलेला आहे. जो कर भरण्यासाठी पात्र आहे, परंतु पळवाट शोधून कराच्या स्लॅबमध्ये येण्यासाठी टाळाटाळ करीत आहे, काही बाबी चुकवून किंवा शासनाची दिशाभूल करुन कराच्या स्लॅबमध्ये येत नाहीत त्यांचा जीएसटी, व्हॅट विभागाच्या माध्यमातून शोध घेऊन आपण राज्याचे उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे केंद्र शासनाने जीएसडीपीच्या तुलनेत आपल्याला अर्धा टक्के म्हणजे ३.५ टक्के कर्ज काढण्याची मर्यादा वाढवून दिली. आपण त्या मर्यादेच्या आत कर्ज काढले. मला कोणाची तुलना करावयाची नाही. परंतु केंद्र शासनाचे कर्ज काढण्याचे प्रमाण बघितले तर ते ६.४३ टक्क्याच्या पुढे गेलेले आहे. केंद्र शासनाचे कर्ज काढण्याचे प्रमाण वाढलेले आहे. परंतु राज्य शासनाने मर्यादेच्या आत कर्ज काढण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, केंद्र शासनाकडून अनुदान वाढवून मिळते. परंतु केंद्र शासन पैसे देत नाही, असे राज्य शासनाकडून सांगितले जाते. मी या निमित्ताने सभागृहाला आकडेवारी देऊ इच्छितो. केंद्र शासनाकडून राज्याला जीएसटीचा परतावा मिळतो. राज्याला केंद्र शासनाकडून

श्री.शंभुराज देसाई.......

सन २०१९ मधील १०२९ कोटी रुपये येणे बाकी आहेत. सन २०२०-२१ मधील ६४७१ कोटी रुपये, सन २०२१-२२ मधील १८९७८ कोटी रुपये असे एकूण २६५०० कोटी रुपये मार्च अखेर येणे बाकी आहेत. कोरोना काळात राज्यावर कर्ज काढण्याची वेळ आली तशी वेळ केंद्र शासनावर सुद्धा आली. महाराष्ट्र राज्य कर रुपाने देशाच्या उत्पन्नात भर घालणारे सर्वात मोठे राज्य आहे. ज्याप्रमाणे इतर राज्यांना वेळेवर परतावा दिला जातो त्याप्रमाणे महाराष्ट्र राज्याला सुद्धा परतावा मिळाला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे साहेब आपल्याला आपले वजन वापरून केंद्र शासनाने महाराष्ट्राकडे सवतीच्या भावनेने बघू नये असे सांगावे लागेल. केद्राकडून राज्याला २६५०० कोटी रुपये येणे बाकी आहेत, ते मार्च अखेर पर्यंत मिळाले पाहिजेत. सन २०१९ मधील जीएसटी परताव्याची रक्कम बाकी आहे. सन २०२०-२१ मधील पैसे येणे बाकी आहेत. आता मार्च महिना संपत आलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या कामांना कट लावला, त्या कामांना कट लावला, स्थानिक पातळीवर पैसे वितरित झाले नाहीत. केंद्र शासनाकडून २६५०० कोटी रुपये मिळाले तर आपल्याला या अडचणी निश्चितपणे दूर करण्याचा प्रयत्न करता येईल.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, ३ पक्षाच्या सरकारमध्ये शिवसेना पक्षाच्या वाट्याला कमी निधी आलेला आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांचे भाषण राजकीय होते, त्यांनी हा मुद्दा कशासाठी उपस्थित केला, हे मला माहिती नाही. महाविकास आघाडी सरकार सत्तेवर आले तेव्हा पासून आपण यांच्यामध्ये कधी बिनसते याची वाट बघत आहात. आपण सातत्याने आकडेवारी देण्याचा प्रयतन करता. आपल्या माहिती आहे की, बहुतांश आमदार ग्रामीण भागातून निवडून येतात. आपण जलसंपदा विभागाचे उदाहरण घेतले तर जलसंपदा विभागाचे मोठे प्रकल्प आहे. त्यासाठी केंद्र शासनाकडून काही निधी मिळतो.

यानंतर श्री.सांगळे......

श्री.शंभुराज देसाई...

केंद्र शासनाचा ६०:४० किंवा ५०:५० टक्क्यांचा प्रकल्प असो, सदर प्रकल्पांसाठी केंद्र शासनाकडून जेवढा निधी दिला जातो त्याची मॅचिंग ग्रँट राज्य शासनाकडून दिली जाते. राज्य शासनाचे असे धोरण आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंधारण, जलसंपदा विभागांमधील प्रकल्प किंवा मोठमोठया रस्त्यांचे प्रकल्प असो, त्याकरिता राज्य शासनाकडून तरतूद केली जाते. अशा प्रकारे ग्रामीण भागांशी संबंधित विकासाच्या योजना राबविणाऱ्या विभागांकरिता साहजिकच त्यांच्याकडे असलेल्या कामाच्या व्याप्तीनुसार शासनाकडून तरतूद केली जाते. परंतु सदर विभागांकरिता जास्त तरतूद केलेली आहे. त्यामुळे संबंधित पक्षाला जास्त निधी दिला असे होत नाही. महाविकास आघाडी शासनाकडे १७० प्लस बहुमत आहे. आपण कितीही जगलरी केली किंवा कितीही आकडेवारी प्रसिध्द करुन ती रेकॉर्डवर आणण्याचा प्रयत्न केला तरी १७० चे १७५ होतील. परंतु १७० ते १६९ होणार नाहीत. ही बाब आपण सातत्याने लक्षात ठेवावी. तसेच हा आमच्या कुटुंबातील विषय आहे. आम्ही तिन्ही पक्षांनी असे ठरविले आहे की, महाविकास आघाडीमध्ये अंतिम शब्द हा शिवसेनेचे पक्ष प्रमुख आदरणीय श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचा असेल. तसेच ते आम्हाला जे सांगतील तो महाविकास विकास आघाडीमधील अंतिम निर्णय असेल. त्यामुळे आपण आमच्यामध्ये अशा प्रकारे कितीही भांडणे लावण्याचा प्रयत्न केला तरी त्याचा आमच्यावर कोणताही परिणाम होणार नाही.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकरांनी त्यांच्या भाषणात वंचित घटकांना मागे ठेवल्यासंबंधी उल्लेख केला होता. मी याबाबत सदनाला सांगू इच्छितो की, सन २०२१-२२ मध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या वंचित घटकांकरिता १२३० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यानंतर सन २०२२-२३ मध्ये सदर घटकांकरिता १६३५ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. अशा प्रकारे यावर्षी सदर घटकांकरिता मागील वर्षीपेक्षा २०० ते २२५ कोटी रुपयांची वाढ केलेली आहे.

श्री.शंभुराज देसाई...

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकरांनी त्यांच्या भाषणात अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळासंबंधी उल्लेख केला होता. मी याबाबत सदनाला सांगू इच्छितो की, सन २०२१-२२ मध्ये सदर महामंडळाकरिता ९६८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. परंतु सन २०२२-२३ मध्ये सदर महामंडळाकरिता शासनाने १०३८ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. तसेच माननीय विरोधी पक्षनेत्यांनी ज्योर्तिलिंगापासून अनेक विषयासंबंधी उल्लेख केला होता. त्या प्रत्येकासाठी शासनाने निधी वाढवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच त्यांनी विमानतळासंबंधी विषय उपस्थित केला होता. सभापती महोदय, शासनाने विमानतळांकरिता भरीव तरतूद केलेली आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकरांनी त्यांच्या भाषणात शिकाऊ उमेदवारासंबंधी उल्लेख केला होता. मी याबाबत सदनाला सांगू इच्छितो की, कोविड काळात कौशल्य विकास विभागाअंतर्गत ऑफलाईन प्रशिक्षण देता येत नव्हते. प्रत्यक्ष क्लासेस भरण्यासाठी मर्यादा होत्या. त्यामुळे विभागाच्या माध्यमातून जास्तीत जास्त ऑनलाईन बॅचेस देण्यात आल्या.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकरांनी त्यांच्या भाषणात उद्योग विभागासंबंधी इंडस्ट्रीयल ग्रोथ, सामजंस्य करारासंबंधी नेमके काय झाले ? याबाबत उल्लेख केला होता. मी त्याबाबत सदनाला सांगू इच्छितो की, २ वर्षांच्या काळात जवळपास ९८ सामजंस्य करार करण्यात आले व त्या माध्यमातून राज्यात ४ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणुकीला चालना देण्यासाठी प्रयत्न करण्यात आला. ९८ सामजंस्य करारापैकी १५ प्रकल्प बांधकामाधीन आहेत, ५८ प्रकल्पांना जमीन हस्तांतरीत करण्यात आली आहे. ५ प्रकल्पांना जमीन हस्तांतर करण्याची प्रक्रिया प्रगतीप्रथावर आहे. १३ प्रकल्पांकरिता खाजगी जमीन घेण्याची प्रक्रिया सुरु आहे. २ प्रकल्पांकरिता अद्याप जमीन प्राप्त न झाल्यामुळे उद्योग विभागामार्फत त्याकरिता जमीन शोधण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच ९८ सामजंस्य करारापैकी फक्त ५ प्रकल्प काही ना काही कारणास्तव ऑन होल्ड राहिले

श्री.शंभुराज देसाई...

आहेत. त्यामुळे उद्योग विभागासंबंधी त्यांच्याकडून जाणीवपूर्वक सांगण्यात आले की, सामजंस्य करार केल्यानंतर देखील प्रकल्प ऑन होल्ड ठेवण्यात आलेले आहेत.

सभापती महोदय, वैधानिक विकास मंडळे अस्तित्वात नसल्यासंबंधी सांगण्यात आले. वैधानिक विकास मंडळांशिवाय त्या विभागांचा विकास कसा करणार आहात ? अशी विचारणा करण्यात आली. मी याबाबत सदनाला सांगू इच्छितो की, वैधानिक विकास मंडळे नसली तरी वैधानिक विकास मंडळे असताना त्या विभागांमधील कामांकरिता ज्या टक्केवारीचे प्रमाण राखून ठेवले जात होते. त्याच प्रमाणे संबंधित विभागांमधील योजनांकरिता सदर निधी राखून ठेवण्याचे सूत्र नियोजन विभागामार्फत केले जात आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकर तसेच सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांनी त्यांच्या भाषणात सारथी, बाटी तसेच महाज्योती अशा ३ संस्थांचा उल्लेख केला होता. मी त्याबाबत सदनाला सांगू इच्छितो की, तिन्ही संस्थांना त्यांच्या मागणीनुसार नियतव्यय उपलब्ध करुन देण्यासाठी संबंधित विभागांकरिता तरतूद करण्याचा शासनाने प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकर यांनी त्यांच्या भाषणात महाराष्ट्राला मद्यराष्ट करण्याचा प्रयत्न करुन राज्यात दारुकरिता सवलती दिल्यासंबंधी उल्लेख केला होता. मी त्याबाबत सदनाला सांगू इच्छितो की, विदेशी मद्याचे शुल्क ३०० टक्क्यांवरुन १५० टक्के करण्याचा शासनाने निर्णय घेतला. याचे कारण असे आहे की, बॉर्डरवर असलेल्या राज्यांमध्ये सदर विदेशी मद्याचे शुल्क आपल्या राज्यापेक्षा कमी होते. त्यामुळे त्या राज्यांमधून आपल्या राज्यामध्ये चोरीच्या मार्गाने विदेशी मद्य यायचे. त्यामुळे आपल्या राज्यातील विदेशी मद्याच्या विक्रीवर परिणाम होत होता. म्हणून विदेशी मद्याचे शुल्क कमी करण्यात आले. त्या अनुषंगाने सदर ३ महिन्यांची तुलना मागील वर्षाशी केल्यास शासनाने घेतलेल्या निर्णयामुळे राज्यातील विदेशी मद्याच्या विक्रीत वाढ झाली आहे. तसेच शासनाने विदेशी मद्यावरील कर कमी करुन देखील दुप्पट उत्पन्न झालेले आहे. राज्यातील व

असुधारित प्रत

श्री.शंभुराज देसाई...

यामधील सर्व व्यवहार विचारात घेतल्यास ही सर्व टक्केवारी एकूण मद्याच्या टक्क्याच्या फक्त एक टक्का इतकी आहे. बाहेरील राज्यातून चोरीच्या पध्दतीने येणारे मद्य तस्करी बंद व्हावी. तसेच त्यावर आळा घालण्यासाठी शासनाने प्रायोगिक तत्त्वावर यासंबंधी घेतलेला निर्णय यशस्वी झाल्याचे दिसून आले आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकर यांनी सातारा येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या संग्रहालयाच्या कामाकरिता शासनाकडून निधी दिला जात नसल्यासंबंधी उल्लेख केला होता. मी त्याबाबत सदनाला सांगू इच्छितो की, आपल्याला त्याची जाणीव आहे. मागील २ वर्षांपासून छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयामध्ये जंबो कोविड सेंटर सुरु करण्यात आले. कोविड काळात त्या रुग्णालयाचा हजारो रुग्णांना उपयोग झाला. त्यामुळे हजारो रुग्णांचे प्राण वाचू शकले. सातारा येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या संग्रहालयाची इमारत तयार आहे. तेथे ऐतिहासिक जुने संग्रहालय होते. त्याऐवजी आता भव्य इमारत बांधून तयार आहे. आता कोविडची लाट जवळपास संपत आली आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार दोन महिन्यांपूर्वी सातारा येथील दौऱ्यावर आले होते. त्यावेळी त्यांनी असे सांगितले होते की, कोविड रुग्णालय शिफ्ट झाल्यानंतर उर्वरित कामांसाठी आवश्यक असलेला सर्व निधी वित्त विभागाकडून दिला जाईल. अशा प्रकारे लवकरच छत्रपती शिवाजी महाराजांच्या संग्रहालयाचे काम पूर्ण केले जाईल.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकर यांनी त्यांच्या भाषणामधून असा मुद्दा उपस्थित केला होता की, वित्त विभाग किंवा मंत्रालयांमधील संबंधित विभागांमध्ये २५ कोटी रुपयांपेक्षा जास्त असलेल्या नस्त्यांसंबंधी मी माहिती मागितली असता मला सदर माहिती मिळू शकली नाही. मी या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांना सल्ला विचारतो. आपण ५ वर्षे कॅबिनेट मंत्री होता. एक लाख रुपये ते दहा लाख रुपयांची नस्ती, १० लाख रुपये ते ५० लाख रुपयांची नस्ती, ५० लाख रुपये ते एक कोटी रुपयांची नस्ती अशा प्रकारे मंत्रालयामध्ये नस्त्यांची वर्गवारी केली जात नाही. मी अडीच वर्षांपासून वित्त

श्री.शंभुराज देसाई...

राज्यमंत्री म्हणून काम करीत आहे. मला अशा प्रकारे वर्गवारी केली असल्याचे कधीही आढळून आले नाही. अशा परिस्थितीत माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकर यांनी २५ कोटी रुपयांपेक्षा जास्त असलेल्या नस्त्यांसंबंधी कशी माहिती विचारली ? अशा प्रकारे रकमेनुसार नस्त्यांची वर्गवारी केली जात नसल्यासंबंधी त्यांना शासनाकडून उत्तर देण्यात आले. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, अशा प्रकारे सकारी कामकाजामध्ये रकमेनुसार नस्त्यांसंबंधी उल्लेख केला जात नाही.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत

श्री.शंभुराज देसाई .....

सभापती महोदय, थोडया वेळापूर्वी मी सभागृहात उपस्थित होतो, त्यावेळी उप सभापती महोदया होत्या, महिला व बालकल्याण विभागाच्या एका विषयावर चर्चा करताना सोलापूर जिल्हयात विधवांचे प्रमाण शुन्य आहे असा उल्लेख झाला, माननीय सभापती महोदयांनी निवेदन करण्याबाबत सांगितले होते. माझ्या माहितीनुसार महिला बालकल्याण मंत्री महोदयांनी सभागृहात त्या अनुषंगाने आज निवेदन केले आहे.

सभापती महोदय, कृषी क्षेत्रात महिलांकरीता काही योजना आहेत का, या योजना तुम्ही दाखविलेल्या नाहीत असे माननीय विरोधी पक्ष नेते म्हणाले. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, राज्यस्तरावरील व जिल्हास्तरावरील सर्व योजना, व्यक्तीगत लाभाच्या योजना किंवा कृषी संबंधी योजना असतील, यापूर्वी त्या योजनांमधील ३० टक्के वाटा महिलांकरीता राखीव म्हणून ठेवला जायचा, आता हे प्रमाण ५० टक्क्यावर नेलेले आहे. ३० ऐवजी ५० टक्के समावेश आता राहिल. सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी उल्लेख केला आहे की, नाबार्डचे काम सुचविताना विधान परिषद सदस्यांचाही उल्लेख करण्यात यावा. निश्चितपणाने त्यांच्या भावना माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्या निदर्शनास आणून दिल्या जातील. सन्माननीय सदस्य श्री.रणजितसिंह मोहिते पाटील यांनी पशुसंवर्धन विभागाबाबत मुद्दा उपस्थित केला होता. सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास निधी न दिल्याबाबत सांगितले होते. मी त्यांना सांगू इच्छितो की, सन २०२२-२३ मध्ये २०० कोटीची तरतूद डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या कामासाठी केलेली आहे. तसेच त्यांना सांगू इच्छितो की, मच्छिमारांना डिझेल परतावा देण्यासाठी २०२१-२२ मध्ये ६० कोटी रुपये अर्थसंकल्पीय निधीची तरतूद केली होती. पुरक मागणीद्वारे ५० कोटीचा निधी त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

असुधारित प्रत

श्री.शंभुराज देसाई .....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड व श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांना मी सांगू इच्छितो की, नागपूर करारानुसार नागपूर येथे दोन वर्ष अधिवेशन झालेले नाही ही वस्तुस्थिती आहे. नागपूरला अधिवेशन का झालेले नाही हे राज्यमंत्री म्हणून मी या सभागृहात सांगण्यापेक्षा कामकाज सल्लागार समितीमध्ये याबाबत चर्चा होत असते, सर्व गटनेते व सर्वपक्षीय नेते त्या बैठकीत उपस्थित असतात. दोन वर्षे कोविडची पार्श्वभूमी आपणास माहिती आहे. केवळ त्याच कारणामुळे नागपूरला अधिवेशन होऊ शकले नाही. परंतु अधिवेशन नागपूर झाले नसले तरी महाविकास आघाडीचे सरकार व मुख्यमंत्री महोदय कोणत्याही विभागावर अन्याय करण्याची भूमिका घेणार नाही. आम्हाला आठवते व मागील पाच वर्षाच्या काळात आम्ही पाहिले की, पेड पेंडींग कनेक्शन हा माजी उर्जामंत्री श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांचेशी संबंधित विभाग होता. आमच्या भागातील पेड पेंडींग कनेक्शन त्या काळात २०१८-२०१९ पर्यतची पेंडींग असायची, तुमच्या विभागात पाहिले तर तुम्ही आमच्या फार पाठीमागे नसायचा. आता पाहिले तर आपल्याकडील कनेक्शनचा बॅकलॉग मोठया प्रमाणावर भरुन निघाला आहे, आमच्याकडील बॅकलॉग काही प्रमाणात वाढायला लागला आहे. पण महाविकास आघाडीचे सरकार विभागीय असमतोल होऊ देणार नाही. काल खालच्या व आज वरच्या सभागृहात विजेच्या प्रश्नावर चर्चा झाली, अनेक सन्माननीय सदस्यांनी हा मुद्दा उपस्थित केला, उर्जामंत्री महोदयांनी सांगितले की, तीन महिने शेतकऱ्याचे पीक विकून त्याच्या हातात पैसा येईपर्यत विजेचे कनेक्शन तोडणार नाही. मध्यंतरीच्या काळात तोडले असतील तर लगेच जोडून देऊ. तशी प्रक्रिया कालपासून सुरु झालेली आहे. मी मुंबईत असलो तरी मतदारसंघातून मी स्वत: माहिती घेतली आहे. कापलेली कनेक्शन महावितरणने जोडण्यास सुरुवात केलेली आहे. कोणाचेही कनेक्शन तोडू नका असे आदेश सरकारकडून देण्यात आलेले आहेत. सन्माननीय सदस्य अभिजीत वंजारी यांनी संज तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठास १०० कोटी रुपयांची तरतूद करावी असे सांगितले, मी याबाबतची माहिती उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून घेतली आहे. विद्यापीठाकडून उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे याचा प्रस्ताव अद्याप आलेला नाही.

श्री.शंभुराज देसाई .....

त्यांना काय अपेक्षीत आहे याचा प्रस्ताव आला पाहिजे. प्रस्ताव आल्यावर उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदयांकडे आपण बैठक आयोजित करु. आपण पाठपुरावा करुन गती दिली तर सरकार याबाबत निश्चित सकारात्मक राहिल. आर्कीटेक्ट कॉलेज औरंगाबादची मागणी पूर्ण करण्याबाबत मी आपणास सांगू इच्छितो की, औरगाबाद येथे स्कूल ऑफ प्लॅनिंग व आर्कीटेक्टचर स्थापन करण्याकरीता दिनांक १०.१.२०१९ च्या पत्रान्वये सविस्तर प्रस्ताव, तसेच दिनांक ९.४.२०१९ च्या पत्रान्वये सविस्तर अहवाल केंद्र शासनास सादर करण्यात आलेला आहे. या संस्था स्थापनेकरीता उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदयांनी ऑगस्ट २०२० मध्ये बैठक घेतली व त्याला गती देण्याचे काम केले जात आहे.

सभापती महोदय, मराठी भाषा भवनबाबत अर्थसंकल्पात देखील उल्लेख आहे, चर्नी रोडला मोठे मराठी भाषा भवन बांधत आहोत. नवी मुंबई येथे उपकेंद्र बांधकाम करण्याचे काम राज्य सरकारकडून हाती घेत आहे. सन्माननीय सदस्य श्री. नरेंद्र दराडे यांनी जात पडताळणी समित्यांबाबत विचारले होते, त्यांच्या सूचनेचा निश्चित विचार केला जाईल. सन्माननीय सदस्य अंबादास दानवे यांनी मालोजी राजेंचे जन्मगाव असलेल्या गावचा उल्लेख केलेला आहे, ही बाब संबंधित मंत्री महोदयांच्या निदर्शनास निश्चितपणे आणून दिली जाईल.

सन्माननीय सदस्य श्री.विलास पोतनीस यांना सांगू इच्छितो की, महाराष्ट्र सरकारने वन ट्रीलीयन अर्थव्यवस्थेकडे जाण्याचा उल्लेख केलेला आहे, पर्यटनासाठी केलेली तरतूद, मराठी भाषेला अभिजात भाषेला दर्जा देण्याबाबतच्या सूचना आहेत, त्यांनी दिलेल्या सकारात्मक सूचनांबाबत राज्य सरकार सकारात्मक विचार करेल. सन्माननीय सदस्य कपिल पाटील यांना सांगू इच्छितो की, शिक्षकांचे पगार एक तारखेला व्हायचे. आता होत नाही असे सांगितले जाते. सातत्याने आपण या विषयी आग्रही असता, यापूर्वी सरकारने वेळोवेळी काही निर्देश दिलेले आहेत. मागील दीड दोन वर्षातील परिस्थती आपणा सर्वांना माहिती आहे. आम्ही दर पंधरा दिवसाला पाहतो की, तिजोरीत अपेक्षीत महसूल जमा झाला आहे का. थोडया आर्थिक

असुधारित प्रत

श्री.शंभुराज देसाई .....

अडचणी असल्याने काही बाबी घडल्या असतील. खालच्या स्तरावर अडचणी असतील तर माझ्या स्तरावर याकरीता मी बैठक घेईन. पण राज्य सरकारने यापूर्वी जे आदेश निर्गमित केले असतील त्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाला तशा सूचना दिल्या जातील. फिल्डवर विभाग स्तरावर किंवा जिल्हा स्तरावर अंमलबजावणी करण्यास दिरंगाई होत असेल किंवा तांत्रिक अडचणी असतील तर अधिवेशन संपल्यावर माझ्यासमवेत त्यांची एक बैठक निश्चितपणे आयोजित करु.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत आसगावकर व डॉ. परिणय फुके सभागृहात उपस्थित दिसत नाहीत. सन्माननीय सदस्या डॉ.प्रज्ञा सातव यांनी हिंगोलीतील महिलांच्या वतीने सरकारचे आभार मानले आहेत. मराठी भाषा भवन करीता आपण काही चांगल्या सूचना केलेल्या आहेत. आपण नव्याने सभागृहात आलेल्या असला तरी आपण चर्चेत चांगला सहभाग घेतला आहे, आपण केलेल्या चांगल्या सूचनांचा राज्य सरकार निश्चितपणे विचार करेन.

सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांना सांगू इच्छितो की, जलसंपदा विभागाचा अकोला जिल्हयातील प्रकल्प ९७ टक्के पूर्ण झाला आहे, ३ टक्के कामामुळे व ठेकेदाराच्या दिरंगाईमुळे काम झाले नाही, तीन वर्षे सिंचनाची सुविधा त्या शेतकऱ्यांना मिळू शकली नाही, ही बाब गंभीर आहे. आपल्या सारख्या अभ्यासू सदस्याने राज्याचा मंत्री म्हणून काम केलेले आहे. या प्रकल्पाचे नाव व वस्तुस्थिती आपण मला सांगितली तर जलसंपदा मंत्री महोदयांशी मी स्वत: चर्चा करीन. ठेकेदार जाणीवपूर्वक दिरंगाई करीत असेल तर मुदतीत त्याने काम पूर्ण करावे अशा सूचना जलसंपदा विभागामार्फत ठेकेदारास दिल्या जातील. हा प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी जे करावे लागेल ते करण्यासाठी निश्चितपणे सकारात्मक निर्णय राज्य सरकार घेईन.

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

श्री.शंभुराज देसाई.......

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील म्हणाले की, कौशल्य विकास योजना गतीने करावी. या विभागाचे आपण देखील पूर्वीच्या सरकारमध्ये राज्यमंत्री होतात, त्याचप्रमाणे आज तो विभाग माझ्याकडे आहे. मी सातत्याने या विभागात चांगल्या सुधारणा करुन अधिकाधिक ग्रामीण भागामध्ये हा विभाग घेऊन जाण्याचा प्रयत्न गेल्या दोन वर्षापासून प्रयत्न करत आहे. यापूर्वी या विभागासंदर्भातील कार्यवाही बाबत मी काही बोलणार नाही. स्कील डेव्हलपमेंट कोर्सेस मेट्रोपोलिटियन सिटीमध्ये, कॉर्पोरेशन शहरांमध्येच होत होते. परंतु हे कोर्सेस तालुका पातळीवर देखील झाले पाहिजे, याकरिता मी प्रयत्न करीत आहे. याकरिता सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या सूचना अतिशय चांगल्या आहेत. कोविडमुळे ऑफलाईन क्लासेस घेता येत नव्हते. आता ऑफलाईन क्लासेस सुरु झालेले आहेत. याबाबत संबंधितांना अधिकचे टार्गेट देण्यात येईल. या अर्थसंकल्पामध्ये कौशल्य विकासाकरिता चांगली तरतूद प्रस्तावित केलेली आहे. या विभागाच्या योजनांना गती देण्याचे काम करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांनी ओपन जेल, आटपाडी तालुका, स्वतंत्रपूर याबाबत उल्लेख केलेला आहे. हे जर असे असेल आणि ती पूर्वीची योजना काही कारणामुळे ती थांबली असेल तर मी स्वत: याबाबत लक्ष घालेल. अधिवेशन संपल्यानंतर वाटले तर मी स्वत: त्या भागातील आमदार सन्माननीय श्री.अनिल बाबर साहेबांकडे जाणारच आहे, तेथे गेल्यानंतर एकदा जरुर त्या परिसराला स्वत: भेट देईल. ज्या काही सुधारणा तेथे कराव्या लागतील, त्या मी निश्चितपणे करण्याचा प्रयत्न करेल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र दराडे यांनी उल्लेख केला की, काल रोजी नाशिक शहरात एका वादा संदर्भात काही नागरिक पोलीस स्टेशनमध्ये गेले होते. पोलीस स्टेशनमधील काही कर्मचाऱ्यांनी त्यांच्याबरोबर गैरवर्तन केले, ते नशेमध्ये होते. सन्माननीय सदस्य आता सभागृहात उपस्थित नाहीत. परंतु ते जाताना मला भेटून याबाबत सांगून गेले. मी या संदर्भात निश्चित योग्य ती कारवाई करेल.

असुधारित प्रत

श्री.शंभुराज देसाई.......

मी संबंधित जिल्हा पोलीस अधीक्षक,पोलीस आयुक्त यांच्याबरोबर बोलून याची सखोल चौकशी करुन याबाबत निश्चितपणे योग्य ती कारवाई करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी उल्लेख केला की, २०१९ ची एक जुनी केस आहे, त्यावेळी गुन्हा दाखल झाला होता, याबाबत एसपी यांना मी सांगितले होते. पालकमंत्री महोदयांनी याबाबत बैठक घेतली होती. परंतु मी याबाबत विभागाकडून माहिती घेतलेली आहे. त्यानुसार ते सबज्युडिस्ड मॅटर आहे. कोर्टामध्ये चार्जशीट गेलेली आहे. त्यामुळे आता याबाबत आऊट ऑफ कोर्ट सेटलमेंट कितपत शक्य आहे, मला माहिती नाही. परंतु तरीदेखील सन्माननीय सदस्यांकडून याबाबतची अधिकची माहिती घेऊन पोलीस अधीक्षक, रेंज आय.जी. यांच्याबरोबर याबाबत चर्चा करुन आऊट ऑफ कोर्ट सेटलमेंट करुन जी मुले नोकरीच्या परीक्षेला बसलेली आहेत, याबाबत कोर्टाचा मान राखून जे बेस्ट टू सोल्यूशन यात निघत असेल, ते निश्चितपणे करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी गृह विभागावर बोलताना अनेक मोठया कंपन्या या सीएसआरचे पैसे हे कोविड पार्श्वभूमीवर पोलिसांना देण्याकरिता तयार झाल्या होत्या. काही कंपन्यांनी ११२ ची व्हेईकल्स घेऊन दिली. काही कंपन्यांनी बीट मार्शलकरिता दोन-चाकी गाडया दिलेल्या आहेत. या सीएसआर कंपन्यांचे नेहमीकरिता असे म्हणणे असते की, आम्ही बाजारात जाऊन गाडी खरेदी करायची, आम्ही जाऊन काहीतरी आणून तुम्हाला द्यायचे, त्याच्याऐवजी आमचा सीएसआर फंड अधिकृत आहे. केंद्राने याबाबतीतील डायरेक्शन्स दिलेल्या आहेत. यासंदर्भात काही सन्माननीय सदस्यांनी सूचना मांडलेल्या आहेत. गृह विभागाने काही डायरेक्शन्स तयार करावी. गृह विभागाने एक नियमावली तयार करावी. या या नियमावलीला अनुसरुन कंपन्यांचे सीएसआर देखील पोलीस वेल्फेअरकरिता घेता येतील. याबाबत माझे स्वत:चे मत असे आहे की, एखाद्या कंपनीचे सीएसआर त्या जिल्हयातील किंवा त्या कमिशनरेटमधील पोलीस स्टेशनमध्ये देताना त्या कंपनीचा कोणताही वाद पोलिसांकडे प्रलंबित नसावा, सन्माननीय सदस्य डॉ.रणजित

श्री.शंभुराज देसाई.....

पाटील आपणही त्या खात्याचे मंत्री होता, अशी काही नियमावली या अनुषंगाने जर तयार करता आली तर डी.जी., अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग यांना बोलावून याबाबतीतील नियमावली देखील तयार केली जाईल. गृह मंत्रीमहोदय, उप मुख्यमंत्री महोदय, मुख्यमंत्री महोदय या तिघांसमवेत याबाबत चर्चा करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी रोजगार हमी योजनेबाबतचा मुद्दा मांडला होता. माननीय रोजगार हमी योजना मंत्री सभागृहात उपस्थित होते. त्यांच्याशी मी याबाबत चर्चा केली. ते देखील म्हणाले की, बऱ्याचदा परिपूर्ण प्रस्ताव उपलब्ध होत नाहीत. परंतु जसजसे प्रस्ताव प्राप्त होतील, तसतसे निधीचे वितरण देखील केले जाईल. रोजगार हमी योजना मंत्री यांच्याबरोबर सन्माननीय सदस्यांच्या विषयांची स्वतंत्र बैठक आपल्या दालनात घेऊ.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरुण लाड यांनी शिक्षण संस्थांमधील नोकर भरतीच्या बाबतीतील विषय उपस्थित केलेला आहे. त्याबाबत कोविड पार्श्वभूमीवर शासनाने आरोग्य विभाग,गृह विभाग या दोन विभागांच्या भरत्यांना मान्यता दिलेली आहे. आता हळूहळू कोविडची परिस्थिती निवळायला लागलेली आहे. माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री या दोघांशीही चर्चा करुन याबाबतीत देखील निश्चितपणे सकारात्मक निर्णय घेण्याचा प्रयत्न केला जाईल.

सभापती महोदय, वाईच्या पाठशाळेबाबत सन्माननीय आमदार महोदयांबाबत बैठक घेण्यात येईल. सभापती महोदय, आपल्याकडे वाईच्या पाठशाळेबाबत संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून बैठक बोलावून त्यात सकारात्मक निर्णय घेण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.निलय नाईक यांनी ज्या पोहरादेवी देवस्थानचा उल्लेख केला. मी त्या जिल्हयाचा पालकमंत्री आहे. आमचे सहकारी मित्र श्री.संजय राठोड साहेबांनी प्रयत्न करुन पोहरा देवी देवस्थानचा आराखडा तयार

असुधारित प्रत

श्री.शंभुराज देसाई.......

केलेला आहे. त्या आराखडयाच्या प्रारुपाला मान्यता दिली गेली, त्यापैकी काही काम सुरु देखील झाले.....(अडथळा)

ॲड निलय नाईक ( खाली बसून ): सभापती महोदय, याकरिता मागील सरकारच्या काळात माननीय श्री.देवेंद्र फडणवीस साहेबांनी १०० कोटी रुपये दिले होते.

श्री.शंभुराज देसाई : सन्माननीय सदस्यांनी खाली बसून बोलू नये. आमचे सहकारी श्री.संजय राठोड यांनी देखील याकरिता प्रयत्न केलेला आहे. आपणही याकरिता प्रयत्न केलेले आहे. याकरिता निधी कमी आहे. निधी कमी असला तरीही याबाबतीतील मी स्वत: बैठक घेतलेली आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी याकरिता निधी वाढवून देण्याचे मान्य केलेले आहे. या पोहरादेवी देवस्थानाकरिता माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेने वाढीव निधी देखील उपलब्ध करुन दिला जाईल.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पावर अनेक मान्यवर सदस्यांनी येथे आपापली मते व्यक्त केलेली आहेत. आर्थिक अडचण असतानाही आर्थिक शिस्त लावून या राज्याची आर्थिक घडी सुस्थितीत ठेवण्याचा प्रयत्न महाविकास आघाडीचे नेते आदरणीय श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्त्वाखाली आम्ही केलेले आहे. वित्त विभागामध्ये राज्याचे माननीय मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री यांनी गेली दोन-अडीच वर्षे जी शिस्त विभागामध्ये ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. ती आर्थिक शिस्त कायम ठेवून राज्य प्रगतीच्या दिशेने पुढे नेण्याचा प्रयत्न महाविकास आघाडी शासनाचा राहील. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

**सभापती :** सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा आता संपली आहे.

असुधारित प्रत

## सभागृहाच्या कामकाजाबाबत

**सभापती :** मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, उद्या गुरुवार,दिनांक १७ मार्च,२०२२ रोजी सभागृहाची बैठक होणार नाही.

तसेच, आजच्या कामकाज पत्रिकेत दाखविण्यात आलेल्या सर्व अर्धा-तास चर्चेच्या सूचना पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत.

सभागृहापुढील सर्व कामकाज संपलेले आहे. आता मी सभागृहाची बैठक स्थगित करीत आहे. सभागृहाची बैठक सोमवार, दिनांक २१ मार्च,२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता पुन्हा भरेल. सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. सदरहू विशेष बैठकीत लक्षवेधी सूचना चर्चेस घेण्यात येतील. त्यानंतर दुपारी १२.०० वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी ५ वाजून १८ मिनिटांनी सोमवार,दिनांक २१ मार्च,२०२२ च्या सकाळी १० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------------

असुधारित प्रत